CMYK

सोलापूर

SOLAPUR TARUN BHARAT

तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

आसमंतसह

सोलापूर | रविवार, १६ फेब्रुवारी २०२५ । युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक १०० । पाने १२ । किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com

महत्त्वाचे

'भेल'ला ६,७०० कोटींची ऑर्डर

मुंबई : सार्वजनिक अवजड उद्योग क्षेत्रातील दिग्गज कंपनी भारत हेवी इलेक्ट्रिकल्सला ६,७०० कोटी रुपयांची मोठी ऑर्डर मिळाली आहे. शुक्रवारी बाजार बंद झाल्यानंतर कंपनीने शेअर बाजारांना दिलेल्या माहितीत म्हटले की, त्यांना सिंगारेनी कोलियरीज कंपनी लिमिटेडकडून औष्णिक वीज प्रकल्पासाठी ऑर्डर मिळाली असून, हा प्रकल्प तेलंगणामध्ये आहे. शुक्रवारी हा शेअर ४.२५ टक्क्यांच्या घसरणीसह १९३ रुपयांवर बंद झाला. सोमवारी बाजार उघडल्यावर शेअरमध्ये मोठा चढ-उतार दिसू शकतो. सध्या शेअर त्याच्या उच्चांकापेक्षा ४३ टक्क्यांनी खाली आला. भेल कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या माहितीनुसार, भेलला पुढील ४८महिन्यांत हा ऑर्डर पूर्ण करायची आहे. ६,७०० कोटी रुपयांची ही ऑर्डर ईपीसी म्हणजेच अभियांत्रिकी, खरेदी आणि बांधकाम संबंधित आहे. यामध्ये बॉयलर, टर्बाइन, जनरेटर आणि संबंधित घटकांचा पुरवठा समाविष्ट आहे. ■

अलाहाबादियाचा फोन 'स्विच्ड ऑफ'

मुंबई : 'इंडियाज गॉट लॅटेंट'मध्ये आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या रणवीर अलाहाबादियाचा फोन स्विच्ड ऑफ असल्याने मुंबई पोलिसांना त्याचा माग काढता आला नाही. दुसरीकडे, विनोदी कलावंत समय रैना याला या प्रकरणी बयाण नोंदवण्यासाठी १० मार्चपर्यंत मुदत देण्यात आली, अशी माहिती एका अधिकाऱ्याने शनिवारी दिली. युट्युबवरील इंडियाज गॉट लॅटेंट या कार्यक्रमात रणवीर अलाहाबादियाने अत्यंत आक्षेपार्ह वक्तव्य केले होते. याविरोधात मोठ्या प्रमाणात संताप व्यक्त करण्यात आल्यानंतर हा एपिसोड युट्युबवरून हटवण्यात आला. अलाहाबादियासोबत संपर्क स्थापन करण्यात खार पोलिसांना यश मिळाले नाही, असे अधिकाऱ्याने सांगितले. समय रैना सध्या अमेरिकेत असल्याने त्याच्या वकिलांनी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांची भेट घेऊन बयाण नोंदवण्यासाठी मुदत मागितली. त्यांच्या विनंतीनुसार पोलिसांनी हजर होण्यासाठी १० मार्चपर्यंतची मुदत दिली आहे. या प्रकरणी भाजपाच्या पदाधिकाऱ्याने दाखल केलेल्या तक्रारीच्या आधारे आतापर्यंत पोलिसांनी आठ जणांचे बयाण नोंदवून घेतले आहेत. यात मखिजा, चंचलानी आणि अलाहाबादियाच्या व्यवस्थापकाचा समावेश आहे. मात्र, अद्याप एफआयआर दाखल केलेला नाही.

सीबीएसई दहावी, बारावीची परीक्षा सुरू

नवी दिल्ली : केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ अर्थात् सीबीएसई बोर्डाची दहावी-बारावीची परीक्षा शनिवारपासून सुरू झाली. देश-विदेशातील ७,८०० केंद्रांवरून ४२ लाखांपेक्षा जास्त विद्यार्थी ही परीक्षा देत आहेत. दहावीचे २४.१२ लाख विद्यार्थी ८४ विषयांची परीक्षा देतील, तर बारावीचे १७.८८ लाखांपेक्षा जास्त विद्यार्थी बारावीच्या १२० विषयांची परीक्षा देतील, अशी माहिती बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी दिली. भारतातील ७,८४२, तर विदेशातील २६ केंद्रांवर ही परीक्षा होत आहे. सीबीएसई बोर्ड परीक्षेच्या पहिल्या दिवशी दहावीच्या विद्यार्थ्यांनी इंग्रजीचा पेपर दिला. बारावीच्या विद्यार्थ्यांनी उद्योजकतेची परीक्षा दिली. दहावीची परीक्षा १८ मार्च रोजी, तर बारावीची परीक्षा ४ एप्रिल रोजी संपणार आहे. ■

तीन इस्रायली ओलिसांना हमासने केले मुक्त

तेलअवीव : इस्रायल आणि हमास यांच्यातील युद्धबंदी करारानुसार, हमासने शनिवारी ३ इस्रायली ओलिसांना मुक्त केले. त्यानंतर इस्रायलने ३६९ पॅलेस्टिनी कैद्यांना मुक्त केले आहे. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेत्यान्याहू आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हमासला ओलिसांना मुक्त करण्यासाठी शनिवारपर्यंतची मुदत दिली होती. ओलिसांना मुक्त न केल्यास युद्धबंदीचा करार संपुष्टात येणार असल्याचा इशारा दिला होता. ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने केलेल्या हल्ल्यानंतर इस्रायलीनागरिकांचे अपहरण केले होते. ओलिसांना मुक्त करण्याच्या शर्तीवर इस्रायलने युद्धबंदीची घोषणा केली. त्याबदल्यात पॅलेस्टिनी कैद्यांना मुक्त करण्याचे ठरले होते.

जिल्हा परिषदेचे अधिकारी विवेक लिंगराजसह तिघांचा अपघाती मृत्यू

बोरामणी नाक्या जवळील शनिवारी रात्रीची घटना; सातजण जखमी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-

हैदराबादच्या दिशेने निघालेल्या बलकरने दुचाकीला धडक दिली आणि चुकीच्या दिशेने जात ट्रक बांधणीच्या कारखान्यात तोच बलकर घुसल्याने झालेल्या अपघातात तिघे ठार तर सातजण जखमी झाले आहेत. विवेकानंद (विवेक) लिंगराज यांचाही मृतामध्ये समावेश असून ते जिल्हा परिषद कृषी विभागात प्रशासन अधिकारी पदावर कार्यरत होते. तसेच गॅरेजमध्ये काम करणाऱ्या मुलाचा या अपघातात मृत्यू झाला तर वडील जखमी झाले आहेत.

ही घटना शनिवारी सायंकाळी सव्वासहाच्या सुमारास हैदराबाद नाक्याजवळ घडली. तोहिद माजीद कुरेशी (वय ३०, रा. सर्वोदय नगर, सोलापूर) आसिफ चाँदभाशा बागवान (वय ४५, रा. हैदराबाद रोड, सोलापूर), विवेकानंद राजकुमार लिंगराज (वय ५२, रा. सतनाम चौक, उत्तर सदर बझार, लष्कर सोलापूर) अशी मृतांची नावे आहेत. वाजिद अलीम कुरेशी (वय ४९, रा. सर्वोदय नगर), मजीद महबूब चौधरी (वय ३६, रा. सर्वोदय नगर), करीम बादशहा बेपारी (वय २८, रा. मैंदर्गी, ता. अक्कलकोट) यांच्यासह आणखी तीन ते चार जणांचा जखमीत समावेश असल्याचे समजते. बलकर (क्र. एम. एच. ४४/ यु. ७४९५) हा सोलापूरहून हैदराबादच्या दिशेने निघाला होता. हैदराबाद नाक्याजवळ समोरून चाललेल्या दुचाकीवरी आसिफ बागवान यास पाठीमागून जोरदार धडक दिली. त्यामध्ये ते जागीच ठार झाले. त्यानंतर बलकरचा टायर फुटल्याने चालकाचा त्यावरील ताबा सुटला. त्यामुळे बलकर दुभाजक ओलांडून थेट तोहिद बॉडी बिल्डर या ट्रक बांधणी करणाऱ्या कारखान्यात घुसला. बॉडी बिल्डर कारखान्यासमोर काही वाहने उभी होती. त्या वाहनांना बलकने जोरात धडक दिली. त्यामुळे वाहने एकमेकात अडकली होती.

मयत विवेक लिंगराज

मयत आसिफ बागवान

बलकरच्या धडकेने दुचाकीस्वार असिफ बागवान हा जागीच ठार झाला तर बलकर कारखान्यात घुसल्यामुळे कारखान्यातील तोहीद वाजीद व माजिद हे तिघेजण गंभीर जखमी झाले. यापैकी तोहीद हा जागीच ठार झाला तर अन्य दोघे जखमी झाले. करीम व विवेकानंद हे दोघे रस्त्याच्या कडेला थांबले होते. या अपघातात दोघेही गंभीर जखमी झाले. यापैकी विवेकानंद हाही जागीच ठार झाला. यातील चारही जखमींना उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे. उर्वरित तीन-चार जखमींना शहरातील खासगी रुग्णालयात दाखल केल्याचे घटनास्थळावरील नागरिकांनी सांगितले. अपघातानंतर बलकर चालकाने पलायन केले. अपघाताची माहिती मिळताच जोडभावी पेठ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुहास चव्हाण, एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रमोद वाघमारे यांनी कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. तसेच अपघातग्रस्त वाहने बाहेर काढून रस्ता मोकळा केला. याप्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते. अपघातानंतर शासकीय रुग्णालयात मृत व जखमींच्या नातेवाईकांनी मोठी गर्दी केली होती. मृतांच्या नातेवाईकांनी हंबरडा फोडला.

विवेक लिंगराज लोकप्रिय अधिकारी व संघटनेचे नेता

विवेक लिंगराज हे जिल्हा परिषदेतील लोकप्रिय अधिकारी तर होतेच परंतु ते जिल्हा परिषद कर्मचारी संघटनेचे लोकप्रिय नेतेही होते. कर्मचाऱ्यांच्या हितासाठी सातत्याने आवाज उठविणारे लढवय्ये नेतृत्व होते. जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्थेच्या यशात आणि नावलौकिक वाढविण्यात विवेक लिंगराज यांचा सिंहाचा वाटा होता.

रुग्णालय, घटनास्थळी बघ्यांची मोठी गर्दी

घटनास्थळी गर्दी एवढी वाढली होती की पोलिसांनी जमावाला पांगवले. रात्री उशिरापर्यंत शासकीय रुग्णालय परिसरात मृत व जखमींच्या नातेवाईकांची गर्दी होती. आ. विजयकुमार देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त यशवंत गवारी, सदर बजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजित लकडे यांनी शासकीय रुग्णालयात येऊन मृत व जखमींच्या नातेवाईकांचे सांत्वन केले.

चालक, वाहक नशेत तर्रर

बलकरचा चालक घटनेनंतर पळून गेले. ते नशेत तर्रर होते. त्यांना चालताही येत नव्हते. यामुळेच चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने हा अपघात घडल्याचे प्रत्यक्षदर्शींनि सांगितले.

राज्यात लागू होणार लव्ह जिहाद, धर्मांतरण विरोधी कायदा

मुंबई, १५ फेब्रुवारी,

राज्यात लव्ह जिहादच्या वाढत्या घटनांच्या पृष्ठभूमीवर लव्ह जिहाद व फसवणूक, बळाचा वापर करून केलेले धर्मांतरण रोखण्यासाठी कायदा करण्यात येणार आहे. यासाठी राज्य सरकारने पोलिस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष समिती गठित केली आहे.

ही समिती राज्यातील सध्याच्या परिस्थितीचा अभ्यास करून आणि उपाययोजना सुचवून कायद्याचा मसूदा तयार करणार आहे. त्यामुळे लव्ह जिहादच्या विरोधात कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील दहावे राज्य ठरणार आहे. देशात आतापर्यंत उत्तरप्रदेश, हरयाणा, हिमाचल प्रदेश, गुजरात, झारखंड, मध्यप्रदेश, उत्तराखंड, ओडिसा आणि छत्तीसगड या नऊ राज्यांनी लव्ह जिहादविरोधी कायदा आणला आहे. या धर्तीवर महाराष्ट्रातही लव्ह जिहाद कायदा लागू करण्याची मागणी भाजपा नेते आणि मंत्री नितेश राणे यांच्यासह राज्यातील विविध हिंदू संघटनांनी केली होती. राज्यातल्या धर्मांतराच्या तक्रारीनंतर या विरोधात कायदा करण्याची ग्वाही तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली होती. त्यानुसार राज्य सरकारने एक विशेष समिती गठित केली आहे. ही समिती कायदेशीर बाबींचा अभ्यास करून सरकारला कायद्याचा मसुदा तयार करून देणार आहे. राज्याच्या पोलिस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या या समितीत महिला व बालकल्याण विभागाचे सचिव, अल्पसंख्यक विकास विभागाचे सचिव, विधी व न्याय विभागाचे सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव, गृहविभागाचे सचिव तसेच गृह विभागाचे (विधी) सचिव हे सदस्य असणार आहेत.

छत्तीसगड स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपाचा झेंडा

रायपूर, १५ फेब्रुवारी,

छत्तीसगडमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत भाजपाने जबरदस्त कामगिरी करीत काँग्रेसचा सुपडा साफ केला.

छत्तीसगडमध्ये १० नगरपालिका, ४९ नगर परिषद आणि ११४ नगर पंचायतींच्या निवडणुकीसाठी ११ फेब्रुवारी रोजी मतदान झाले होते. भाजपाने सर्वच १० नगरपालिकांवर विजय मिळवला. खातेही न उघडण्याची नामुष्की या निवडणुकीत काँग्रेसवर आली आहे. ४९ नगर परिषदांपैकी ३५ भाजपाच्या ताब्यात आल्या, तर काँग्रेसला आठ जागांवर समाधान मानावे लागले.

अमेरिका दौऱ्यामागील मोदींचा उद्देश यशस्वी

अमेरिकी तज्ज्ञांचे मत

◆ **वॉशिंग्टन, १५ फेब्रुवारी**

अमेरिका दौऱ्यामागील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा उद्देश यशस्वी ठरला असल्याचे मत अमेरिकेतील तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प व नरेंद्र मोदी यांच्यातील द्विपक्षीय बैठकीत अनेक महत्त्वपूर्ण मुद्यांवर सकारात्मक चर्चा झाली. ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळात अमेरिका-भारत संबंध खूप चांगल्या पद्धतीने सुरू झाल्याचे संरक्षणापासून ते व्यापारापर्यंतच्या अनेक करारांवरून स्पष्ट झाले, असे अमेरिकी प्रशासनात यापूर्वी सेवा दिलेले अधिकारी ॲश्ले जे. टेलिस यांनी सांगितले.

अमेरिकेसाठी भारत एक उत्कृष्ट भागीदार आहे, हा विश्वास देण्यासाठी डोनाल्ड ट्रम्प राष्ट्राध्यक्ष झाल्यावर महिनाभरात मोदींनी अमेरिका दौरा केला आणि हा विश्वास देण्यात ते पूर्णतः यशस्वी ठरले, असे अमेरिकी परराष्ट्र आणि संरक्षण धोरणाते तज्ज्ञ टेलिस यांनी सांगितले.

ट्रम्प यांच्या व्यापार धोरणातून भारताला दिलासा मिळावा, हे नरेंद्र मोदी यांना सुनिश्चित करायचे होते. ट्रम्प यांच्यासारख्या व्यक्तीला राजी करणे सहजसोपे नाही, त्यामुळे मोदींचा हा दौरा जादूई होता. पत्रपरिषदेत दोन्ही जागतिक नेत्यांमधील संवाद पाहता, नरेंद्र मोदी यांनी ठेवलेले उद्देश पूर्णतः यशस्वी झाले, असे टेलिस यांनी सांगितले.

नरेंद्र मोदी यांच्या भेटीपूर्वी ट्रम्प यांनी 'रेसिप्रोकल टेरिफ'ची घोषणा केली आणि भारतही कर आकारणी करणाऱ्यांत आघाडीवर असल्याचे सांगितले. मात्र, दोन्ही नेत्यांनी संरक्षण करारांवर चर्चा केली आणि २०३० पर्यंत ५०० अब्ज डॉलर्सच्या द्विपक्षीय व्यापाराचे लक्ष्ये निर्धारित केले. यात भारताला अधिक लष्करी उपकरणांची विक्री आणि एफ-३५ विमान देण्याबाबत ट्रम्प यांनी दिलेल्या प्रस्तावाचा समावेश होता. याव्यतिरिक्त भारताने अमेरिकी तेल आणि वायू आयात करण्याबाबतही सहमती दर्शवली. यामुळे व्यापारातील तूट कमी होणार आहे. ◀(वृत्तसंस्था)

प्रयागराजच्या महाकुंभातील एका शिबिराला शनिवारी दुपारच्या सुमारास आग लागली. तथापि, अग्निशमन दलाच्या जवानांनी काही वेळातच ती आटोक्यात आणली

मुख्य निवडणूक आयुक्तांच्या निवडीसाठी उद्या बैठक

पंतप्रधान मोदींची राहणार उपस्थिती

◆ **नवी दिल्ली, १५ फेब्रुवारी**

देशाचे नव्या मुख्य निवडणूक आयुक्त (सीईसी) निवडण्यासाठी कायदा मंत्रालयाने सोमवारी तीन सदस्यीय समितीची बैठक बोलावली आहे. या बैठकीला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन मेघवाल आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी उपस्थित राहणार आहेत.

मुख्य निवडणूक आयुक्त पदासाठी निवडल्या जाणाऱ्या नावांमध्ये ज्ञानेश कुमार यांचे नाव आघाडीवर आहे. विद्यमान मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांचा कार्यकाळ १८ फेब्रुवारी रोजी संपत आहे.

अधिकृत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या सर्वोच्च पदासाठी मंत्रालयाने ४८० नावांपैकी पाच नावे पुढील चर्चेसाठी पाठवली आहेत. समिती या नावांचा विचार करेल. समितीच्या शिफारशीनंतर राष्ट्रपती नव्या मुख्य निवडणूक आयुक्तांची नियुक्ती करतील.

आतापर्यंत सर्वांत वरिष्ठ निवडणूक आयक्तांना मुख्य निवडणूक आयुक्त बनविण्याची परंपरा आहे. अशा परिस्थितीत सध्याचे निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना मुख्य निवडणूक आयुक्त होण्याची संधी मिळू शकते. राजीव कुमार यांच्यानंतर ज्ञानेश कुमार हे सर्वांत वरिष्ठ निवडणूक आयुक्त आहेत. त्यांची निवड झाली, तर त्यांचा कार्यकाळ २६ जानेवारी २०२९ पर्यंत राहील. सुखबीरसिंग संधू हे दुसरे निवडणूक आयुक्त आहेत. ◀(वृत्तसंस्था)

राजीव कुमार यांचा कार्यकाळ

» राजीव कुमार यांची मे २०२२ मध्ये मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या कार्यकाळात गेल्या वर्षी एप्रिलमध्ये झालेली लोकसभा निवडणूक आणि जम्मू-काश्मिरात एका दशकाहून अधिक काळातील पहिल्या विधानसभा निवडणुकीचा समावेश आहे तसेच २०२२ मध्ये राष्ट्रपतिपदासाठीची निवडणूक त्यांनी घेतली. झारखंड, महाराष्ट्र आणि दिल्ली विधानसभा निवडणूक त्यांच्याच कार्यकाळात पार पडली. ■

केजरीवालांचा शिशमहल आता सरकारी अतिथिगृह होणार

भाजपाचा नवा मुख्यमंत्री राहणार नाही या बंगल्यात

◆ **नवी दिल्ली, १५ फेब्रुवारी**

दिल्लीचा भाजपाचा नवा मुख्यमंत्री शिशमहल म्हणून बदनाम झालेल्या सरकारी बंगल्यात राहणार नाही, हे जवळपास स्पष्ट झाले आहे. त्यामुळे या बंगल्याचा उपयोग सरकारी अतिथिगृह (गेस्ट हाऊस) म्हणून करण्याचा विचार सुरू झाला आहे.

६ फ्लॅगस्टाफ रोड या बंगल्यात २०१५ पासून ऑक्टोबर २०२४ पर्यंत मुख्यमंत्री म्हणून अरविंद केजरीवाल यांचे वास्तव्य होते. आजूबाजूच्या चार बंगल्यांची जागा घेऊन तसे कोट्यवधी रुपयांचा खर्च करत केजरीवाल यांनी या बंगल्याचे नूतनीकरण केले. त्यावरून भाजपाने त्यांच्यावर जोरदार हल्ला चढवला होता. त्यानंतरच शिशमहल म्हणून हा बंगला ओळखला जाऊ लागला. केजरीवालांच्या विधानसभा निवडणुकीतील पराभवात या बंगल्याचे मोठे योगदान राहिले. त्यामुळे भाजपाने आपला नवा मुख्यमंत्री शिशमहलमध्ये राहायला जाणार नाही, हे स्पष्ट केले.

भाजपा नेते वीरेंद्र गुप्ता यांनी नायब राज्यपाल विनयकुमार सक्सेना यांना पत्र पाठवत शिशमहल ची विस्ताराची योजना रद्द करण्याची मागणी केली आहे. आजूबाजूच्या चार बंगल्यांची जागा घेत हा बंगला बनवण्यात आला होता. अर्वरित तीन बंगल्यांची जागा परत घेण्याची मागणी गुप्ता यांनी केली.

शिशमहलचा उपयोग दिल्ली सरकारचे अतिथिगृह (गेस्टहाऊस) म्हणून करण्याचा विचार आहे. भाजपाच्या नव्या मंत्रिमंडळाच्या पहिल्याच बैठकीत यासंदर्भातील निर्णय घेतला जाऊ शकतो.

मदनलाल खुराणा मुख्यमंत्रिपदावरून पायउतार झाल्यानंतर त्यांच्या ३३ शामनाथ मार्ग या बंगल्याचा उपयोग काही काळासाठी दिल्ली सरकारचे अतिथिगृह म्हणून करण्यात आला होता. पण त्यानंतर दिल्लीत सरकारचे अधिकृत अतिथिगृह नव्हते. त्यामुळे शिशमहल हे सरकारी अतिथिगृह करण्याचा प्रस्ताव भाजपाने मांडला आहे. या बंगल्याच्या नूतनीकरणाचा सुरुवातीचा खर्च ७ कोटी ९१ लाख होतो, तो वाढतवाढत ३३ कोटी ६६ लाखावर गेला. सरकारी पैशाची उधळपट्टी केल्याचा आरोप या मुद्यावरून भाजपाने केजरीवाल यांच्यावर केला होता. सीएजी अहवालातूनही केजरीवाल यांच्यावर ठपका ठेवण्यात आला होता. ◀(तभा वृत्तसेवा)

'सीव्हीसी'ने दिला शिशमहलच्या नूतनीकरणाच्या चौकशीचा आदेश

केजरीवालांचा पाय खोलात

◆ **नवी दिल्ली, १५ फेब्रुवारी**

दिल्ली विधानसभा निवडणुकीत पराभवाचा धक्का बसल्यानंतर आता आम आदमी पार्टीचे राष्ट्रीय संयोजक आणि माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अडचणी वाढताना दिसत आहेत. दिल्लीतील ६ फ्लॅग स्टाफ रोड येथील सरकारी बंगला शिशमहलच्या नूतनीकरणासाठी झालेल्या खर्चाची सखोल चौकशी करण्याचा आदेश केंद्रीय दक्षता आयोगाने (सीव्हीसी) केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाला दिला.

दिल्ली मुख्यमंत्री निवासस्थान शिशमहल हे ४०,००० चौरस यार्ड पेक्षा(८ एकर) जास्त जागेवर आहे. या बंगल्याच्या नूतनीकरणाचा आदेश केजरीवालांनी दिला होता. मात्र, नूतनीकरण करताना बांधकाम नियमांचे उल्लंघन झाल्याची तक्रार विजेंदर गुप्ता यांनी सीव्हीसीकडे दाखल केली होती.

गुप्ता यांच्या तक्रारीची घेतली दखल

५ नोव्हेंबर रोजी सीव्हीसीने गुप्ता यांच्या तक्रारीची दखल घेतली आणि आरोपांचे गांभीर्य मान्य केले. त्यानंतर ५ डिसेंबर रोजी सीपीडब्ल्यूडीच्या मुख्य दक्षता अधिकाऱ्यांनी विजेंद्र गुप्ता यांच्या तक्रारीवर आधारित तथ्यात्मक अहवाल सीव्हीसीला सादर केला होता. ◀(वृत्तसंस्था)

महत्त्वाचे

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे भविष्यात घडतील मोठे बदल : राष्ट्रपती

रांची : कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंगच्या क्षेत्रात होणारी प्रगती पाहता भविष्यात मोठे बदल घडतील, असे प्रतिपादन शनिवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केले. बिर्ला इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीने २०२३ मध्ये उच्च शिक्षणात कृत्रिम बुद्धीमत्तेला समाविष्ट करण्यासाठी पावले उचलली. ही एक अभिमानाची बाब असल्याचे त्या म्हणाल्या. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंगच्या क्षेत्रात होणारी प्रगती भविष्यात मोठे बदल घडवतील. भारत सरकार कृत्रिम बुद्धिमत्तेला उच्च शिक्षणात समाविष्ट करण्यासाठी पावले उचलत आहे. निर्माण होत असलेल्या तांत्रिक संधी उपेक्षित समुदायांनाही उपलब्ध करून दिल्या पाहिजे. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे मोठे परिवर्तन घडवून आणले जात आहे. याचा फायदा सर्वांनाच झाला पाहिजे, असे मुर्मू यांनी सांगितले. कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर करताना पारंपारिक ज्ञानाच्या आधाराकडे दुर्लक्ष करू नये. अनेकदा समस्यांना मोठ्या तांत्रिक हस्तक्षेपांची आवश्यकता नसते, असे त्यांनी सांगितले. शैक्षणिक उत्कृष्टता जपत संशोधन आणि तांत्रिक नवोपक्रमाची ७० वर्षे पूर्ण केली आहेत. ■

संतोष देशमुख प्रकरणात शेवटपर्यंत लढा देणारच : धस

बीड : मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण लावून धरणारे भाजप आमदार सुरेश धस यांनी या प्रकरणी चौफेर टीका सहन करणाऱ्या मंत्री धनंजय मुंडे यांची भेट घेतल्यामुळे एकच खळबळ माजली आहे. या भेटीवर विरोधकांकडून टीकेची उठल्यानंतर सुरेश धस यांनी आपली बाजू मांडली. जोपर्यंत संतोष देशमुखांच्या आरोपींना फाशी होणार नाही तोपर्यंत मी ठाम राहणार असल्याचे सुरेश धस म्हणालेत. या प्रकरणात मी शेवटपर्यंत लढा देणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. कुणीतरी अतिशय व्यवस्थितपणे यामध्ये षडयंत्र रचले आहे. ज्यांनी षडयंत्र रचले, त्यांचा मी बंदोबस्त करणार, असा इशाराही धस यांनी दिला. सुरेश धस म्हणाले, हे पेल्यामधील वादळ आहे. एक दोन दिवसांमध्ये शांत होईल. आमच्या पक्षाच्या प्रदेशाध्यक्षांनी आजही सांगितले की, सुरेश धस त्यांच्या म्हणण्यावर ठाम राहिले आहेत. मी आजही ठाम आहे, उद्याही राहील आणि जोपर्यंत या आरोपींना फाशी होणार नाही तोपर्यंत मी ठाम राहणार आहे. जर कुणाच्या मनाला ठोस पोहोचली असेल तर ती काढून टाका, या प्रकरणात मी शेवटपर्यंत लढा देणारच आहे.

दाढीवाल्यांना हलक्यात घेऊ नका; एकनाथ शिंदेंचा इशारा

रत्नागिरी : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या वतीने राज्यभरात आभार मेळावा आयोजित केला जात आहे. आज हा मेळावा कोकणातील रत्नागिरीत पार पडला. यावेळी एकनाथ शिंदे यांनी कोकणवासियांचे आभार मानले. विधानसभा निवडणुकीत दिलेल्या आशीर्वादामुळे मी तुमच्यासमोर नतमस्तक व्हायला आलो आहे, असे ते म्हणाले. शिवसेनेच्या विजयामध्ये कोकणी माणसाचा मोठा सिंहाचा वाटा आहे. एकही आमदार निवडून येणार नाही असे म्हणणाऱ्यांची बोलती महाराष्ट्राने बंद केली, अशा शब्दांत ठाकरे गटाला टोला लगावला. आज रत्नागिरी येथे आयोजित आभार मेळाव्यात माजी आमदार सुभाष बने, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष रोहन बने, पराग बने यांनी शनिवारी शिवसेनेत प्रवेश केला. तसेच माजी जिल्हा प्रमुख राजेंद्र महाडिक, जिल्हा प्रमुख विलास चाळके, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा रचना महाडिक यांनीही शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी एकनाथ शिंदे बोलत होते.

अजित पवारांची खंत, माझा भाऊच माझ्यासोबत नाही

जालना : उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माझा भाऊ सोबत नसल्याची खंत व्यक्त केली आहे. स्वतःच्या घरात काय जळतंय ते आधी बघावे, मग दुसऱ्यांच्या घराचा विचार करावा, असे मी पूर्वी रेटून बोलायचो, पण आता दबकत बोलतो. कारण आज माझा भाऊच माझ्यासोबत नाही, असे अजित पवार म्हणाले. ते आज जालन्यात बोलत होते. निवडणुकीत अजित पवार यांचे त्यांच्या भावासोबतचे ताणले गेलेले संबंध अद्यापही व्यवस्थित झाले नसल्याचे त्यांच्या विधानावरून दिसून येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतर पवार कुटुंबातही मोठी फूट पडली आहे. विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीतही पवार विरुद्ध पवार अशी लढत पाहायला मिळाली. निवडणुकीचा प्रचारादरम्यान एकमेकांवर टीका देखील करण्यात आली होती. विधानसभा निवडणुकीत बारामतीमध्ये अजित पवार यांच्या विरोधात त्यांचे पुतणे युगेंद्र पवार उभे होते. त्यावेळी युगेंद्र पवार यांचे वडील आणि अजित पवार यांचे सख्खे भाऊ श्रीनिवास पवार हे देखील आपल्या मुलाच्या बाजूने होते. त्यांनी अजित पवारांविरोधात भूमिका घेतली होती.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत काही निर्णय स्थानिक पातळीवरून

चंद्रशेखर बावनकुळे यांचे प्रतिपादन

◆ **मुंबई, १५ फेब्रुवारी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती म्हणूनच लढणार आहोत. तथापि, काही निर्णय स्थानिक परिस्थिती पाहून घेतले जातील, असे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले. छत्रपती संभाजीनगर येथे माध्यमाशी बोलताना ते म्हणाले, अजून मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते येतील आणि ज्या नेत्याला वाटतं की भाजपासोबत काम करायचं आहे ते नेते येतील. पक्षप्रवेश सुरू आहे.

२०१४-१९ या काळात ज्या पद्धतीने आम्ही काम केले, त्या पद्धतीचे काम आम्ही पूर्ण करू. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर लोक आता भारतीय जनता पार्टीमध्ये येत आहेत. चंद्रशेखर बावनकुळे सध्या संघटन पर्वासाठी महाराष्ट्राच्या प्रवासावर आहेत. त्यांनी विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्राचा प्रवास पूर्ण केला असून, रविवारी कोल्हापूर, पुणे करून मंगळवारी ते कोकण, ठाणे व मुंबई विभागातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांची कार्यशाळा घेणार आहेत. यावेळी प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण त्यांच्यासोबत आहेत.

महाराष्ट्रामध्ये आजपर्यंत एक कोटी १२ लाख प्राथमिक सदस्य पक्षाचे झाले असून, २८ तारखेपर्यंत दीड कोटी सदस्य संख्या असलेली आणि संपूर्ण डिजिटल रेकॉर्ड असलेली भाजपा ही पार्टी असेल असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त करून ते म्हणाले, देश व महाराष्ट्राच्या इतिहासातलं सर्वात मोठं संघटन पर्व आम्ही करतो आहे. ३ लक्ष कार्यकर्त्यांना आम्ही सक्रिय सदस्यता देतो आहोत.

बीड येथील संतोष देशमुख हत्या प्रकरण गंभीर असून यावरून भाजपाबाबत चुकीचे मत तयार करण्याचा काहींचा प्रयत्न होता. आम्ही राज्याला ज्या विकासाच्या मार्गावरून घेऊन जात आहोत त्यामध्येही अडथळा येत होता. नेत्यांमध्ये मतभेद असू शकतात पण मनभेद असता कामा नये. विकासाच्या मुद्यावर सर्वांनीच एकत्र येऊन काम करावे, यासाठी सुरेश धस आणि धनंजय मुंडे यांची भेट करण्यात आली, असे बावनकुळे म्हणाले.

◀(तभा वृत्तसेवा)

वाळू माफिया औषधालाही उरणार नाहीत..!

राज्यासाठी चांगले वाळू धोरण येत आहे. आमची अंतिम बैठक पुढच्या आठवड्यात होणार असून त्यामध्ये धोरण निश्चित होईल. सर्वसामान्य जनतेला स्वस्त दरात वाळू मिळेल. यामुळे वाळू माफिया यापुढे तयारच होणारच नाही, असा विश्वासही चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. ■

ईडीने गोठवला १,६४६ कोटींचा क्रिप्टो निधी

◆ **नवी दिल्ली, १५ फेब्रुवारी**

सिक्युरिटीज गुंतवणुकीच्या नावाखाली असंख्य ठेवीदारांना फसवण्यात आलेल्या गुंतवणूक योजनेच्या मनी लॉण्ड्रिंग चौकशीचा भाग म्हणून अंमलबजावणी संचालनालय अर्थात्? ईडीने १,६४६ कोटी रुपयांची सर्वांत मोठी क्रिप्टो करन्सी जप्त केली, असे अधिकृत सूत्रांनी सांगितले.

'बिटकनेक्ट लेंडिंग प्रोग्राम'द्वारे गुंतवणुकीच्या स्वरूपात फसव्या आणि नोफ्लदणीकृत नसलेल्या सिक्युरिटीज प्रस्ताव आणि विक्रीशी संबंधित प्रकरणात शनिवारी नव्याने छापे टाकल्यानंतर तपास यंत्रणेच्या अहमदाबाद कार्यालयाने १३.५० लाख रुपये रोख, एक एसयूव्ही आणि अनेक डिजिटल उपकरणे जप्त केली आहेत. बेकायदेशीर सावकारी प्रतिबंधक कायद्याच्या अंतर्गत दाखल करण्यात आलेला ईडीचा खटला, सुरत पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या एफआयआरवरून सुरू झाला आहे. यात नोव्हेंबर २०१६ ते जानेवारी २०१८ झालेल्या फसवणुकीचा उल्लेख आहे. ◀(वृत्तसंस्था)

मारेगावात जाणवले भूकंपाचे सौम्य धक्के

तालुक्यातील अनेक गावांचा समावेश

◆ **मारेगाव, १५ फेब्रुवारी**

शुक्रवार, १४ फेब्रुवारी रोजी रात्री १०.३० ते ११ च्यादरम्यान सर्व जण आपापल्या घरी शांततेने झोपलेले असताना मारेगाव तालुक्यातील अनेक गावांत भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले.

अनेकांना काय झाले कळलेच नाही. भीतीने सर्वच आपापल्या घराच्या बाहेर निघाले. ज्यांचे टीन आणि कौलांचे घर होते, त्यांच्या टीनांचा आवाज आला. काहींच्या घरी भांडे पडल्याचा आवाज झाला. नागरिकांना वाटले ब्लास्टिंगचा वगैरे आवाज असेल, मात्र नंतर कळले की हा भूकंपाचा सौम्य धक्का होता. त्यामुळे नागरिक भीतीने घराच्या बाहेर पडले. काहींनी तर संपूर्ण रात्र जागून काढल्याची चर्चा तालुक्यातील पिसगाव, कुंभा, सिंधी मांगरूळ, चिंचाळा तसेच अनेक गावांमध्ये होती.

मारेगाव तालुक्याला लागून भांडेवाडा ही भूमिगत खाण आहे. तिथे अनेकदा कोळसा काढण्याच्या वेळी ब्लास्टिंग केली जाते. ब्लास्टिंगचा आवाज आणि धक्का लोकांना परिचयाचा आहे. परंतु १४ फेब्रुवारीच्या रात्री अंदाजे १०.३० च्या सुमारास रात्री सगळे लोक घरी शांतपणे झोपलेले असताना अचानक जोराचा आवाज आला. काही लोकांच्या घरची भांडीसुद्धा पडल्याचे सांगण्यात आले. प्रशासकीय स्तरावरून हा धक्का भूकंपाचा की कशाचा, याची अजूनही पुष्टी केलेली नसली तरी नागरिकांच्या मनात भीतीचे वातावरण पसरले आहे.

सुरुवातीला हा धक्का ब्लास्टिंगचा असावा अशीही अनेकांना शंका आली. त्यामुळे नागरिकांनी जवळपास ब्लास्टिंगचे काम कोठे सुरू आहेत का, याची चौकशी केली. परंतु त्यांना कुठेही ब्लास्टिंग सुरू असल्याचे आढळले नाही.

याविषयी मारेगाव तहसीलचे तहसीलदार उत्तम निलावाड यांच्याशी संपर्क केला असता त्यांनीही अशा प्रकारचे मला कॉल आले. मी पिसगाव, सिंधी, कुंभा या गावांना भेटी देऊन चौकशी केली. तसेच याविषयी वरिष्ठ कार्यालयाला माहितीसुद्धा दिली असल्याचे सांगितले. ◀(तभा वृत्तसेवा)

केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान यांचे पुत्र कुणाल सिंह यांचा विवाह सोहळा शनिवारी पार पडला. यावेळी काढण्यात आलेले समूह छायाचित्र

महाकुंभासाठी जाणाऱ्या १० भाविकांचा अपघातात मृत्यू

◆ **प्रयागराज, १५ फेब्रुवारी**

शुक्रवारी रात्री उशिरा प्रयागराजच्या मेजा परिसरात महामार्गावर बसच्या समोरासमोर झालेल्या धडकेत बोलेरो कारमध्ये प्रवास करणाऱ्या दहा जणांचा मृत्यू झाला, असे पोलिसांनी शनिवारी सांगितले. छत्तीसगडच्या कोरबा जिल्ह्यातील भाविक महाकुंभात स्नान करण्यासाठी जात असताना महामार्गावर बोलेरो आणि बसची समोरासमोर धडक झाली.

बोलेरोमध्ये प्रवास करणाऱ्या सर्व दहा जणांचा अपघातात मृत्यू झाला. बसमधील लोकांना किरकोळ दुखापत झाली, असे पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. उत्तर देशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अपघातात झालेल्या जीवितहानीबद्दल एक्सवर पोस्ट करीत शोक व्यक्त केला आहे. जखमींना रुग्णालयात पाठविण्यात आले असून,त्यांच्यावर योग्य उपचार करण्याचा निर्देश मुख्यमंत्र्यांनी जिल्हा प्रशासनाला दिला आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शनिवारी प्रयागराज येथे झालेल्या अपघातात झालेल्या जीवितहानीबद्दल शोक व्यक्त केला आणि जखमींच्या लवकरात लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना केली. ◀(वृत्तसंस्था)

शाळकरी मुलीचा विनयभंग; एकावर गुन्हा

मंगळवेढा, दि.१५ फेब्रुवारी-

एका १७ वर्षीय शाळकरी मुलीचा शाळेला येता - जाता पाठलाग करुन तु मला खूप आवडतेस मला तुझ्यासोबत लग्न करावयाचे आहे असे म्हणून तिच्या मनाला लज्जा वाटेल असे कृत्य केल्याप्रकरणी दयानंद बापू लवटे (रा. तनाळी ता पंढरपुर) याच्याविरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील १७ वर्षीय अल्पवयीन फिर्यादी मुलगी ही दि.२९ जानेवारी ते १३ फेब्रुवारी दरम्यान एका शैक्षणिक संस्थेत शाळेला जाता येता तिचा पाठलाग करुन आरोपी दयानंद लवटे याने हात पकडून तु मला खूप आवडतेस, मला तुझ्यासोबत लग्न करावयाचे असे म्हणून तिच्या मनास लज्जा वाटेल असे कृत्य केल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक नागेश बनकर हे करीत आहेत.

बसच्या धडकेत दुचाकीस्वार पिता-पुत्री ठार

संतप्त नागरिकांनी ४ तास रस्ता रोखला

◆ **गोंदिया, १५ फेब्रुवारी**

भरधाव खाजगी बसने दुचाकीला दिलेल्या धडकेत दुचाकीस्वार पिता-पुत्रीचा जागीच मृत्यू झाल्याची घटना १४ फेब्रुवारी रोजी रात्री ९ च्या सुमारास महामार्ग क्रमांक ५३ वर देवजीटोला पुलाजवळ घडली. सूरजलाल वसाके व वेदिका सूरजलाल वसाके रा. देवरी अशी मृतांची नावे आहेत. अपघाताची माहिती मिळताच नागरिकांनी घटनास्थळ गाठून अग्रवाल ग्लोबल कंपनीविरोधात आंदोलन केले. यावेळी चार तास वाहतूक ठप्प होती. पोलिसांनी नागरिकांची समजूत काढून वाहतूक सुरळीत केली.

सूरजलाल वसाके व वेदिका वसाके

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वर बाह्मणी-खडकी गावाजळ महामार्गाचे काम सुरू आहे. कामाचे कंत्राट अग्रवाल ग्लोबल कंपनीला देण्यात आले आहे. बांधकामासाठी रस्ता खोदून ठेवला आहे. येथून एकेरी वाहतूक सुरू आहे. गत तीन दिवसांतील हा तिसरा अपघात आहे. कंपनीने येथे सुरक्षेच्या दृष्टीने कोणतीही उपाययोजना केलेली नाही. घटनेच्या दिवसी सूरजलाल वसाके मुलगी वेदिकासह दुचाकीने कोहमाराकडून स्वगावी देवरीकडे जात असताना देवरीच्या दिशेने भरधाव जाणाऱ्या खाजगी बसने दुचाकीला जोरदार धडक दिली. यात दुचाकीस्वार सूरजलाल व वेदिकाचा जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच ब्राह्मणी खडकी परिसरातील नागरिकांनी अपघातस्थळ गाठून आंदोलन केले. कंपनीवर कारवाई करावी, आठवडाभरात रस्त्याचे काम करावे, मृतांच्या कुटुंबीयांना तत्काळ २५ लाखांची मदत द्यावी आदी मागण्या आंदोलकांनी केल्या. पोलिसांनी आंदोलकांची समजूत काढल्यानंतर दोन्ही मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आले. डुग्गीपार पोलिसांनी आरोपी बसचालकावर गुन्हा दाखल केला आहे.

◀(तभा वृत्तसेवा)

भाजपा सदस्य नोंदणीत 'शहर मध्य'ने मारली सोलापूर शहरात बाजी

तब्बल ६३ हजार ६५३ जण झाले भाजपाचे सदस्य : आ. देवेंद्र कोठे यांच्या 'मायक्रो प्लॅनिंग' अन् संघटित प्रयत्नांचे यश

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१५ फेब्रुवारी-

भारतीय जनता पार्टीच्या संघटन पर्व अंतर्गत सदस्यता नोंदणी अभियानात सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाने सोलापूर शहरात सर्वप्रथम नोंदणीचे उद्दिष्ट पूर्ण करत बाजी मारली आहे. शहर मध्य विधानसभेला दिलेला ६० हजार ८०० नोंदणीच्या उद्दिष्टाचा टप्पा ओलांडून शनिवारी रात्री भाजपा शहर मध्य विधानसभेने तब्बल ६३ हजार ६५३ जणांची भाजपची सदस्यता पूर्ण केली.

भारतीय जनता पार्टीच्या वरिष्ठांनी दिलेल्या सूचनांनुसार भाजपाच्या माजी नगरसेवक, इच्छुक नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी घरोघरी जाऊन भारतीय जनता पक्षाची माहिती, भारतीय जनता पक्षाने केलेला विकास सांगत भाजपाचे सदस्य होण्याचे आवाहन नागरिकांना केले. या आवाहनाला प्रतिसाद देत शहर मध्य विधानसभा मतदारसंघातील तब्बल ६३ हजार ६५३ इतक्या विक्रमी संख्येने नागरिकांनी भाजपाचे सदस्यत्व स्वीकारले आहे. गर्दीची ठिकाणे, महाविद्यालये, विडी कारखाने, यंत्रमाग कारखाने, शाळांबाहेरील विद्यार्थ्यांचे पालक, भाजी मंडई, हॉटेल अशा अनेक ठिकाणी जाऊन भाजपा कार्यकर्त्यांनी अतिशय उत्साहाने सदस्य नोंदणी केली. सदस्य नोंदणी अभियान सुरू झाल्यापासून पहिल्या १० दिवसातच २५ हजार सदस्यतेचा टप्पा पूर्ण झाला. परंतु कोठे कुटुंबात दुःखद घटना घडल्यामुळे सदस्य नोंदणीच्या अभियानाची गती मंदावली होती.

मात्र आमदार देवेंद्र कोठे पुन्हा सक्रिय होताच त्यांनी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना सोबत घेऊन पक्षातील वरिष्ठांनी दिलेले नोंदणीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी पुन्हा एकदा जोर लावून नोंदणी पूर्ण केली आहे. नोंदणीचे उद्दिष्ट पूर्ण होताच शहर मध्य विधानसभेत शनिवारी रात्री ठिकठिकाणी कार्यकर्त्यांनी जल्लोष करून आनंद व्यक्त केला. उद्दिष्टपूर्ती झालेली असली तरी पक्षाने दिलेल्या मुदतीपर्यंत नोंदणी सुरूच राहणार असल्याचे आमदार देवेंद्र कोठे यांनी सांगितले.

'मायक्रो प्लॅनिंग' अन् संघटित प्रयत्नांचे यश

भारतीय जनता पार्टीच्या सदस्य नोंदणी अभियानामध्ये शहर मध्य विधानसभेने मुदतीपूर्वी पूर्ण केलेले उद्दिष्ट हे सर्व भाजपा कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांच्या 'मायक्रो प्लॅनिंग' अन् संघटित प्रयत्नांचे यश आहे. या यशासाठी भाजपाच्या सर्व माजी नगरसेवक, इच्छुक नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि भाजपप्रेमी मित्रपरिवाराने घेतलेल्या परिश्रमासाठी सर्वांचे मनःपूर्वक आभार आणि अभिनंदन ! भाजपाच्या सदस्य नोंदणीप्रमाणे शहर मध्य विधानसभेच्या विकासाचेही उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

- देवेंद्र कोठे,
आमदार, शहर मध्य विधानसभा

अकलूज येथे जिपीकॉन २०२५ उत्साहात

अकलूज : माळशिरस तालुक्यातील निमा संघटना,होमिओपॅथी संघटना व सना हॉस्पिटल कोंडवा पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने जिपीकॉन २०२५ चे आयोजन कृष्णप्रिया हॉल अकलूज येथे करण्यात आले होते.

मेडिकल क्षेत्रामध्ये नवनवीन तंत्रज्ञान येत असल्यामुळे त्याचे ज्ञान अवगत करण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन केले जाते.मेडिकल क्षेत्रात रोबोटच्या सहाय्याने अनेक सर्जरी केल्या जातात. त्यामध्ये रोबोटीक जॉईंट रिप्लेसमेंट ही सर्जरी खूपच यशस्वी होताना दिसत आहे. रोबोटीक जॉईंट रिप्लेसमेंट या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी पुणे येथील सना हॉस्पिटलचे सर्वेसर्वा सुप्रसिद्ध अस्थीरोगतज्ञ डॉ.सुहेल खान यांचे बेसिक्स ऑफ जॉइंट रिप्लेसमेंट अँड प्रॅक्टिकल विडिओ या विषयावरती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ऑटोमॅटिक रोबोटीक जॉइंट रिप्लेसमेंटमुळे सांध्याचा जेवढा भाग खराब झाला आहे.त्याचे मेजरमेन्ट कॉम्प्युटरच्या सहाय्याने घेतले जातात व रोबोटच्या सहायाने तेवढाच भाग काढून तेथे कृत्रिम सांधा कशा प्रकारे बसवला जातो. त्याचे रुग्णांना कशा प्रकारे फायदे होतात.याबद्दलचे मार्गदर्शन डॉ सुहेल खान यांनी केले.यावेळी अकलूजचे सुप्रसिद्ध अस्थीरोगतज्ञ डॉ.अमोल शिंदे,डॉ विश्वास कदम फिजिशियन डॉ. समीर दोशी उपस्थित होते.डॉ. शुभांगी माने-देशमुख यांनी डॉ सुहेल खान यांचा परिचय करून दिला. प्रास्ताविक डॉ. दिलीप पवार यांनी केले तर आभार निमाचे अध्यक्ष डॉ. अमोल माने शेंडगे यांनी मानले.

वर्धा नागरी बँकेच्या नागपूर शाखेचा आज शुभारंभ

नितीन गडकरी, दीपक तामशेट्टीवार यांची प्रमुख उपस्थिती

◆ **वर्धा, १५ फेब्रुवारी**

वर्धा जिल्ह्यात हक्काची वाटणारी आणि सहकार क्षेत्रात उंची गाठणाऱ्या वर्धा नागरी बँकेचा शाखा विस्तार अमरावती, यवतमाळ व नागपूर या तीन जिल्ह्यांत झाला. यातील नागपूर शाखेचा शुभारंभ रविवार १६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.३० वाजता रेवतीनगर-ओंकारनगर रोड इरा इंटरनॅशनल स्कूलजवळ बेसा पिपळा, नागपूर येथे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी तसेच रा. स्व. संघाचे प्रांत संघचालक दीपक तामशेट्टीवार यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी बँकेचे अध्यक्ष डॉ. विनय देशपांडे तर उपाध्यक्ष मंगेश परसोडकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

आप्पाजी जोशी यांनी स्थापन केलेल्या वर्धा नागरी बँकेच्या नागपूर, यवतमाळ, अमरावती व चंद्रपूरसह वर्धा जिल्ह्यात १३ शाखा संगणकीकृत झाल्या आहेत. बँकेला तीन वर्षांत ऑडिट नामांकन 'अ' वर्ग मिळाला असून बँक मजबूत ध्येयधोरणानुसार प्रगती करीत असल्याचे तीन वर्षांच्या आकडेवारीवरून स्पष्ट होते. बँकेला अनुक्रमे ३०२.२० लाख, ४०३.१५ लाख व ५३७.६२ लाख रुपये नफा मिळाला आहे. तीन वर्षांत लाभांश भागधारकांना देण्यात आला.

बँक रिझर्व्ह बँकेचे निकष पूर्ण करीत आहे. ३१ मार्च २०२४ च्या आर्थिक स्थितीनुसार १७३६.९४ वसूल भागभांडवल, सभासद संख्या ४७,५५६, ठेवी ५५७२०.९४, कर्ज २८४३८.९४, गुंतवणूक २९५३३.२०, ग्रॉस एनपीए ७.४८ टक्के, नेट एनपीए ० तर सीआरएआर १७.३० टक्के असल्याची माहिती बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कांचन केळकर यांनी दिली. बँकेच्या वतीने आत्मनिर्भर वाहन कर्ज, आदित्य सोलर कर्ज, सोने तारण, गृहशोभा कर्ज आदी योजना राबविल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले. ◀(तभा वृत्तसेवा)

माजी जनरल मॅनेजरनेच मारला बँकेच्या तिजोरीवर १२२ कोटींचा डल्ला!

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी
मुंबई, दि.१५ फेब्रुवारी:

न्यू इंडिया को ऑप बँक लिमिटेड बँकेच्या माजी जनरल मॅनेजरनेच बँकेत १२२ कोटीचा डल्ला मारल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. हितेश प्रविणचंद मेहता असे या ठकसेनचे नाव असून त्याने दादर व गोरेगावच्या शाखेतून त्यानेही रक्कम बाहेर काढली. मुंबई पोलिसांनी त्याच्यासह अनेकांवर गुन्हा दाखल केला असून तपास आर्थिक गुन्हा अन्वेषण शाखेकडे सोपविण्यात आला आहे.

रिझर्व बँक ऑफ इंडियाने आरबीआय या बँकेवर गुरुवारपासून आर्थिक निर्बंध घातले आहेत. त्यामुळे हजारो ठेवीदारांचे कोट्यावधी रुपये अडकून पडले आहेत.

हितेश मेहता बँकेचा जनरल मॅनेजर व चीफ अकाउंटंट पदाचा कार्यभार होता.त्याच्यावर दादर आणि गोरेगाव बँकेची जबाबदारी होती. त्यावेळी त्याने पदाचा गैरवापर करून २०२० ते २०२५ या कालावधीत दोन्ही शाखेच्या खात्यावरून १२२ कोटीचा अपहार केला.गैरव्यवहार केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी दादर पोलिस ठाण्यात बँकेच्या चिफ अकाऊंटीग अधिकारी याने दिलेल्या तक्रारीनुसार पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. या गैरव्यवहारात हितेशसह अन्य एका व्यक्तीचा समावेश असल्याचा संशय पोलिसांना आहे. त्या अनुशंगाने पोलिस तपास करत आहेत.

२०२० ते २०२५ च्या दरम्यान गैरव्यवहार-

सदर प्रकरणाचा तपास आता आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसाकडे पुढील तपासासाठी वर्ग केला आहे. याच बँकेवर आरबीआयकडून निर्बंध लावण्यात आले. ज्यामुळे बँकेला १३ फेब्रुवारीपासून कोणतेही आर्थिक व्यवहार करता येणार नाहीत. तसेच ग्राहकांनाही पैसे जमा किंवा काढता येणार नाही. बँकेतील सर्व प्रकारच्या अत्यावश्यक कामावरही आरबीआयने पुढील सहा महिन्यांसाठी बंदी घातली आहे. २०२० ते २०२५ च्या दरम्यान हा गैरव्यवहार झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणी दादर पोलिसांनी कलम ३१६(५), ६१ (२) भा न्या सं अन्वेय गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने मुंबईतील न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेच्या कामकाजावर निर्बंध घालण्याचा निर्णय घेतला आहे. आरबीआयने निर्बंध घातल्यानं बँकेत ठेवी ठेवणाऱ्या खातेदारांना त्यांची रक्कम काढता येणार नाही.

न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँक आता कर्ज देऊ शकणार नाही किंवा ठेवी देखील स्वीकारु शकणार नाही. आरबीआयने गुरुवारी बँकेचे कामकाज बंद झाल्यानंतर पुढील सहा महिन्यांसाठी निर्बंध लागू केले आहेत. आरबीआयच्या या निर्णयानंतर ठेवीदारांच्या अडचणी वाढल्या आहेत. बँकेचे खातेधारक आता त्यांच्या खात्यातून पैसे काढू शकणार नाहीत. आरबीआयनं सध्या बँकेवर केवळ सहा महिन्यांसाठी निर्बंध घातले आहेत. त्यामुळं या काळात बँकेची स्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला जाईल. सहा महिन्यानंतर आरबीआय त्यांच्या निर्णयाचे पुनरावलोकन करणार आहे..

सौर ऊर्जा क्षेत्रात भारत महाशक्ती

युनोच्या हवामान प्रमुखांनी केले कौतुक

◆ **नवी दिल्ली, १५ फेब्रुवारी**

हवामान बदलाच्या आव्हानांवर मात करण्यासाठी स्वच्छ ऊर्जेच्या दिशेने भारताकडून सुरू असलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत. आजच्या घडीला भारत सौर ऊर्जा क्षेत्रातील महाशक्ती असल्याचे संयुक्त राष्ट्रांच्या हवामान विभागाचे प्रमुख सायमन स्टील म्हणाले.

एका कार्यक्रमात स्टील म्हणाले, भारताने प्रदूषणमुक्त ऊर्जा निर्मितीवर भर दिल्याने अर्थव्यवस्थेच्या वाढीला चालना मिळेल. जगातील काही देश केवळ घोषणा देतात, बोलतात मात्र भारत केवळ बोलत नाही, तर प्रत्यक्ष करून दाखवतो. भारत सौर ऊर्जा क्षेत्रात महाशक्ती असून, १०० गिगावॅटपेक्षा अधिक सौर ऊर्जेचे उत्पादन घेणाऱ्या जगातील चार देशांमध्ये भारताचा समावेश आहे. वाढत्या लोकसंख्येची ऊर्जेची गरज पूर्ण करणे आणि अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी भारताला सौर ऊर्जा क्षेत्राचा विस्तार करण्याची आवश्यकता आहे. त्या दिशेने जाण्यासाठी भारताच्या सरकारने घेतलेले निर्णय योग्यच आहे. आजच्या घडीला भारताकडे शेकडो गिगावॅट्सचे सौर ऊर्जा उत्पादन घेण्याची प्रचंड क्षमता आहे. नवोन्मेष, तंत्रज्ञान आणि मनुष्यबळाचा योग्य वापर केल्यास सौर उपकरणांसह इतर वस्तूंच्या निर्यातीत भारत मोठी मजल गाठू शकतो.

मोदींना देशवासीयांची काळजी

स्टील म्हणाले, जगातील पाचवी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था असलेल्या देशाला पंतप्रधान मोदींसारखे नेतृत्व मिळाल्यामुळे देश विकासाच्या दिशेने अग्रेसर आहे. हवामान बदलाच्या आव्हानांवर मात करण्यासाठी पर्यावरण रक्षणाला त्यांनी दिलेले महत्त्व देशवासीयांची काळजी असलेले नेतृत्वच करू शकतो. त्यांनी संस्था, समुदाय आणि प्रत्येक व्यक्तींच्या शक्तीचा वापर देशाच्या विकासासाठी करण्यासाठी घेतलेले महत्त्वाकांक्षी निर्णय कौतुकास्पद आहे. ◀(वृत्तसंस्था)

सायबर गुन्हेगारांच्या ११ ठिकाणांवर सीबीआयचे छापे

१.०८ कोटी रोख, १००० अमेरिकन डॉलर्स जप्त

◆ **नवी दिल्ली, १५ फेब्रुवारी**

सायबर गुन्ह्यांशी संबंधित एका प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभाग अर्थात्? सीबीआयने शनिवारी राजधानी दिल्ली-एनसीआर आणि हरयाणामधील ११ ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत आतापर्यंत १.०८ कोटी रुपये रोख, १००० अमेरिकन डॉलर्सचे परकीय चलन आणि २५२ ग्रॅम सोने जप्त करण्यात आले.

सीबीआयच्या एका अधिकाऱ्याने सांगितले, कारवाईत अनेक डिजिटल पुरावे सापडले, ज्यात ६ लॅपटॉप, ८ मोबाईल फोन आणि १ आयपॅडचा समावेश आहे.

आरोपी सरकारी अधिकारी असल्याचे भासवून तसेच तांत्रिक सहाय्य देण्याच्या नावाखाली लोकांची फसवणूक करित होते. मिळविलेले पैसे क्रिप्टोकरन्सीमध्ये रूपांतरित करून वेगवेगळ्या खात्यांमध्ये पाठवत होते, असे तपासात समोर आले आहे. या प्रकरणात आधीच तीन आरोपींविरोधात आरोपपत्र दाखल केले आहे. त्यांच्यावर खंडणीचाही आरोप आहे.

कारवाईनंतर आरोपींवर सीबीआयकडून भारतीय दंड संहितेच्या कलम १२० बी (कट रचणे), ४२० (फसवणूक) आणि माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६६ डी अंतर्गत गुन्हे दाखल केले. ◀(वृत्तसंस्था)

व्हीओआयपी कॉलिंग प्रणालीचा वापर

सीबीआयला आढळून आले की, आरोपी बेकायदेशीरपणे व्हीओआयपी कॉलिंग प्रणाली वापरत होते आणि डार्कनेटद्वारे लोकांची फसवणूक करण्याचे आपले जाळे पसरवत होते. सीबीआय आता या प्रकरणाचा अधिक तपास करीत आहे. आरोपींनी आतापर्यंत किती लोकांना फसवले आणि त्यांनी किती पैसे लुटले, याचाही तपास केला जात आहे. कॉल सेंटरद्वारे परदेशी नागरिकांना लक्ष्य केल्याची अनेक प्रकरणे यापूर्वीही समोर आली आहेत. ■

जम्मू-काश्मीरला योग्य वेळी राज्याचा दर्जा

किरेन रिजिजू यांनी स्पष्ट केली भूमिका

◆ **श्रीनगर, १५ फेब्रुवारी**

केंद्रशासित प्रदेश असलेल्या जम्मू-काश्मीरला योग्य वेळी राज्याचा दर्जा बहाल केला जाईल. यासंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी यापूर्वीच भूमिका स्पष्ट केल्याचे संसदीय कामक मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितले.

जम्मू- काश्मीरच्या दौऱ्यावर असलेल्या रिजिजू प्रसार माध्यमांशी बोलताना म्हणाले, जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा कधीपर्यंत देणार यासंदर्भात केंद्र सरकारने कुठलीही मुदत निश्चित केलेली नाही. त्यामुळे वेळ आल्यावर निर्णय घेतला जाईल. पंतप्रधान आणि गृहमंत्री यांनी यापूर्वीच स्पष्ट केले की, केंद्रशासित प्रदेशाला राज्याचा दर्जा बहाल केला जाईल आणि अधिकार व कार्य निश्चित करण्यात येईल. त्यामुळे योग्य वेळ आल्यावर यावर निर्णय घेतला जाईल. केंद्रीय अर्थसंकल्पाच्या अनुषंगाने हा दौरा असल्याने याविषयी अधिक बोलणे योग्य राहणार नसल्याचे रिजिजू यांनी स्पष्ट केले. जम्मू-काश्मीर सध्या केंद्रशासित प्रदेशाचा भाग आहे, उपराज्यपाल हे केंद्रशासित प्रदेशाचे प्रशासकीय प्रमुख आहे. ◀(वृत्तसंस्था)

सीबीएसई दहावी आणि बारावीचा पहिला पेपर शनिवारी पार पडला. या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून पेपर फारच सोपा गेला असल्याचे दिसते



मध्यप्रदेशच्या भोपाळ येथील वनविहार राष्ट्रीय उद्यानात शनिवारी सकाळच्या कोवळ्या उन्हात बाहेर आलेल्या आशियाई सिंहांची ही जोडी कोणत्या गोष्टीसाठी भांडत आहे, हे त्यांचे त्यांनाच माहीत!

मणिपुरात नऊ बंडखोरांना अटक

◆ **इम्फाळ, १५ फेब्रुवारी**

पूर्व इम्फाळ आणि थौबल जिल्ह्यातून विविध संघटनांच्या नऊ बंडखोरांना सुरक्षा दलांनी अटक केली, अशी माहिती पोलिसांनी दिली.

थौबल जिल्ह्यातील चिंग्दोमपॉक परिसरातून प्रतिबंधित कांग्लेईपाक कम्युनिस्ट पार्टीच्या (नोयोन) चार सक्रिय बंडखोरांना शुक्रवारी अटक करण्यात आली. ते खंडणी वसुलीत गुंतले होते, असे पोलिसांनी सांगितले. दुसऱ्या एका कारवाईत सुरक्षा दलाने केसीपीच्या चार बंडखोरांना पूर्व इम्फाळच्या खाबेईसोई परिसरातून खंडणी वसुलीच्या आरोपात शुक्रवारी अटक केली. पूर्व इम्फाळच्या नुंगोई अवांग लेईकाय परिसरातून पोलिसांनी यूएनएलएफच्या एका सक्रिय सदस्याला अटक केली. ◀(वृत्तसंस्था)

अतिरेक्यांशी संबंध असलेले तीन सरकारी कर्मचारी बडतर्फ

◆ **जम्मू, १५ फेब्रुवारी**

अतिरेक्यांशी संबंध असल्याच्या आरोपाखाली जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल लेफ्टनंट मनोज सिन्हा यांनी शनिवारी तुरुंगातील एका पोलिसासह तीन सरकारी कर्मचाऱ्यांना बडतर्फ केले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

बडतर्फ केलेल्यांमध्ये पोलिस कॉन्स्टेबल फिरदौस अहमद भट, शिक्षण विभागातील शिक्षक मोहम्मद अश्रफ आणि वनविभागातील निसार अहमदचा समावेश आहे. २००० मध्ये नॅशनल कॉन्फरन्सच्या नेत्याच्या हत्येच्या आरोपाखाली निसार अहमदला यापूर्वी अटक करण्यात आली होती. कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्था, गुप्तचर यंत्रणांनी या तिनही सरकारी कर्मचाऱ्यांचा संबंध अतिरेक्यांशी असल्याचे स्पष्ट केल्यानंतर नायब राज्यपाल आणि अधिकाऱ्यांनी घटनेतील कलम ३११ (२) (सी) चा वापर करीत त्यांना बडतर्फ केले.

मागील काही वर्षांत अतिरेक्यांसोबत संबंध असलेल्या ७० सरकारी कर्मचाऱ्यांना नायब राज्यपालांनी बडतर्फ केले आहे. दहशतवादाच्या विरोधात कारवायांची तीव्रता वाढवण्यासाठी सुरक्षा यंत्रणांसोबत श्रीनगर आणि जम्मूत झालेल्या बैठकांच्या पृष्ठभूमीवर नायब राज्यपालांनी त्यांच्या बडतर्फीचा निर्णय घेतला आहे. ◀(वृत्तसंस्था)

महाकुंभात त्रिजटा स्नानाचे विशेष महत्त्व

महाकुंभातील संगमच्या वाळूवर कल्पवासींना पुण्य मिळण्याची प्रक्रिया अजूनही सुरू आहे. माघ पौर्णिमेनंतरही हजारो भाविक तीन दिवस त्रिजटा स्नान करून त्यांचे आध्यात्मिक संकल्प पूर्ण करीत आहेत. त्रिटजा स्नानाचे महत्त्व अशा भक्तांसाठी आहे, जे माघ पौर्णिमेनंतरही संगमात स्नान करून त्यांच्या धार्मिक श्रद्धेचे पालन करतात.

असे मानले जाते की, त्रिजटात स्नान केल्याने संपूर्ण माघ महिन्यात स्नान केल्याचे पुण्य मिळते. त्रिजटा म्हणजे तीन प्रवाह गंगा, यमुना, आणि अदृश्य सरस्वती. हे स्नान कर्म, भक्ती आणि ज्ञानाचे संगम मानले जाते, जे भक्तांना आध्यात्मिक ऊर्जा देते. कल्पवासी संपूर्ण महिना संयम, ध्यान आणि तपश्चर्येने संगमच्या वाळूवर झोपतात. त्यांना त्यांच्या ध्यानात कोणतीही कमतरता राहू द्यायची नाही, म्हणून ते पौर्णिमेच्या स्नानानंतरही तीन दिवस स्नान करतात. त्रिजटा स्नान हे अपूर्ण स्नान पूर्ण होण्यासारखे देखील मानले जाते , ज्यामुळे कल्पवासाचा संकल्प पूर्ण होतो. महाकुंभात भाविकांच्या श्रद्धेची लाट अजूनही संगमाकडे वाहत आहे. हजारो भाविक घाटांवर स्नान करीत आहेत आणि ही संख्या दररोज वाढत आहे. धार्मिक श्रद्धेनुसार, महाशिवरात्रीच्या स्नानानंतरच महाकुंभातील गर्दी कमी होईल. महाकुंभ केवळ सामान्य भाविकांसाठीच नाही, तर राजकारणी, चित्रपट क्षेत्रातील व्यक्ती आणि सामाजिक कार्यकर्त्यांसाठीही आकर्षणाचे केंद्र आहे. संगमात पवित्र स्नान करण्यासाठी देश-विदेशातून भाविक येत आहेत, त्यामुळे प्रयागराजची वाळू पुन्हा एकदा आध्यात्मिक श्रद्धेचा संगम बनली आहे. महाकुंभ हा भव्य दिव्य कार्यक्रम त्रिजटा स्नान आणि महाशिवरात्री स्नानाने पूर्णत्वाकडे वाटचाल करीत आहे. ■

'डिजिटल खोया-पाया'ने २० हजारांवर लोकांना आणले एकत्र

५० कोटींहून अधिक भाविकांच्या अभूतपूर्व उपस्थितीमुळे महाकुंभ ऐतिहासिक ठिकाण बनले आहे. हा दिव्य कार्यक्रम सुरक्षित आणि सुव्यवस्थित करण्यासाठी योगी आदित्यनाथ सरकारने अनेक अनुकरणीय उपक्रम हाती घेतले आहेत. यावेळी महाकुंभात हरवलेल्या भाविकांना त्यांच्या कुटुंबीयांशी त्वरित भेट घडवण्यासाठी योगी सरकारने डिजिटल हरवलेले आणि सापडलेले केंद्रे स्थापन केली आहेत, ज्याद्वारे आतापर्यंत २० हजारांहून अधिक हरवलेल्या भाविकांना त्यांच्या कुटुंबीयांशी भेट घडवण्यात आली आहे.

हजारो कुटुंबांना दिलासा

१४४ वर्षांनंतर आयोजित होणाऱ्या या वर्षीच्या महाकुंभमेळ्यात त्यांच्या प्रियजनांपासून विभक्त झालेल्या २०,१४४ लोकांना त्यांच्या कुटुंबीयांशी पुन्हा जोडण्यात योगी सरकारने यश मिळवले आहे. त्यापैकी मोठ्या संख्येने महिला होत्या. एवढेच नाही तर, देशातील विविध राज्ये आणि नेपाळमधील भाविकांना त्यांच्या कुटुंबीयांशी यशस्वीरीत्या जोडण्यात पोलिसांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

अमृत स्नान उत्सव मौनी आमावास्या दरम्यान गर्दीचे व्यवस्थापन करून डिजिटल लॉस्ट ॲण्ड फाऊंड सेंटर्सनी सर्व ८,७२५ हरवलेल्या व्यक्तींना त्यांच्या कुटुंबीयांकडे सोपवले आहे. त्याचप्रमाणे, मकर संक्रांतीच्या दिवशी हरवलेल्या ५९८ भाविकांना आणि वसंत पंचमीला हरवलेल्या ८१३ भाविकांना डिजिटल लॉस्ट ॲण्ड फाउंड सेंटरच्या मदतीने त्यांच्या कुटुंबीयांशी पुनर्मिलन करण्यात आले. याशिवाय, इतर स्नान उत्सव आणि सामान्य दिवसांमध्ये हरवलेल्या १० हजारांहून अधिक लोकांना त्यांच्या कुटुंबीयांना पुन्हा जोडले गेले.

प्रत्येक गरजूंना आवश्यक सुविधा

» मुख्यमंत्री योगी यांच्या सूचनेनुसार, पुनर्मिलन प्रक्रियेदरम्यान कोणत्याही व्यक्तीला कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणून या केंद्रांवर प्रतिक्षालय, वैद्यकीय कक्ष, शौचालय आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. मुख्यमंत्री योगी यांनी आधीच स्पष्ट केले होते की, महाकुंभ हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून, तो सेवा आणि सुशासनाचे प्रतीक असावा. याअंतर्गत डिजिटल हरवलेले आणि सापडलेले केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. ■

मुख्यमंत्र्यांच्या सूचनांचे काटेकोर पालन

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी ७ डिसेंबर २०१४ रोजी डिजिटल प्रणालीद्वारे हरवलेले आणि सापडलेले केंद्र सुरू केले होते. यासोबतच, मुख्यमंत्र्यांनी पोलिस प्रशासन आणि न्यायप्रविष्ट अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या होत्या की, कोणत्याही भाविकाला कोणतीही अडचण येऊ नये. याअंतर्गत, सेक्टर ३, ४, ५, ८, ९, २१, २३, २४ येथे संगम, झुंसी, अरैल, फाफामऊ आणि प्रयागराज जंक्शन रेल्वे स्थानकाजवळ १० डिजिटल हरवलेले आणि सापडलेले केंद्रे स्थापन करण्यात आली.

तंत्रज्ञान आणि मानवतेचा अद्भूत समन्वय

डिजिटल लॉस्ट ॲण्ड फाऊंड सेंटर्समध्ये एआय आधारित फेस रेकग्निशन सिस्टम, मशीन लर्निंग आणि बहुभाषिक समर्थन यासारख्या आधुनिक वैशिष्ट्यांसह प्रदान केले. यामुळे जत्रेच्या परिसरात वेगळे झालेल्या भाविकांना त्यांच्या कुटुंबीयांशी लवकर पुनर्मिलन करता आले. उत्तरप्रदेश पोलिस, प्रशासकीय अधिकारी आणि विविध स्वयंसेवी संस्थांनी डिजिटल हरवलेला आणि सापडलेला केंद्रांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. युनिसेफसह अनेक गैर-सरकारी संस्थांनीही यामध्ये सक्रिय योगदान दिले. ■

महाकुंभात स्वामी चिदानंद व विदेशी भक्तांची स्वच्छता मोहीम

महाकुंभात स्वामी चिदानंद सरस्वती व विदेशी भक्तांनी स्वच्छता मोहीम राबवली. पृथ्वी, हवा आणि पर्यावरण यांच्या संरक्षणाबाबत जनजागृती करणे हा मोहिमेचा उद्देश आहे. स्वामी चिदानंद सरस्वती म्हणाले की, आपली पृथ्वी ही आपली व्हॅलेंटाईन आहे. ती आपल्याला जीवन देते. आता आपल्या पृथ्वीवर प्रेम करण्याची आणि संरक्षण करण्याची आपली जबाबदारी आहे. जर आपण पृथ्वीचे संवर्धन केले, तर भविष्यातील पिढ्यांसाठी ती निरोगी आणि हिरवीगार राहील.

आपल्या पूज्य संत आणि ऋषीमुनींनी नेहमीच पृथ्वीवर प्रेम आणि आदराचा संदेश दिला. त्यामुळे आपण जलसंवर्धन असो किंवा वृक्ष लागवड असो, त्याला प्राधान्य दिले पाहिजे. ते म्हणाले की, प्लॅस्टिक प्रदूषण हे आज आपल्या पृथ्वीसाठी सर्वांत मोठे आव्हान बनले आहे. हे केवळ आपल्या आरोग्यासाठीच धोकादायक नाही, तर आपल्या जलस्रोतांना आणि परिसंस्थेलाही गंभीर धोका निर्माण करीत आहे. साध्वी भगवती म्हणाल्या की, आमचा उद्देश केवळ घाण साफ करणे नाही. स्वच्छता ही केवळ घरे,शहरांपुरती मर्यादित नसावी. जोपर्यंत आपण आपली पृथ्वी स्वच्छ ठेवत नाही, तोपर्यंत आपण भावी पिढ्यांसाठी सुरक्षितता ठेवू शकत नाही. ■

महाकुंभातील चेंगराचेंगरीनंतर बेपत्ता आजोबा तेराव्याला परतले

प्रयागराज महाकुंभमेळ्यात २९ जानेवारीला झालेल्या चेंगराचेंगरीत ३० जणांचा मृत्यू झाला. तेव्हापासून स्थानिक रहिवासी खुंटी गुरू बेपत्ता होते. चेंगराचेंगरीत खुंटी यांचा मृत्यू झाला असावा, असे समजून शेजाऱ्यांनी त्यांचा अन्त्यविधी सुरू केला. तेरावे झाल्यावर सायंकाळी जेवणाची तयारी सुरू असताना खुंटी गुरू तिथे सदेह परतले. त्यांना पाहून सगळ्यांचा आनंद ओसंडून वाहत होता.

खुंटी गुरू यांच्या कुटुंबात कोणीच नाही. ते एकटेच राहतात. मौनी आमावास्याच्या मुहूर्तावर स्नान करण्यासाठी ते एक दिवस आधी म्हणजेच २८ जानेवारीला संगमस्थळी पोहोचले. २९ जानेवारीला संगमस्थळी प्रचंड चेंगराचेंगरी झाली. तेव्हापासून खुंटी गुरू बेपत्ता होते. आसपासच्या लोकांनी खुंटी यांचा अनेक ठिकाणी शोध घेतला. पण त्यांचा थांगपत्ता लागला नाही. चेंगराचेंगरीत खुंटी गुरू यांचा मृत्यू झाल्याचे समजून शेजारच्यांनी मृत आत्म्याच्या शांतीसाठी लहानशी प्रार्थना आयोजित केली. त्यानंतर स्थानिकांना जेवण देण्याची तयारी केली असता खुंटी गुरू तिथे आले. ■

चित्रपट वार्ता

छावा चित्रपटाने पहिल्या दिवशी केली विक्रमी कमाई

मुंबई : बॉलिवूड अभिनेता विकी कौशल आणि रश्मिका मंदाना यांचा छावा हा चित्रपट शुक्रवारी १४ फेब्रुवारीला प्रदर्शित झाला. लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित या चित्रपटाने पहिल्याच दिवशी ३३.१ कोटींपेक्षा जास्त कमाई केली आहे. कमाईचा आकडा आणि क्रिटिक्सच्या रिव्ह्यूला पाहता हे स्पष्ट झाले की, चित्रपट हा पहिल्याच आठवड्यात तो १०० कोटींच्या क्लबमध्ये सहभागी होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुत्र छत्रपती संभाजी महाराज यांच्या आयुष्यावर आधारित हा चित्रपट आहे. हा चित्रपट प्रदर्शित होण्याआधी वादाच्या भोवऱ्यात अडकला होता. पण ,आता असे दिसून येते आहे की, प्रेक्षकांनी या चित्रपटाला पसंती दिली आहे. ■

प्रतीक बब्बर दुसऱ्यांदा अडकला विवाहबंधनात



मुंबई : अभिनेता प्रतीक बब्बरने १४ फेब्रुवारीला दुसरे लग्न केले आहे. त्याने त्याची प्रेयसी प्रिया बॅनर्जीसोबत लग्न केले. तथापि, प्रतीकच्या कुटुंबातील कोणीही या लग्नाला उपस्थित नव्हते. त्याचे वडील आणि अभिनेते राज बब्बर देखील या लग्नात सहभागी झाले नाहीत. प्रतीकचा सावत्र भाऊ आणि स्टँड-अप कॉमेडियन आर्य बब्बरने सांगितले की, बब्बर कुटुंबाला या लग्नासाठी आमंत्रित करण्यात आले नव्हते. त्याची पत्नी प्रिया बॅनर्जी ही एक दक्षिण भारतीय अभिनेत्री आहे. तिने दक्षिण चित्रपटसृष्टीतील कारकीर्दीची सुरुवात केली. याशिवाय ती ऐश्वर्या राय बच्चनच्या जज्बा चित्रपटात दिसली होती. तिने बेकाबू, राणा नायडू आणि हॅलो मिनी सारख्या मालिकांमध्येही काम केले आहे. ■

प्रेमाची गोष्ट २ चित्रपट जूनमध्ये होणार प्रदर्शित

मुंबई : एव्हरेस्ट एंटरटेन्मेंटने 'प्रेमाची गोष्ट २' या बहुप्रतीक्षित चित्रपटाची पहिली झलक भेटीला आणली आहे. सुपरहिट प्रेमकथा सादर करणारे दिग्दर्शक सतीश राजवाडे एक नवीन प्रेमकथा निर्माते संजय छाब्रिया यांच्यासह हा चित्रपट घेऊन येत आहेत. या चित्रपटात अभिनेता ललित प्रभाकर प्रमुख भूमिका साकारत आहे. अभिनेत्री ऋचा वैद्यसह हिंदी व मराठी चित्रपटसृष्टीत आपली छाप सोडणारी अभिनेत्री रिधिमा पंडित ही चित्रपटात दिसेल. या चित्रपटात प्रेमाची जादू आणि तंत्रज्ञानाचा मिलाप असल्याने प्रेक्षकांना प्रेमाचा हा प्रवास नक्की आवडेल, असे दिग्दर्शक सतीश राजवाडे म्हणाले. प्रेम आणि नशीबाचा हा जादुई प्रवास येत्या जूनमध्ये अनुभवायला मिळणार आहे. ■

रोखठोक

दिनेश गुणे

भविष्यभयाच्या जाणिवा पुसण्यासाठी...

माणसावर कोसळणारे प्रत्येक संकट त्याला काही ना काही शहाणपण शिकवत असते असे म्हणतात. ते खरेच आहे. पण हे शहाणपण कायम टिकत नसावे, ही खरी समस्या आहे. चार वर्षांपूर्वीच्या कोविड महामारीच्या संकटातील जगण्याच्या संघर्षानेही माणसास बरेच काही शिकविले. मुख्य म्हणजे, जीवनशैलीची घडी बिघडली असून ती पुन्हा बसविण्याची गरज आहे, याची जाणीव माणसास झाली आणि या संकटातून बचावलो तर नव्या घडीनिशी, नव्या शिस्तीनिशी नवी जीवनशैली अंगीकारावी लागेल, हे प्रत्येकास पटले. अनेकांनी तशा आणाभाकाही घेतल्या. हा काही फार दूरचा भूतकाळ नाही. त्याचा विसर पडावा एवढा काळदेखील मध्ये उलटलेला नाही किंवा आठवणींमध्ये काही पिढ्यांचे अंतरदेखील पडलेले नाही. ज्या पिढ्यांनी हे संकट अनुभवले, त्या संकटाचे चटकेही सोसले, त्या पिढ्यांनाच, तेव्हा घेतलेल्या त्या आणाभाकांचा विसर पडला की काय असे वाटण्यासारखी परिस्थिती आसपास दिसत आहे. थोडक्यात, त्या महामारीच्या आधीची जीवनशैलीच पूर्वपदावर आली आहे. त्यामुळे, त्या वेळी संकटाने शिकविलेले शहाणपण स्मरणशक्तीच्या सामाजिक सिद्धांतानुसार विस्मृतीत जमा झाले असावे, असेच म्हणावे लागेल.

येत्या काही वर्षांत पाण्यासाठीचा संघर्ष तीव्र होईल, पाण्यासाठी युद्धे होतील आणि यात जो प्रबळ असेल त्यालाच पाण्यावर हक्क गाजवता येईल असा इशारा या क्षेत्रातील जाणकार लोक वारंवार देत असतात. याचा सतत पुनरुच्चारही होत असतो. पाणी वाचविण्याचे इशारे, आवाहने, कायदेही अस्तित्वात असले, तरी पाण्याचे महत्त्व माहीत असूनही पाणी वाचविण्याचे गांभीर्य माणसाला समजलेलेच नसावे. तहान लागल्याबरोबर पाणी समोर येत असल्याने, तहान लागल्यावर विहिरी खोदण्याची वेळ अजून तरी आलेली नाही. काही हंगामांचे अपवाद वगळले, तर पावसाळे बरे जातात, शेते पिकतात, नद्या-नाल्यांचे प्रवाह जिवंत होतात, विहिरींमध्ये पाणी साठलेले दिसते आणि विपुल पाण्याचा आनंद साजरा करताना, पाण्याच्या दुर्भिक्षाचे भयावह भविष्य आपोआप विस्मरणाच्या कप्प्यात दाखल होते. गेल्या काही वर्षांत देशातही मान्सूनने अधूनमधून दडी मारली तेव्हा तर दुष्काळाच्या झळांनी माणसाची उमेद काजळू लागली होती. पाणी जपून वापरले नाही तर भविष्यात काय घडू शकते याची भयाण जाणीव त्या दुष्काळांनी करून दिली होती. अशा संकटसमयी सारे एक होतात. तात्पुरत्या स्वरूपात का होईना, त्यावर उपाय शोधतात आणि संकट दूर होईपर्यंत शहाण्यासारखे वागतात. भविष्यात पाण्यासाठी युद्धे भडकतील असा इशारा कधीतरी पहिल्यांदा कुणीतरी दिला, तेव्हा त्याची नक्कीच खिल्ली उडविली गेली असणार! कारण, या इशाऱ्यानंतरही पाण्याचे मोल जाणण्यात माणूस कमीच पडला. तो निसर्ग आपल्या ठरल्या वेळी भरभरून बरसणार आणि पाण्याच्या झोळ्या पुरेपूर भरूनच परतणार अशा वेडगळ समजुतीत आपण राहिलो. सरकारी यंत्रणांच्या उपाययोजनांमध्येही, माणूस हाच केंद्रबिंदू असतो.

या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करायची जाणीव जागी झाली, अंगावर भयचकिताचा सरसरीत काटा येणे म्हणजे काय ते काही वेळा प्रत्यक्ष अनुभवास येते. काही वर्षांपूर्वीच्या एका बातमीमुळे तसेच माणसांच्या जगात तसेच काहीसे घडले. रोजच्या राजकारण आणि भक्तरुग्ण वादाची झिंग एका झटक्यात उतरली आणि भरकटलेली मने भानावर आली. असं काही झालं की आपोआप सहावे इंद्रिय जागे होते आणि भविष्य जणू भेसूर होऊन वर्तमानाच्या रूपाने विक्राळपणे समोर येते. भविष्याचे भय भेडसावू लागते आणि हे असे भविष्य कधीच आकारू नये यासाठी नकळत प्रार्थनाही सुरू होतात. तो, जो कोणी अज्ञात नियंता-निसर्ग आहे, तो ती प्रार्थना नक्की ऐकेल अशी आशादेखील बळावते अन् अंगावर उमटलेला शहार हळूहळू मिटू लागतो. तरीही भविष्यभयाची चाहूल देणारे भयाण वर्तमान मनाचा कब्जा घेऊन बसलेलेच असते.

आज ती बातमी विस्मृतीत गेली असली, तरी परिस्थिती मात्र, जशीच्या तशी, ताजी वाटावी अशीच आहे. कारण, पाण्यासाठीच्या संघर्षाचे भविष्य उंबरठ्यावर उभे ठाकले आहे.

चारपाच वर्षांपूर्वी मध्य प्रदेशातील एका जंगलात, पाणी न मिळाल्याने तहानेने तडफडणाऱ्या १५ माकडांचा उष्माघाताने मृत्यू झाला, ही ती भविष्यभयाची जाणीव करून देणारी बातमी! पण याचा गाभा आणखीनच भयाण आहे. हे मृत्यू केवळ तहानेने तडफडल्यामुळे झालेले नाहीत. पाण्यासाठीच्या संघर्षाचे हे पंधरा बळी आहेत. माकडांच्या दुसऱ्या टोळीने पाणवठ्यावर येण्यास मज्जाव केल्याने एका टोळीतील ही तहानलेली माकडे मरण पावली. यावेळी नक्कीच दोन टोळ्यांमध्ये संघर्ष झालाच असणार! या दुसऱ्या टोळीने आसपासच्या पाणवठ्यांवर आपला कब्जा प्रस्थापित केला होता. पाण्यासाठीचा संघर्षाचा जो इशारा काही दशकांपूर्वी दिला गेला होता, त्याची सुरुवात झाल्याचा संकेत देणारी ही बातमी! ही सुरुवात माणसांच्या जगात होण्यास कदाचित काही काळ जाईल, पण प्राण्यांच्या जगात मात्र, याची सुरुवात झाली आहे. हा पाण्यावरच्या हक्काचा संघर्ष होता, यात शंका नाही. बहुधा, 'त्या' भविष्यवाणीतील हे पहिले युद्ध असू शकते. म्हणूनच, अन्य माकडांवर अशी वेळ येऊ नये म्हणून मध्य प्रदेशातील वन खात्याला त्या घटनेनंतर जाग आली. त्यांच्यासाठी पर्यायी जलस्रोत कुठून उभे करायचे यासाठी शोध सुरू झाला. मध्य प्रदेशातील जंगलातले हे वास्तव माणसाला जागे करणार का, हा नवा प्रश्न त्या भयाच्या हातात हात घालून समोर थयथयाट करणार आहे!

धुवांधार पावसाळ्याचा प्रदेश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोकणातील अनेक गावांत, शहरांतही, मार्च-एप्रिलनंतर पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ येते. अंगणातील विहिरी कोरड्याठाक पडतात, आणि सार्वजनिक पाणीपुरवठा यंत्रणांतून होणाऱ्या पाणीपुरवठ्याची धार सुताएवढी होते. माणसाला पिण्याला पाणी पुरत नाही, तेथे जनावरांची तहान कोण भागवणार? मग गोठ्यातली जनावरे मोकाट सोडली जातात. त्यांच्या दैवाच्या भरवशावर मोकाट सोडली जातात. ती पाण्याच्या घोटासाठी दारोदार उभी राहतात आणि मन कळवळत असतानाही, एखाद्या मोकाट गायीला पोटभर पाणी देता येत नाही या दुःखाने माणसे कासावीस होतात. एखाद्या विहिरीच्या तळाशी कोपऱ्यातल्या एका खड्ड्यात दिवसभरानंतर थेंबाथेंबाने साचणाऱ्या ओंजळभर पाण्यात विहिरीतले मासे तग धरण्यापुरती जिवाची शिकस्त करतात. विहीर बांधल्यावर मोठ्या हौसेने आणून सोडलेले काही मासे आणि दिवसागणिक वाढणारी आणि पाण्यात बागडणारी त्यांची पिलावळ न्याहाळताना मालकाच्या डोळ्यात आनंदाची कारंजी फुलवतात, पण अशा वेळी आज त्याच माशांची केविलवाणी स्थिती न्याहाळताना, मनाला फुटणारे हुंदके अनावर होतात. त्या माशांना जगवण्यासाठी दर दिवसाआड, त्या विहिरीत चार बादल्या पाणी ओतायची वेळ मालकावर ओढवते. ज्या विहिरीतून पाणी काढले जाते, त्याच विहिरीत वरून पाणी ओतायची वेळ यावी, हीदेखील त्या भयाची एक जाणीवच!

पण समाजाची स्मरणशक्ती तोकडी असते. आजूबाजूला सगळं सुरळीत झालं, की जुन्या घटना, जुने संघर्ष, हलाखी यांचा विसर पडतो आणि वर्तमानकाळातील सुखात माणूस बुडून जातो. पण भविष्यकाळाचे कुणालाच माहीत नसते. त्याला सामोरं जाण्यासाठी तरी, भूतकाळातील अनुभवांची सोबत असायला हवी. अनुभवांचे गाठोडे अधुनमधून उघडायला हवे. म्हणजे त्यात, भविष्यकाळाची जाणीव करून देणारे असे काही सापडते.

काही वर्षांपूर्वी, राजस्थानातील एका खेडेगावातील एका घरासमोर एका कुटुंबाने स्वतःच्या वापरासाठी पाणी साठवून ठेवलेल्या एका भांड्यात, तहानेने व्याकुळलेल्या बिबट्याने तोंड घातले आणि तो फसला. त्या भांड्यात त्याचा जबडा अडकला आणि हे उमदे जनावर केविलवाणे झाले. अगोदरच तहानेमुळे गलितगात्र झालेला हा प्राणी, पुरता परावलंबी झाला आणि फसलेल्या या जंगली जनावराला पाहण्यासाठी माणसांची गर्दी भोवती गोळा झाली. कुणी त्याची शेपूट ओढून स्वतःची करमणूक करून घेऊ लागले, कुणी मोबाईलवरून व्हिडीओ चित्रीकरण करू लागले. बिबट्या मात्र, सुटकेच्या असफल प्रयत्नांची पराकाष्ठा करत अखेर थकून गेला होता. अशा वेळी माणुसकीची अनेक रूपे एका वेळी जागी व्हायला हवी होती. पण बराच वेळ मनसोक्त करमणूक झाल्यानंतर माणुसकीला जाग आली आणि सहा तासांनंतर बिबट्याला सोडविण्याचे प्रयत्न सुरू झाले. त्याची मुक्तता झाली. पण या सहा तासांत पाण्याच्या एका घोटासाठी बिबट्याने जे काही सोसले असेल, त्यातून धडा घ्यायला हवा. एक जनावर मडक्यात अडकले एवढीच या घटनेची बातमी नाही. त्या प्रसंगानंतर त्याचे व्हिडीओ जगभर पसरले. आणि ते करुण दृश्य पाहताना माणुसकीच्या झऱ्यांना महापूरही आले. हे झरे वेळीच जिवंत व्हायला हवे होते. पाण्याच्या एका घोटासाठी जीवघेण्या संकटात सापडलेल्या एका वन्य पशूने या घटनेतून माणसाला खूप काही सांगितले आहे. पहिली गोष्ट म्हणजे, सर्व सजीवांमध्ये प्रगत असलेल्या माणूस नावाच्या प्राण्यावर अन्य जीविताची काळजी घेण्याची जबाबदारी आहे. दुसरे म्हणजे, अशा प्रसंगात माणसाच्या बुद्धिमत्तेची कसोटी लागते. एका केविलवाण्या प्रसंगातून एका असहायाची मुक्तता करण्यासाठी बुद्धिमान माणसाला सहा तास लागणे दुर्दैवी आहे. आणि तिसरे म्हणजे, भविष्यातील संकटाची जाणीवच जणू या प्रसंगातून निसर्गाने माणसाला करून दिली आहे. अशा संकटात यापुढे केवळ माणसाच्या भविष्याचा विचार करून चालणार नाही. अगोदरच माणसाने वन्यजीवांच्या हक्कांवर अतिक्रमण केले आहे. आता त्यांच्या जगण्याच्या किमान अपेक्षा अबाधित राहतील याचा विचार करूनच भविष्यातील उपाययोजना कराव्या लागतील. आज केविलवाण्या बिबट्यावर वेळ ओढवली असताना त्याची गंमत पाहणाऱ्या माणसाला भविष्याचा विचार करून मनाचा माणुसकीचा कोपरा घासूनपुसून घ्यावाच लागेल. कारण जगण्याचा हक्क माणसाएवढाच प्रत्येक सजीवाला आहे.

या वास्तवाच्या दुसऱ्या बाजूला असलेली एक दिलाशाची किनार आता समोर येऊ लागली आहे. वेगाने सुरू असलेले शहरीकरण, पायाभूत सुविधांच्या विकासासाठी आवश्यक असलेला पाण्याचा वाढता वापर आणि वाढत्या लोकसंख्येची पाण्याची गरज भागविण्याकरिता तसेच माणसाबरोबरच, प्रत्येक सजीवाच्या जगण्याकरिता पाण्याची गरज लक्षात घेऊन अनेक योजना सरकारी स्तरावर गांभीर्याने राबविल्या जात आहेत. पाण्याचा प्रत्येक थेंब मोलाचाच नव्हे, तर गरजेचा आहे आणि तो वाचविला पाहिजे, यासाठी कृतिशील आखणी सुरू झाली आहे. कारण, पाणीटंचाईचे हे गंभीर संकट येत्या दशकभरातच उग्र होण्याचा अंदाज असून २०३० पर्यंत जगाला गरजेच्या असलेल्या पाण्याचे स्रोत ४० टक्क्यांनी कमी झालेले असतील, असे स्पष्ट झाले आहे. भारतातील परिस्थिती वेगळी नाही. सुमारे सात दशकांपूर्वी भारतातील पाण्याचा दरडोई वापर पाच हजार घनमीटर एवढा होता. २०२० मध्ये तो १५०० घनमीटर एवढा झाला आणि पुढच्या पाच वर्षांत, म्हणजे नंतरच्या दशकभरात तो एक हजार घनमीटर एवढा राहील, असा सरकारी अंदाज असल्याने, पाणी वापराच्या आणि पाणी वाचविण्याच्या जाणिवा जिवंत झाल्या आहेत. याचाच एक भाग म्हणून, वापरात नसलेल्या खाणींच्या खड्ड्यांत साचणारे पाणी वापरात आणण्याचे प्रयोग यशस्वी होऊ लागले आहेत. वापरात नसलेल्या खाणींच्या खड्ड्यांतील पाण्याचे प्रचंड साठे प्रक्रिया करून वापरण्याच्या प्रयोगातून झारखंडमध्ये खाणक्षेत्रांतील जवळपास ८८० खेड्यांमधील सुमारे १२ लाख लोकसंख्येची पाण्याची गरज आज भागविली जात असून, सुमारे सात हजार २०० हेक्टर शेतजमिनीत सिंचनासाठी वापरले जात आहे. येत्या पाच वर्षांत अशा पाण्याचा वापर वाढविण्याचे धोरणच केंद्र सरकारने आखले असून दर वर्षाला या वापरात नसलेल्या किंवा चालू स्थितीतील खाणींमधून २० लाख किलोलिटर पाणी वापरासाठी उपसले जाईल, अशी सुवार्ता अलिकडेच केंद्र सरकारने राज्यसभेत दिली. या पाण्यापासून वीजनिर्मितीही करण्यात येणार असून महाराष्ट्रातही कोल इंडिया कंपनीसोबत वीजनिर्मितीचा करार करण्यात आला आहे. तामिळनाडूमध्ये नेविली खाणक्षेत्रात खाणीच्या खड्ड्यांत साचलेल्या पाण्यापैकी ६०० घनमीटर पाणी वीजनिर्मितीसाठी वापरले जात आहे, १४० घनमीटर पाण्यावर प्रक्रिया करून सुमारे साडेनऊ लाख लोकसंख्येची पिण्याच्या पाण्याची गरज भागविली जात आहे, तर ३८१ घनमीटर पाणी २५ हजार एकर शेतजमिनीवरील सिंचनासाठी वापरले जात आहे. चेन्नई महानगरातील पाणीपुरवठा योजनेतून महानगरात पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याकरिता तामिळनाडूत खाणीतील प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर केला जात असल्याची माहितीही राज्यसभेमध्ये सरकारकडून देण्यात आली.

वापरात नसलेल्या खाणी निरुपयोगी असतात, तेथे केवळ काळवंडलेली माती आणि खड्ड्याखड्ड्यात साचलेला भयावह काळोख, असे काल्पनिक चित्र आता पुसले जाऊ लागले आहे. अशा खाणी आता पाण्याच्या खाणी म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या असून, प्रत्येक खाणीत जमा झालेला पाण्याचा प्रत्येक थेंब वापरात आणला, तर भविष्यातील पाणीटंचाईच्या भयावर थोडीशी तरी दिलासादायक फुंकर ठरेल, असा सरकारचा विश्वास आहे. कालपरवापर्यंत हे पाणी सांडपाणी म्हणून नदीनाल्यांमध्ये सोडून दिले जात असे. आता त्या पाण्याचा प्रत्येक थेंब वापरण्याच्या सरकारी धोरणातून भविष्यभयाचे सावट काहीसे अंधुक होण्याची आशादायक परिस्थिती दिसू लागली आहे. अर्थात, तोकड्या स्मरणशक्तीचे गालबोट पुसून संकट समोर आल्यानंतर संघर्ष करताना येणारे शहाणपण अगोदरच समाजात रुजविण्याची गरज अधिक ठळकपणे अधोरेखित होणार आहे. ■

dineshgune@gmail.com

रविवारची पत्रे

स्वातंत्र्यवीर सावरकरांना भारतरत्न मिळावा!

देशाच्या स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीचा सेतू उभारून मारिता मारिता मरेतो झुंजेन! माता भगवती समोर नतमस्तक होऊन अशी प्रतिज्ञा करणारे बालवीर म्हणजे विनायक दामोदर सावरकर! बालपणीच अशी शपथ घेतलेल्या सावरकरांनी आपले संपूर्ण आयुष्य भारतमातेच्या चरणी अर्पण केले. वय वर्ष अवघे चौदा असताना, सशस्त्र क्रांतीचे रणशिंग फुंकताना सवंगड्यांना दिलेल्या संदेशात सावरकर म्हणाले, सशस्त्र क्रांतीवाचून स्वातंत्र्य कधीही संभवत नसल्याने तू तुझे कर्तव्य कर, यश येवो ना येवो, देशमाता मुक्त करण्यासाठी, एक शत्रू जरी बळी घेऊन तू मारीत मारीत मेलास तरी तुझं कर्तव्य तू केलंस...

''काय, ओळखलंत का मला? हे केवळ कपडे बदलले आहेत. मी तोच आहे. ईश्वराची इच्छा असेल तर पुन्हा भेट होईलच. तोवर जरी कधी सामान्य संसाराचा मोह होऊ लागला तर असा विचार करा की, मुलामुलींची वीण वाढवणं आणि चार काटक्या एकत्र करून घरटी बांधणं यालाच जर संसार म्हणायचे असेल तर असले संसार कावळे- चिमण्याही करीतच आहेत. पण संसाराचा याहून भव्य अर्थ घ्यायचा असेल तर मनुष्यासारखा संसार थाटण्यात आपणही कृतकार्य झालो आहोत. आपली चार चूल बोळकी फोडून टाकली, पण त्यायोगे पुढेमागे हजारो जणांच्या घरी क्वचित सोन्याचा धूर निघेल.'' हे उद्गार आहेत पन्नास वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा भोगायला निघालेले थोर स्वातंत्र्यसैनिक विनायक दामोदर सावरकर अशा भावपूर्ण शब्दात पत्नीचा निरोप घेतात तेव्हा स्वतः सावरकर आणि त्यांच्या पत्नीची मनोदशा काय असेल याची आपणास कल्पनाही करणे शक्य नाही.

काळ्या पाण्याची शिक्षा भोगत असताना स्वातंत्र्यवीर सावरकरांचा यांचा जो क्रूर छळ करण्यात आला, जे हाल करण्यात आले, ते वाचताना, ऐकताना अंगावर शहारे येतात. तेव्हा ते अत्याचार सहन करणाऱ्या व्यक्तींची अवस्था काय झाली असेल याची कल्पनाही करवत नाही. केवळ भारत स्वतंत्र व्हावा त्यासाठी स्वतःच्या संसारावर तुळशीपत्र ठेवून तुरुंगवास भोगताना क्षणोक्षणी हलाहल पचविणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकरांना 'भारतरत्न' या सर्वोच्च सन्मानाने कधी गौरविण्यात येईल हा प्रश्न असंख्य सावरकर भक्तांना पडला आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकर यांना दैवत मानणारी कोट्यवधी हिंदू जनता एका घोषणेची वर्षानुवर्षे वाट पाहत आहे ती म्हणजे स्वातंत्र्यवीर, हिंदू हृदयसम्राट विनायक दामोदर सावरकर यांना भारतरत्न हा सर्वोच्च नागरी सन्मान कधी प्राप्त होणार? वास्तविक पाहता या पुरस्कारामुळे केवळ हिंदू धर्मीयांचा गौरव होणार नाही तर भारतरत्न या सन्मानाचाही गौरव होणार आहे हे निश्चित!

मध्यंतरी अटलबिहारी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार स्थापन झाले तेव्हा जनतेची सावरकरांना भारतरत्नाने गौरविण्यात येईल ही आशा पल्लवित झाली होती परंतु वाजपेयी सरकारला अनेक पक्षांचा पाठिंबा असल्यामुळे ते होऊ शकले नाही हे जनतेने समजून घेतले. २०१४ पासून केंद्रात नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली कणखर, मजबूत सरकार स्थापन झाल्यानंतर हिंदू जनतेची आशा ठाम विश्वासात परिवर्तित झाली असून 'भारतरत्न सावरकर' हे शब्द सन्मानपूर्वक ऐकण्यासाठी कान आतुर झाले आहेत. विशेषतः काश्मीरबाबत जे ठोस निर्णय मोदी सरकारने घेतले ते पाहता २०२४ मध्ये ज्या पाच महनीय व्यक्तींना भारतरत्न जाहीर झाले. विशेष म्हणजे पी. व्ही. नरसिंह राव आणि प्रणव मुखर्जी यांना २०२४ ला भारतरत्न प्रदान करण्यात आला. तेव्हाही 'भारतरत्न सावरकर' अशी इच्छा प्रबळ झाली. विशेषतः पंतप्रधान मोदी यांच्यासह अनेक भाजप नेते, कार्यकर्ते हे सावरकरांचे चाहते आहेत परंतु तरीही हा योग का जुळून येत नाही? काही व्यक्ती वारंवार स्वातंत्र्यवीर सावरकरांवर टीका करतात, त्यांचा पराकोटीचा द्वेष करतात तेव्हा वाटते या लोकांना एकमेव उत्तर म्हणजे वि. दा. सावरकर यांना भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार प्रदान करण्यात यावा परंतु मोदी सरकार तिसऱ्या वेळी सत्तेत असूनही तो क्षण येत नाही याचे आश्चर्य वाटते.

लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विनंती आहे, आपण याबाबत स्वतः पुढाकार घेऊन २६ फेब्रुवारीला सावरकरांच्या पुण्यतिथीचा योग साधून स्वातंत्र्यवीर सावरकर यांना भारतरत्न या सन्मानाने गौरविण्यासाठी पंतप्रधान मोदींना तशी विनंती करावी, पाठपुरावा करावा आणि करोडो सावरकर भक्तांना आनंदित करावे.

नागेश शेवाळकर/९४२३१३९०७१

●● ●●

आमचा महाकुंभमेळ्याचा न भूतो न भविष्यति अनुभव

भव्य दिव्य महाकुंभ म्हणतात ते खरंच तिथे गेल्यावर कळतं. आम्ही १८ मैत्रिणी घरच्यांचा काळजीयुक्त विरोध पत्करून ३६ तासांच्या ट्रॅफिक जामच्या दिव्यातून जाऊन साग्रसंगीत गंगापूजा व गंगा स्नान करून आलो. यामागे वैज्ञानिक कारण आहे ते म्हणजे मंगळ, बुध आणि गुरू हे तिन्ही ग्रह एकाच रेखा वृत्तावर आलेले आहेत आणि असा हा योग १४४ वर्षांनंतर घडला. त्या तिघांचा ग्रॅव्हिटी फोर्स पृथ्वीवर आल्यामुळे त्याचे त्या तीर्थक्षेत्राला महत्त्व प्राप्त झाले आहे. आम्ही ७ तारखेला दुपारी ३ ला बसने निघालेलो ९ तारखेच्या पहाटे २.३० वाजता प्रयागराजला पोहोचलो.

३६ तासांच्या वाहतूक कोंडीतसुद्धा स्वतःचे मनोबल ढळू न देता, मस्त खात पीत, गाणी गात, एकमेकांना धीर देत वेळ काढला. पहाटे २.३० ला बस पार्किंग ते तंबूपर्यंतचे जवळपास ८/१० किमीचे अंतर चालत जाण्याशिवाय पर्याय नसल्यामुळे आम्ही नारे देत निघालो. पण ३ किमी नंतर आम्हाला ई रिक्षा मिळाली आणि जीव भांड्यात पडला. प्रयाग शहर बघत बघत आम्ही टेंटमध्ये पोचलो. अतिशय उत्तम प्रकारे सगळ्या टेंटची एकसारखी रचना केलेली आहे. नदीचा घाट, आजूबाजूचा परिसर दिव्यांच्या प्रकाशाने अक्षरशः उजळून निघाला आहे. जेव्हा पहाटे ४ वाजता हाडं गोठवणाऱ्या थंडीत नदी काठावर गेलो आणि नदीच्या पाण्यावर सोडलेले दिवे बघितले तेव्हा अक्षरशः अंगावर दिव्यतेचा शहारा आला. परिसरात अत्यंत उत्तम व्यवस्था केलेली आहे. सार्वजनिक स्वच्छतागृहे खरोखरच स्वच्छ ठेवली आहेत. स्त्रियांना स्नानानंतर कपडे बदलायला चांगली व्यवस्था केली आहे. लाखा-करोडो लोकांची गर्दी असली तरी कोणाची काही तक्रार नाही. सगळे भाविक आनंदाने कितीही चालावं लागलं तरी बेहत्तर पण गंगा स्नान करूनच यायचं याच एका जोशाने कितीही लांबच लांब चालतात. शहरातले नागरिक पण कमाईसोबत मदतसुद्धा करताना दिसले. अगदी स्वतःच्या घरचं कार्य असल्यासारखं त्यांनी तयारी केली असावी. सरतेशेवटी ९तारखेला संध्याकाळी ५ वा आम्ही परतीचा मार्ग धरला. ४ किमी चालल्यावर एका सामानवाहू गाडीवाल्याला गयावया करून ८ किमी अंतरावरच्या आमच्या बस पार्किंगजवळ सोडून देण्याची विनंती केली. आणि मजल दरमजल करत समाधानाने आमच्या घरच्यांसाठी गंगाजल घेत घरी अवतरलो.

त्यात अजून विशेष हे की, ज्या टूर ऑर्गनायझरसोबत त्याच्या भरवशावर आम्ही गेलो होतो त्याने आम्हाला अक्षरशः वाऱ्यावर सोडून दिले. फक्त तिकडचे पत्ते, लोकेशन देऊन उपकार केले. मात्र आम्ही १८ मैत्रिणी आणि त्या टूरमधले ५ वयस्कर, ५/६ बाकी महिला असे २५/३० जण इतक्या गर्दीतून संगम स्नान करून आमचं आम्हीच मॅनेज करून बस पार्किंगपर्यंत सुखरूप परत आलो. असा आमचा सात्त्विक आणि रोमहर्षक प्रवास पार पडला.

अंजली मुळावकर/नागपूर

कुंभमेळ्यातील पवित्र स्नानाची इच्छा पूर्ण झाली

मी खरंतर पक्केच ठरवले होते की कुंभमेळ्याच्या गर्दीत संगमावर स्नान करायला जायचे नाही. पण सुप्त इच्छा मनात असणार बहुधा, म्हणून पूर्वीचा ऑफिसचा हैदराबाद दौरा करून प्रयागराजला जाती झाले. गर्दी अनुभवायची होतीच पण खरा खरा ट्रॅफिक जाम पण अनुभवायला मिळालं.

संख्येने किती माहीत नाही पण शेकड्याने आखाडे वसवले होते. आणि प्रत्येक आखाड्यात चहा, जेवण सर्व विनाशुल्क. आखाड्यांच्या बाहेर चहा विकत मिळत होता फक्त १० रुपयाला. पण चव मात्र रेल्वेमध्ये मिळणाऱ्या २० रुपयाच्या चहापेक्षा उत्तम. आणि हे असं जवळपास मागचा एक महिना चाललय. अद्भुत आणि अविश्वसनीय आहे. तिथल्या लोकांच्या वागण्यात इतका सेवाभाव होता की एक क्षण वाटूनच गेलं की अशी सेवा आपण करतो का? एक महिन्यापासून लोक सुटी घेऊन आले आहेत तिथे सेवा करण्यासाठी. नदीच्या विस्तीर्ण वाळवंटात टेंट सिटी तयार केली आहे ती खूपच बघण्यासारखी होती. शेकडोंच्या संख्येत प्रसाधनगृहे इतकी छान तयार केल्या होत्या की त्या व्यवस्थेला खरा पहिला सलाम करायला हवा.

मौनी अमावास्येनंतर बरेचसे साधू परत गेल्यामुळे त्यांचे दर्शन घेता आले नाही. पापं धुतली गेली का हा प्रश्नच खरा चुकीचा आहे पण जर विचारणार असाल तर सर्वांत आधी वैचारिक पापं धुण्याचा विचार व्हायला हवा. आम्ही सर्वांनी अतिशय थंड पाण्यात मनसोक्त डुबक्या घेतल्या. २९ जानेवारीचा प्रसंग दुर्दैवीच होता. याची कारणं शोधणं हा न संपणाऱ्या संशोधनाचा विषय आहे. परंतु आखाड्यांमधून मिळणारी वागणूक, आम्ही बघितलेला गर्दीतील संयम, १५-१५ किमी चालूनही लोकांच्या चेहेऱ्यावरचा आनंद वैयक्तिक स्तरावर आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडत होता. कुठून येतो हा उत्साह? कुठून येते इतकी ऊर्जा? सेवाभाव कसा उतरतो मनात? असे प्रश्न त्यांची उत्तरं माहीत असूनही मनात घिरट्या घालत होते. ते उत्तर म्हणजे केवळ 'श्रद्धा' होय. तीच सर्व काही करवून घेत असते. प्रयागराजमधल्या लोकांची मात्र खूपच कमाल वाटते. आपण कोण त्यांना आशीर्वाद देणार म्हणा पण गेले दीड महिना त्यांना जे सहन करावं लागतंय त्याची कल्पनाही करू शकत नाही आपण. महाकुंभाच्या निमित्ताने हिंदू धर्माचे शक्ती दर्शन घडले. बघणाऱ्या तरुणांना महाकुंभ बघण्याचीही तेवढीच उत्सुकता आहे हे पाहून छान वाटले. त्यांची उत्सुकता वाढीला लागो आणि हिंदू असाच संघटित राहो हीच प्रार्थना करावीशी वाटते.

अनघा मोहरीर/नागपूर

●● ●●

डोडोचे स्मारक व्हावे

तरुण भारतच्या आकांक्षा पुरवणीत प्रकाशित 'अशी पाखरे येती' या निशिकांत मायी यांच्या सदरांतर्गत प्रकाशित 'आळशी डोडो' या लेखातून प्रकाशित झालेला डोडोचा इतिहास अप्रतिम असा आहे. अति शिकारीमुळे डोडो पक्षी पृथ्वीवरून नाहीसे झाले आहेत. मॉरिशसच्या बेटावर हा पक्षी मोठ्या संख्येने होता. डच लोकांनी या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वास्तव्य करण्यास सुरुवात केली. त्यांनी आपल्यासोबत कुत्रे, मांजरी सुद्धा या बेटावर आणले होते. मात्र डोडो पक्ष्यांना अतिवजनामुळे उडता येत नव्हते. याचाच फायदा घेऊन डच लोकांनी या पक्ष्यांची मोठ्या प्रमाणात शिकार करण्यास सुरुवात केली. या पक्ष्यांची मोठ्या प्रमाणात शिकार झाल्यामुळे कालांतराने ते नष्ट होत गेले आणि आता आता तर नाहीसे सुद्धा झालेले आहेत. पृथ्वीवरून ही जमात नाहीशी झालेली आहे. डोडो या पक्ष्याचे अस्तित्व नाहीसे झाले असले तरी त्याची आठवण येणाऱ्या पिढींना व्हावी, हा पक्षी कसा होता, काय करायचा आदी माहिती मिळावी या उद्देशाने मॉरिशसमध्ये या डोडो पक्ष्याचे स्मारक बनवले गेले आहेत. तिथल्या करन्सीवर सुद्धा डोडोचे चित्र आहे. इतकंच नव्हे तर येथील अनेक संस्थांना डोडोचे नाव देण्यात आले आहे. आपल्या नागपूर, विदर्भात सुद्धा पक्ष्यांविषयी अनेकांना प्रेम आहे. पक्ष्यांच्या माहितीविषयी उत्सुक ता आहे. डोडोविषयी आपल्या विदर्भ, नागपूरवासीयांना माहिती व्हावी या उद्देशाने उपराजधानी असलेल्या नागपुरात चौकात किंवा बगीच्यामध्ये डोडोचे स्मारक व्हावे, अशी इच्छा आहे. निशिकांत मायी यांनी डोडो पक्ष्याविषयी आठवणी जागृत केल्या याबद्दल त्यांचे अभिनंदन.

अशोक ढाकुलकर/७६६६१६०९८६

●● ●●

जैसी दृष्टी वैसी सृष्टी अणि वसुधैव कुटुंबकम्

महाभारतात कथा आहे. भगवान कृष्णाने युधिष्ठिर व दुर्योधनाला (ज्याला कृष्णभगवान सुयोधन म्हणायचे) नगरात फेरफटका मारून काय दिसले ते सांगा म्हणाले. दुर्योधन परत येऊन म्हणाला, ''सगळीकडे अनाचार, भ्रष्टाचार, पापी जनांची जास्त संख्या आहे.'' त्याच नगरात युधिष्ठिर फिरून आल्यावर म्हणाला, ''सगळीकडे सुख, शांती, समाधान आहे, मला तरी सगळेच पुण्यवान भेटले.'' तात्पर्य जैसे ज्याचे मन तयास तैसे दिसते. १४४ वर्षांनी आलेल्या या महाकुंभात काहींना (दुर्योधनी प्रवृत्तीच्या) लोकांना फक्त गर्दी, घाण, अव्यवस्था, रस्ता जाम, रस्ता रोको, वाहणारे मृतदेह, चेंगराचेंगरी दिसली (जी स्वाभाविक नसावी व मुद्दाम अपशकुन करण्याचाही प्रयत्न असावा अशी शंका येत आहे).

युधिष्ठिर वृत्तीच्या लोकांना हा विश्वव्यापक सनातन हिंदू अध्यात्म आणि देवत्वाचा महाकुंभ दिसला. काहींना आपल्या पूर्वजांची इच्छा पूर्ण झालेली दिसली. उत्तम नियोजन, सुव्यवस्था, चोख बंदोबस्त, शिव व गंगा भक्तांची सहृदयता दिसली. योगीजींचे, पोलिस, प्रशासन, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद, इतर धार्मिक/सामाजिक आस्थापनांचे निरलस व निरपेक्ष सहयोग/सहकार्य दिसले. सर्व सुनियोजनात आधुनिक संसाधनाचा व्यापक वापर पहिल्यांदाच अनुभवाला आला. म्हणूनच हा महाकुंभ आस्था, भक्ती, सनातन हिंदू धर्माचा पुनरुच्चर, एकता, अखंडता, उत्कृष्ट नियोजन, आर

आरंभ पालक मेळाव्यात २८ अंगणवाड्यांचा सहभाग; तब्बल २९ स्टॉलची उभारणी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१५ फेब्रुवारी-

सोलापूर शहर बालविकास प्रकल्प अधिकारी शहर पश्चिम विजापूर रोड बिटच्या वतीने आरंभ पालक मेळाव्याचे आयोजन म्हेत्रे वस्ती येथील ओंकार प्रशाला येथे करण्यात आले होते. या पालक मेळाव्यासाठी प्रमुख मान्यवर म्हणून बालविकास प्रकल्प अधिकारी प्रशांत शिर्के, बाल विकास प्रकल्प अधिकारी शहर पश्चिम विजापूर बिट दीपक ढेपे, ई आकार जिल्हा समन्वयक नितीन थोरात, ओंकार शाळेचे मुख्याध्यापक हरीहरदास गुरव, मुख्यसेविका रोहिणी निर्मळे, कुलकर्णी, ढेपे ओंकार प्रशालेतील सहशिक्षक श्रीकृष्ण भोसले, सुखदेव शिंदे, सावित्री गुरव आदींची उपस्थिती होती. प्रमुख मान्यवरांच्या हस्ते फित कापून तसेच प्रतिमा पूजन करून मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले.

तदनंतर प्रमुख मान्यवर बाल विकास प्रकल्प अधिकारी प्रशांत शिर्के आणि दीपक ढेपे यांनी उपस्थित माता-पालकांना व बालकांना मार्गदर्शन करताना बालकांचा आहार तसेच त्यांचे संगोपन कसे असावे, याबद्दल माहिती दिली. या मेळाव्यातून बालसंगोपनासाठी कशा पद्धतीने कृतीशील उपक्रम राबवायचे याची माहिती उपलब्ध करून देण्यात आली, असून याचा पालकांनी लाभ घेण्याचे आवाहन केले. दरम्यान, राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या एकात्मिक बालविकास सेवा योजना अंतर्गत सोलापूर शहर पश्चिम विजापूर रोड नागरी प्रकल्पातील २८

अंगणवाड्यांनी मेळाव्यात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या मेळाव्यात विविध अंगणवाड्यांनी एकाच छताखाली २९ स्टॉल उभारले होते. या विविध स्टॉल्समध्ये अंगणवाडी मध्ये येणाऱ्या बालक व त्यांच्या पालकांना बालसंगोपनासाठी कुटुंबाचे आणि आणि समुदायाचे सक्षमीकरण या आरंभ पालक मेळावा उपक्रमांतर्गत समजावून सांगण्यात आले. प्रास्ताविक मुख्य सेविका रोहिणी निर्मळे यांनी केले. सूत्रसंचालन ओकांर प्रशालेतील शिक्षिका सुकेशनी गायकवाड यांनी केले. तर पूजा गुरव यांनी आभार मानले.मेळावा यशस्वी करण्यासाठी अंगणवाडी सेविका भारती गुरव, प्रमिला शिंगे, जयश्री कुलकर्णी, ललिता शिंदे यांनी परिश्रम घेतले.

स्टॉलच्या माध्यमातून कृतिशील आरंभ उपक्रम

सदरच्या आरंभ उपक्रमांतर्गत बालसंगोपनाचे विविध धडे स्टॉलच्या माध्यमातून देण्यात आले. यामध्ये भविष्याचे झाड, मेंदूचे जाळे, झुंबर व खुळखुळा, कागदांचा पाऊस, आरसा, हस्तकौशल्याच्या आधारित मास्क टोप्या, चष्मे घरगुती पुठ्ठ्यावर बनवलेले साहित्य, घरगुती वाद्य वाजविणे, कापडी चिंध्या व पातळ कणिक आहार प्रात्यक्षिक, मायेचा घ्यास, सुरक्षित वातावरण, भरणीत बॉल टाकणे-काढणे, ओढणारी खेळणी, बोगदा, खेळघर, मुक्त खेळ किराणा दुकान दागिनेच दुकान, शेती ठसेकाम, आकार बालशिक्षण आदींसह आकार पालक ग्रुप स्टॉल गप्पा गाणी गोष्टी, लसीकरण तळ्यात म ळ्यात खेळ, खेळ संपवूया आहाराचे लॉकडाऊन, खेळ आहार व आरोग्याची सापशिडी,असे विविध स्टॉलची वैविध्यपूर्ण मांडणी बिटमधील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी यावेळी केली होती. स्टॉल्स पाहण्यासाठी आलेल्या पालकांना बालकांचा विकास करण्यास घरगुती साहित्यामधून बालकांशी खेळ व संवाद करुन आपण सर्वांगिण विकास कसा करु शकतो याचे महत्त्व प्रत्यक्षात प्रात्यक्षिक करुन दाखवले.

आत्मविश्वास हाच यशाकडे नेणारा मार्ग : जगताप

सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-

आपल्याला कोणत्याही क्षेत्रात यशस्वी व्हायचे असेल तर आत्म विश्वास हवा. आत्मविश्वासाने अशक्य गोष्टी शक्य करता येतात. आत्मविश्वास हाच यशाकडे नेणारा मार्ग आहे. परीक्षेला सामोरे जाताना आत्मविश्वासाने जा. यश तुमची वाट पाहत आहे.

असे उदगार जिल्हा परिषद दक्षिण सोलापूर चे शाखा अभियंता राजेश जगताप यांनी काढले. ते सद्संकल्प शिक्षण समूहाच्या विश्वभूषण विद्यालयात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना एसएससी बोर्ड परीक्षेसाठी शुभेच्छा देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या शुभेच्छा समारंभ कार्यक्रमात बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक सचिव समाजभूषण अण्णासाहेब भालशंकर हे होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे उपाध्यक्ष रमेश लोखंडे, बशीर शेख, रशीदाबानो शेख, मंजुश्री खंडागळे, सत्यवान पाचकुडवे, जय बाळशंकर, भाग्यश्री स्वामी हे उपस्थित होते. यावेळी रमेश लोखंडे, बशीर शेख, रशिदाबानो शेख यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन प्रवीण पाटील, अंजली इरवाडकर, सुहाना मकानदार यांनी केले. प्रास्ताविक शाहीन शेख हिने केले तर शेवटी आभार प्रणाली गायकवाड हिने मानले.

वसुंधरा महाविद्यालयातील १८ खेळाडूंची निवड

महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव

सोलापूर, दि.१५ फेब्रुवारी-

२६ व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवाचे आयोजन चंद्रपूर येथे होणार आहे. हा महोत्सव दिनांक १७ ते २२ फेब्रुवारी या कालावधीमध्ये संपन्न होणार आहे. यासाठी वसुंधरा कला महाविद्यालयातील सात क्रीडा प्रकारात १८ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. या सर्व विद्यार्थ्यांचे शाहू शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. लक्ष्मण ढोबळे, प्र. प्राचार्य डॉ. तानाजी देशमुख, क्रीडा संचालक डॉ. अशोक पाटील यांनी अभिनंदन केले. खो-खो महिला : सादिया मुल्ला, स्नेहा निम्बर्गी, आरती खरात, पायल गावडे, दिपाली कट्टीमनी. पुरुष : सौरभ चव्हाण, विकास राठोड, समर्थ कोळी, रोशन रजपूत. कबड्डी महिला : श्रद्धा अचलेरी, पायल पवार. पुरुष : आकाश कोळी. मैदानी स्पर्धा महिला: साक्षी कसबे, सादिया मुल्ला, स्नेहा निम्बर्गी.पुरुष: बबलू चव्हाण, सौरभ चव्हाण.

मंगळवेढ्यातील पुरवठा विभाग सलाईनवर

नागरिकांमधून तीव्र संताप; जिल्हाधिकाऱ्यांच्या भूमिकेकडे लक्ष

तभा वृत्तसेवा,
मंगळवेढा, दि.१५ फेब्रुवारी -

मंगळवेढा तहसील कार्यालयातील पुरवठा विभाग कर्मचार्याअभावी सलाईनवर असून याचा फटका रेशनकार्डाबाबत विविध कामे घेवून येणार्या नागरिकांना बसत असल्याने पुरवठा विभागाच्या कामकाजाबाबत गेल्या पंधरा दिवसापासून प्रचंड तक्रारी वाढल्या आहेत. परिणामी प्रत्येक कुटुंबाला लागणारे रेशनकार्ड मिळणे आता दुरापास्त झाल्याने नागरिक थेट या तक्रारी लोकप्रतिनिधीकडे मांडून सोडविण्याचा प्रयत्न करीत असल्याचे चित्र आहे.

दरम्यान,कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी याकामी गांभिर्यपूर्वक लक्ष घालून येथील पुरवठा विभाग सुरळीत करून नागरिकांची थांबलेली कामे पूर्ण करून दयावीत अशी मागणी नागरिकांतून जोर धरीत आहे.मंगळवेढा तहसील कार्यालयाच्या वरील मजल्यावर पुरवठा विभाग असून येथे पुर्वी खाजगी मुलांची संख्या जास्त कार्यरत असल्याने सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक लुट होत होती.एक रेशन कार्ड काढून देण्यासाठी जवळपास तीन ते पाच हजार रुपयापर्यंतचा रेट गेल्याच्या तक्रारी होत्या.सध्या या कार्यालयात एक शासकिय महिला कार्यरत असून या महिलेवर संपूर्ण पुरवठा विभागाची जबाबदारी टाकण्यात आली आहे.

मोठया प्रमाणात खाजगी मुले आर्थिक लुट करीत असल्याच्या तक्रारी वाढल्यानंतर येथील अधिकार्यांनी त्यांना हद्दपार करून कार्यालयाला कुलूप लावून हे कामकाज खालच्या हॉलमध्ये सुरु केले आहे. येथील पुरवठा निरिक्षक बदलून गेल्याने हे पद अदयापही रिक्तच आहे.पाठीमागे विदर्भातील एका महिलेचा आदेश पुरवठा विभागात झाला होता. मात्र येथील परिस्थिती पाहून त्या महिलेने कार्यभार न स्विकारताच आल्या पावलांनी माघारी निघून गेल्या.त्यामुळे येथे कर्मचार्यांची संख्या खूपच अपुरी आहे.सध्या एक महिला कार्यरत असून ही महिला येथील कामाच्या तणावामुळे सातत्याने आजारी पडत असल्यामुळे येथील कार्यालय चक्क सलाईनवर असल्याच्या नागरिक भावना व्यक्त करीत आहेत.

रेशनकार्ड हे प्रत्येक कुटुंबाशी निगडीत असल्यामुळे कामाचा ताण मोठा आहे.अनेक कार्डधारकांच्या धान्य मिळत नसल्याच्या प्रचंड तक्रारी आहेत. काही मोलमजुरी करणारे,भूमि हीन,भटके अशा लोकांनी धान्य मिळावे या मागणीसाठी गेल्या सहा महिन्यापुर्वी अर्ज केले आहेत. मात्र या अर्जाची अदयापही दखल घेतली गेली नसल्यामुळे कार्डधारकांना पुरवठा विभागाचे उंबरठे झिजविण्याची वेळ आली आहे.या पुरवठा विभागावर अंकुश कोणाचाच राहिला नसल्यामुळे नागरिकांना प्रचंड मनस्ताप होत आहे.

मुळ रजि. खरेदीखत पावतीसह हरवले बाबतची जाहीर नोटीस

तमाम लोकास विशेषतः पंढरपूर शहर, ता पंढरपूर, जि. सोलापूर येथील आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते कि, श्री. अन्सार जब्बार शेख, याच्या कडून रजि. खरेदीदस्त नं. १) ३३३३/२०१०, दि. ०५/०७/२०१०, व २) ८९९/२००६, दि. २४/०२/२००६ हे मूळदस्त पावतीसह व त्याची सूची २ च्या मूळ प्रति पंढरपूर शहर परिसरात दि. ०३/०२/२०२५ रोजी हरवलेले आहेत. त्याबाबत त्यांनी पंढरपूर शहर येथील सिटी पोलीस ठाणे पंढरपूर, येथे दि. १४/०२/२०२५ रोजी तक्रार केली आहे. त्याचा गहाळ रजि. क्र. १३५/२०२५ असा आहे.

श्री. अन्सार जब्बार शेख यांना सदर जागा कर्ज प्रकरण करून बँकेकडे तारण ठेवण्याकरिता मूळ रजि. खरेदीदस्त नं. रजि. खरेदीदस्त नं.१)३३३३/२०१०,दि. ०५/०७/२०१०, व २) ८९९/२००६, दि. २४/०२/२००६ हे मूळदस्त पावतीसह व त्याची सूची २ च्या मूळ प्रति आवश्यक आहेत. परंतु सदर खरेदीखत मूळ दस्त, त्याची पावती व त्याची सूची २ हरवल्याने यदाकदाचित कोणास मिळाल्यास खालील दिलेल्या पत्यावरती संपर्क साधून आणून द्यावेत, अथवा आमचे अशील हे मूळ रजि. खरेदीखत दस्त, सूची २ आणि पावती ऐवजी दुय्यमप्रत आधारे कर्ज प्रकरण करतील, यदाकदाचित याबाबत कोणाची काही हरकत अथवा त्या प्लॉट बाबत हक्क, हितसंबंध लीज, दान, गहाण, टाच, बोजा, अशाप्रकारे हक्क हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसाचे आत आमचे वकिलांना खाली दिलेल्या पत्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबित करावा. अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील कोणाची कसलीहि हरकत नाही असे गृहीत धरून सदर मिळकत बँकेकडे तारण ठेवतील, नंतर कोणाची कसलीही हरकत आल्यास आमचे अशीलाच्या व बँकेच्या हक्कावर व अधिकारावर ती बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत/फसवणूक होऊ नये या करिता हि जाहीर नोटीस दिली. दि. १५/०२/२०२५.

आमचे अशील
श्री. अन्सार जब्बार शेख

शिक्का

सही/-
ॲड. कुलदिप संजय क्षीरसागर
ऑफिस पत्ता :- ३९४५/१, भवानी पेठ,
सोलापुर रोड बार्शी, ता. बार्शी जि. सोलापुर.
(अशिला तर्फे ॲडव्होकेट)

खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकना विशेषतः शहर सांगोला, ता. सांगोला, जि. सोलापूर येथील व परिसरातील लोकांना ॲड. श्री सुधीर नंदकुमार वाघ बी.ए. एलएल.बी. रा. सांगोला, यांचेमार्फत कळविणेत येते की,

१) मिळकतीचे वर्णन तुकडी सोलापुर, पोटतुकडी व तालुके सांगोला पैकी शहर सांगोला येथील नगरपरिषद हद्दीतील मिळकत जमिन सर्व्हे नं. १०५/१ क्षेत्र २ हे २७ आर, आकार २ रू ९० पैसे, पैकी ० हे २५.४५ आर, आकार ० ३३ यासी चतुः सिमाः पुर्व भुईटेवस्ती, दक्षिणः झाकीर शेख यांची मिळकत, पश्चिमः कडलास रोड, उत्तरः- भुईटेवस्ती रोड, ही संपुर्ण मिळकत सुरेंद्र हरीदास खडतरे यांचे मालकी हक्क प्रत्यक्ष कब्जे वहीवाटीची मिळकत असून सदरची संपुर्ण मिळकतीबाबत सुरेंद्र हरीदास खडतरे व आमचे अशिल रमेश ज्ञानोबा भुसे व रूपेश रामचंद्र सलगर यांचे दरम्यान कायमखुष खरेदी विकीचा व्यवहार ठरला असून सदर मिळकत निर्वेध, निजोखमी, असलेबाबत आमचे अशिलांना सुरेंद्र हरीदास खडतरे यांनी खात्री व हमी दिलेली आहे.

२) सबब सदरील मिळकतीवर कोणाचा खरेदी विकी, तारण, गहाण, लीज, दान, पोटगी, बक्षीसपत्र, बँकेचा बोजा, वहीवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसात आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील नमुद पत्यावर संपर्क करून कागदपत्रांसह शहानिशा करून द्यावी. अन्यथा आमचे अशिल सदर मिळकतीबाबत कोणाची कसलीही तकार नाही असे समजुन कायमखुष खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही तकार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही कोणाची कसलीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे.

ता.१५/०२/२०२५

सही/-
(अशिलातर्फे ॲड)
ॲड.एस.एन.वाघ
रा. सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर
मोबाईल नं. ७८७५७१९९०९
ऑफिस पत्ता - चंद्रमाला, कुंभारगल्ली, सांगोला,
ता.सांगोला, जि. सोलापूर

सही/-
अशिल

मनोरमा परिवार अंतर्गत

श्री सदाशिव नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर

कोटणीस नगर, विजापूर रोड, सोलापूर

ग्राहकांच्या आग्रहास्तव खास ठेव योजना

१० दिवसांसाठी ९.००% व्याजदर
६० दिवसांसाठी ८.००% व्याजदर
११ महिन्यात दामदुप्पट ठेव योजना

अधिक महितीसाठी संपर्क

श्री. पुरुषोत्तम अनंत साखरे
चेअरमन (मो. ९१७५३६३९४५)

श्रीमती अनिता सुरेशराव जगताप
व्यवस्थापिका (मो. ८७८८३७४३६)

अक्कलकोटमध्ये महादासोही शरणबसप्पा पुराणाला सुरुवात

मृगेंद्र शास्त्री करणार निरुपण; वीरपक्षय्या गौडगाव, बसवराज आळंद देणार साथ

तभा वृत्तसेवा
अक्कलकोट, दि. १५ फेब्रुवारी-

येथील आझाद गल्लीतील श्री अक्कमहादेवी प्रतिष्ठापनाच्या ६ व्या वर्धापनदिनानिमित्त विरक्त मठाचे मठाधिपती श्री.म.नि.प्र. बसवलिंग महास्वामीजी यांच्या मार्गदर्शनाखाली उमराणी येथील श्री. मृगेंद्र शास्त्री यांच्या अमृतवाणीने आणि संगीत-वीरपाक्षय्या गौडगाव, तबला-बसवराज आळंद यांच्या साथसंगतीने घाणदेवी मैदानावरील आयोजित महादासोही कलबुर्गी शरणबसप्पा यांच्या जीवन चरित्रावरील दहा दिवशीय पुराण व प्रवचनाचे उद्घाटन हत्तीकणबस मठाचे मठाधिपती श्री. प्रभुप्रशांत महास्वामीजी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी समाजसेवक मल्लिनाथ स्वामी, ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन मंदिर चे अध्यक्ष शिवलिंगय्या स्वामी, समाजसेविका मल्लमा पसारे, सुनंदा तेली, संजय समाने, अक्कमहादेवी मंदिराचे अध्यक्ष अध्यक्ष श्रीशैल भरम शेट्टी, माजी नगरसेवक शशिकांत बकरे, वेदमूर्ती बसवराज शास्त्री, मंदिराचे उपाध्यक्ष शिवशंकर चनशेट्टी, सचिव लक्ष्मण समाने, विश्र्वस्त सुभाष आंदोडगी, देविदास कवटगी, संतोष लंगोटे, रविंद्र बंकापूरे, नारायण कदम, सुभाष पेठकर, शरणप्पा काडरामे, विश्वनाथ माळी, राजकुमार कांदे, सिध्दाराम स्थावरमठ, सचिन स्वामी, बाबुराव बोलदे, श्री रेणुकाचार्य अक्कनबळग भजन मंडळ, तसेच समस्त आझाद गल्ली, माळी गल्ली, बसवेश्वर नगर, राजीव नगर, शिवसम्राट चौक व शहर परिसरातील सर्व सदभक्त मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जाहीर समन्स

दि. कि. अर्ज नंबर ८१/२०१८
नि.नं. २९

बार्शी येथील मे. अतिरीक्त जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे कोर्टात

बंडु महादेव केदार / वगैरे - अर्जदार
विरुध्द
विठ्ठल ज्ञानोबा केदार / वगैरे - सामनेवाला

सामनेवाला नंबर १ -
श्री. विठ्ठल ज्ञानोबा केदार,
उ.व ४०, धंदा-शेती,
रा. घोटी, ता. माढा, जि. सोलापूर

ज्या अर्थी उपरोक्त अर्जदार यांनी आपले विरुध्द प्रस्तुतचे अपील विलंब माफीचे अर्जासह दाखल केला आहे. सदर अर्जातील पत्यावर आपणास समन्स बेलिफामार्फत गेले असता तेथे आपण राहत नसल्याचा बेलिफ रिपोर्ट आलेला आहे.

त्या आर्थी उपरोक्त सामनेवाला नंबर १ यांना या जाहीर समन्सद्वारे सुचित करण्यात येते की, वरील अर्जाचे व अपीलाचे कामी तुम्ही स्वतः अगर निर्देशित वकीलामार्फत पुढील नेमलेली ता. ११/०३/२०२५ रोजी या मे. कोर्टात सकाळी ११ वा. हजर राहून आपला बचाव मांडावा. आपण उपरनिर्देशित तारखेस या कोर्टात हजर रहाणेस कसुर केलेस आपले काही म्हणणे नाही असे समजुन पुढील हुकूम केले जातील. याची नोंद घ्यावी.

हे जाहीर समन्स सही शिक्यानिशी प्रसिध्द केले ता. १७/०२/२०२५

सही/-
कनिष्ठ लिपीक
जिल्हा न्यायालय, बार्शी

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा. अधिक्षक
जिल्हा न्यायालय, बार्शी

जाहीर समन्स

सोलापुर येथील मा. श्री. यू. एम. कुलकर्णी, न्यायाधिश, सहकार न्यायालय, सोलापूर यांचे कोर्टात

श्री शिवशक्ती अर्बन को. ऑप बैंक म. बार्शी
७३९ कर्मवीर नगर, पोस्ट ऑफिस शेजारी
शिवाजी नगर, जि. सोलापूर
वादी
विरुध्द
०१. हॉटेल येडेश्वरी
रा.४२६९, तुळजापूर रोड,
बार्शी, जि. सोलापूर वगेरे-०३.
प्रतिवादी

अ. क्र.	कि. सहकार केस नंबर	प्रतिवादीचे नांव नंबर व पत्ता	दावा रक्कम रुपये	नेमलेली तारीख
०१	०७/ २०१९	०२. निलबाई पती सायबण्णा सोरेगांवकर (मयत) कायदेशीर वारस २अ. विजय सायबण्णा सोरेगांवकर २ब. सचिन सायबण्णा सोरेगांवकर दोघे रा.तुळजापूर रोड, एसटी स्टॅण्डजवळ बार्शी, जि. सोलापूर	--	१०/०३/२०२५

ज्याअर्थी वादी यांनी तुमच्या विरुद्ध या न्यायालयामध्ये दावा दाखल केलेला आहे. यात वादीने नि.२२ वर अर्ज देवून दाव्यातील प्रतिवादी नं.२ यांचे वारसदारांना दाव्यात समाविष्ट करण्सासंबंधी विनंती केलेली आहे. त्यामुळे या जाहीर समन्स नोटीसद्वारे आपणांस असे सूचित करण्यात येते की, आपण व्यक्तिशः अथवा योग्य रितीने अधिकार प्रदान करण्यात आलेला अधिकृत प्रतिनिधी, जो या दाव्याच्या संदर्भातील सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तर देवू शकेल असा अधिकृत प्रतिनिधीमार्फत या न्यायालयामध्ये दि. १०/०३/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता सदरील दाव्यामधील आपल्या विरुध्य करण्यात आलेल्या मागणीच्या संदर्भात आपले म्हणणे व पुरावे दाखल करण्यासाठी हजर राहावे वर उल्लेखिलेल्या तारखेस व वेळेवर आपण हजर न राहिल्यास सदरील दाव्याचा एकतर्फी निकाल आपले गैरहजेरीमध्ये करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

दि.३१/०१/२०२५ रोजीच्या मा. न्यायाधिश साहेब यांचे न्यायालयात हुकूमान्वये जाहीर समन्स दिले असे.

न्यायालयाचा पत्ताः-
सहकार न्यायालय, सोलापूर,
सोलापूर जिल्हा महसूल कर्मचाऱ्यांची सहकारी पतसंस्थेची इमारत, पहिला मजला, जिल्हाधिकारी कार्यालयाचे आवारात, सोलापूर,

शिक्का

सही/-
(निलेश स. देवराज)
न्यायालयीन लिपीक,
सहकार न्यायालय, सोलापूर,

जाहीर समन्स

मे. उपनिबंधक, सहकारी संस्था, (परसेवा),
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर
११३ (अ), सिध्देश्वरपेठ, स्टेट बँक ऑफ इंडीया, ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर

समर्थ सहकारी बँक लि., सोलापूर - अर्जदार बँक
अंत्रोळीकर शॉपींग सेंटर, दत्तचौक, सोलापूर
विरूध्द
खालील तपशीलातील नमूद केलेले बँकेचे थकबाकीदार सभासद - जाब देणार

अं. न.	केस नंबर	दावा रक्कम	जाब	जाब देणार यांचे नाव व पत्ता
1	1010/ 24-25	91,212.00	1 2	**बनसोडे स्वाती नवनाथ** रा. पाटील वस्ती, नाझरे, सांगोला, सोलापूर **बनसोडे नवनाथ पांडुरंग** रा. पाटील वस्ती, नाझरे, सांगोला, सोलापूर
2	1013/ 24-25	92,538.00	1 2	**गंगाधरे उर्मिला सज्जन** रा. महादेव मंदिराच्या पाठीमगे, वणीचिंचाळे, सांगोला, सोलापूर **गंगाधरे सज्जन रमेश** रा. महादेव मंदिराच्या पाठीमगे, वणीचिंचाळे, सांगोला, सोलापूर
3	1019/ 24-25	1,56,647.00	1 2	**गंगाधरे भाग्यश्री आबासो** रा. शिरशी रोड, वाणी चिंचोल, सांगोला, सोलापूर **गंगाधरे आबासाहेब गजेंद्र** रा. शिरशी रोड, वाणी चिंचोल, सांगोला, सोलापूर
4	1022/ 24-25	1,06,562.00	1 2	**नागणे मंदाकिनी विश्वंभर** रा. पुजारवाडी शाळा सामोर, एखतपूर रोड, सांगोला, सोलापूर **नागणे प्रवीण विश्वंभर** रा. पुजारवाडी शाळा सामोर, एखतपूर रोड, सांगोला, सोलापूर
5	1025/ 24-25	89,598.00	1 2	**तांबोळी नसरीन हुफजुलखान** रा. जय भवानी चौक, सांगोला, सोलापूर **तांबोळी हुफजुलखान माणिक** रा. जय भवानी चौक, सांगोला, सोलापूर
6	1026/ 24-25	1,36,607.00	1 2	**सुतार सुवर्णा अजित** रा. पोस्ट ऑफिस, जय भवानी चौक, सांगोला, सोलापूर. **सुतार अजित बाळासाहेब** रा. पोस्ट ऑफिस, जय भवानी चौक, सांगोला, सोलापूर
7	1030/ 24-25	1,30,031.00	1 2	**जमादार शमशाद इसामुद्दीन** रा. लक्ष्मी मंदिर जवळ, लवटे गल्ली, महुद बीके, सांगोला, सोलापूर **जमादार इसामुद्दीन सल्लाउद्दीन** रा. लक्ष्मी मंदिर जवळ, लवटे गल्ली, महुद बीके, सांगोला, सोलापूर
8	1031/ 24-25	1,81,573.00	1 2	**पंडित उर्मिला प्रसाद** रा. सोनार माळा, कडलास, सांगोला, **सोलापूर पंडित प्रसाद माधव** रा. सोनार माळा, कडलास, सांगोला, सोलापूर
9	1032/ 24-25	1,45,293.00	1 . 2	**माने सुरेखा विनायक** रा. पारे रोड, माने वाडी, घेरडी, सांगोला, सोलापूर **माने विनायक सोमा** रा. पारे रोड, माने वाडी, घेरडी, सांगोला, सोलापूर
10	1035/ 24-25	1,80,856.00	1 2	**मनेरी सनाबी जावेद** रा. मुसलमान गल्ली, मेन रोड, गावठाण, वाकी घेरडी, ता. सांगोला, सोलापूर **मनेरी जावेद इनुस** रा. मुसलमान गल्ली, मेन रोड, गावठाण, वाकी घेरडी, ता. सांगोला, सोलापूर
11	1036/ 24-25	1,08,262.00	1 2	**टकले वैशाली वसंत** रा. कोष्टी गल्ली, सांगोला, सोलापूर **टकले वसंत महादेव** रा. कोष्टी गल्ली, सांगोला, सोलापूर
12	1040/ 24-25	67,684.00	1 2	**बागवान रेश्मा फिरोज** रा. कुंभार गल्ली, ता. सांगोला, सोलापूर **बागवान फिरोज वकील** रा. कुंभार गल्ली, ता. सांगोला, सोलापूर
13	1046/ 24-25	1,06,150.00	1 2	**बिले कुसुम बाबासाहेब** रा. वाढेगाव रोडा, पवार वस्ती, सांगोला, सोलापूर **बिले प्रशांत बाबासाहेब** रा. वाढेगाव रोडा, पवार वस्ती, सांगोला, सोलापूर
14	1048/ 24-25	98,447.00	1 2	**बाबर मयुरी अजय** रा. चोपडी, सांगोला, सोलापूर **बाबर अजय अशोक** रा. चोपडी, सांगोला, सोलापूर
15	1049/ 24-25	40,555.00	1 2	**पवार राणी ज्ञानेश्वर** रा. वाढेगाव रोड, पवार वस्ती, सांगोला, सोलापूर **पवार ज्ञानेश्वर रामचंद्र** रा. वाढेगाव रोड, पवार वस्ती, सांगोला, सोलापूर
16	1050/ 24-25	1,44,294.00	1 2	**देवळे आरती प्रकाश** रा. कमलापूर, सांगोला, सोलापूर **देवळे प्रकाश संभाजी** रा. कमलापूर, सांगोला, सोलापूर
17	1052/ 24-25	77,097.00	1 2	**विटेकर सुवर्णा भारत** रा. लाडे वस्ती, अजनाळे, सांगोला, सोलापूर **विटेकर भारत आनंदा** रा. लाडे वस्ती, अजनाळे, सांगोला, सोलापूर
18	1053/ 24-25	1,05,633.00	1 2	**ताटे सुरेखा विलास.** रा. चिंचाळे रोड, ताटे वस्ती, घेरडी, सांगोला, सोलापूर **ताटे विलास गणपत** रा. चिंचाळे रोड, ताटे वस्ती, घेरडी, सांगोला, सोलापूर
19	1056/ 24-25	1,21,696.00	1 2	**खाटीक समरीन नासिर** रा.१, कचेरी रोड, घनगर गल्ली, सांगोला, सोलापूर **खाटीक नासिर शब्बीर** रा.१, कचेरी रोड, घनगर गल्ली, सांगोला, सोलापूर
20	1131/ 24-25	1,78,210.00	3	**पंतगे महेश दत्तात्रय** रा. ई११,२ अभिषेक नगर, हॉटेल ॲम्बेसेडरजवळ, मुरारजी पेठ, सोलापूर ४१३००१
21	1132/ 24-25	3,45,051.00	2	**रा. स्वामी श्रीकांत शिवय्या** रा. १५६, विद्या नगर, शेळगी, सोलापूर

याकामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील जाव देणार यांना रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहे. परंतू जाव देणार समन्स रूजू न झाल्याने/त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदरचे जाहीर समन्स देत आहोत.

उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार- मंगळवार दि.०४/०३/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता दाव्यासंबंधीच्या कागदपत्रासह आपण या कार्यालयात हजर व्हावे.

या नोटीसीद्वारे जाव देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

म्हणून दिनांक १५/२/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयीन मुदेसह हे जाहीर समन्स दिले.

सही/-
उपनिबंधक,
सहकारी संस्था, (परसेवा)
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स्
को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर

महत्त्वाचे

मनु भाकर, पी.आर. श्रीजेशला स्पोर्ट्स स्टारचा सर्वोच्च सन्मान

मुंबई : मुंबईतील ताजमहाल पॅलेस येथे झालेल्या २०२५ च्या स्पोर्टस्टार एसेस पुरस्कार सोहळ्यात भारतीय हॉकी दिग्गज पी.आर. श्रीजेश आणि स्टार नेमबाज मनू भाकर यांना स्पोर्टस स्टारचा सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. २०२४ च्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताला कांस्यपदक जिंकून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या श्रीजेशला स्पोर्ट्सस्टार ऑफ द इयर (पुरुष) पुरस्कार मिळाला. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये दोन पदके जिंकणारी महिला नेमबाज मनू भाकरला स्पोर्ट्सस्टार ऑफ द इयर (महिला) पुरस्कार प्रदान करण्यात आला. तिने स्पोर्ट्सवुमन ऑफ द इयर पुरस्कारही जिंकला. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकणारा नेमबाज स्वप्निल कुसळे याला स्पोर्ट्समन ऑफ द इयर पुरस्कार मिळाला. मी आता एक माजी खेळाडू आहे हे समजणे खूप कठीण आहे. मी आता जिथे जातो तिथे लोक मला माजी खेळाडू आणि प्रशिक्षक म्हणतात. हे माझ्यासाठी खूप नवीन आहे, असे श्रीजेश म्हणाला. हा पुरस्कार जिंकून मला खूप आनंद झाला आहे. मी माझ्या वडिलांचे आणि माझ्या प्रशिक्षकाचे आभार मानू इच्छिते., असे मनू म्हणाली. ■

क्रीडामंत्र्यांनी मदत करावी कुस्तीगीरांची मागणी

नवी दिल्ली : आशियाई विजेता सुनील कुमार, २३ वर्षांखालील आशियाई सुवर्ण विजेती मिनाक्षी आणि इतर अनेक भारतीय कुस्तीपटूंनी शनिवारी क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांच्या निवासस्थानी जमले व त्यांनी अल्बानियामध्ये होणाऱ्या आगामी दुसऱ्या रँकिंग सिरीज कुस्ती स्पर्धेत सहभागी होण्यासाठी मदत करावी अशी मागणी केली .आगामी २६ फेब्रुवारी ते २ मार्च दरम्यान अल्बानियातील तिराना येथे होणाऱ्या वर्षातील दुसऱ्या रँकिंग सिरीजमध्ये सहभागी होण्यासाठी कुस्तीगीरांना मंत्रालयाने परवानगी रोखली आहे. आम्ही स्पर्धेत सहभागी होऊ शकत नाही आणि म्हणूनच आम्हाला स्पर्धेत सहभागी होण्याची परवानगी द्यावी अशी विनंती करण्यासाठी आम्ही मंत्र्यांच्या निवासस्थानी आलो आहोत,'' असे कुमार यांनी वृत्तसंस्थेला सांगितले. मार्चमध्ये अम्मानमध्ये होणाऱ्या आशियाई स्पर्धेसाठी आम्हाला गुण निश्चित करतॉ येईल आणि पहिल्या फेरीतील लढतींमध्ये आम्हाला मदत होईल,असे ते म्हणाले. तथापि, क्रीडामंत्री उत्तराखंडला गेले होते आणि उपलब्ध नव्हते. ८ ते १० कुस्तीपटूंचे शिष्टमंडळ दुपारी २ वाजेपर्यंत त्यांच्या निवासस्थानाबाहेर वाट पाहत होतोआणि नंतर ते निघून गेले. पूर्वी, आम्हाला क्रोएशियामध्ये होणाऱ्या जागतिक रँकिंग चॅम्पियनशिपमध्ये भाग घेण्याची परवानगी नव्हती आणि आता आम्हाला अल्बेनियाला जाण्याची परवानगी नाही. आम्ही येथे विनंती करण्यासाठी आलो होतो, आम्हाला कारण माहित नाही. यामध्ये क्रीडा मंत्र्यांनी हस्तक्षेप करावा, असे मिनाक्षी म्हणाली. मंत्रालयाने भारतीय कुस्ती महासंघाने (डब्ल्यूएफआय) आवश्यक शिफारसी वेळेवर सादर न केल्यामुळे मान्यता रोखली आहे.

महिला प्रो लीग : इंग्लंडला नमवून भारताची विजयी सुरुवात

भुवनेश्वर : शनिवारी कलिंगा स्टेडियमवर झालेल्या एफआयएच महिला प्रो-लीगच्या पहिल्या सामन्यात भारतीय महिला हॉकी संघाने इंग्लंडला ३-२ अशा एका गोलच्या फरकाने पराभूत केले. उपकर्णधार नवनीत कौरने अखेरच्या क्षणी गोल करून विजयावर शिक्कामोर्तब केले. भारताकडून वैष्णवी विठ्ठल फाळके (६ वे मिनिट), दीपिका (२५ वे मिनिट) आणि नवनीत कौर (५९ वे मिनिट) यांनी गोल केले, तर इंग्लंडकडून डार्सी बॉर्न (१२ वे मिनिट) आणि फियोना क्रॅकल्स (५८ वे मिनिट) यांनी गोल केले. भारताचे दोन गोल पेनॉल्टी कॉर्नरवरून झाले. पहिला चरण त्यंत स्पर्धात्मक होता. दोन्ही संघांनी एकदा गोल केला. सामन्याचा पहिला पेनॉल्टी कॉर्नर मिळवल्यानंतर भारताने सहाव्या मिनिटाला आघाडी घेतली. इंग्लंडने १२ व्या मिनिटाला कमकुवत बचावात्मक खेळीचा फायदा घेत प्रत्युत्तर दिले. दुसऱ्या चरणामध्ये चुरशीची लढत झाली.

सेवा संघाला सर्वसाधारण विजेतेपद

हल्दवानी : उत्तराखंडमधील विविध ठिकाणी आयोजित ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचा समारोप येथे एका शानदार समारोप समारंभाने झाला. या स्पर्धेत सेवा संघाने सर्वसाधारण अजिंक्यपद पटकावले. हरयाणाने दुसरे स्थान, तर महाराष्ट्राने तिसरे स्थान पटकावले. सर्वसाधारण विजेतेपद पटकावणाऱ्या सेवा संघाने ६८ सुवर्ण, २६ रौप्य आणि २७ कांस्यपदके जिंकून स्पर्धेत वर्चस्व गाजवले. हरयाणा संघाने ४८ सुवर्ण, ४७ रौप्य आणि ५८ कांस्य दके जिंकली. महाराष्ट्राने ५४ सुवर्ण, ७१ रौप्य आणि ७६ कांस्य पदकांसह सर्वोत्तम राज्य संघाचा प्रथम क्रमांक पटकावला व स्पर्धेत तिसरे स्थान मिळविले. ■

रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ चॅम्पियन्स चषकासाठी दुबईला रवाना

◆ **मुंबई, १५ फेब्रुवारी**

सलामीवीर रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारताचा वरिष्ठ पुरुष क्रिकेट संघ १९ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या आयसीसी चॅम्पियन्स चषक स्पर्धेत सहभागी होण्यासाठी मुंबईहून दुबईला रवाना झाला आहे.

भारतीय संघाचे सर्व गट अ सामने दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर होतील, तर उर्वरित सामने पाकिस्तानमध्ये होतील. मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरून मिळालेल्या दृश्यांमध्ये रोहित आणि त्याची चमू, सहायक कर्मचाऱ्यांसह दुबईला जाण्यासाठी विमानतळावर तपासणी करताना दिसले.

संघाची सुरुवातीची योजना दुबईला दोन तुकड्यांमध्ये रवाना होण्याची होती, परंतु गत महिन्यात जारी केलेल्या बीसीसीआयच्या धोरणात्मक मार्गदर्शक तत्त्वांमुळे संघ आपल्या परदेश दौऱ्यासाठी एकत्र प्रवास करेल, त्यामुळे संघाने मुंबईहून आठ संघांच्या स्पर्धेत एकत्र रवाना होण्याचा निर्णय घेण्यात आला.

मुंबई विमानतळाहून दुबईकडे रवाना होताना कर्णधार रोहित शर्मा, ऋषभ पंत व हार्दिक पांड्या

चॅम्पियन्स चषकामध्ये भारताला वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहची उणीव भासेल. बुमराह गत महिन्यात सिडनी येथे झालेल्या पाचव्या बॉर्डर-गावस्कर चषक कसोटीदरम्यान झालेल्या पाठीच्या दुखापतीतून सावरत आहे. त्याच्या जागी वेगवान गोलंदाज अष्टपैलू हर्षित राणाला संघात स्थान देण्यात आले आहे, तर यशस्वी जयस्वालच्या जागी मनगटाचा फिरकी गोलंदाज वरुण चक्रवर्तीलाही संघात स्थान देण्यात आले आहे. यशस्वी हा मूळतः तात्पुरत्या संघात होता. जयस्वाल आता मोहम्मद सिराज आणि शिवम दुबे यांच्यासोबत राखीव खेळाडूंपीकी एक आहे.

दोन वेळा चॅम्पियन्स चषक जिंकणारा भारत २०२५ च्या मोहिमेची सुरुवात २० फेब्रुवारी रोजी बांगलादेशविरुद्ध करेल आणि त्यानंतर २३ फेब्रुवारी रोजी पाकिस्तानविरुद्ध बहुप्रतिक्षित सामना खेळेल. भारत २ मार्च रोजी न्यूझीलंडविरुद्ध अ गटातील आपला शेवटचा सामना खेळेल.

आयसीसी चॅम्पियन्स चषकासाठी भारताचा संघ : रोहित शर्मा (कर्णधार), शुभमन गिल, विराट कोहली, श्रेयस अय्यर, के. एल. राहुल, ऋषभ पंत, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, हर्षित राणा, मोहम्मद शमी, अर्शदीप सिंग, रवींद्र जडेजा व वरुण चक्रवर्ती. ◀*(वृत्तसंस्था)*

गुलवीर सिंगचा नवीन राष्ट्रीय विक्रम

जागतिक पात्रता फेरी गाठण्याकडे लक्ष

◆ **नवी दिल्ली, १५ फेब्रुवारी**

सेनादलाचा लांब पल्ल्याचा धावपटू २६ वर्षीय गुलवीर सिंगने शुक्रवारी रात्री बॉस्टन युनिव्हर्सिटी इनडोअर ट्रॅक स्पर्धेत ३००० मीटर शर्यतीत राष्ट्रीय विक्रम मोडून वर्षाची सुरुवात योग्य मार्गावर केली.

हॅण्गझोऊ आशियाड क्रीडा स्पर्धेत १० हजार मीटरमध्ये कांस्यपदक जिंकणाऱ्या गुलवीरने २०२५ च्या बीयू डेव्हिड हेमेरी व्हॅलेंटाईन आमंत्रित इनडोअर ॲथ्लेटिक्स स्पर्धेत ३००० मीटर स्पर्धेत दुसरे स्थान मिळवत ७३८:.२६ सेकंद अशी वेळ नोंदवली. यापूर्वीचा सुरेंदर सिंगने २००८ मध्ये नोंदवलेला ७४९:.४७ सेकंदांचा राष्ट्रीय विक्रम मोडीत काढला. विशेष म्हणजे, सुरेंदर आता प्रशिक्षक आहे.

यावर्षाची सुरुवात धमाकेदारपणे केल्यानंतर, गुलवीरने २०२५ च्या जागतिक ॲथ्लेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेसाठी पुरुषांच्या १०,००० मीटर ट्रॅक शर्यतीत २७००:.०० चा स्वयंचलित पात्रता गुण मिळवण्यावर आपले लक्ष केंद्रित केले आहे. या वर्षाच्या अखेरीस जपानमध्ये पात्रता स्पर्धा होईल.

बॉस्टनमध्ये माझ्या हंगामातील पहिल्या इनडोअर शर्यतीत चांगली वेळ नोफ्लदवल्याबद्दल मला खूप आनंद आहे, असे २६ वर्षीय गुलनीर विक्रमी कामगिरी केल्यानंतर म्हणाला. ◀*(वृत्तसंस्था)*

सौदी लेडीज गोल्फमध्ये अदिती २० व्या स्थानावर

रियाध : लेडीज युरोपियन टूरमध्ये पहिल्यांदाच सहभागी होणाऱ्या आदिती अशोक आणि प्रणवी उर्सने पीआयएफ सौदी लेडीज इंटरनॅशनल गोल्फ स्पर्धेत चांगली सुरुवात केली. एलपीजीएमध्ये तिच्या हंगामाची सुरुवात करणाऱ्या अदितीने ३-अंडर ६९ चा स्कोर केला. ■

प्रथम विश्वमानांकित सिनरवर डोपिंगसाठी तीन महिन्यांची बंदी

◆ **मॉण्ट्रियल, १५ फेब्रुवारी**

जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या इटलीचा स्टार टेनिसपटू जॅनिक सिनरने जागतिक डोपिंग विरोधी एजन्सी (वाडा) सोबत एक करार केला आहे, या करारानुसार सिनरला तीन महिन्यांची बंदी घालण्यात येणार आहे.

मार्च २०२४ मध्ये क्लोस्टेबोल या प्रतिबंधित पदार्थासाठी दोनदा चाचणी पॉझिटिव्ह आल्यानंतर आंतरराष्ट्रीय टेनिस इंटिग्रिटी एजन्सीच्या (आयटीआयए) स्वतंत्र न्यायाधिकरणाने सिनरला कोणताही दोष किंवा निष्काळजीपणा नसल्याचे आढळून आले.

जागतिक डोपिंग विरोधी एजन्सीने(वाडा) पुष्टी केली की त्यांनी इटालियन टेनिस खेळाडू जॅनिक सिनरच्या बाबतीत केस रिझोल्यूशन करार केला आहे, ज्यामध्ये खेळाडूने मार्च २०२४ मध्ये क्लोस्टेबोल या प्रतिबंधित पदार्थासाठी पॉझिटिव्ह आल्यामुळे डोपिंग विरोधी नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल तीन महिन्यांच्या अपात्रतेचा कालावधी स्वीकारला आहे, असे वाडाने म्हटले आहे. ◀*(वृत्तसंस्था)*

न्यूझीलंडचा पाकिस्तानवर विजय

कराची : येथे झालेल्या तिरंगी क्रिकेट मालिकेच्या अंतिम सामन्यात न्यूझीलंडने पाकिस्तानवर पाच गड्यांनी विजय मिळवला आणि आयसीसी पुरुष एकदिवसीय संघ क्रमवारीत आपले स्थान मजबूत केले. २४३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंडने डॅरिल मिशेल (५७) कर्णधार टॉम लॅथम (५६) डेव्हॉन कॉनवे (४८), केन विल्यमसन (३४) आणि ग्लेन फिलिप्स (नाबाद २०) यांचे महत्त्वाचे योगदान होते. अलिकडेच फॉर्ममध्ये घसरण झाली असली तरी, लॅथमने आपल्या संघाला विजय मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

तथापि, गोलंदाजांनी न्यूझीलंडच्या विजयाचा पाया रचला. वेगवान गोलंदाज विल ओरोर्कने उत्कष्ट कामगिरी केली. ■

चंद्रपुरात रंगणार २६ वा राज्यस्तरीय क्रीडा महोत्सव

● गोंडवाना विद्यापीठ यजमान ● केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते उद्घाटन

◆ **चंद्रपूर, १५ फेब्रुवारी**

२६ व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवाचे आयोजन येत्या १८ ते २२ फेब्रुवारीदरम्यान चंद्रपूर आणि बल्लारपूर परिक्षेत्रात करण्यात आले असून, राजभवनद्वारे या महोत्सवाचे यजमानपद गोंडवाना विद्यापीठाला दिले आहे. अवघ्या महाराष्ट्रातील विद्यापीठांचे जवळपास चार हजार खेळाडू या महोत्सवात सहभागी होणार आहेत, अशी माहिती गोंडवाना विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे यांनी शनिवारी येथे पत्रपरिषदेत दिली.

पत्रपरिषदेत माहिती देताना डॉ. श्रीराम कावळे, डॉ. अनिल हिरेखण, डॉ. जयेश चक्रवर्ती आदी

यावेळी कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण, अधिष्ठाता डॉ. जयेश चक्रवर्ती, डॉ. संजय निंबाळकर, अधिसभा तथा आयोजन समिती सदस्य संजय रामगिरवार, सिनेट सदस्य नीलेश बेलखेडे, डॉ. प्रवीण जोगी, डॉ. राजेश दहेगावकर आदी उपस्थित होते.

डॉ. कावळे म्हणाले, या महोत्सवाचा उद्घाटन समारंभ २० फेब्रुवारी रोजी दुपारी ४ वाजता विसापूर येथील तालुका क्रीडा संकुलात होत असून, अध्यक्षस्थानी महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन असणार आहेत. महोत्सवाचे उद्घाटन केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते होईल, तर प्रमुख अतिथी म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक ऊईके तसेच क्रीडा मंत्री दत्तात्रय विठोबा भरणे हेही प्रामुख्याने उपस्थित राहतील. विद्यापीठ परिक्षेत्रातील खासदार, आमदार तसेच प्रशासकीय अधिकारीही याावेळी उपस्थिती राहणार आहेत.

२२ ला समारोप

महोत्सवाचा समारोपीय शनिवार, २२ फेब्रुवारी रोजी दुपारी १२.३० वाजता तालुका क्रीडा संकुल, विसापूर येथे होणार असून, कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे उपस्थित राहतील. ■

महोत्सवात मुले व मुलींचे कबड्डी, खो-खो, व्हॉलिबॉल, बास्केटबॉल, बॅडमिंटन, टेबल टेनिस, ॲथ्लेटिक्स व चेस अशा ८ क्रीडा प्रकारांच्या स्पर्धा होतील. २३ विद्यापीठांमधील ३ हजार ७२३ खेळाडूंची व संघ व्यवस्थापकांची नोंदणी झाली आहे.

निमंत्रित मान्यवर, विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, पदाधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी, स्वयंसेवक असे अंदाजित ४,५०० जण यामध्ये सहभागी होतील. त्यामुळे हे मोठे आयोजन असल्याचेही डॉ. कावळे यांनी सांगितले. ◀*(तभा वृत्तसेवा)*

गुकेशने एकही विजय मिळवला नाही

फ्रीस्टाइल बुद्धिबळ ग्रॅण्ड स्लॅममध्ये शेवटच्या स्थानावर

◆ **हॅम्बुर्ग (जर्मनी), १५ फेब्रुवारी**

फ्रीस्टाइल बुद्धिबळ ग्रॅण्ड स्लॅममध्ये सातव्या स्थानासाठीच्या प्ले-ऑफ सामन्याच्या दुसऱ्या डावांत इराणी-फ्रेंच ग्रॅण्डमास्टर अलिरेझा फिरोजाकडून पराभव पत्करून विश्वविजेता डी. गुकेश शेवटच्या स्थानावर राहिला.

अशाप्रकारे गुकेशने वाईसेनहॉस रिसॉर्ट येथे झालेल्या स्पर्धेत एकही विजय न मिळवता आपली विस्मयकारक मोहीम संपवली. पहिल्या दिवशीची लढत बरोबरीत सुटल्यानंतर विश्वरविजेत्या गुकेशला आज ३० चालींमध्ये पराभव पत्करावा लागला होता. वेळेची कसोटी मधल्या डावांत सुरू झाली जेव्हा गुकेशने चूक केली , त्यावेळी फिरोजाने आपल्या भौतिक फायद्याचा चांगला वापर केला.

दरम्यान, स्थानिक आवडत्या व्हिन्सेंट कीमरला एक नवोदित खेळाडू म्हणून ओळखले जात असतानाच स्पर्धेही पहिली आवृत्ती जिंकली. जर्मन खेळाडूने अनेक प्रतिस्पर्ध्यांवर पहिल्या टप्प्यात विजय मिळवणे ही या स्पर्धेच्या प्रायोजकांसाठी चांगली बातमी आहे.

जगातील सर्वोच्च बुद्धिबळ संघटना असलेल्या फिडेला चेस ९६० आवडत नाही, त्यामुळे या स्पर्धेला फिशर रँडम चेस किंवा फ्रीस्टाइल चेस असेही म्हणतात.

नॉर्वेच्या मॅग्नस कार्लसनने उझबेकिस्तानच्या जावोखिर सिंदारोव्हविरुद्धचा सलग दुसरा गेम जिंकला . हा स्पर्धेतील दुसरा मोठा विजय होता.

विश्वनाथन आनंदने माघार घेतल्यानंतर सिंदारोव्हला या स्पर्धेत प्रवेश मिळवला आणि उपांत्य फेरीत पोहोचून स्वतःला आमंत्रणासाठी पात्र असल्याचे सिद्ध केले. मात्र त्याला संधीचे सोने करता आले नाही आणि त्याला सलग दुसऱ्या दिवशी जगातील सर्वोत्तम खेळाडूंनी शिक्षा दिली.

हिकारू नाकामुराने आणखी एक उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्ह विरुद्ध २-० असा जिंकून पाचवे स्थान मिळविले.

निकाल : व्हिन्सेंट कीमर (जर्मन) मात फॅबियानो कारुआना (अमेरिका) १.५-०.५, नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्ह (उझबेकिस्तान) पराभूत वि. हिकारू नाकामुरा (अमेरिका), अलीरेझा फिरोज्जा (फ्रान्स) मात डी. गुकेश (भारत) १.५-०.५, जावोखिर सिंदारोव्ह (उझबेकिस्तान) पराभूत वि. मॅग्नस कार्लसन (नॉर्वे) ०-२.

अंतिम क्रमवारी : १. व्हिन्सेंट कीमर; २. फॅबियानो कारुआना; ३. मॅग्नस कार्लसन; ४. जावोखिर सिंदारोव्ह; ५. हिकारू नाकामुरा; ६. नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्ह; ७. अलीरेझा फिरोज्जा व ८. डी गुकेश. ◀*(वृत्तसंस्था)*

गुजरात जायण्ट्सचे युपी वॉरियर्सविरुद्ध विजयाचे लक्ष्य

◆ **वडोदरा, १५ फेब्रुवारी**

रविवारी वडोदरा येथे युपी वॉरियर्सविरुद्ध होणाऱ्या महिला प्रीमियर लीग हंगामाच्या पहिल्या सामन्यात गुजरात जायण्ट्सचा सामना होणार आहे. या सामन्यात गुजरातच्या फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणात लक्षणीय सुधारण दिसण्याची आशा आहे.

गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या आपल्या पहिल्या साखळीसामन्यात गुजरात जायण्ट्सने २०२ धावांचे लक्ष्य ठेवून दमदार फलंदाजी केली. तथापि, त्यांच्या गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणामुळे त्यांना निराशा झाली व पराभव पत्करावा लागला. सहा गोलंदाजी पर्याय असूनही, ते आरसीबीच्या फलंदाजांना रोखू शकले नाहीत .ऋचा घोषने केवळ २६ चेंडूत प्रभावी ६४ धावा फटकावल्या व आपल्या आरसीबीला विजय मिळवून दिला. गुजरातच्या तनुजा कंवरनेही एलिस पेरीला २ धावांवर बाद केले.

त्यापूर्वी गुजरात जायण्ट्सने उत्कृष्ट फलंदाजी केली होती, माजी कर्णधार बेथ मुनी (५६) व विद्यमान कर्णधार ॲशले गार्डनर (नाबाद ७९) यांच्या अर्धशतकांसह, वडोदरा येथील कोटाम्बी स्टेडियमवर गुजरातने ५ ब ाद २०१ धावांपर्यंत मजल मारली. ◀*(वृत्तसंस्था)*

जसपाल राणा, दीपाली देशपांडे राष्ट्रीय नेमबाजी प्रशिक्षकपदी

◆ **नवी दिल्ली, १५ फेब्रुवारी**

शनिवारी एनआरएआयच्या नियामक मंडळाने मान्यता दिलेल्या प्रशिक्षण तज्ज्ञांच्या एका लांब यादीत, द्रोणाचार्य पुरस्कार विजेते जसपाल राणा हे अपवादात्मक क्षमतेचे प्रशिक्षक आहेत. ते राष्टीय रायफल असोसिएशन ऑफ इंडिया (एनआरएआय) च्या पिस्तूलसाठी ''उच्च कामगिरी प्रशिक्षक'' म्हणून प्रशिक्षक पॅनेलमध्ये परतले आहेत. आणखी एक द्रोणाचार्य पुरस्कार विजेती, रायफल प्रशिक्षक दीपाली देशपांडे यांची मुख्य प्रशिक्षक म्हणून प्रशिक्षक पॅनेलमध्ये नियुक्ती करण्यात आली आहे.

जसपाल राणा दीपाली देशपांडे

अनेक आशियाई खेळांमध्ये सुवर्णपदक विजेता व दीर्घकाळ भारतीय नेमबाजीचा चेहरा राहिलेले जसपाल राणा यांनी मनू भाकरला पॅरिस ऑलिम्पिकमध्ये दोन ऑलिम्पिक पदके मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. यापूर्वी त्यांनी सुमारे एक दशक कनिष्ठ नेमबाजी संघाचे राष्टीय प्रशिक्षक म्हणून काम केले होते. खेळावर लक्ष केंद्रित करून व चांगल्या प्रक्रियेवर लक्ष केंद्रित करून भारतीय नेमबाजीसाठी एक मजबूत पाया तयार केला होता. रोनक पंडित पिस्तूलसाठी उच्च-कार्यक्षमता व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत, तर समरेश जंग हे मुख्य प्रशिक्षक म्हणून कार्यरत आहेत.

गत हंगामात दीपाली देशपांडे यांनी पुरुष व महिला अशा अर्धा डझन नेमबाजांना ऑलिम्पिक कोटा जिंकण्यासाठी मार्गदर्शन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती, त्यापैकी स्वप्निलअ कुसळेने पॅरिसमध्ये रायफल थ्री पोझिशन कांस्यपदक जिंकले.

रायफलमध्ये, मनोज कुमार उच्च-कार्यक्षमता प्रशिक्षक म्हणून कार्यरत राहतील. शॉटगनमध्ये, मानशेर सिंग हाय-परफॉर्मन्स मॅनेजर आणि अन्वर सुलतान हाय-परफॉर्मन्स कोच असतील. विक्रम चोप्रा हे मुख्य प्रशिक्षक म्हणून प्रशंसनीय काम करत आहेत.

जितू राय, पूजा घाटकर, ओम प्रकाश, सोनिया राय, दीपक दुबे, वर्षा तोमर आणि अमरिंदर सिंग चीमा ही एनआरएआयच्या प्रशिक्षकांच्या चमूमध्ये सहभागी होणारी काही प्रमुख नावे आहेत. ◀*(वृत्तसंस्था)*

आयसीसी चॅम्पियन्स चषकासाठी आठ संघ सज्ज

◆ **दुबई, १५ फेब्रुवारी**

१९९६ नंतर पाकिस्तान पहिल्यांदाच आयसीसी स्पर्धेचे आयोजन करणार आहे. १९ फेब्रुवारीपासून सुरु होणाऱ्याआायसीसी चॅम्पियन्स चषक क्रिकेट स्पर्धेसाठी सहभागी आठ संघ सज्ज झाले आहेत.

आठ संघांना दोन गटात विभागण्यात आले आहे. प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ उपांत्य फेरीत पोहोचतील. गट अ मध्ये यजमान पाकिस्तान, भारत, न्यूझीलंड आणि बांगलादेश यांचा समावेश आहे, तर गट ब मध्ये ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका आणि अफगाणिस्तान आहेत.

भारत २० फेब्रुवारी रोजी बांगलादेशविरुद्ध आणि २३ फेब्रुवारी रोजी प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी सामना करेल. भारत २ मार्च रोजी न्यूझीलंडविरुद्ध गट अ चा शेवटचा सामना खेळेल.

अव्वल आठ संघांच्या स्पर्धेत पाकिस्तान आणि यूएईमध्ये १९ दिवसांत १५ सामने खेळले जातील. भारत आपले सर्व सामने दुबईमध्ये खेळेल, यात उपांत्य व अंतिम सामन्याचा समावेश आहे. ४ व ५ मार्च रोजी उपांत्य सामने आणि ९ मार्च रोजी अंतिम सामना होणार आहे.

चॅम्पियन्स चषकासाठी सर्व ८अंतिम संघ असे :-

अफगाणिस्तान संघ : हशमतुल्ला शाहिदी (कर्णधार), इब्राहिम झदरन, रहमानउल्ला गुरबाज, सेदिकुल्लाह अटल, रहमत शाह, इक्रम अलीखिल, गुलबदिन नायब, अजमतुल्ला उमरझाई, मोहम्मद नबी, रशीद खान, नांगयाल खरोती, नूर अहमद, फजलहक फारूकी, फरीद मलिक, फरीद मलिक. राखीव: दरविश रसूली, बिलाल सामी.

बांगलादेश संघ : नजमुल हुसेन शांतो (कर्णधार), सौम्या सरकार, तन्झिद हसन, तौहिद हृदयॉय, मुशफिकुर रहीम, एमडी महमूद उल्ला, जाकेर अली अनिक, मेहदी हसन मिराझ, रिशाद हुसेन, तस्किन अहमद, मुस्तफिजुर रहमान, परवेझ होसाई, इमोन, नज़िद अहमद, नज़ीद हसन, नज़मीन अहमद.

दक्षिण आफ्रिका संघ: टेम्बा बावुमा (कर्णधार), टोनी डी. झोर्झी, मार्को जानसेन, हेनरिक क्लासेन, केशव महाराज, एडन मार्कराम, डेव्हिड मिलर, वियान मुल्डर, लुंगी नगिदी, कॅगिसो रबाडा, रायन रिकेल्टन, तबरेज शम्सी, ट्रिस्टन स्टब्स, रॅसी व्हॅन डेर डसेन, कॉर्बिन बॉश. प्रवासी राखीव खेळाडू : क्वेना माफाका.

न्यूझीलंड संघ: मिचेल सॅण्टनर (कर्णधार), मायकेल ब्रेसवेल, मार्क चॅपमन, डेव्हॉन कॉनवे, लॉकी फर्ग्युसन, मॅट हेन्री, टॉम लॅथम, डॅरिल मिचेल, विल ओरोर्क, ग्लेन फिलिप्स, रचिन रवींद्र, जेकब डफी, नाथन स्मिथ, केन विल्यमसन, विल यंग.

ऑस्ट्रेलिया संघ : स्टीव्ह स्मिथ (कर्णधार), शॉन ॲबॉट, ॲलेक्स केरी, बेन द्वारशुइस, नॅथन एलिस, जेक फ्रेझर-मॅकगर्क, आरोन हार्डी, ट्रॅव्हिस हेड, जोश इंगलिस, स्पेन्सर जॉन्सन, मार्नस लाबुशाने, ग्लेन मॅक्सवेल, तन्वीर संघा, मॅथ्यू शॉर्ट, ॲडम झॅम्पा. प्रवासी राखीव खेळाडू : कूपर कॉनोली.

इंग्लंड संघ : जोस बटलर (कर्णधार), जोफ्रा आर्चर, गस ॲटकिन्सन, जेकब बेथेल, हॅरी ब्रुक, ब्रायडन कार्स, बेन डकेट, जेमी ओव्हरटन, जेमी स्मिथ, लियाम लिव्हिंगस्टोन, आदिल रशीद, जो रूट, साकिब महमूद, फिल साल्ट, मार्क वूड.

पाकिस्तान संघ : मोहम्मद रिजवान (कर्णधार), बाबर आझम, फखर जमान, कामरान गुलाम, सौद शकील, तैयब ताहिर, फहीम अशरफ, खुशदिल शाह, सलमान अली आघा, उस्मान खान, अबरार अहमद, हरिस रौफ, मोहम्मद हसनैन, नसीम शाह, शाहीन शाह आफ्रिदी.

भारतीय संघ : रोहित शर्मा (कर्णधार), शुभमन गिल, विराट कोहली, श्रेयस अय्यर, केएल राहुल, ऋषभ पंत, हार्दिक पंड्या, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, हर्षित राणा, मोहम्मद. शमी, अर्शदीप सिंग, रवींद्र जडेजा, वरुण चक्रवर्ती. ◀*(वृत्तसंस्था)*

दुखापतग्रस्त श्रेयंका पाटील बाहेर स्नेह राणा आरसीबीत दाखल

वडोदरा : रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने (आरसीबी) शनिवारी महिला प्रीमियर लीग (डब्ल्यूपीएल) २०२५ च्या उर्वरित हंगामासाठी जखमी श्रेयंका पाटीलच्या जागी बदली खेळाडू म्हणून स्नेह राणाशी करार केला आहे. आरसीबीकडून १५ सामने खेळणारी आणि १९ बळी टिपणारी श्रेयंका दुखापतीमुळे डब्ल्यूपीएलच्या तिसऱ्या आवृत्तीतून बाहेर पडली आहे. अष्टपैलू खेळाडू असलेली राणा यापूर्वी गुजरात जायण्ट्सकडून खेळली आहे. ती ३० लाख रुपयांना आरसीबीमध्ये सहभागी झाली आहे. ■

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे सांगोल्यात स्वागत

तभा वृत्तसेवा,
सांगोला, दि.१५ फेब्रुवारी-

सांगोला शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथील भव्य स्मारकामधील चबुतऱ्यावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात येणार आहे. सदर पूर्णाकृती पुतळ्याचे शुक्रवारी म हामाता भिमाई रामजी आंबेडकर यांच्या १७१ व्या जयंती दिनानिमित्त सांगोला शहरात मुंबईहून आगमन झाले. यावेळी मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.

यावेळी महामाता भिमाई व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची रॅली काढत सांगोला शहरातील सर्व महापुरूषांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे सांगोला शहरात जयघोषात, उत्साहपूर्ण वातावरणात, जल्लोषात स्वागत करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थीचे धम्मविधी कोल्हापूरचे भंतो संबोधी व गुगुवाड (ता.जत, जि. सांगली) येथील भंतो गोविंदो मानदो यांनी केले. यावेळी आ.डॉ. बाबासाहेब देशमुख, माजी आ. ॲड. शहाजीबापू पाटील, माजी नगराध्यक्ष रफिकभाई नदाफ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते विविध क्षेत्रातील मान्यवर यांच्यासह भीम अनुयायी, फुले शाहू आंबेडकर प्रेमी, बहुजन बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहरात ठिकठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले. जयंती उत्सव मंडळाचे अध्यक्ष तानाजी बनसोडे, खजिनदार सीताराम बनसोडे, सेक्रेटरी बाळासाहेब बनसोडे, उपाध्यक्ष अप्सरा ठोकळे, मैना बनसोडे, सहसचिव रुपेश बनसोडे, संचालिका विजया बनसोडे, संचालक दीपक बनसोडे, राम स्वरूप बनसोडे, सतीश बनसोडे, कुंदन बनसोडे, जगदीश भोरकडे, किशोर बनसोडे, सोपान बनसोडे, मिलिंद बनसोडे, प्रशांत धनवजीर, सुभाष बनसोडे, महादेव बनसोडे, उमेश बनसोडे, मोहन गुडदौरू,

धम्म मित्र बापूसाहेब ठोकळे, तज्ञ संचालक ॲड.आनंदा बनसोडे, ॲड. सागर बनसोडे यांनी परिश्रम घेतले.

सांगोला : शहरामध्ये आगमन सोहळ्याच्या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार घालून भाजपाचे सोलापूर पश्चिम जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांनी अभिवादन केले. यावेळी ओबीसी प्रदेश उपाध्यक्ष विजयकुमार इंगोले, शहराध्यक्ष विशाल बनसोडे उपस्थित होते.

कौठाळी येथे अवैध वाळू उपसा; चार दिवसांनी दोघांवर गुन्हा दाखल

महसूल अधिकारी, कर्मचाऱ्यांबद्दल उलटसुलट चर्चा

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि. १५ फेब्रुवारी-

तालुक्यातील कौठाळी येथे अवैध वाळू उपसा तसेच वाहतूक केल्या प्रकरणी येथील ग्रामीण पोलीस ठाण्यात दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र घटने नंतर तब्बल चार दिवसानंतर गुन्हा दाखल करण्यात आला असल्यामुळे याबाबत उलट सुलट चर्चा रंगू लागली आहे

येथील महसूल विभागाचे पथक कौठाळी येथे ९ फेब्रुवारी २०२५ रोजी कारवाई करण्यासाठी गेले होते. या वेळी या पथकाला एका ठिकाणी ट्रॅक्टर व ट्रॉलीच्या माध्यमातून अवैद्य वाळूचा उपसा तसेच वाहतूक होत असल्याचे दिसून आले. मात्र पथक तेथे पोहोचतात वाळू उपसा करणारे लोक ट्रॅक्टर व ट्रॉली घेऊन पळून गेले. मात्र याच दिवशी महसूल विभागाच्या पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून गुन्हा दाखल होणे गरजेचे होते. मात्र तसे झाले नाही आणि घटने नंतर तब्बल चार दिवसानंतर म्हणजे १३ फ ेब्रुवारी २०२५ रोजी पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाण्यात महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी अवैध वाळू उपसा केल्या प्रकरणी विकास नागटिळक व आबा टिंगरे या दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान या घटनेमुळे येथील महसूल विभागात खळबळ उडाली असून तब्बल चार दिवसानंतर गुन्हा दाखल झाल्यामुळे याबाबत उलट सुलट चर्चा होऊ लागल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

पालकमंत्र्यांच्या आदेशाला केराची टोपली

पंढरपूर तालुक्यातून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा तसेच वाहतूक होत असल्याने ती बंद करण्यात यावी असे आदेश पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी प्रशासनाला दिले आहेत. तरीही अवैध वाळू उपसा तसेच वाहतूक बिनदिक्कतपणे सुरूच आहे. यामुळे पालकमंत्र्यांच्या आदेशाला महसूल अधिकारी व पोलिसांनी चक्क केराची टोपली दाखविली असल्याची चर्चा रंगू लागली आहे.

अपघातातील तरुणीचा मृत्यू

तभा वृत्तसेवा,
वैराग, दि. १५ फेब्रुवारी-

वैराग येथे पंधरा दिवसापूर्वी हिंगणी रस्त्यावर ट्रॅक्टर व दुचाकीचा अपघात होऊन ऋतुजा गंभीर जखमी झाली होती. तिच्यावर सोलापूर येथे खासगी रुग्णालयामध्ये उपचार चालू होते. पंधरा दिवस तिची मृत्यूशी सुरू असलेली झुंज अखेर अपयशी ठरली असून तिचा शनिवारी मृत्यू झाला आहे.

तिच्या मृत्यूमुळे वैराग शहरात हळहळ व्यक्त होत आहे. रस्त्याच्या कडेला बेशिस्तपणे उभी केलेली वाहने व रस्त्यावरील वाढते अतिक्रमण अपघातास कारणीभूत ठरत असल्याने त्याविषयी नागरिकातून संताप व्यक्त होत आहे. वैराग (ता. बार्शी) येथील नगरसेवक अतुल मोहिते (रा. दत्तनगर, वैराग) हे ३१ जानेवारी रोजी पुतणी ऋतुजा अजित मोहिते (वय १९) हिला घेऊन मोटारसायकलवरून घराकडे निघाले होते. त्यावेळी हिंगणी रोडवर उसाच्या मळीने भरलेला ट्रक्टर व मोटरसायकल यांच्यात अपघात झाला. त्यामध्ये ऋतुजा हिच्या उजव्या पायाच्या मांडीला गंभीर जखम झाली. तिचा डावा कान तुटला व डोक्याला गंभीर मार लागला होता. ती वैद्यकीय शिक्षण घेत होती. तिचे चुलते अतुल मोहित देखील जखमी झाले.

संक्षिप्त वृत्त

संस्कृत ओलंपियाड स्पर्धेत कर्मयोगी विद्यानिकेतनचे घवघवीत यश

पंढरपूर, दि. १५ फेब्रुवारी-

येथील कर्मयोगी विद्यानिकेतन प्रशाले मधील विद्यार्थ्यांनी अखिल भारतीय भाषा ओलंपियाड संस्थेमार्फत घेण्यात येणाऱ्या संस्कृत व्याकरण परीक्षेमध्ये भरघोस यश संपादन केल्याची माहिती प्रशालेच्या प्राचार्या प्रियदर्शिनी सरदेसाई यांनी दिली. या संदर्भात माहिती देताना प्राचार्या सरदेसाई यांनी सांगितले की, विद्यालयातील इयत्ता ९वी व १०वीच्या विद्यार्थ्यांनी या परीक्षेत १०० पैकी ९८, ९७ अशा प्रकारे गुण प्राप्त करून विशेष प्राविण्य, प्रथम श्रेणी मिळवली. ही स्पर्धा संपूर्ण भारत देशामध्ये घेतली जाते. तसेच या स्पर्धेतील विद्यार्थ्यांना शाळेतील क्रमांकानुसार प्रशस्तीपत्रक गौरवचिन्ह व रोख पारितोषिक दिले जाते. दरम्यान या सर्व विद्यार्थ्यांना संस्कृत शिक्षक गिरीश खिस्ते यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन प्रशालेचे प्रमुख विश्वस्त रोहन परिचारक, प्रशालेच्या प्राचार्या प्रियदर्शिनी सरदेसाई यांनी केले.

अकलूज येथे श्री संत शिरोमणी नरहरी महाराजांची पुण्यतिथी साजरी

अकलूज, दि. १५ फेब्रुवारी-

येथील लाड सुवर्णकार युवक मंडळातर्फे श्री संत शिरोमणी नरहरी महाराजांची ७३९ वी पुण्यतिथी धार्मिक विधीने साजरी करण्यात आली यावेळी हभप अनिल महाराज गायकवाड, शिवरत्न भजनी मंडळ बावडा यांची भजनसेवा होऊन दुपारी १२ वाजता पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी माजी सरपंच किशोरसिंह माने -पाटील, क्रांतिसिंह माने-पाटील, मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब सदानंद दहिवाळ, एकनाथ सदानंद दहिवाळ, रमेश वसंतराव शहाणे, सुधीर वसंतराव शहाणे, दिलीप उदावंत, राजन माळवे, लक्ष्मण बागडे, प्रदीप डहाळे, मंगेश बोराडे, सतीश बोराडे, रवींद्र बोराडे, उपस्थित होते. समाजाचे राजेंद्र ज्ञानेश्वर माळवे व वृषाली राजेंद्र माळवे यांनी महाप्रसाद सेवा बजावली. आभार संदीप सुधीर शहाणे यांनी मानले.

मोडनिंब वितरिकेतून पाणी सोडण्याची मागणी

मोडनिंब, दि. १५ फेब्रुवारी-

मोडनिंबला वितरिकेच्या माध्यमातून भेंड येथून पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे माढा तालुकाध्यक्ष कैलास तोडकरी यांनी केली. निवेदन सीना माढा उपसा प्रकल्पाच्या उपविभागीय कार्यालय अधिकाऱ्यांना देण्यात आले. भेंड येथून पाणी सोडण्यात येते. परंतु अद्यापपर्यंत पाणी सोडण्यात आलेले नाही. यामुळे त्यांनी ही मागणी केली आहे.

मोडनिंब येथे संत नरहरी महाराजांचा पुण्यतिथी सोहळा भक्तिभावात

तभा वृत्तसेवा,
मोडनिंब, दि. १५ फेब्रुवारी-

मोडनिंब (ता. माढा) येथे श्री संत नरहरी महाराज यांचा पुण्यतिथी सोहळा साजरा करण्यात आला. महालिंगेश्वर मंदिरात सकल सोनार समाज मोडनिंब शहराच्या वतीने त्यांचा पुण्यतिथी सोहळा भक्तीमय वातावरणात साजरा केला.

श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. मंदिरात आकर्षक फुलांची सजावट तसेच विद्युत रोषणाई, रांगोळी करण्यात आली होती. विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल होती. भक्त मंडळांच्या वतीने महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते. मंदिरामध्ये फुलांची आरास करण्यात आली होती. रंगीबेरंगी फुलांनी केलेली ही आरास भाविकांचे लक्ष अधिकच वेधून घेत होती.दुपारी बारा वाजता पुष्प वृष्टी करण्यात आली.फटाक्यांची आतषबाजी झाली नंतर महाआरती झाली.यानंतर किरण महाराज सूरवसे यांची कीर्तन सेवा झाली. भजनकीर्तन व भक्तिगीतांचे कार्यक्रम सुरू होते. श्रींच्या प्रतिमेवर पुष्पवृष्टी करून महाआरती करण्यात आली. कार्यक्रमाची सांगता महाप्रसादाने झाली. यावेळी माजी सभापती विक्रमसिंह शिंदे, माजी समाजकल्याण सभापती शिवाजी कांबळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे कैलास तोडकरी,शहाजी पाटील, सुभाष वेदपाठक, ग्रामस्थ यासह महिलाही मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आनंद क्षीरसागर, राहुल वेदपाठक, युवा उद्योजक आकाश पंडित, गणेश महामुनी, शशिकांत दीक्षित,शिवानंद दीक्षित, महेश दीक्षित, संजय पंडित, चेतन दीक्षित, रमेश दीक्षित, संतोष पंडित आदींनी परिश्रम घेतले.

पंढरपुरात अडीच लाखांचा गांजा जप्त

पोलिसांनी पाठलाग करुन वाहन घेतले ताब्यात

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि.१५ फेब्रुवारी-

शहरातील जुन्या अकलूज रस्त्यावर गांजा विक्रीसाठी आलेले वाहन शहर पोलिसांनी फिल्म ीस्टाईलने पाठलाग करून ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या या वाहना मध्ये चक्क अडीच लाख रुपयांचा गांजा मिळून आला. याप्रकरणी इंदापूर तालुक्यातील बावडा येथील रोहन शंकर चव्हाण व रोहित प्रकाश कांबळे यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

शहर पोलिसांनी दिलेली माहिती अशी की,शहर पोलिसांचे पथक गुरुवारी रात्री पाहणी करीत असताना जुन्या अकलूज रस्ता येथील डीमार्टच्या अंधाऱ्या रस्त्यावर त्यांना एक चारचाकी वाहन संशयास्पद स्थितीमध्ये आढळून आले. याची चौकशी करण्यासाठी पोलिस जात असताना सदर वाहन चालक वाहन घेऊन पळून जाण्याचा प्रयत्न करीत होता. मात्र पोलीस पथकाने त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले असता ईरटीका (क्रं.एमएच ७ एस ३६९९) या वाहनात चालकासह एक व्यक्ती आढळून आली. या बरोबरच वाहनांमध्ये सहा खोकी देखील आढळून आली. त्या प्रत्येक खोक्या मध्ये दोन किलो व त्यापेक्षा अधिक गांजा आढळून आला. या कारवाईत १२ किलोहून अधिक गांजा जप्त करण्यात आला असून याची किंमत २ लाख ४५ हजार रुपये इतकी आहे. तसेच ८ लाख रुपयाची ईरटीका देखील ताब्यात घेतली असून पोलिसांकडून एकूण १० लाख ४५ हजार ४४० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर कारवाई सहायक पोलीस निरीक्षक कांबळे, पोसई राजेश गोसावी, सहायक फौजदार कदम, हवालदार गोडसे, औटी, हेंबाडे, निलेश कांबळे, मंडले, माने व बिचकुले यांनी पार पाडली. आता पोलिस पुढे काय कारवाई करणार, या त्यांच्या भूमिकेकडे लक्ष लागले आहे.

शिवाजी महाविद्यालयाच्या खेळाडूंची निवड

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. १५ फेब्रुवारी-

राज्यपाल कार्यालयामार्फत १८ ते २२ फेब्रुवारीदरम्यान २६ वा महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धा गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथे होणार आहे. या स्पर्धेसाठी बार्शीतील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सहा खेळाडूंची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर संघात निवड झाली आहे.

यामध्ये गौरी राऊत, समीना मुलाणी, सिद्धी मस्के यांची म हिला खो-खो संघात व आकाश तिकटे याची पुरुष खो-खो संघात निवड झाली आहे. तर यश भाट याची व्हॉलीबॉल संघात तर अथर्व देशपांडे याची बॅडमिंटन संघात निवड झाली आहे.

या सर्व संघाचे सराव शिबीर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर येथे बार्शी विद्यापीठ संघात निवड झालेल्या खेळाडूंसह शिक्षक सुरु आहे. या निवडीबद्दल श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी. टी. पाटील, सहसचिव अरुण देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, कार्यकारिणी सदस्य तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अब्दुल शेख, प्रबंधक प्रमोद जाधव, संतोष कवडे, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले. यावेळी प्राचार्य शेख यांनी यशस्वी खेळाडूंसह क्रीडा शिक्षकांचा सत्कार केला. याप्रसंगी खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. हरिदास बारसकर, डॉ. विजयानंद निंबाळकर, डॉ. रामहरी नागटिळक, प्रा. संजय पाटील यांच्यासह शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

हंजगी जिल्हा परिषद शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

तभा वृत्तसेवा,
अक्कलकोट, दि. १५ फेब्रुवारी-

तालुक्यातील हंजगी येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. उद्घाटन जेऊरचे उपसरपंच काशिराया पाटील यांनी केले.

अध्यक्षस्थानी सरपंच भाग्यश्री हालोळे होते. यावेळी काशिराया पाटील, ॲड. दयानंद उंबरजे, गटविकास अधिकारी अरुण वाघम ोडे, प्रकाश कुंभार, सरपंच चिदानंद उण्णद, तंटामुक्त अध्यक्ष बसवराज पाटील, गुरुबसप्पा हचडे, केंद्र प्रमुख कृष्णात मोरे, देविदास वाघमोडे, अरुण पोपसभट, राजशेखर पाटील, आनंद हचडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सचिन बाणेगाव, माजी सरपंच उमेश पाटील, संतोष पाटील, मोशीन मुल्ला, कट्टेप्पा माने उपस्थित होते. प्रारंभी पुलवामा हल्ल्यात शहीद झालेल्या वीर जवानांना आदरांजली वाहण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या भारदार सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. मुख्याध्यापक रमाकांत सोनार यांनी प्रास्ताविक केले. यावेळी आमसिद्ध पुजारी, लक्कप्पा कोळी, आमसिद्ध पुजारी, प्रेमिला वाघमोडे, जया कांबळे, स्नेहल जाधव, आकाश बिडवे, स्नेहल जाधव, आकाश बिडवे, आम सिद्ध पुजारी यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

अकलूजच्या फार्मसी कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत

तभा वृत्तसेवा,
अकलूज, दि.१५ फेब्रुवारी-

अकलूज येथील कॉलेज ऑफ फार्मसीम ध्ये शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ मध्ये प्रथम वर्ष बी.फार्मसी व थेट द्वितीय वर्ष बी.फार्मसी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत सम रंभ महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे सभापती विनोद कुमार दोशी होते.प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक नारायण फुले, रामभाऊ गायकवाड,सचिव अभिजीत रणवरे,फार्मसी कॉलेजचे प्राचार्य श्री नानासाहेब देवडकर उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल भानवसे यांनी केले.उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या प्रथम वर्ष बी.फार्मसी व द्वितीय वर्ष बी.फार्मसीच्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव अभिजीत रणवरे यांनी म नोगत व्यक्त करताना नव्याने प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने स्वागत केले.यावेळी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने राबवत असलेल्या विद्यार्थ्यांसाठीच्या धोरणांची माहिती उपस्थित विद्यार्थ्यांना दिली. या स्वागत समारंभाचे आयोजन महाविद्यालयातील द्वितीय तृतीय व अंतिम वर्ष वर्गातील विद्यार्थ्यांनी केले होते. सूत्रसंचलन अंतिम वर्ष वर्गातील विद्यार्थी श्रीप्रसाद कुलकर्णी व कु.प्रियांका कुलकर्णी यांनी केले.हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. नव्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आल्याने त्यांच्यात उत्साह संचारला होता.

यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा

तभा वृत्तसेवा,
करमाळा, दि. १५ फेब्रुवारी-

उत्तराखंडमध्ये झालेल्या ३८ व्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धत यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळामधील महिला पैलवान कु.आश्लेषा बागडे हिने दैदिप्यम ान यश संपादन केले आहे. तिने राष्ट्रीय पातळीवर तिसरा क्रमांक मिळवत ब्राँझ मेडल पटकावले.

आश्लेषाने संपूर्ण स्पर्धेमध्ये उत्तम कामगिरी करत आपल्या लौकिकाला साजेल असा खेळ केला. सेमी फायनलमध्ये तिने हरत असलेली कुस्ती अत्यंत कुशलतेने खेळून दमदार विजयात रुपांतर केले. महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा. राम काळे यांचे मार्गदर्शन लाभले.या दंगल गर्लने महाविद्यालयाचे तसेच महाराष्ट्राचे नाव राष्ट्रीय पातळीवर झळकावले आहे.

अशा अतिशय महत्वाच्या कामगिरीबद्दल विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, संस्थेचे सहसचिव विक्रम सिंह सुर्यवंशी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल.बी. पाटील,वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ. अनिल साळुंखे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाक यांच्यासह पदाधिकारी व शिक्षकांनी अभिनंदन केले.

निधन वृत्त...

अशोक परळीकर

सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी -

मंत्री चंडक पार्क, विजापूर रोड येथील रहिवासी कै. अशोक लक्ष्मीकांत परळीकर यांचे वयाच्या ८० व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. ते निवृत्त परीचारीका कल्पना अशोक परळीकर यांचे पती होते.

अरुणा भारता

सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-

आकाशवाणी केंद्रानजीकच्या गुरुदेवनगरातील रहिवासी अरुणा सत्यनारायण भारता (वय ५४) यांचे गुरुवार, दि. १३ फेब्रुवारी रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुली, एक मुलगा असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

केसरी टूर्सचे संस्थापक-अध्यक्ष केसरीभाऊ पाटील यांचे निधन

तभा वृत्तसेवा,
मुंबई, दि.१५ फेब्रुवारी

मुंबई : केसरी टूर्सचे संस्थापक-अध्यक्ष केसरी भाऊ पाटील यांचे १५ फेब्रुवारी रोजी शनिवारी पहाटे वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९० वर्षांचे होते. त्यांच्या अंत्यदर्शनासाठी संध्याकाळी चार ते सहा या वेळेत बांद्रे येथील त्यांच्या निवासस्थानी व्यवस्था करण्यात आली होती. शिवाजी पार्क स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी त्यांचं संपूर्ण कुटुंबिय आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १९ फेब्रुवारी रोजी दादर पूर्व येथील योगी सभागृह हॉल येथे दुपारी ४ ते सायंकाळी ७ या वेळेत शोकसभेचे आयोजन केले आहे.

वयाच्या नव्वदीतही केसरी भाऊंनी श्रीनगर ते दूधपात्री असा प्रवास केला. वय हा फक्त एक आकडा आहे. काळानुरूप तो वाढतो. पण आपल्या जिद्दीचा झरा चिरंतन वाहत राहिला पाहिजे...असा संदेश जणू त्यांनी दिला. केसरी भाऊ...एक प्रसन्न, हासरं आणि भारदस्त व्यक्तिमत्त्व. जिथे जाईल तिथे सर्वांना आपलसं करणारं. त्यांच्यामध्ये जितकी शिस्तबद्धता होती तितकाच प्रेमळ आणि मिश्किल स्वभावही होता. एक आदर्श शिक्षक, प्रयोगशील शेतकरी ते लोकप्रिय सहल संयोजक अशी त्यांची ओळख. गावाकडच्या वातावरणातून मुंबईसारख्या स्वप्ननगरीत येऊन सहकुटुंब, मुलांसोबत ते राहिले. ज्या वयात माणसं निवृत्त होतात त्या ५०व्या वयात भाऊंनी ८ जून १९८४साली केसरी टूर्सची स्थापना केली. २४ तास कार्यरत राहत, कोणतेही सणवार न पाहता ते कार्यशील असायचे. या प्रवासात त्यांच्यासोबत त्यांच्या पत्नी सुनिता पाटील कायम सोबत होत्या. तसंच हे सारं काही त्यांनी पुढच्या पिढीलाही शिकवलं. अविरत कष्ट, परिश्रम आणि अभिनव संकल्पनांद्वारे पर्यटन क्षेत्रात नवनवीन क्षितिजे पार करत केसरी टूर्सने पर्यटन क्षेत्रात यशस्वी ४० वर्षे पूर्ण केली आहेत.

पात्रता परीक्षेत जिल्ह्यातील ३.३८ टक्केच शिक्षक पात्र

● पात्रताधारक उमेदवारांना पवित्र पोर्टलद्वारे शिक्षक भरतीमध्ये संधी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१५ फेब्रुवारी

अनेक वर्षापासून रखडत चाललेली शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) गेल्या नोव्हेंबर महिन्यामध्ये पार पडली होती. मात्र आजमहाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेचा (एम एएचएटीईटी) अंतिम निकाल पेपर १ (१ ली ते ५ वी गट) आणि पेपर २ (६ वी ते ८ वी गट) प्रसिद्ध झाला असून, या परीक्षेत ३.३८ टक्के उमेदवार पात्र ठरले आहेत. उमेदवारांना त्यांचा निकाल शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर पाहता येणार आहे.

या परीक्षेसाठी प्रविष्ट एकूण ३ लाख ५३ हजार ९५२ परीक्षार्थींपैकी ११ हजार १६८ परीक्षार्थी पात्र ठरले होते. या परीक्षेचा अंतरिम निकाल ३१ जानेवारी २०२५ रोजी प्रसिद्ध करून १० फेब्रुवारीपर्यंत आक्षेप मागविण्यात आले होते. शुक्रवारी परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर करण्यात आला. पेपर १ (१ ली ते ५ वी गट) साठी १ लाख ५२ हजार ६०५ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते, त्यातील ४ हजार ७०९ उमेदवार पात्र ठरले. पेपर २- गणित विज्ञान (६ वी ते ८ वी गट) ७५ हजार ५९९ उमेदवार प्रविष्ट झाले, त्यातील २१ हजार ४१४ उमेदवार पात्र ठरले तर पेपर २-सामाजिकशास्त्र (६ वी ते ८ वी गट) १ लाख २५ हजार ७४८ उमेदवार प्रविष्ट झाले असून, ४ हजार ०४५ उमेदवार पात्र ठरले आहेत.राज्यातील शिक्षक पात्रता परीक्षा साठी सोलापूर जिल्हातून पेपर क्रमांक एक आणि पेपर क्रमांक दोन या दोन्ही परीक्षेसाठी १२ हजार ५३० हून अधिक उमेदवारांनी शिक्षक पात्रता परीक्षा दिली. राज्यात टिईटी परीक्षांचा निकाल लागला परंतू निकाल कमी प्रमाणात लागल्यामुळे लाखो भावी शिक्षकांना पुढच्या शिक्षक अभियोग्यता परिक्षासाठी पात्र होऊ शकत नाहीत. केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्यात सुद्धा एका वर्षात दोन वेळा परीक्षा घेतल्यास उत्तीर्ण संख्या वाढणार आहे. पुढील खाजगी आस्थापन किंवा शासनाच्या पवित्र पोर्टल शिक्षक भरती मध्ये त्या उमेदवारांना नक्कीच नोकरीची सुवर्णसंधी मिळणार आहे.

केंद्र सरकारच्या (सीटीईटी) केंद्रीय शिक्षक पात्रता वर्षातून दोन वेळा आयोजित केले जाते त्यांमध्ये उत्तीर्ण झालेल्या ची प्रमाणही राज्य सरकारच्या पेक्षाही जास्त आहे. (एनसीआरटी) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण च्या धरतीवर राज्यात किमान वर्षातून दोनदा शिक्षक पात्रता घेणे अनिवार्य असताना गेल्या दहा ते बारा वर्षात आठ ते नऊ वेळाच ही परीक्षा घेतली गेली आहे शासनाने भावी शिक्षकांचा विचार करून वर्षातून दोनदा तरीही परीक्षा घेऊन उत्तराची संख्या वाढेल याकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे.

- प्रशांत शिरगुर,
राज्य समन्वयक डि.एड बी.एड स्टन्डट असो. तथा पावित्र पोर्टल शिक्षक भरती.

एकूण विद्यार्थी संख्या

- प्रविष्ट उमेदवरांची संख्या- ३ लाख ५३ हजार ९५२
- परीक्षासाठी बसलेल्या उपस्थित उमेदवराची संख्या-२ लाख ८८ हजार
- पेपर एक क्रमांक १ ली ते ५ वी - उमेदवारांची (प्रविष्ट) संख्या - १ लाख ५२ हजार ६०५
- उत्तीर्ण संख्या -४ हजार ७०९
- पेपर क्रमांक दोन ६ ते ८ वी उमेदवरांची संख्या - ७५ हजार ५९९ उमेदवार (प्रविष्ट)
- उत्तीर्ण झालेल्या उमेदवरांची संख्या- ४ हजार ४५

प्रदेशनंतर आता जिल्हा काँग्रेसमध्ये बदलाचे वारे

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-

विधानसभा निवडणुकीत दारुण पराभव झाल्यानंतर काँग्रेसने नूतन प्रदेशाध्यक्ष म्हणून हर्षवर्धन सपकाळ यांची निवड केल्याने कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

पदभार घेताच सपकाळ यांनी आपले कामकाज सुरू केले आहे. येत्या काही दिवसांमध्ये राज्यातील २१ जिल्हाध्यक्षांची नवीन निवड करण्याचे संकेत त्यांनी दिले आहेत. त्यामुळे सोलापूर जिल्हा काँग्रेसला लवकरच जिल्हाध्यक्ष मिळणार आहे. विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसमध्ये मोठे बदल होत आहेत. नाना पटोले यांच्याकडून प्रदेशाध्यक्षपद काढून तळागाळातून आलेल्या सपकाळ यांच्याकडे प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी दिल्याने कार्यकर्त्यांकडून त्याचे स्वागत करण्यात आले आहे.

प्रदेशाध्यक्ष पदाचा पदभार घेताच सपकाळ यांनी राज्यातील सर्व जिल्हाध्यक्षपदाची यादी मागविली आहे. तसेच पक्षात जे कार्यकर्ते अनेक वर्षापासून निष्ठेने काम करत आहेत, त्यांच्या खाद्यांवर पक्षातील विविध पदांची जबाबदारी देणार असल्याचे माहिती पक्षातील एका वरिष्ठ नेत्यांनी दिली आहे. त्यामुळे कोणाची वर्णी जिल्हाध्यक्षांसह इतर पदावर लागते ते काही दिवसात कळणार आहे. काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते-पाटील यांनी जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. पण, तो राजीनामा तत्कालीन प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी स्वीकारला की नाही याबाबत संभ्रम कायम आहे. आता नव्या प्रदेशाध्यक्षांकडे हा विषय जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता तरी काँग्रेसला अनेक महिन्यांपासून नवा जिल्हाध्यक्ष मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. दरम्यान लोकसभेत काँग्रेस पक्षाला यश मिळाले होते. त्यावेळी पक्षातील कार्यकर्ते पदावर निवड व्हावी, यासाठी धडपड करत होते. मात्र, विधानसभेच्या पराभवानंतर पदे घेण्यासाठी कार्यकर्ते उत्सुक नसल्याने चित्र आहे.

जिल्हाध्यक्षपदी हसापुरेंची लागणार का वर्णी

जिल्हाध्यक्ष सुरेश हसापुरे व्हावेत, यासाठी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, खा. प्रणिती शिंदे हे वरिष्ठांकडे लॉबिंग करत आहेत. हसापुरे यांचे शिंदे पिता-पुत्रीकडे वजन असल्याने त्यांची निवड जवळपास निश्चित मानली जात आहे; कोणाची निवड होणार हे काही दिवसांत स्पष्ट होणार आहे.

संक्षिप्त वृत्त

प्रशिक सामाजिक संस्थेच्या वतीने भाविकांना अल्पोपहार वाटप

सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-

श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज यांचा ६८ व्या पुण्यतिथी महोत्सव निमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकीतील भाविकांना प्रशिक सामाजिक संस्थेच्या वतीने अल्पोपहार वाटप करण्यात आला. यावेळी सद्गुरू श्री प्रभाकर महाराज यांच्या पालखीचे दर्शन घेण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे प्रमुख सल्लागार शिवम सोनकांबळे, ब्रम्हा निकंबे, विजय सोनवणे, प्रबुद्धकुमार दोड्यानुर, शुभम सोनकांबळे, अनिकेत जगताप, विनोद कांबळे, वैभव इंगळे, प्रथमेश सोनकांबळे, सुमित कटारमल, आयुब शेख, रोहन कांबळे, हुसेन शेख,अजय कांबळे, नितीन माने, गणेश नवले, रसूल शेख, राहुल गवळी, सूर्यकांत चव्हाण उपस्थित होते.

राजे शिवछत्रपती प्रतिष्ठानतर्फे मंगळवारी शाहिरी शिवदर्शन कार्यक्रम

सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-

राजे शिवछत्रपती प्रतिष्ठानच्या वतीने शिवजन्मोत्सवानिमित्त मंगळवार (दि. १८) रोजी सायंकाळी ६.३० वाजता झी मराठी, सोनी मराठी, कलर्स मराठी, झी युवा मराठी पाऊल पडते पुढे विजेते शाहीर डॉ. देवानंद माळी यांचा शाहीरी शिवदर्शन पोवाड्याचा कार्यक्रम आयोजित केला आहे. तरी या कार्यक्रमास शिवप्रेमी, शिवभक्तांनी व सोलापूरातील सर्व नागरिकांनी याप्रंसगी उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा. असे अवाहन मंडाळाचे संस्थापक अध्यक्ष संस्थापक अध्यक्ष विजय घुले यांनी केले. कार्यक्रम पार पडण्यासाठी अजय घुले, राहूल जगताप, दिनेश पुकाळे, रोहित घुले, अमोल कामाणे, मोहन चटके, विराज क्षिरसागर परिश्रम घेत आहेत.

१८ फेब्रुवारीपासून 'गाणारे दगड, बोलणारे पाषाण' प्रदर्शन

सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-

छत्रपती श्री शिवाजी महाराज स्मारक मंडळातर्फे सोलापुरात १८ ते २० फेब्रुवारी दरम्यान 'गाणारे दगड बोलणारे पाषाण' या आगळ्यावेगळ्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर यांनी दिली. मोरेश्वर कुंटे आणि विजया कुंटे यांनी पाहिलेल्या महाराष्ट्रातील तब्बल १८ हजार मंदिरांपैकी आगळ्यावेगळ्या, अविस्मरणीय मंदिरांच्या छायाचित्रांचे हे प्रदर्शन असणार आहे. सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत आहे प्रदर्शन सुरू राहील. रविवार, १८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. महाराष्ट्राला अत्यंत रेखीव, दर्जेदार आणि कलाकुसर असलेल्या मंदिरांची परंपरा लाभली आहे. महाराष्ट्रातील शेकडो मंदिरे त्यांच्या स्थापत्यशैलीसाठी आणि अनोख्या वैशिष्ट्यांसाठी जगभर प्रसिद्ध आहेत. अशी हजारो मंदिरे पाहून मोरेश्वर कुंटे आणि विजया कुंटे यांनी त्या मंदिरांच्या छायाचित्रांचा मोठा संग्रह केला आहे. या छायाचित्रांचे प्रदर्शन सोलापूरकरांसाठी उपलब्ध करून दिले आहे. हे प्रदर्शन सर्वांसाठी विनामूल्य खुले असून या मंदिरांच्या छायाचित्र प्रदर्शनास सोलापूरकरांनी भेट द्यावी, असे आवाहन शिवस्मारकचे सचिव गंगाधर गवसने यांनी केले आहे.

कोयत्याने मारून एकास केले जखमी

सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-

नवरा बायकोच्या भांडणावरून मेहुण्याने ३० वर्षीय व्यक्तीस कोयत्याने मारून जखमी केले.ही घटना शुक्रवारी रात्री साडे नऊच्या सुमारास सेंटलमेंट परिसरात घडली आहे. सनी शशिकांत जाधव (वय ३० रा.सेटलमेंट) असे जखमी झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. जखमीस भाऊ अजित जाधव यांनी सिव्हिल रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

दुचाकीच्या धडकेत एकाचा मृत्यू

सोलापूर : शेळ्या चारून घरी परत पायी चालत जात असताना एकाचा दुचाकीच्या धडकेत मृत्यू झाला आहे. ही घटना ९ फेब्रुवारी रोजी मेटे वस्ती समोर डोणगाव,सोलापूर येथे घडली आहे. राम कुंडलिक माने (रा. डोणगाव,ता. उत्तर सोलापूर) असे मयत झालेल्या शेळीपालन करणाऱ्या व्यक्तीचे नाव आहे.

याबाबत कुशल राम माने (वय २८) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दुचाकी(एमएच १३ ईएम २०००)चालक लक्ष्मण चंद्रकांत भोई यांच्यावर सलगर वस्ती पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे. पोलिसा दिलेल्या माहितीनुसार कुशल माने यांचे वडील राम हे शेळ्या चारून घराकडे पायी चालत येते होते. त्यावेळी कवठे वरून डोणगाव च्या दिशेने भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने दुचाकी चालवून राम यास पाठीमागून धडक दिली. या धडकेत राम माने हे गंभीर जखमी होवून त्यांचा मृत्यू झाला. तसेच आरोपीचे वडील चंद्रकांत भोई यांना देखील गंभीर जखमी होण्यास कारणीभूत झाला आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक कुतवळ हे करीत आहेत.

डॉ. शंतनु गोखलेंच्या संतूर वादनाने रसिक मंत्रमुग्ध

प्रिसिजन संगीत महोत्सव-२०२५

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-

हुतात्मा स्मृती मंदिराच्या स्वरमंचाचा पडदा उघडताच मंद निळ्या चांदण्याचा वर्षाव करत माघ वद्य तृतियेला व्यासपीठावर उगवलेला पौर्णिमेचा चंद्र दिसताच रसिकांनी आनंदानुभूतीने टाळ्यांचा प्रतिसाद दिला.

शनिवारी, हुतात्मा स्मृती मंदिर येथे प्रारंभी यतीन शहा, डॉ. सुहासिनी शहा, करण शहा, मयुरा शहा-चितळे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन संपन्न झाले. पहिल्या सत्राचा प्रारंभ विश्वविख्यात संतुरवादक पंडित शिवकुमार शर्मा यांचे शिष्य डॉ. शंतनु गोखले यांच्या संतूर वादनाने झाला. राग झिंझोटीच्या सुमधूर स्वरात त्यांनी 'आलाप' 'जोड' व 'झाला' सादर केला. खमाज थाटातील या रागातील धसारेमग, सारे मग, सारे नि ध सा, रेमपधसां नि ध, मपधमग, मपधनीधप, सारेमग.. अशा विशिष्ट स्वरसमूहांनी गंधारावर सुंदर न्यास करत रसपरिपोष करणारी आलापी रंगली. जोड झाला प्रकारात त्यांनी लयकारीचे छान दर्शन घडवले. त्यानंतर त्यांनी मध्यलय रूपक व द्रुत तीनतालातील गती सादर केल्या. त्यानंतर त्यांनी राग पहाडीमध्ये धून सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांना यशवंत वैष्णव यांनी तबल्याची अत्यंत तैय्यारीने व रंगतदारपणे साथसंगत केली. अत्यंत स्पष्ट व गतीमान बोलरचना, 'दायाँ-बायाँचे' विलक्षण संतुलन व संतूरच्या नाजूक स्वरांना पोषक ठरेल अशी संयमित व लयकारीने नटलेली साथसंगत हे एक या सत्राचे वैशिष्ट्य होते.

विजेच्या धक्क्याने कामगार ठार

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-

नवीन वीज जोड देताना विजेचा धक्का बसल्याने ठेकेदाराचा एक कामगार ठार तर एक कामगार जखमी झाला. शनिवारी दुपारी स्वागत नगरात ही घटना घडली. शरणाप्पा मल्लिनाथ माळी (वय ४०, रा. बसवनगर, ता. दक्षिण सोलापूर) असे मृताचे तर प्रवीण वारे (रा. सोलापूर) असे जखमीचे नाव आहे.

वीजपुरवठा खंडित करून हे काम सुरू होते. काम करताना शरणप्पा याच्या बगलेत तर प्रवीण याच्या हातात वायर होती. विजेचा धक्का बसल्याने शरणप्पा जागीच ठार तर प्रवीण जखमी झाला. जखमी प्रवीणला उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल केले आहे. मात्र विजेचा धक्का कसा बसला हे अद्याप समजले नसल्याचे महावितरणचे शहर कार्यकारी अभियंता आशिष मेहता यांनी सांगितले. चौकशीनंतर या दुर्घटने मागचे कारण समजेल असेही त्यांनी स्पष्ट केले. ठेकेदारांनी सुरक्षेची काळजी घेतली नाही. ही दुर्घटना घडण्यास जबाबदार अधिकारी आणि ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी मृत व जखमी च्या नातेवाईकांनी केली आहे. याची नोंद एमआयडीसी पोलीस ठाण्यात झाली आहे.

पाच लाखांचा ऐवज चोरणारी मोलकरीण जेरबंद

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-

घरकाम करणाऱ्या महिलेने घरातील लाखाची रोकड आणि आठ तोळे दागिने असा सुमारे पाच लाखांचा ऐवज चोरला. सदर बझार पोलिसांनी अवघ्या चार तासांत गुन्हा उकल करून शंभर टक्के मुद्देमाल हस्तगत केला.

याबाबत विजया राजेश बिब्बा (वय ३९, रा. गौरीशंकर अपार्टमेंट, रामलाल चौक, सोलापूर) यांनी याबाबत फिर्याद दिली होती. त्यावरून घरकाम करणाऱ्या महिलेविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. यातील फिर्यादी या घरी एकट्याच असतात. त्यांचे पती कामानिमित्त घराबाहेर असतात. तर घरकाम करणारी महिला ही मागील सहा महिन्यांपासून त्यांच्या घरी काम करते. यामुळे तिला घरातील कोणत्या वस्तू कोठे ठेवल्या आहेत, याची माहिती होती. दरम्यान १७ जानेवारी रोजी यातील फिर्यादीने पती राजेश यांना रक्कम लागणार असल्याने ती बँकेतून काढून घरात आणून ठेवली होती. ही बाब घरकाम करणाऱ्या महिलेला माहित होती. त्यानंतर घरकाम करणाऱ्या महिलेने संधी साधून कपाटातील एक लाखांची रोकड तसेच दोन तोळ्याच्या अंगठ्या व तीन तोळे वजनाची सोनसाखळी चोरली. २१ जानेवारी रोजी फिर्यादीच्या पतीने बँकेतून आणलेली रोकड मागितली. तेव्हा त्यांना रोकड देण्यासाठी गेल्यानंतर कपाटात रोकड दिसून आली नाही. तसेच दागिनेही आढळले नाहीत. याबाबत त्यांनी पोलिसांना माहिती दिली. त्यात घरकाम करणारी महिलाच त्यांच्या घरात वावरत असल्याचे समोर आले. पोलिसांनी तिला ताब्यात घेऊन चौकशी केली असता, तिने चोरीची कबुली दिली. त्यानंतर चोरलेला शंभर टक्के ऐवज पोलिसांनी हस्तगत केला. ही कामगिरी पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपायुक्त विजय कबाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि नितीन शिंदे, सहाय्यक फौजदार औदुंबर आटुळे, हवालदार संतोष पापडे, शहाजहान मुलाणी, सागर सरतापे, राजेश चव्हाण, सागर गुंड, सोमनाथ सुरवसे यांनी केली.

'त्या' बस स्टॉपमधील घाणीचे साम्राज्य दूर

● महापालिका अतिरिक्त आयुक्त आणि उपायुक्तांची कार्यतत्परता
● कर्मचाऱ्यांनी तत्काळ तो परिसरच धुवून काढला

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-

महापालिका परिवहनच्या बस स्टॉपमध्ये घाणीचे साम्राज्य आणि त्यामध्ये लोळणारे मनोरुग्ण अशा विदारक चित्राची माहिती मिळताच अतिरिक्त आयुक्त रवी पवार आणि उपायुक्त तैमुर मुलांनी यांनी स्वच्छतेची कार्यवाही केली. अवघ्या दोन तासात स्वच्छता करून मनोरुग्णांनाही इतरत्र हलविण्यात आले.

तुळजापूर वेस येथील बलिदान चौकात काळभैरवनाथ मंदिरासमोर असलेल्या महापालिकेच्या बस स्टॉपमध्ये घाणीचे साम्राज्य पसरले होते. इतकेच नव्हे तर दोन बेघर मनोरुग्ण बस स्टॉपमध्येच लोळत असल्याचे दिसून आले. अस्वच्छतेचे विदारक आणि किळसवाणे चित्र इथे पाहायला मिळाले. यामुळे या बस स्टॉपचा वापर होत नव्हता. लोक दुरून जात होते. मध्यवर्ती ठिकाणच्या या बस स्टॉप परिसराची दुरावस्था झाली होती. दरम्यान, यासंदर्भात महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार आणि उपायुक्त तैमूर मुलाणी यांना माहिती दिली. माहिती मिळताच त्यांनी कार्यतत्परता दाखवत महापालिका कर्मचाऱ्यांना पाठवून दिले. अवघ्या दोन तासात तेथील बस स्टॉप व परिसराची स्वच्छता करण्यात आली. तेथील सर्व कचरा व माती उचलण्यात आली. या ठिकाणी लोळत पडणाऱ्या मनोरुग्णांना इतरत्र हलविण्यात आले. त्यानंतर हा बस स्टॉप आणि सर्व परिसर पाण्याने धुवून स्वच्छ करण्यात आला. स्वच्छता करण्यात आल्याने आता या बस स्टॉपचा वापर होत आहे. प्रवासी थांबत आहेत. यामुळे नागरिकांम धून महापालिका अधिकाऱ्यांच्या कार्यतत्परतेचे स्वागत आणि कौतुक होत आहे.

उपायुक्त तैमूर मुलानी यांनी बस स्टॉप परिसराची स्वच्छता करण्यात आली असल्याची माहिती दिली. अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या संकल्पनेतून शहरातील अस्वच्छ ठिकाणे आता स्वच्छ करण्यात येत आहेत. यामुळे मुख्य रस्त्यांबरोबरच अंतर्गत रस्तेही चकाचक होत असल्याचे दिसून येते.



हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

संक्षिप्त वृत्त...

सरळ सेवा परीक्षेत प्रा. अमित भारत वडवेराव यांचे दुहेरी यश

सोलापूर, दि.१५ फेब्रुवारी-

आरोग्य विभाग महाराष्ट्र शासनामार्फत सन २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या सरळ सेवा भरती परीक्षेत प्रा. अमित भारत वडवेराव यांनी दुहेरी यश संपादन केले. तसेच सन २०२४ मध्ये स्वच्छता निरीक्षक या पदावर त्यांची नियुक्ती झालेली होती व त्यानंतर सन २०२५ मध्ये राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा पुणे अंतर्गत रासायनिक सहाय्यक या पदासाठी निवड होऊन त्यांना नियुक्ती आदेश प्राप्त झाले. सोलापूर महानगरपालिका कामगार नेते भारत पांडुरंग वडवेराव व निवृत्त शिक्षिका मनीषा वडवेराव यांचे ते सुपुत्र आहेत. यापूर्वी त्यांनी दयानंद महाविद्यालयात व हैदराबाद येथील गतीक महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून अध्यापनाची सेवा बजावली आहे. त्यांचे बाळासाहेब कदम, आर.डी.गायकवाड, अभिनय कदम, राखी कदम, सुहास छंचुरे यांनी अभिनंदन केले.

रामकृष्ण मंडळातर्फे आज वैदिकांचा सत्कार सोहळा

सोलापूर, दि.१५ फेब्रुवारी-

श्री रामकृष्ण सेवा सत्संग मंडळाच्या वतीने रविवारी सायंकाळी ५ वाजता वैदिकांच्या सत्कार सोहळा आयोजिला आहे. वेदमूर्ती चैतन्य काळे यांच्या अध्यक्षतेखाली विजयपूर रस्त्यावरील आदित्य सांस्कृतिक भवनात होणाऱ्या या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सोमेश्वर लवंगे व प्रमोद चोळचगुडू यांनी केले आहे. अहिल्यानगर येथील श्री दत्त देवस्थान ट्रस्टच्या मार्गदर्शनाखाली वेदपठण, वेदमहिमा वर्णनही होईल. सद्गुरू श्री रामकृष्ण क्षीरसागर स्वामी महाराजांच्या जयंतीनिमित्त हा उपक्रम राबवला जातो. वेदमंत्रांचे सामर्थ्य, त्यांचा उपयोग सर्व समाजाच्या फायद्यासाठी होत असल्याचे मंडळाचे पदाधिकारी दिलीप बोडके व वैभव परदेशी यांनी केले आहे.

चंद्रभागेत मिसळत आहे चक्क ड्रेनेजचे पाणी

- शहरात जीबीएस आजाराचे दोन रुग्ण;
- पंढरपूर नगरपरिषदेचे दुर्लक्ष

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि. १५ फेब्रुवारी-

येथील चंद्रभागा नदीमध्ये चक्क ड्रेनेजचे पाणी मिसळत असल्यामुळे चंद्रभागा नदीतील पाणी सध्या दूषित होवू लागले आहे. दरम्यान पंढरपूरात जीबीएस आजाराचे दोन रुग्ण सापडल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे. जीबीएस हा आजार दूषित पाण्यामुळे होत असल्याचे आरोग्य विभागाच्या निष्कर्षातून समोर आले आहे. मात्र अशा परिस्थिती मध्ये देखील पंढरपूर नगरपरिषदेचे या गंभीर प्रकाराकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे वारकरी भाविकांतून पालिकेच्या एकंदर कारभारावरच संताप व्यक्त केला जात आहे.

पंढरपूर हे राज्यातील प्रमुख तीर्थक्षेत्र असल्यामुळे विठ्ठलाच्या दर्शनाला वर्षाला सुमारे एक कोटीहून अधिक भाविक येथे येत असतात. येथे आलेले भाविक विठुरायाच्या दर्शना अगोदर माता चंद्रभागा नदीमध्ये पवित्र स्नान करून चंद्रभागेचे पवित्र जल तीर्थ म्हणून प्राशन करतात. ऐवढेच नव्हे तर अनेक भाविक चंद्रभागेचे जल आपल्या बरोबर आपल्या गावी देखील तिर्थ म्हणून बाटलीमध्ये भरुन नेत असतात. मात्र गेल्या काही दिवसांपासून शहरातील ड्रेनेजचे पाणी चक्क चंद्रभागा नदीत सोडण्यात येत असल्यामुळे चंद्रभागा नदीतील पाणी दूषित झाले आहे. येथील चंद्रभागेच्या या दूषित पाण्यातच भाविकांना चंद्रभागेचे पवित्र स्नान करावे लागत असल्यामुळे सहाजिकच भाविकांचे देखील आरोग्य धोक्यात आले आहे. या मध्येच पंढरपुरात जीबीएस आजाराचे दोन रुग्ण सापडले आहेत. जीबीएस आजाराने सध्या राज्यभरात थैमान घातले आहे. सोलापूर आणि आता पंढरपूरात देखील या आजाराचा शिरकाव झाला आहे. जीबीएस हा आजार दूषित पाण्यामुळे होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. मात्र येथील पालिकेला याचे कोणतेही सोयरसूतक दिसत नाही. कारण एकीकडे चंद्रभागा नदीमध्ये ड्रेनेजचे पाणी मिसळत असून नदीतील या दूषित पाण्यामुळे भाविकांच्या आरोग्याशी खेळ खेळला जातो आहे. भाविकांचे आरोग्यास धोका निर्माण होत आहे. मात्र या प्रकाराकडे पंढरपूर नगर परिषदेचे दुर्लक्ष होत असल्यामुळे भाविकातून तीव्र संताप व्यक्त होत आहे. त्यामुळे पालिकेच्या आधिकाऱ्यांनी ही बाब गंभीरतेने घेऊन चंद्रभागा नदीमध्ये मिसळत असलेले ड्रेनेजचे पाणी ताबडतोब बंद करावे, अशी मागणी वारकरी भाविकांमधून करण्यात येत आहे.

नमामी चंद्रभागा योजना कागदावरच

केंद्र शासनाच्या नमामी गंगेच्या धर्तीवर राज्य सरकारने नमामी चंद्रभागा योजना जाहीर केलेली आहे. चंद्रभागेच्या उगमा पासून ते चंद्रभागा वहात असलेल्या राज्यातील शेवटच्या गावापर्यंत तिचे शुध्दीकरण करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आलेले होते. त्यानुसार राज्य शासनाकडून चंद्रभागा नदीच्या शुद्धीकरणाची हाती घेतलेली मोहीम गेल्या काही काळा पासून ठप्प झालेली दिसत आहे. प्रत्यक्षात कुठेही याचे काम होताना दृष्टीस पडत नाही. त्यामुळे गेल्या पाच वर्षापासून नमामी चंद्रभागा ही योजना केवळ कागदोपत्रीच असल्याचे दिसून येत आहे.

इंग्लडच्या सेबर टेक्नलॉंजीचा वापर

चंद्रभागेचे पाणी शुद्धीकरण करण्यासाठी इंग्लडच्या सेबर टेक्नलॉंजीचा वापर करुन नदीपात्रात चार ठिकाणी पाणी शुद्धीकरण करणारे यंत्र बसवले आहेत. त्याद्रारे नदीतील पाणी शुद्धीकरण केले जाणार आहे. शुद्धीकरण प्रकल्पातून पाण्यामधील घातक बॅक्टेरिया मारायचे काम होणार आहे. मात्र हे देखील काम पूर्ण झाले नसल्यामुळे चंद्रभागा नदीमध्ये दूषित पाण्यावर कोणतीही प्रक्रिया न होता चंद्रभागेचे पाणी हे दूषितच रहात आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाने केला ६ लाखांचा मुद्देमाल जप्त

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी -

राज्य उत्पादन शुल्क विभागाने १४ फेब्रुवारी व्हॅलेंटाईन डे दिवशी शहर जिल्ह्यात केलेल्या अवैध हातभट्टी निर्मिती केंद्रावर, अवैध देशी-विदेशी मद्य विक्रि व वाहतूकीवर केलेल्या धडक कारवाई करीत ६ लाख १५ हजार ७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

राज्य उत्पादन शुल्क विभागाने १४ फेब्रुवारी रोजी सोलापूर शहर व जिल्ह्यात केलेल्या अवैध हातभट्ट्यांवर कारवाई करीत १४ हजार लिटर गुळमिश्रीत रसायन नष्ट करीत २६५ लिटर हातभट्टी दारू जप्त केली. तसेच अवैध देशी-विदेशी मद्य विक्रि व वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करीत २८.८ बल्क लिटर देशी मद्य, ३२ लिटर विदेशी मद्य, ४४.४ बल्क लिटर बिअर जप्त करण्यात आली. या कारवाईत सर्व मिळून ६ लाख १५ हजार ७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच बार्शी शहरातील सुभाष नगर रींग रोडवर श्रीगणेश पान शॉपवर कारवाई करून अवैध देशी-विदेशी मद्य विक्रि करणाऱ्या अक्षय दिपक सरकाळे याच्यावर कारवाई करण्यात आली. यावेळी अवैध देशी-विदेशी मद्य व बिअरसह ४० हजार ३५५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

फेब्रुवारी महिन्यात ७५ गुन्हे दाखल...

१ ते १४ फेब्रुवारी या कालावधीत राज्य उत्पादन शुल्क विभागाने सोलापूर शहर व जिल्ह्यात केलेल्या अवैध हातभट्ट्यांवर, अवैध देशी-विदेशी मद्य व ताडी विक्रि करणाऱ्यांवर तसेच वाहतूकीवर केलेल्या धडक कारवाईत ७५ गुन्हे दाखल करण्यात आले असून ८६ जणांवर कारवाई करून ५ वाहनांसह १८ लाख ७५ हजार ३२३ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कालावधीमध्ये दारूबंदी कायद्यातील कलम ९३ नुसार १४ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करून ८ लाख रुपयांचे बंधपत्रे घेण्यात आलेली असल्याचे पोलिस अधिक्षक श्रीमती भाग्यश्री जाधव यांनी दिली.

गावाला गेल्यावर घरातील लॉकरमधील पाच लाखाचे सोन्याचे दागिने, पैसे चोरीस

सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-

रामलाल चौक गौरीशंकर अपार्टमेंटमधील एका घरातील लॉकरमध्ये ठेवलेली रोख रक्कम व ४० ग्रॅम वजनाचे दागिने असा पाच लाखांचा ऐवज लंपास केला.

याप्रकरणी अज्ञात चोरट्यांविरुध्द सदर बझार पोलिसांत शुक्रवारी गुन्हा नोंद झाला आहे. याबाबत विजया राजेश बोब्बा (वय ३९, रा. सी १०, गौरीशंकर अपार्टमेंट) याच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंद झाला आहे. १७ ते २४ जानेवारी २०२५ दरम्यान सदर महिला बाहेर गावी गेल्या होत्या. घरात कोणीच नसल्याच्या संधीचा फायदा घेत चोरट्याने डल्ला मारला. चोरट्याने संधीचा फायदा घरात प्रवेश केला. घरातील कपाटातील लॉकरमध्ये ठेवलेले ३० ग्रॅम सोन्याचे लॉकेट, १० ग्रॅम वजनाच्या अंगठी व रोख रक्कम असा ५ लाखाचा ऐवज लंपास केला आहे.

ज्ञान प्रबोधिनी प्रशालेत विद्याव्रत दीक्षाग्रहण सोहळा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-

ज्ञान प्रबोधिनीमध्ये भारतीय संस्कृतीची जोपासना करणारे अनेक शैक्षणिक संस्कार उपक्रम योजले जातात. त्यामाने भारतीय संस्कृतीचे रक्षण व संवर्धन करणे हा विचार असतो. त्यापैकी एक महत्त्वाचा संस्कार समारंभ म्हणजे विद्याव्रत दीक्षाग्रहण समारंभ होय. ज्ञान प्रबोधिनी प्रशालेत यावर्षी हा संस्कार समारंभ दि. १४ व १५ फेब्रुवारी या दिवशी विद्यार्थ्यांसाठी तसेच विद्यार्थिनींसाठी मंगलमय व पवित्र वातावरणात संपन्न झाला.

या समारंभासाठी आकाशवाणी केंद्राचे निवेदक व प्रिसिजनच्या वाचन अभियानाचे वाचकदूत सुधीर खेडगीकर हे प्रमुख पाहुणे लाभले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले, या प्रशालेतील विद्यार्थी भाग्यशाली आहेत त्यांना भगवद्गीता व उपनिषदांमधील श्लोक म्हणता येतात त्यांचा अर्थ जाणून घेता येतो. याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, इच्छाशक्ती, सकारात्मक विचार, क्रियाशीलता, महत्त्वाकांक्षा असली पाहिजे, अशा अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केल्या. विद्यार्थिनीसाठी आयोजित करण्यात आलेल्या दीक्षाग्रहण समारंभास अखिल भारतीय वारकरी मंडळाचे जिल्हाध्यक्ष हभप सुधाकर महाराज इंगळे हे प्रमुख पाहुणे होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले, जीवनात अन्न, पाणी, श्वासाप्रमाणे संस्कारांचे महत्त्व आहे. योग्य वेळी योग्य संस्कार मिळणे आवश्यक असते. या समारंभात विद्यार्थ्यांवर योग्य वेळी योग्य संस्कार घडत आहेत. अत्यंत शास्त्रशुद्ध पद्धतीने विद्यावत दीक्षाग्रहण संस्कार संपन्न होत आहे, हे पाहून त्यांनी आनंद व्यक्त केला. मुख्याध्यापिका सुनीता चकोत यांनी कार्यक्रमाचा समारोप केला. कार्यक्रमास संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य, इयत्ता आठवीचा विद्यार्थी चेतन कांबळे पालक सीसीनिया वीविका आणि बावणी मैले या विद्यार्थिनीचे पालक पद्मावती व श्रीशीर मैले हे उपस्थित होते.

पतीला दवाखान्यात नेले, चोरट्यांनी फोडले घर

६७ ग्रॅम सोने ७० तोळे चांदीचे दागिने लंपास

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-

पतीला उपचारासाठी हॉस्पिटल नेले असता, बंद घराचा कडी कोयंडा तोडून घरातील लोखंडी कपाटातील ६७ ग्रॅम सोने व ७० तोळे चांदीचे दागिने लंपास केले. ही घटना १२ ते १३ फेब्रुवारी दरम्यान विडी घरकुल परिसरातील धनलक्ष्मी नगरातील युनिक टाऊन फेज २ मध्ये घडली.

याबाबत स्नेहा संतोष दोड्डी (वय ४६ रा. युनिट टाऊन फेज २, ब्लॉक नं १४ रो हाऊस, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांविरुध्द एमआयडीसी पोलिसांत शुक्रवारी सायंकाळी गुन्हा नोंद झाला आहे.

स्नेहा दोड्डी यांच्या पतींना १२ आणि १३ फेब्रुवारी रोजी रुग्णालयात ॲडमिट केले होते. दोड्डी यांच्या घराला कुलूप असल्याचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने दोड्डी यांच्या मुख्य दरवाज्याचा कडी कोयंडा तोडला. घरात प्रवेश करीत घरातील बेडरूममधील लोखंडी कपाटातील असणाऱ्या लॉकर मधील ६७ ग्रॅम सोने व ७० चांदीचे दागिने असा एकुण ३ लाख ९२ हजाराचा ऐवज चोरून नेला आहे. एम आयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास सहायक पोलिस निरीक्षक चंदनशिव करीत आहेत.

घरगुती भांडणातून दहा गोळ्या खाल्या

सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-

घरगुती भांडणाच्या कारणावरून तरुणाने झोपेच्या आठ ते दहा गोळ्या खाल्या,त्यास उपचार करण्यासाठी सिव्हिल रुग्णालयात आजोबा नागनाथ नकाते यांनी दाखल केले. श्रीकांत सुनिल गडगडे (वय २२ रा. कोंडी, उत्तर सोलापूर) असे गोळ्या खालेल्या व्यक्तीचे नाव आहे. आईबरोबर घरगुती भांडणाच्या कारणावरून झोपेच्या गोळ्या खाल्या, घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत आहे.

'इलेक्ट्रो'ला ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-

होम मैदानावर सुरु असलेल्या इलेक्ट्रॉनिक्स, होम ॲप्लायन्सेस, कॉम्प्यूटर, टेलिकम्युनिकेशन, सोलार उत्पादन व फिटनेस इक्विपमेंटसचे प्रदर्शन इलेक्ट्रो २०२५ रविवारी सकाळी ११ ते रा. ९.३० पर्यंत असणार असून ग्राहकांनी याचा अधिकाधिक फायदा घ्यावा असे आवाहनअध्यक्ष आनंद येमूल यांनी केले आहे. यंदा इलेक्ट्रो प्रदर्शनाचे शार्प हे मुख्य प्रायोजक असूनहायफा इलेक्ट्रिकल्स् व एम आयटी विश्वशांती गुरुकुल हे सह प्रायोजक आहेत.

इलेक्ट्रो २०२५ या प्रदर्शनाचे हे २५ वे वर्ष असून जर्मन हँगर पध्दतीचे डोम सोलापूरकरांचे आकर्षण ठरले आहे. अशाप्रकारचे नियोजन व व्यवस्थापनासाठी सेडाचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. ३०० स्टॉलधारकांचा समावेश असलेल्या या प्रदर्शनात भेट देणाऱ्यांसाठी दररोज लकी ड्रॉद्वारे विविध भेट वस्तू देण्यात येत आहे.

शेवटच्या दिवशी बंपर ड्रॉ द्वारे सुमारे एकावन्न हजार किंमतीचे आयएफबी कंपनीचे किचन चिमणी भेट देण्यात येणार असल्याची माहिती सचिव भुषण भुतडा यांनी दिली. पाच दिवसांत सुमारे साठ हजार लोकांनी भेट दिली असल्याचे सांगण्यात आले. सेल्फी पॉईंट वर अनेक जण आपले छायाचित्र काढताना दिसत आहे. याचे संपूर्ण निटनेटके नियोजन सेडा समितीद्वारा करण्यात येत आहे.

ज्ञानामृत आनंदलहरी - १०३१

जग देव परी निवडीन निराळे ।
ज्ञानाचे आंधळे भारवाही ।।

आपले असले तरीही कधी कधी आपण प्रसंगानुरुप का होईना पण त्यांच्यावर चिडतो, रागावतो किंवा नाराज होतो. अशा चिडण्या, रागावण्या किंवा नाराज होण्यामागे त्याच्यात सुधारणा व्हावी, परिवर्तन व्हावे हीच अपेक्षा असते. आपण जरी आप-पर असा भेद करीत असलो तरी संत महात्मे असा भेद करीत नाहीत. ते सर्व जीवांना आपलेच समजून त्याच्यात एका ईश्वराला पाहतात. सर्व जीवांनी एकमेकांशी चांगले संबंध ठेवावेत, म्हणून ते प्रयत्नशील असतात. दगडा-धोंड्यात देवाला पाहण्यापेक्षा संत महात्मे सर्व जीवात भगवंताला पाहतात. हे सर्व सत्य असले तरीही प्रसंगानुरूप या जीवावर नाराजही होतात. अनेकवेळा सांगूनही एखादा जीव कूमार्ग सोडत नसेल, इतर जीवावर अन्याय करीत असेल, तर अशावर नाराजी व्यक्त करणे चुकीचे नाही. सर्व जीवात भगवंत असला तरीही जो जीव कामांध होतो, द्रव्याशिवाय व अहंकाराशिवाय ज्याला काही सुचत नाही, अशा ज्ञानांध जीवाहून मी देवाला वेगळे पाहीन. असे सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात, जग देव परी निवडीन निराळे। ज्ञानाचे आंधळे भारवाही।। आई आपल्या मुलावर रागावते. रागाच्या भरात नको ते बोलून जाते. पण तिच्या रागावण्याने मुलाला जे दु:ख होईल, त्याहीपेक्षा जास्त दु:ख, वेदना ह्या तिलाच होतात. त्याचप्रमाणे तुकाराम महाराजांनी जीवाकडून जाणूनबुजुन होणाऱ्या अक्षम्य चुका विचारात घेऊन कळवळून नाराजी व्यक्त केली असली तरी ते त्या जीवाला ईश्वरापेक्षा वेगळे पाहू शकणार नाहीत. कारण प्रत्येक जीवात एका भगवंताला पाहणे, त्या जीवाला आपले म्हणणे हा त्यांचा स्वभाव होऊन बसला आहे. आजच्या अभंगातील महाराजांची चुकीच्या मार्गावर जाणाऱ्या जीवाबद्दलची तळमळ व कळवळा त्यांच्या भावनेसह आपण विचारात घ्यायला हवा. आपण कोणत्याही परिस्थितीत चुकीच्या मार्गावर जाऊ नये, आपल्याकडील ज्ञानाचा आपल्याकडून दुरुपयोग होऊ नये ही त्यांची भावना आपणाला विचारात घ्यावीच लागेल. आपण पोटच्या मुलालाही एवढे पोटतिडकीने बोलत नाही, हे लक्षात घेतले तर महाराजांच्या अभंगवाणीचे महत्व आपल्या लक्षात येईल. ईर्षा, मोह, द्वेष, मत्सर, अहंकार आदिमध्ये अडकलेल्या बऱ्याच जीवाला दुसरे सुधारले किंवा दुस-याचे चांगले होऊ लागले तर आवडत नाही. दुसऱ्यांनी चांगले व्हावे म्हणून प्रयत्न तर दूरच, उलट त्यात खोडा कसा घालता येईल? असा विचार करणारा जीव संत, महात्म्यांची वाणी समजणे कठीण आहे. आपण भाग्यवान आहोत, कारण आपणाला ज्ञानोबा-तुकोबांची वाणी समजत आहे. आपणाला समजत असलेली ही वाणी आपण इतरांना समजावू शकलो तर आपली भाग्यवानता शिगेला पोहचेल.

जय जय राम कृष्ण हरी।

- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड
मो. ९४२२२१६४४८

सुप्रभात

आजचा दिवस

वार : रविवार
दि. १६ फेब्रुवारी २०२५
विक्रम संवत् २०८०-८१
शके - १९४६
संवत्सर - क्रोधी नाम
मास - फाल्गुन
कृ. चतुर्थी (२६.१५)
ऋतु - वसंत
नक्षत्र - हस्त (२८.३०)
योग - धृती (०८.०५)
करण - बव (१३.०१)

दिनविशेष - संकष्ट चतुर्थी
दादासाहेब फाळके पुण्यदिन
चांगला दिवस
....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००
सोमवार : स. ७.३० ते ९.००
मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०
बुधवार : दु. १२ ते १.३०
गुरुवार : दु. १.३० ते ३.००
शुक्रवार : स.१०.३० ते १२
शनिवार : स. ९ ते १०.३०

राशीभविष्य

मेष : व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती म ध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही. शक्यतो प्रवास टाळा.

वृषभ : नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

मिथुन : जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धे त यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

कर्क : आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

सिंह : संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले. शक्यतो प्रवास टाळा.

कन्या : लोकांशी संप वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

तुळ : राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

वृश्चिक : उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्थातील विस्ताराच्या दृष्टीने योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

धनु : प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील.

मकर : व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. जीवनसाथी बरोबर वाद विवाद होण्याची शक्यता आहे.

कुंभ : सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीम ध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

मीन : कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी रहाल. म ानसिक संतोष निर्माण होईल.

सलग १९ तास दांडपट्टा चालवण्याचा विश्वविक्रम

शिवजयंती निमित्त मंगळवारी उपक्रम

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त ट्रॅडिशनल दांडपट्टा स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने सोलापुरातील सात मावळे सलग १९ तास दांडपट्टा चालविण्याचा विश्वविक्रम मंगळवार दि.१८ फेब्रुवारी रोजी चार हुतात्मा पुतळा चौक येथे करणार आहेत, अशी माहिती अध्यक्ष शिवराम भोसले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

चार हुतात्मा पुतळा चौक येथे या विश्वविक्रमास पहाटे ५ वाजता सुरुवात होणार आहे. रात्री १२.३० वाजता हा विश्वविक्रम पूर्ण करण्यात येणार आहे. ट्रॅडिशनल दांडपट्टा स्पोर्ट्स असोसिएशन महाराष्ट्र राज्य आणि भारतीय लाठी महासंघ यांच्या संयुक्त विद्यम ाने हा ऐतिहासिक विश्वविक्रम करण्यात येणार आहे. ट्रॅडिशनल दांडपट्टा स्पोर्ट्स असोसिएशनचे श्लोक कोळी, आदिनाथ खंडेराव, सुयश हुच्चे, अरमान पटेल, दर्शन राजोबा, प्रतोष आळंद, प्रशिक्षक अश्विन कडलासकर हे सात मावळे विश्वविक्रम करणार आहेत. या विक्रमाची नोंद द आयडल इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड व यूनिकॉन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये होणार आहे. दरम्यान, या उपक्रमाचे औपचारिक उद्घाटन मंगळवारी सकाळी ११ वाजता करण्यात येणार आहे. यावेळी आ. विजयकुमार देशमुख, आ. देवेंद्र कोठे, सरकारी वकील प्रदीपसिंह रजपूत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने, तालुका क्रीडा अधिकारी गणेश पवार, ॲड. अविनाश कडलासकर, डबल उपमहाराष्ट्र केसरी भरत मेकाले, पैलवान युवराज सरवदे, हभप विनोद महाराज सरवदे यांच्या हस्ते होणार आहे, असे प्रशिक्षक अश्विन कडलासकर यांनी सांगितले. यावेळी अमिता खंडेराव, प्रणिता राजोबा उपस्थित होते.

संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.

- सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

अलक:- (५२) रक्षाबंधन

अलक:- (५३) प्राणमंत्र

परमपूजनीय डॉ. हेडगेवारांनी जगायचे कसे आणि कशासाठी या विषयाचा प्राणमंत्र दिला. त्यांनी आधी कृती मग विचार मांडला; म्हणून त्यांना क्रांतदर्शी म्हणतात. आज झुंड, द काश्मीर फाइल्स, पावनखिंड, इत्यादी चित्रपट प्रदर्शित होऊ शकले. कारण आज पंतप्रधान संघ विचारांचा आहे. यातील एक चित्रपट काश्मीरमधील हिंदूंचे क्रूर हत्याकांड दर्शवितो. तेव्हा १९९० साली संघ स्वयंसेवकांनी आहार-विहार- उपचार आदि कामात खूप मदत केली. असे का घडले हे डॉक्टरांच्या विचारातून कळते. ते नेहमी सांगायचे आपण आपली ओळख - आपली संस्कृती- आपला इतिहास- आपला पुरुषार्थ आपले सामर्थ्य विसरलो आहोत; किंबहुना सामर्थ्य आठवले तरी गुंडाळून ठेवले आहे. दुबळे बनणे पसंत केले आहे. आपला हिंदू समाज रोगी बनला आहे. डॉक्टरांच्या जीवनकाळात पण हिंदू रोगी होता, व आजही आहे. हे दुबळेपण घालवण्याचा प्रयत्न करू या. घटनेच्या ज्या कलमामुळे फुटीरतावादी विचार बळावले होते; ते ३७० कलम ही रद्द झाले आहे व एक देश-एक निशान एक प्रधान ही घोषणा प्रत्यक्षात आली आहे. आपण एक आहोत. राष्ट्र आणि समाज हे वेगळे नाहीत. तर एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत हा भाव म्हणजे डॉ. हेडगेवार यांचा प्राणमंत्र होता. आक्रमक पवित्रे घेणाऱ्या परधर्मीयांच्या शक्तीपुढे सदैव भीतीग्रस्त राहणाऱ्या असंघटित हिंदूंमध्ये स्वसंरक्षणाचे सामर्थ्य निर्माण करण्याची आवश्यकता डॉक्टरांना वाटू लागली होतीच. त्यासाठीच संघात वैचारिक शक्ती व शारीरिक शक्ती या दोन्ही शक्तींची उपासना होते.

क्रमश:

जबरदस्तीने वर्गणी मागितली तर मंडळांवर कारवाईच : पोलीस अधिक्षक

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-

आगामी काळामध्ये येणाऱ्या सण व उत्सवामध्ये उत्सव मंडळाकडून जबरदस्तीने वर्गणीची मागणी होत असेल, ते निदर्शनास आणून द्या, अशा उत्सव मंडळावर कडक कायदेशीर कारवाई होईल. तसेच कारखान्याम ध्ये काम करण्यासाठी येणाऱ्या परप्रांतीय कामगारांचे चारित्र्य पडताळणी करून घ्यावी. तसेच सेंद्रिय शेती चळवळ ही सुध्दा सोलापूर जिल्ह्यामध्ये राबवावी. असे आवाहन पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी केले.

पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी हे नागरिकांमधील सुसंवाद वाढला पाहीजे यासाठी

विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले जातात. त्याच त्यांनी जिल्ह्यातील कारखानदार व उद्योजकांशी संवाद हा उपक्रम घेत संवाद साधला. हा कार्यक्रम पोलीस मुख्यालय, सोलापूर ग्रामीण येथील संवाद हॉल येथे घेतला. १०० हून कारखानदार व उद्योजक सहभागी झाले होते. उद्योजकांनी त्यांच्या अडचणी मांडल्या. तसेच चर्चेत सुरक्षा, वर्गणी मागणी व चोरी संदर्भात चर्चा केली. यावेळी अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर उपस्थित होते. पोलीस अधीक्षक यांनी उद्योजक व पोलीस यांची पर्यावरण बाबतची सामाजीक जबाबदारी याबद्दलही सखोल चर्चा केली. यामध्ये कारखानदारी तून निर्माण होणारे हवेच्या प्रदुषणाबाबत अमोल चाफेकर यांनी हवेतील प्रदुषण कमी करण्यासाठी पीपीटीद्वारे सादरीकरण केले. जिल्ह्यामध्ये जास्तीत जास्त वृक्ष लागवड करण्याबाबत हजर असलेल्या उद्योजकांना आवाहन केले. कार्यक्रम पार पडण्यासाठी पोलिस निरीक्षक अतुल मोहीते यांनी परिश्रम घेतले.

शिवजन्मोत्सव मंडळ, निमा संघटनेच्या वतीने आरोग्य शिबीर

सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिंदे चौक येथील इंदिरा कन्या प्रशाला येथे शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळ आणि निमा संघटनेच्या वतीने शालेय मुलांचे आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवातछत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने निमा संघटनेच्या डॉक्टर आणि शाळेच्या मुख्याध्यापिका यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अध्यक्ष नानासाहेब काळे, उत्सव अध्यक्ष सुशील बंदपट्टे, राजन जाधव, महेश हनमे, श्रीकांत घाडगे, बाळासाहेब पुणेकर, अंबादास शेळके, जितू वाडेकर, सचिन स्वामी, बसू कोळी, लता फुटाणे, डॉ. विनायक टेंभुर्णीकर, डॉ. नागनाथ जिड्डीमनी, डॉ. प्रवीण ननवरे अनिल पत्ती, डॉ. शीतल कुलकर्णी, डॉ. पल्लवी भांगे, डॉ.अश्विनी देगांवकर मॅडम, डॉ. समर्थ वाले स्टुडंट फोरम अध्यक्ष, डॉ. रविराज गायकवाड, डॉ. नितीन बलदवा, डॉ. सचिन बोंगरगे, डॉ. महेश दुलंगे, डॉ. सूर्यकांत धाप्पाधुळे, डॉ. किरण देशमुख, डॉ. रोहित शेळवणे उपस्थित होते.

खोट्या मृत्यू पत्राद्वारे प्लॉट लाटण्याचा प्रयत्न

फसवणूक करणाऱ्या पती-पत्नीवर गुन्हा नोंद

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी -

वयोवृद्ध व्यक्तीच्या पत्नीचे खोट्या सह्या द्वारे मृत्युपत्र तयार केले. बेकायदेशीर उताऱ्यावर नोंदी करून प्लॉट हडपण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी कांबळे पती पत्नीवर फसवणुकीचा गुन्हा नोंद झाला आहे.

सारिका गणेश कांबळे व गणेश सुभाष कांबळे (दोघे रा. मड्डी वस्ती सोलापूर) अशी फसवणूक करणाऱ्यांची नावे आहेत. त्याच्यावर विजापूर नाका पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे. याबाबत दशरथ अप्पाराव कांबळे (वय ८३ रा प्लॉट नं ३०, श्रीनगर ६२ पेठ,जुळे सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे.

२० डिसेंबर २०२२ ते ३० एप्रिल २०२३ दरम्यान सदर घटना घडली आहे. वयोवृद्ध व्यक्तीची जुळे सोलापुरातील श्रीनगर ६२ पेठ येथे जागा आहे. ती त्या व्यक्तीच्या पत्नीच्या नावावर आहे. तरी आरोपींनी ती जागा (प्लॉट नं ३०, सर्वे नं १३१/२/ १) तहसिल कार्यालयात जाऊन फिर्यादीच्या पत्नीचे खोट्या सह्याचे मृत्युपत्र तयार केले. सात बारा उताऱ्यावर नोंद करून घेतली,त्या उताऱ्यावर आरोपीने स्वत:च्या पत्नीचे नाव लावले. फिर्यादीच्या पत्नीच्या नावे असलेली मिळकत फसवणूक करून हडपण्याच्या उद्देशाने कागदपत्रे तयार करून घेतली. गणेश कांबळे यांने फिर्यादीस वारंवार फोन करून घर माझे व माझ्या पत्नीचे आहे.ते खाली कर नाहीत तुला बघून घेईन अशी धमकी दिली आहे, अशी नोंद विजापूर नाका पोलिस ठाण्यात करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास सहा पोलिस निरीक्षक गायकवाड हे करीत आहेत.

शिवजन्मोत्सव मंडळाच्या वतीने बांधकाम कामगार नोंदणी शिबीर

सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-

शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने शनिवारी सकाळी बांधकाम कामगार नवीन नोंदणी आणि नूतनीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उत्सव अध्यक्ष सुशील बंदपट्टे, देविदास घुले यांच्या सह शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे पदाधिकारीआणि कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीचे पूजन करून करण्यात आली. ज्या बांधकाम कामगार महिलांना नूतनीकरण नोंदणी करण्यात अडचणी येत होत्या त्या सर्व बांधकाम कामगारांना शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाने मोफत नोंदणी शिबीर आयोजित करून आधार दिला, यावेळी शेकडो महिलांनी या योजनेचा लाभ घेतला, आणि आपली नोंदणी करून घेतली, शिवजन्म ोत्सव मध्यवर्ती महामंडळाने नूतनीकरण आणि नोंदणी शिबीर आयोजित केल्याने महिलांनी मंडळाचे कौतुक करत समाधान व्यक्त केले आणि शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळ आणि उत्सव अध्यक्ष सुशील बंदपट्टे यांचे आभार मानले.

पालिका उपायुक्त लोकरे यांनी तपासली कर्मचाऱ्यांची हजेरी

गैरहजर कर्मचाऱ्यांना बजावणार नोटीस

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१५ फेब्रुवारी-

महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी आज अचानकपणे सकाळी महापालिकेतील प्रशासकीय इमारतीतील विविध विभागांची पाहणी केली. कर्मचाऱ्यांच्या हजेरींची तपासणी केली. साधारणतः ८६० कर्मचारी गैरहजर असल्याची प्राथमिक माहिती आहे. गैरहजर कर्मचाऱ्यांना नोटीस बजावण्यात येणार असून समाधानकारक खुलासा नसल्यास कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

महापालिकेतील सामान्य प्रशासन विभागाचे नियंत्रण अधिकारी तथा उपायुक्त आशिष लोकरे यांनी आज शुक्रवारी महापालिकेतील प्रशासकीय इम ारतीत अचानक भेट दिली. या इमारतीतील विविध विभागात जाऊन पाहणी केली. कर्मचाऱ्यांची हजेरी पाहिली. बायोमेट्रिक हजेरी तपासली. दरम्यान, या पाहणीत साधारणतः ८६० कर्मचारी गैरहजर असल्याची प्राथमिक माहिती पुढे आली आहे मात्र शिफ्टनसार कर्मचारी येत असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, शिफ्टनुसार किती कर्मचारी येतात ? याचीही माहिती घेण्यात येणार आहे. यातून किती कर्मचारी गैरहजर आहेत त्याची तपासणी करण्यात येणार आहे. गैरहजर आढळलेल्या कर्मचाऱ्यांना नोटीस बजावण्यात येणार असून खुलासा मागविण्यात येणार आहे. खुलासा असमाधानकारक असल्यास संबंधितांचा एक दिवसाचा पगार कपात करण्यात येणार आहे असे उपायुक्त आशिष लोकरे यांनी स्पष्ट केले.

प्रत्येक नागरिकांसाठी रजिस्टरमध्ये नोंदणी आवश्यक

महापालिकेतील प्रशासकीय इमारतीत आल्यानंतर प्रत्येक नागरिकांनी आपले कोणत्या विभागात काम आहे ? कशाचे काम आहे ? याची नोंदणी रजिस्टर मध्ये करणे आवश्यक आहे. नोंदणी करूनच त्या विभागात संबंधित नागरिकांनी जावयाचे आहे. त्यासाठी प्रशासकीय इमारतीच्या मुख्य दरवाजातच सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे.

पाच कर्मचारी टी-शर्ट घालून आले

महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी केलेल्या पाहणीत पाच कर्मचारी हे टी-शर्ट घालून आले असल्याचे दिसून आले. त्यांना ड्रेस कोड मध्ये येण्यास सांगण्यात आले तर काही कर्मचाऱ्यांकडे ओळखपत्र नसल्याचे दिसून आल्याने समज देण्यात आली. ड्रेस कोड आणि ओळखपत्र बंधनकारक असल्याचे स्पष्टपणे सुचित करण्यात आले.

कर्मचाऱ्यांना हालचाल नोंद रजिस्टरची सक्ती

सोलापूर महापालिकेतील विविध विभागातील सर्व कर्मचारी, अधिकाऱ्यांना हालचाल नोंद रजिस्टरची सक्ती करण्यात आली आहे. कर्मचारी कुठे जाणार ? काय काम आहे? कशासाठी जाणार ? याची नोंद करणे गरजेचे आहे अन्यथा संबंधितांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे उपायुक्त आशिष लोकरे यांनी स्पष्ट केले आहे.

किल्लेबांधणी स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना किल्ले रायगड, प्रतापगडाची सफर

विद्यार्थ्यांनी दिल्या 'जय भवानी जय शिवराय'च्या घोषणा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-

छत्रपती श्री शिवाजी महाराज स्मारक मंडळ शिवस्मारकतर्फे घेण्यात आलेल्या किल्ले बांधणी स्पर्धेतील विजेत्या संघातील विद्यार्थ्यांना किल्ले श्री रायगड आणि किल्ले श्री प्रतापगडाचे दर्शन घडविण्यात आले. यामध्ये ५० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

या दुर्गभ्रमंती माहितीपर सहलीचा प्रारंभ शिवस्मारक येथे छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे पूजन करून झाला. यावेळी शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर म्हणाले, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराज आणि त्यांचे स्वराज्य निर्मितीचे मर्म जाणून घ्यायचे असेल तर दुर्गभेटी इतका दुसरा चांगला मार्ग नाही. गडकिल्ल्यांच्या सहवासात गेल्याने आपल्याला हिंदवी स्वराज्याचा काळ अनुभवता येतो आणि इतिहासाचीही माहिती होते. त्यामुळे शिवस्मारकतर्फे केवळ किल्लेबांधणी स्पर्धा न घेता या स्पर्धेत विजयी होणाऱ्या संघातील सदस्यांना दरवर्षी किम ान दोन गड दाखविण्यात येतात. या दुर्गभ्रमंती माहितीपर सहलीत विद्यार्थ्यांनी हिंदवी स्वराज्याची राजधानी असलेल्या दुर्गराज श्री किल्ले रायगड आणि अफजल खान वधाचा साक्षीदार असलेल्या किल्ले श्री प्रतापगडाचे दर्शन घेऊन तेथील इतिहास आणि बारकावे जाणून घेतले. यावेळी विद्यार्थ्यांनी किल्ले श्री रायगडावरील पुण्यश्लोक छत्रपती श्री शिवाजी महाराजांची समाधी, श्री जगदीश्वराचे मंदिर, राजसदर, होळीचा माळ, श्री शिरकाई देवीचे मंदिर, धान्य कोठार आडी अनेक ठिकाणांना भेटी दिल्या. तसेच प्रतापगडावरील श्री भवानी देवीचे मंदिर, पुण्यश्लोक छत्रपती श्री शिवरायांची मूर्ती आदी ठिकाणांचे दर्शन घेतले. या दुर्गभ्रमंती माहितीपर सहलीप्रसंगी सोलापूर जिल्हा गिर्यारोहक संघाचे अध्यक्ष राजेंद्र डांगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या दुर्गभ्रमंती माहितीपर सहलीत शिवस्मारकचे सचिव गंगाधर गवसने, संचालिका माधवी कुलकर्णी, व्यवस्थापक मल्लिनाथ होटकर सहभागी झाले होते.

संक्षिप्त वृत्त

माळशिरस येथे संत नरहरी महाराजांची पुण्यतिथी साजरी

सदाशिवनगर, दि. १५ फेब्रुवारी-

माळशिरस येथील महादेव मंदिरात सोनार समाज व सराफ संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने श्री संत नरहरी महाराज पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी सागर महामुनी व अश्विनी महामुनी यांच्या हस्ते नरहरी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सकाळी १० ते १२ पर्यंत भजन करण्यात आले. त्यानंतर १२ वाजता श्री संत नरहरी महाराजांच्या प्रतिमेवर पुष्पवृष्टी करण्यात आली. या कार्यक्रमास विश्वास महामुनी, दत्ता शहाणे, विष्णुपंत अष्टेकर, दिलीप सिदवाडकर, श्रीकांत सिदवाडकर, विजय दीक्षित, सागर महामुनी, उत्तम दीक्षित, हेमंत सिदवाडकर, रविंद्र सिडदवाडकर, भगवान दीक्षित, राहुल महामुनी, प्रविण सिदवाडकर, संजय पंडित यांच्यासह सोनार समाज बांधव, महिला व सराफ संघटनेचे सदस्य व नागरिक उपस्थित होते.

कुसमोड जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

पिलीव, दि. १५ फेब्रुवारी-

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील जिल्हा परिषद लक्ष्मीनगर, जि. प. पवारवस्ती, लेंगरेवस्ती व गावठाण या चारही शाळांना बारामती कॅटल फिडस् बारामती यांच्यातर्फे सीएसआर फंडातून पहिली ते चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत ५६९ वह्यांचे वाटप करण्यात आले. पहिली-दुसरीतील विद्यार्थ्यांना दोन वह्या तर तिसरी-चौथीतील विद्यार्थ्यांना पाच वह्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी बारामती कॅटल फिडसचे प्रतिनिधी हरीश पिसाळ, श्रीधर मांगडे, संजय पाटील, मुख्याध्यापक सुहास कोल्हे उपस्थित होते. यासाठी कुसमोडचे मिलींद मनोहर लवटे यांचे विशेष सहकार्य लाभले.

कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयातील दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

पिलीव, दि. १५ फेब्रुवारी-

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विदयालयातील दहावीच्या विदयार्थीना आज निरोप देणयात आला. येत्या २१ फेब्रुवारीपासून दहावीची बोर्डाची परिक्षा सुरु होत यानिमित्ताने दहावीच्या विद्यार्थ्यांना विद्यालयाच्या वतीने परीक्षेसाठी शुभेच्छा देणयात आल्या. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक शिवाजी कापसे होते. यावेळी ज्येष्ठ पत्रकार दामोदर लोखंडे, संजय पाटील, संजय रोकडे उपस्थित होते. यावेळी सातपुते, कुलकर्णी, कांबळे, पाटील, अतुल पाटील, काळे, इंगळे यांच्यासह उपस्थित होते. प्रास्ताविक माळी यांनी केले तर अतुल पाटील यांनी आभार मानले.

जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी चिकाटी महत्त्वाची : दीपक मुंढे

बार्शी, दि. १५ फेब्रुवारी-

जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनापासूनच चिकाटी आणि प्रयत्नात सातत्य ठेवल्यास आपण ठरविलेल्या क्षेत्रात निश्चितपणे यश मिळते असे उद्गार सोलापूर येथील माध्यमिक वेतन अधीक्षक श्री दीपक मुंढे यांनी काढले. ते बार्शी तालुक्यातील लोकसेवा विद्यालय आगळगाव येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समरंभ कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी केंद्र प्रमुख पांडुरंग बनसोडे, सचिन उकिरडे, पी.एम. शिंदे उपस्थित होते. ते पुढे म्हणाले की, शालेय जीवनात चांगले गुण मिळवण्याबरोबरच आपापल्या क्षेत्रात जिद्दीने अभ्यास केल्यास निश्चितपणे आपण यशस्वी होतो. यावेळी प्रा. डॉ. रविराज फुरडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.यावेळी ए.एस. टोपे, एस एम मिरगणे, एन.बी. कोळेकर, ए.जे. सपाटे, ए.ए. कदम, एस.सी.बचुटे, एस.डी. मोरे, एस. एम. अवतार, हांगे, आर.डी. गरड, प्रशांत माने, चंद्रकांत दोडमणी उपस्थित होते. प्रास्ताविक विद्यार्थिनी मयुरी गरड, सूत्रसंचालन संचिता ओमन आणि आभार सानिका डमरे हिने मानले.

संत सेवालाल महाराजांना अभिवादन

बार्शी, दि. १५ फेब्रुवारी-

येथील श्री शिवाजी महाविद्यालयात संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. राहुल पालके यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी सार्वजनिक उत्सव समितीचे प्रमुख डॉ. एस. बी. शिंदे, प्रा. डॉ. अनिल कट्टे, प्रा. डॉ. ए. बी. कदम, ग्रंथपाल टिपरसे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी प्रा. डॉ. सुब्राव जाधव, प्रा. डॉ. रविंद्र चाटी, डॉ. गुणवंत सरवदे, डॉ. निलोफर चौधरी, प्रा. भरत जसाभाटी, प्रा. किशोर गरड उपस्थित होते.

मंद्रुपच्या आखाड्यात घुमतोय शड्डूंचा आवाज

- मोबाईलच्या दुनियेतही पैलवान घडविण्यासाठी प्रयत्न
- यात्रेतील कुस्तीमुळे पैलवानांना मिळतेय प्रोत्साहन

तभा वृत्तसेवा । अमोगसिद्ध मुंजे
सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-

कुस्ती म्हणजे कोल्हापूरचा आखाडा अन् पैलवान हे समीकरण ठरलेलं. कोल्हापूरमध्ये कुस्तीचे धडे घेतलेले पैलवान देशभरात कुस्ती खेळून नावारुपास आले आहेत म्हणून कुस्तीत करिअर करण्यासाठी मुलांना कोल्हापूरला पाठविण्यासाठी आई-वडिलांची धडपड सुरु असते. कोल्हापूरमधील वस्तादांकडून कुस्तीचे धडे घेऊन धडधाकट शरीर कमावलेल्या मुलांना बघितल्यानंतर आई-वडिलांसह गावकऱ्यांनाही अभिमान वाटतो. तीस वर्षापूर्वी धडधाकट व पीळदार शरीरयष्टी कमविण्यासाठी महिन्याला दोन ते तीन हजार रुपये खर्च करावा लागायचा. गरीब व सामान्य कुटुंबातील मुलांना पैलवान होताना आर्थिक अडचणीला सामोरे जावे लागत असे. मात्र याच कोल्हापूरच्या छत्रपती शाहू महाराज आखाडाच्या धर्तीवर मंद्रुपमध्ये मळसिध्दप्पा शेखसाहेब कुस्तीचा आखाडा तयार करून पैलवान घडविण्याचे काम माजी सभापती गुरुसिद्ध म्हेत्रे यांच्यासह मंद्रुपच्या नामांकित वस्तादांकडून सुरू आहे. त्यामुळे जानेवारी ते मे या सहा महिन्यांच्या काळात विविध देवांच्या यात्रेदरम्यान मंद्रुपमध्ये कुस्ती स्पर्धा आयोजित करून पैलवानांना प्रोत्साहन देण्याचे काम होत आहे.

आजच्या युगात सकाळी उठल्यानंतर मुलांच्या हातात मोबाईल दिसतो. मात्र याच मुलांवर बलवान शरीराचे संस्कार करून त्यांना बलशाली भारतासाठी निर्व्यसनी पैलवान घडविण्याचे काम मंद्रुपमधील पैलवानांकडून सुरू आहे. मंद्रुपचे माजी सभापती गुरुसिद्ध म्हेत्रे हे एकेकाळचे नावाजलेले पैलवान. मळसिद्ध देवाच्या यात्रेत अनेक वर्षांपासून खुल्या मैदानात भरविण्यात येणाऱ्या कुस्त्यांसाठी गुरुनाथ म्हेत्रे यांनी अनेक दानशूर, कुस्तीप्रेमींकडून लोकवर्गणी व स्वखर्चाने कोल्हापूर पद्धतीचा नवीन कुस्ती आखाडा बांधला. या आखाड्याला ग्रामदैवत मळसिध्दप्पा शेखसाहेब कुस्ती आखाडा नाव देण्यात आले आहे. शिवाय आखाड्यामध्ये व प्रवेशद्वारांवर आकर्षक

बजरंग बलीची मूर्ती साकारण्यात आली आहे. या आखाड्यामध्ये पाच हजार कुस्तीशौकीन बसण्याची व्यवस्था असून कुस्ती पाहताना अडचण येऊ नये म्हणून आखाडा चढ-उतार पद्धतीने बांधण्यात आला आहे. आखाडा परिसर निसर्गरम्य दिसावा म्हणून देशी पिंपळ वृक्षांची लागवड करून निसर्गसौंदर्यात भर टाकण्यात आला आहे.

या आखाड्याशेजारी मल्लिकार्जुन मळसिध्दप्पा तालीम संघ व मल्लविद्या केंद्र आहे. या तालीममधून नामवंत कुस्तीपटू व वस्ताद दररोज रात्री नवीन पैलवानाना कुस्तीचे धडे देत आहेत. कुस्ती आखाडा गाजविताना शालेय स्पर्धांमध्येही येथील पैलवानाना पुरस्कार मिळाले आहेत. त्यामुळे येथील पैलवानांना कुस्तीमधील नवनवीन डाव व कला शिकण्याची संधी उपलब्ध होत आहे. मंद्रुपमध्ये पूर्वीच्या काळी सहा तालीम होते. मात्र कालांतराने कुस्तीकडे पाहण्याचा पालकांचा कल बदलल्याने चार तालीम बंद पडले तर दोन तालीम सुरू आहे. अनेक वर्षांपासून शेखसाहेब तालीम सुरू आहे तर आखाडाशेजारी नवीन कुस्ती केंद्र उभारण्यात आले आहे. मात्र मंद्रुपमध्ये गुरुसिद्ध म्हेत्रे व त्यांच्या इतर सहकाऱ्यांमुळे कुस्तीला पुनर्वैभव मिळवून सोन्याचे दिवस आले आहेत. त्यामुळे गरीब व सामान्य कुटुंबातील पैलवानांना मंद्रुपमध्ये मोफत कुस्तीचे धडे मिळून पैशांची बचत होत आहे. या लालमातीत सराव करून व कुस्ती खेळून अनेक कुस्तीपट्टू सरकारी नोकरीत जनसेवा करीत आहेत. त्यांच्याकडूनही आई-वडिलांच्या स्मरणार्थ आखाडा व कुस्तीसाठी चांदीची गदा व आर्थिक मदत देऊन कुस्तीपटूंना आर्थिक बळ देण्याचे काम सुरू आहे.

मंद्रुपमधील नावाजलेले पैलवान

गुरुनाथ म्हेत्रे, मळसिद्ध शिंगडगाव, आप्पाशा नडविनंगळ, मल्लिनाथ मेंडगुदले, महादेव म्हेत्रे, मल्लिकार्जुन वाडकर, महादेव घाटे, चंद्रकांत लोभे, यल्लप्पा वाघमोडे, खंडप्पा वाघमोडे, सोनेंद्र नवले, सुनिल शिंदे, महादेव टेळे, विठ्ठल बंडगर, आंबिर शेख, शब्बीर मुल्ला, घनश्याम फडतरे, लक्ष्मण कोकळगी, दत्तात्रय टेळे, नामदेव सलगरे, महमद मुल्ला, काशिनाथ कोष्टी, राजकुमार कोळी या पैलवानांनी मंद्रुपचे नाव कुस्तीमध्ये नावारुपास आणले आहे.

खुराकचा खर्च महाग; गावात काम करून सराव करणे शक्य

तीस वर्षांपूर्वी एका महिन्याला खुराक खर्च दोन हजार रुपये होता. आजच्या काळात एका महिन्यासाठी वीस हजार रुपये खर्च आहे. त्यामुळे गरीब कुटुंबातील अनेक पैलवानांना कोल्हापुरात सराव करणे शक्य नाही. मात्र गावात काम करून कुस्तीचा सराव करता येत असल्याने पैलवान होणाऱ्याला सहकार्य होत आहे. मंद्रुपमध्ये मळसिद्ध देवाची यात्रा, पीर शेखसाहेब ऊरूस, मल्लिकार्जुन यात्रा, चौडेश्वरी यात्रा, मरीआई समाज, तंटामुक्तीचे अध्यक्ष रेवणसिद्ध मेंडगुदले यांच्याकडून आयोजित कुस्ती स्पर्धा यामुळे पैलवानांना संधी मिळते.

या दानशुरांकडून कुस्त्यांसाठी मदत

मंद्रुपमधील सोन्याचे व्यापारी सतिश वेर्णेकर यांच्याकडून शेवटच्या कुस्ती पैलवानांना प्रत्येकी चार ग्रॅम चांदीचा कडा सलग तीन वर्षे विजेत्यास चांदीची गदा तसेच सागर शेजाळ याला सरावासाठी दर महिना पाच हजार रुपये, बिरप्पा वाघमोडे यांच्याकडून खंडप्पा वाघमोडे यांच्या स्मरणार्थ चांदीची गदा देण्यात येत आहे.

निर्व्यसनी समाजासाठी कुस्तीचे धडे गरजेचे

मंद्रुपमध्ये पूर्वी सहा तालीम होते. कालांतराने चार तालीम बंद पडले. आज दोन तालीम असून या तालीममधून निर्व्यसनी तरुण घडविण्याचे काम होत आहे. नामांकित वस्तादांकडून तरुण पैलवानांना कुस्तीचे नवीन डाव व कला शिकविण्यात येतात. शिवाय शालेय कुस्ती स्पर्धांमध्ये यश मिळविल्यानंतर सरकारी नोकरीतही आरक्षण असल्याने तरूणांनी कुस्तीचे धडे घेऊन पीळदार व बलवान शरीरयष्टी कमवावे. निरोगी व निर्व्यसनी समाजासाठी पैलवान बनणे उत्तम मार्ग आहे.

-पै. रमेश नवले, माजी उपसरपंच, मंद्रुप

बलशाली भारत घडविण्याचे आदर्श कार्य

मंद्रुपमध्ये प्रशस्त व आकर्षक कुस्ती आखाडा आहे. मंद्रुपमधील अनेक देवांच्या यात्रेनिमित्त या आखाड्यात कुस्तीसाठी उपस्थित राहण्याचा योग आला. नेपाळचा देवा थापासह दिल्ली, हरीयाणा, पंजाब, कर्नाटक, महाराष्ट्र केसरी असणाऱ्या नामांकित मल्लांच्या कुस्ती या आखाड्यात पार पडले आहेत. आखाड्यासह मल्लविद्या केंद्राच्या माध्यमातून बलशाली भारत घडविण्याचे आदर्श काम होत आहे.

-श्रीशैल हत्तुरे, संस्थापक अध्यक्ष, महात्मा बसवेश्वर प्रतिष्ठान

वस्तादांकडून कुस्तीचे नवीन डावाचे धडे

कुस्तीमधील नवनवीन धडे देण्यासाठी दररोज तालीममध्ये उपस्थित राहतो. शिवाय चार ते पाच वस्तादांकडून पैलवानांची तयारी करून घेतली जाते. त्यामुळे नवीन पैलवानांना प्रोत्साहन मिळते. शिवाय मंद्रुपमध्ये मोठ्या प्रमाणात पैलवान तयार करण्याचा खटाटोप सुरू आहे.

-गुरुनाथ म्हेत्रे, प्रमुख, मल्लिकार्जुन मळसिद्ध तालीम संघ, मंद्रुप

परंपरा जतन करण्याचा प्रयत्न

अनेक वर्षांपासून पूर्वजांनी परंपरा म्हणून सुरू केलेला कुस्ती खेळ आहे. या खेळामुळे पैलवान तयार होण्याबरोबर युवकांना सशक्त व सुदृढ होण्यासाठी मदत होते. आमच्या पूर्वजांनी सुरू केलेला कुस्ती खेळ जतन करण्यासाठी गावाच्या विविध देवांच्या यात्रेत प्रोत्साहन म्हणून कुस्ती आखाडा भरविण्यात येते. पुढील काळातही कुस्ती वाढीसाठी प्रयत्न करणार आहे.

-राजेश देशमुख, अध्यक्ष, मळसिद्ध यात्रा कमिटी, मंद्रुप

प्रोत्साहन म्हणून बक्षीस

मंद्रुपला नामांकित मल्लांची मोठी परंपरा आहे. प्रत्येक देवांच्या यात्रेत कुस्त्या होत असल्याने पैलवानांना प्रोत्साहनाबरोबरच चांदीचा कडा, गदा व पाच हजार रुपयांचे बक्षीस दिले आहे. पैलवान निर्माण होण्यासाठी आणखी मदत करण्याची तयारी आहे.

-सतिश वेर्णेकर, उद्योजक, मंद्रुप

मंद्रुपमधील कुस्ती डावामुळे राष्ट्रीय पातळीवर कामगिरी

शालेय जीवनात मंद्रुपमधील तालीममधून सराव केला. येथील वस्तादांच्या शिकवणीमुळेच दोनवेळा राज्यस्तरीय, शालेय कुस्ती स्पर्धा, खाशाबा जाधव कुस्ती स्पर्धा, कुमार महाराष्ट्र केसरीसह विभागीय व जिल्हा पातळीवर उत्तम कामगिरी करून मंद्रुपच्या पैलवानांचे नाव प्रसिद्धीस आणले आहे.

-सागर शेजाळ, पैलवान, मंद्रुप

बोरामणीला विकासापासून वंचित ठेवणार नाही

आ. कल्याणशेट्टी : बोरामणी ते खडकी दावल मलिक दर्गा रस्त्याचे मजबुतीकरण

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-

बोरामणी गावाला कोणत्याही शासकीय योजनापासून वंचित ठेवणार नसून येणाऱ्या काळात बोरामणी गावांमध्ये अनेक विकासाची कामे करणार असल्याचे प्रतिपादन आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले. मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून बोरामणी ते खडकी दावल मलिक रस्ता मजबुतीकरण व काँक्रिटीकरणसाठी आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी ४ कोटी ७० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. त्या रस्त्याच्या उद्घाटनप्रसंगी आ. कल्याणशेट्टी बोलत होते.

यावेळी आ. कल्याणशेट्टी म्हणाले की, अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील गाव खेड्यांमध्ये रस्ते पोहोचविण्याचा आपला प्रयत्न असून दळणवळणाची साधने सोपी व्हावेत , या उद्देशाने आपण या मतदारसंघात रस्त्याची कामे प्रामुख्याने केली असून गाव खेड्यांना केंद्रस्थानी ठेवून आपल्या विधानसभा मतदारसंघाचा विकास कशा पद्धतीने करता येईल यासाठी नेहमीच प्रयत्न करणार असल्याचे सांगून केदारलिंग विभुते यांनी या रस्त्यासाठी आपल्याकडे नेहमीच पाठपुरावा केल्याचे त्यांनी त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी सोमनाथ पटणे, भारत कवडे, राजकुमार हलसगे, शशिकांत पटणे, रफिक मुजावर, शिवराज विभुते, नाना भोसले, इसुलाला पटेल, शंकर भगरे, भगवान चव्हाण, राज साळुंके, संजय विभुते, अप्पा बिराजदार, नागनाथ जाधव, दिगंबर साळुंखे, राजकुमार राठोड, संजय राठोड, शाम रोकडे, राजकुमार वाघमारे आदी उपस्थित होते.

आमदारांमुळे बोरामणीचा विकास

आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्यामुळे आज बोरामणीच्या परीसरातील रस्त्याबरोबरच अनेक विकासाची कामे झाली असून बोरामणीच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमीच प्रयत्न केल्याचे कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक केदारलिंग विभुते यांनी सांगितले.

ध्येय निश्चितीसाठी युवकांनी मोठी स्वप्ने पहावित : डॉ. अजित आव्हाड

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. १५ फेब्रुवारी-

युवकांनी चांगला विचार, भावना आणि सामाजिक वर्तनाच्या माध्यमातून व्यक्तिमत्व घडवून युवकांनी मोठी स्वप्ने पहावेत, असे प्रतिपादन डॉ. अजित आव्हाड यांनी केले.

श्री शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने देवगांव येथे विशेष श्रम संस्कार शिबिरात युवकांचे मानसिक आरोग्य या विषयावर डॉ. आव्हाड बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष ग्राम विकास अधिकारी प्रमोद बाबर होते. यावेळी डॉ. सारंगा बुरगुटे-आव्हाड, कार्यक्रम अधिकारी डॉ. दामाजी भिसे, प्रा. समाधान लोंढे, प्रा. मनोज चिकराम, प्रा. राजनंदिनी हरदाडे, प्रा. आशा कांबळे आदी उपस्थित होते. पुढे डॉ. आव्हाड असे म्हणाले की, प्रत्येकाला यशस्वी व्हायचे असेल तर मानसिक आरोग्य उत्तम असले पाहिजे. तसेच नकारात्मक विचारांनी गोंधळून जाण्यापेक्षा तज्ञ व्यक्तीची मदत घ्यावी.

त्याबरोबर युवकांनी सोशएल मिडीयाचा वापर करणे टाळले पाहिजे, जेणेकरुन मनोरंजनातून बाहेर येऊन आपण वास्तवादी जीवन जगू शकतो. आजचा युवक हा करिअर संदर्भात जुजबी माहिती असल्याने आपण यशस्वी होत नाहीत. त्यामुळे आपल्या मनात निराशा येते. असे ही त्यांनी सांगीतले. प्रास्ताविक निकिता आवारे तर यशराज शेंबडे हिने केले. सूत्रसंचालन मृणाली पाटील आणि श्रद्धा कोंढारे हिने केले. आभार सायली ठाकरे हिने मानले.

श्री संत कुर्मदास कारखान्याच्या गळीत हंगामाची सांगता

८० हजार मे. टन गाळप

तभा वृत्तसेवा,
माढा, दि. १५ फेब्रुवारी-

पडसाळी येथील संत कुर्मदास सहकारी साखर कारखाना लि. सहकार महर्षी गणपतराव साठे नगर या कारखान्याच्या सन २०२४ - २०२५ चा गळीत हंगामाचा सांगता समारंभ कारखान्याचे कारखान्याचे संस्थापक चेअरमन माजी आमदार ॲड. धनाजीराव साठे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

सांगता समारंभानिमित्त कारखान्याचे मुख्य शेती अधिकारी प्रकाश शिंदे व त्यांच्या सुविद्य पत्नीसुरेखाताई शिंदे या उभयतांच्या हस्ते काटा व श्री सत्यनारायण पुजा करण्यात आली. सुरुवातीस श्री संत कुर्मदास महाराज, सहकार महर्षी गणपतराव साठे, लोकनेते स्व.विलासरावजी देशमुख साहेब यांचे प्रतिमेचे पूजन कारखान्याचे व्हाईस चेअरमन सुधीर पाटील व संचालकांच्या उपस्थित करण्यात आले. प्रास्ताविक संचालक दादासाहेब साठे यांनी केले. चेअरमन ॲड. धनाजीराव साठे यांनी सांगितले की, आजपर्यंत सर्वांच्या सहकार्याने कारखाना प्रगती करत आला आहे. हंगामामध्ये विविध अडचणीतून मार्ग काढीत सर्वांच्या सहकार्याने कारखान्याचा हंगाम सुरळीत पार पाडला. कारखान्याच्या या हंगामात कारखान्याकडे नोंदलेल्या सभासद, बिगर सभासदांच्या ऊसाचे गाळप करुन हंगामामध्ये एकूण ८०५०० मे. टन उसाचे गाळप करण्यात आले. गेल्या वर्षीच्या दुष्काळी परिस्थितीमुळे जिल्ह्यामध्ये ऊस उत्पादन घटले होते. तसेच यंदा सोलापूर जिल्ह्यामध्ये खोडव्याचे प्रमाण जास्त असल्याने ऊस उत्पादनामध्येही उतारा कमी मिळून ऊसाच्या तोडी लवकर आटोपल्या त्यामुळे त्याचा परिणाम बहुतांश कारखान्याचे गाळप हंगामावर होवून कमी कालावधीत गाळप हंगाम संपले आहेत. कारखान्याच्या गळीत हंगामामध्ये ऊस उत्पादक सभासद शेतकरी, विविध शासकीय कार्यालयाचे तसेच बँकांचे अधिकारी, व्यापारी, हंगामी कंत्राटदार, ऊस तोडणी वाहतूक ठेकेदार, बैलगाडीवान, ऊस तोडणी वाहतूक शेतमजूर, कारखान्याचे विविध विभागाकडील अधिकारी, कर्मचारी हंगामामध्ये मोलाचे सहकार्य मिळाले. कारखान्याचा गळीत हंगाम यशस्वीपणे पूर्ण करता आला. यावेळी संस्थापक चेअरमन ॲड. धनाजीराव साठे, व्हा. चेअरमन सुधीर पाटील, संचालक दादासाहेब साठे, कारखान्याचे मार्गदर्शक बी. डी. पाटील, संचालक भालचंद्र पाटील, हरीदास खताळ, राहुल पाटील, विठ्ठल शिंदे, बाळासाहेब पाटील, शंकर नाईकवाडे, विजयसिंह पाटील, संध्याराणी खरात, शालिनी कदम, कमल लोंढे, संजय इंगळे, पडसाळीचे सचिन पाटील, कार्यकारी संचालक झुंजार आसबे, टाईम किपर सिध्देश्वर बिनग उपस्थित होते. आभार नारायण गायकवाड यांनी मानले.

CMYK

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

क्रीडा महोत्सव स्पर्धेसाठी वैष्णवी बस्के, साक्षी गाडे यांची निवड

तभा वृत्तसेवा,
कुर्डूवाडी, दि. १५ फेब्रवारी-

राज्यपाल कार्यालय आयोजित २६ व्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धेसाठी पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात बास्केटबॉल खेळाचे निवासी सराव शिबीर डॉ. प्रशांत तांबिले यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. या शिबिरातून अंतिम संघ निवडण्यात आला. यात के. एन. भिसे महविद्यालय, कुर्डूवाडी येथील बी. एस. सी भाग १ मधील विद्यर्थिनी वैष्णवी बस्के, साक्षी गाडे यांची गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे १७ ते २२ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत होणाऱ्या आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली. या निवडीबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अनुपमा पोळ, उपप्राचार्य

डॉ. प्रकाश कांबळे, अध्यक्षा जयश्रीताई भिसे, उपाध्यक्ष संतोषजी भिसे, सचिव बाळासाहेब भिसे यांनी अभिनंदन केले.

संक्षिप्त वृत्त...

उत्कर्ष माध्यमिक विद्यालयात इलेक्ट्रॉनिक्सवर कार्यशाळा

सांगोला, दि. १५ फेब्रुवारी-

सांगोल्यातील उत्कर्ष माध्यमिक विद्यालयात मल्टीस्किल फाउंडेशन कोर्स मध्ये ऊर्जा व पर्यावरण विभागांतर्गत इलेक्ट्रॉनिक्स विषयावर एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी फॅब्रेटेक इंजिनियरिंग कॉलेजचे शिक्षक गणेश शिंदे व संदीप केदार यांनी मार्गदर्शन केले. ११० विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत सहभाग घेतला. यावेळी सदर विभागाचे एचओडी मंगेश कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले. मुख्याध्यापक सुनील कुलकर्णी यांच्या हस्ते आलेल्या मार्गदर्शक शिक्षकांचे स्वागत करण्यात आले. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मूलभूत इलेक्ट्रॉनिक घटक, सर्किट डिझाईन, सेन्सर्स, तसेच अर्डीनिओ प्रोग्रामिंग याविषयी माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी एलईडी सर्किट, सेन्सर प्रयोग आणि छोटे प्रोजेक्ट स्वतः तयार करून प्रयोगात्मक शकण्याचा आनंद घेतला. कार्यशाळेस माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान संस्थेचे अध्यक्ष निलिमा कुलकर्णी, संस्थापक डॉ. संजीवनी केळकर यांनी भेट दिली. यावेळी मल्टिस्किल फाउंडेशन कोर्समधील शिक्षक सत्यवान भिंगार्डे, सुशांत गावडे, माधुरी गोरे उपस्थित होते.

मंद्रुपमध्ये सेवालाल जयंती साजरी

सोलापूर, दि. १५ फेब्रुवारी-

मंद्रुप येथे बंजारा समाजाचे आराध्य दैवत संत सेवालाल महाराजांची जयंती उत्साहाने साजरी करण्यात आली. सेवालाल चौक येथे पोलीस उपनिरीक्षक राजकुमार डांगे, पंचायत समितीच्या सदस्या शालन चव्हाण व माजी ग्रामपंचायत सदस्य अमृता चव्हाण यांच्या हस्ते भोग लावून श्रीफळ वाढविण्यात आले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी माजी कृषी सभापती अप्पाराव कोरे, नायब तहसीलदार जितेंद्र मोरे, माजी जिल्हा परीषद सदस्या विद्युलता कोरे, सरपंच अनिता कोरे, माजी सरपंच विश्वनाथ हिरेमठ, ग्रामपंचायत सदस्य सुरेश टेळे, शिवपुत्र जोडमोटे, शांताबाई चव्हाण, ग्रामपंचायत अधिकारी नागेश जोडमोटे, पोलीस कॉन्स्टेबल सागर चव्हाण, सिद्राम हेळकर, कारभारी खुबा चव्हाण, नाईक अर्जून चव्हाण, बाळासाहेब चव्हाण, विनोद चव्हाण, शिवाजी चव्हाण, हेमंत चव्हाण, बाबू चव्हाण, महेश चव्हाण, संजय राठोड, कस्तुर चव्हाण, विलास चव्हाण आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन शिवाजी चव्हाण यांनी केला, तर विनोद चव्हाण यांनी आभार मानले.

एनएमएमएस परीक्षेत विद्याविकास मंदिरच्या विद्यार्थ्यांचे सुयश

करकंब, दि. १५ फेब्रुवारी-

आठवीतील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत विद्या विकास मंदिर उंबरे (पागे) येथील प्रियांका कदम ८४, आकांक्षा भोसले ८३, सृष्टी कदम ८०, दुर्गा कानगुडे ७२, पायल भोसले ६६ या विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले. दहावीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभप्रसंगी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक बी. जे. शिंदे, परीक्षा प्रमुख व्ही. एन. लांडगे, शिक्षक के. सी. पाटील, एस. आर. चव्हाण, शिक्षिका सुप्रिया वायकर यांचे मार्गदर्शन लाभले. मुख्याध्यापक कल्याण बाबर यांनी मार्गदर्शन केले. यशवंतांचे संस्थेचे चेअरमन ज्ञानदेव ढोबळे, अध्यक्ष राजाराम नरसाळे, सचिव बलभीम पाटील यांनी अभिनंदन केले.

सुरदीप क्षीरसागरची मुंबई पोलीस दलात भरती

मोडनिंब, दि. १५ फेब्रुवारी-

मोडनिंब (ता. माढा) येथील सुरदीप बापू क्षीरसागर याची मुंबई पोलीस कारागृह येथे भरती झाली आहे. पहिल्याच प्रयत्नात त्याने या यशाला गवसणी घातली. सुरदीपला मैदानी चाचणीत ४० तर लेखी परीक्षेत ८९ असे एकूण १२९ गुण मिळाले. सुरदीपला आई वंदना व मामा जितेंद्र ओहोळ, आजी-आजोबा यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी निखिल वाघमारे, शुभम वाघमारे, सिद्धेश्वर गायकवाड, जय थोरात, धीरज नाईक, सुबोध नाईक, जीवन नाईक, साई नाईक, संतोष ओहोळ, अभिजित माने, पवन गायकवाड, शेखर जाधव यासह नागरिक, मित्र परिवार यांनी सत्कार केला.

पंढरपूर कॉरिडोर विकास आराखड्याबाबत संभ्रम

शासन, प्रशासनाकडून स्पष्टीकरण नाही; विकासाबाबत समज-गैरसमज

तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर
पंढरपूर, दि. १५ फेब्रुवारी-

एकीकडे केंद्राच्या सहकार्याने राज्य शासनाकडून पंढरपूर कॉरिडोरचा घातलेला घाट तर दुसरीकडे जिल्हाधिकाऱ्यांकडून स्कायवॉक आणि दर्शन रांगेच्या निविदा काढून येत्या १५ मार्चपासून प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्याचे केलेले सूतोवाच यामुळे पंढरपूरचा नेमका विकास कसा असणार, नियोजित पंढरपूर कॉरिडोरचे नेमके काय होणार? याबद्दल पंढरपूरवासीयांमध्येच संभ्रमावस्था निर्माण झालेली आहे. जर कॉरिडोर होणार असेल तर स्कायवॉक, दर्शन रांग, दर्शन हॉल याचे प्रायोजन त्यामध्ये नसणार का? कॉरिडोर अंतर्गतच ही कामे केली जाणार आहेत का? असे एक ना अनेक सवालदेखील पंढरपूरकर नागरिकांतून उपस्थित केले जात आहेत.

राज्यातील तमाम विठ्ठल भक्तांसाठी आणि वारकरी सांप्रदायाच्या दृष्टीने पंढरपूर हे माहेरघरच नव्हे तर देवभूमी तसेच आध्यात्मिक नगरी. या तीर्थक्षेत्राचा विकास व्हावा ही दस्तुरखुद्द देशाच्या पंतप्रधानाची तीव्र इच्छा. त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून आयोध्या, काशीविश्वनाथ, उज्जैनच्या धर्तीवर पंढरपूर कॉरिडोर राबविण्याचा केलेला संकल्प. यावर देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी देखील भाष्य करुन पंढरपूर कॉरिडोर हा पंतप्रधान नरेंद्र मोदींचा ड्रीमप्रोजेक्ट असल्याचे सांगितल्यामुळे कॉरिडोर होणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेष असल्याचे वरिष्ठ पातळीवरुन बोलले जाऊ लागले. यामध्येच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू मानले जाणारे आणि संकटमोचक म्हणून राज्यभर ज्यांची ख्याती आहे असे गिरीष महाजन यांनीदेखील मध्यंतरी पंढरपूर भेटीच्या वेळी पंढरपूर कॉरिडोर संदर्भात लवकरच गोड बातमी आपणास कळेल असे सुतोवाच केले. त्यानंतर पालकमंत्रिपदी वर्णी लागल्यामुळे विठ्ठलाच्या दर्शनाच्या निमित्ताने येथे आल्यावर जयकुमार गोरे यांनी देखील पंढरपूरचा चेहरामोहरा बदलणाऱ्या पंढरपूर कॉरिडोरच्या विषयाला पुष्टी दिली. त्यामुळे पंढरपूरवासियांमध्ये गेल्या काही महिन्यांपासून या विषयाबाबत संभ्रमावस्था आहे.

शासनाने भूमिका स्पष्ट करावी

एकंदरीतच शासन आणि प्रशासनाच्या पंढरपूर कॉरिडोर संदर्भातील बोटचेप्या धोरणामुळे दस्तुरखुद्द पंढरपूरकरांमध्येच पंढरपूरच्या होणाऱ्या विकासाबाबत संभ्रमावस्था दिसत आहे. त्यामुळे पंढरपूर कॉरिडोर किंवा पंढरपूर विकासाबाबत समज, गैरसमज पसरण्याअगोदरच शासनाने आपली नेमकी भूमिका स्पष्ट करावी अशी मागणी समस्त पंढरपूरकर नागरिकां मधून केली जात आहे.

मंदिराचे कामही रेंगाळले

दुसरीकडे विठ्ठल मंदिराला पुरातन लूक देण्यासाठी पहिल्या टप्प्याचे काम गेल्या काही महिन्यांपासून सुरु करण्यात आलेले आहे. यासाठी सुमारे ७३ कोटींची तरतूद करण्यात आलेली आहे. मात्र एक, दोन महिन्यांपासून हे काम देखील काही प्रमाणात रेंगाळलेले दिसत आहे. या मध्येच जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दर्शन हॉल, स्कायवॉकच्या कामाची १२९ कोटींची निविदा मागविली असून येत्या १५ मार्च पासून हे काम सुरु करुन साधारण वर्षभरात हे काम पूर्णत्वास नेण्याचा संकल्प केल्याचे ते सांगत आहेत.

पंढरपूर कॉरिडोरचे भविष्य काय?

पंढरपूर कॉरिडोरचे भविष्य काय? जर कॉरिडोर होणार असेल तर दर्शन रांग, दर्शन हॉल, स्कायवॉक याचे प्रयोजन त्या कॉरिडोर अंतर्गत होणाऱ्या विकास आराखड्या मध्ये नाही का? पंढरपूरचा अशा प्रकारे विकास कसा होणार, पंढरपूरच्या विकास योजनांना काही रुपरेषा आहे की नाही ? या बरोबरच शासन तसेच प्रशासन कॉरिडोर संदर्भात मूगगिळून गप्प का आहेत ? असे एक ना अनेक सवाल पंढरपूरवासियांकडून सध्या उपस्थित केले जात आहेत.

चिवरी येथील महालक्ष्मीची मंगळवारपासून यात्रा

दोन दिवस विविध धार्मिक कार्यक्रम; वाघ्या मुरळी, आराधी पथके, यल्लमाची गाणी, धनगरी ओव्या, पोतराजही होणार सहभागी

तभा वृत्तसेवा,
अणदूर, दि. १५ फेब्रुवारी-

महाराष्ट्रासह कर्नाटक आंध्रप्रदेशातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या तुळजापूर तालुक्यातील चिवरी येथील महालक्ष्मी यात्रोत्सवास मंगळवारी १८ फेब्रुवारीपासून सुरुवात होत आहे.

महालक्ष्मीची यात्रा प्रथेप्रमाणे दरवर्षीच्या माघ पौर्णिमेनंतर येणाऱ्या पहिल्या मंगळवारी साजरी केली जाते. यात्रेनिमित्त देवस्थानच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. देवीजींना सोमवार मंगळवारच्या मध्यरात्री महाअभिषेक, अलंकार पूजा करून महाआरती केली जाते. त्यानंतर आंबट-गोड भातासह पुरणपोळीचा नैवद्य दाखवला जातो. पहाटे गाव ते मंदिर या एक किलोमीटर अंतरावर दंडवत व लिंबाच्या पाल्याने रस्ता झाडला जातो. या गावातील शेकडो भाविक सहभाग नोंदवितात. मंगळवार हा यात्रेचा मुख्य असतो.

या दिवशी नवीन पोतराजांना दीक्षा देणे, दंडवत घेणे, पट बांधणे, लहान मुलांचे जावळ काढणे आदी नवस्फूर्तीचे कार्यक्रम होतात. तसेच वाघ्या मुरळी, आराधी पथके, यल्लमाची गाणी, धनगरी ओव्या, पोतराज गाणी अशा महाराष्ट्रीयन लोककलेचे धार्मिक कार्यक्रम होतात. देवीच्या दर्शनासाठी लातूर, धाराशिव, बीड, मुंबई, पुणे आदींसह परराज्यातून भाविक मोठ्या संख्येने येतात. विशेष म्हणजे या यात्रेमध्ये हजारो पारधी समाज दाखल होतो. मंगळवारी दिवसभरात मानकरी वाणी पाटील, मराठा-पाटील यांच्या वाड्यावर जाणे, घोंगड्यात भात झेलणे आदी मानपानाच्या विधी पार पडतात. मंगळवारी रात्री गावातून देवींची शोभेच्या दारूकामासह पालखी छबिना मिरवणूक काढण्यात येते व पालखी मानाच्या पुजाऱ्याच्या घरी प्रस्थान होऊन रात्री बारा वाजता मंदिराकडे पालखी प्रस्थान होते. यानंतर होमावहनामध्ये धार्मिक विधी पार पडल्यानंतर भाविकांना महाप्रसाद दिला जातो. बुधवारी १९ रोजी सकाळी सात वाजता पान व लिंबू याचा घाव होतो. बुधवारी सायंकाळी मंदिरामध्ये एकही यात्रेकरू थांबत नाही. मंदिर निर्मनुष्य होते. येथे संध्याकाळी भुताची यात्रा भरते, अशी आख्यायिका आहे.

यात्रेची तयारी पूर्ण

ट्रस्टतर्फे यात्रेची संपूर्ण तयारी झाली असून सोयीसुविधांसाठी ट्रस्ट तत्पर असून, वीज, पाणी, स्वछता या प्राथमिक गोष्टी पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकामुळे सांगोल्याच्या वैभवात भर

माजी आ. दीपकआबा साळुंखे-पाटील यांचे प्रतिपादन

तभा वृत्तसेवा,
सांगोला, दि. १५ फेब्रुवारी-

गतवर्षी सांगोला शहरात हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे आगमन झाले. यंदाच्या वर्षी सुरुवातीलाच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे आगमन झाले. त्यामुळे दोन्ही महापुरुषांच्या आगमनाने सांगोलकरांचा आनंद गगनात मावेनासा झाला आहे. सांगोलकरांचे स्वप्न साकार झाले असे प्रतिपादन माजी आ. दीपकआबा साळुंखे-पाटील यांनी व्यक्त केले.

शुक्रवारी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास दीपकआबा साळुंखे-पाटील यांनी आपल्या संपर्क कार्यालयासमोर पुष्पहार अर्पण करून जेसीबीमधून पुष्पवृष्टी केली, यावेळी ते बोलत होते. यावेळी हजारो भीमसैनिक, समाजबांधव आणि कार्यकर्ते उपस्थित होते. पुढे बोलताना ते म्हणाले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे तमाम देशवासीयांचे स्फूर्तीस्थान आहेत. सांगोला शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर

यांचे भव्य दिव्य स्मारक झाल्याने सांगोला शहराच्या वैभवात भर पडणार आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यापासून हजारो तरुणांना प्रेरणा मिळेल आणि येणाऱ्या अनेक वर्षांना सांगोला शहरातील छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर या दोन्ही युगपुरुषांची स्मारके अखंड प्रेरणा देत राहतील असा आशावादही यावेळी त्यांनी व्यक्त केला.

अकोले खुर्दची प्रियांका पाटील बनली अन्न सुरक्षा अधिकारी

मुलगी अधिकारी झालेले पाहण्याचे वडिलांचे स्वप्न अधुरे

तभा वृत्तसेवा,
टेंभुर्णी, दि. १५ फेब्रुवारी-

लहानपणीच आईचे छत्र हरपले. वडिलांनी आईचे दुःख जाणवू न देता सांभाळ केला. मुलीला उच्च शिक्षण घेऊन अधिकारी होण्याचे स्वप्न दाखवले. मुलीने वडिलांचे स्वप्न जिद्दीने अभ्यास करून पूर्ण करीत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेत अन्न सुरक्षा अधिकारी वर्ग-२ या पदाला गवसणी घातली.

मात्र निकालाच्या अवघ्या चार दिवसांपूर्वी वडिलांनी जगाचा अखेरचा निरोप घेतला. ही मन अतिशय सुन्न करणारी कहाणी आहे माढा तालुक्यातील अकोले-खुर्दची कन्या प्रियांका प्रताप पाटील हिची. अकोले-खुर्द येथील प्रताप शामराव पाटील यांचे नुकतेच निधन झाले. ते दोन मुली व एक मुलगा असे एकमेकांना आधार देत दिवस कंठीत होते. मुलांची आई तर लहानपणीच गेली होती. यामुळे आई-वडिलांचे

छत्र हरपल्याने प्रियांकासह दोन्ही बहिणी व भाऊ अशी तिन्ही भावंड आई-वडिलांच्या आशीर्वादास कायमची पोरकी झाली. अशात एकीकडे वडिलांचे दुःख तर दुसरीकडे निवड झाल्याच्या आनंदाचा क्षण अशी स्थिती अकोले खुर्द येथील पाटील कुटुंबात पाहायला मिळाली आहे. प्रियांकाला अधिकारी म्हणून पाहण्याचे वडील प्रताप पाटील यांचे स्वप्न होते. अखेर ते स्वप्नच राहिले.

बोरी उमरगेच्या लक्ष्मीची मंगळवारी यात्रा

तभा वृत्तसेवा,
अक्कलकोट, दि. १५ फेब्रुवारी-

तालुक्यातील बोरी उमरगे येथे अनादी काळापासून चालत आलेली श्री लक्ष्मी थंडी यात्रा भाकणूक कार्यक्रम मंगळवारी १८ फेब्रुवारी रोजी होणार आहे.

महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील कलबुर्गी, विजापूर, धाराशिव, सोलापूर आदी जिल्ह्यातून शेतकरी, भाविक भक्त येथे मोठ्या संख्येने गर्दी करतात. मंगळवारी १८ रोजी रात्री ९ वाजता बोरी उमरगे येथील श्रीक्षेत्र लक्ष्मी मंदिर, दोड्डे लक्ष्मी मंदिर व डोंगर लक्ष्मी मंदिराचे कलशारोहण

कार्यक्रम करण्यात येणार असून रात्री अकरा वाजता गावातून श्री लक्ष्मी माता पालखीचे मिरवणूक सोहळा होणार आहे. यानंतर रात्री बारानंतर उमरगे येथून श्री लक्ष्मी माता पालखीचे मिरवणूक सोहळा डोंगर लक्ष्मी मंदिरकडे प्रयाण होणार आहे. डोंगर लक्ष्मी मंदिर येथे रात्री एक दीडच्या सुमारास भाकणुकीस सूरवात होणार असून शेती पीकपाणी पाऊस रोगराई व राजकीय घडामोडी बद्दल भाकणूक सांगितले जाते. या भाकणुकीनुसार महारष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील शेतकरी वर्षभरातील आपल्या शेतीचे पीक पाणी मशागतीबद्दल नियोजन करतात. या यात्राची उमरगे, मैंदर्गी, मिरजगी, रामपूर, हत्तीकणबस, कंठेहळ्ळी, संगोळगी (आ), चिक्केळ्ळी या पंचक्रोशीतील भाविक भक्तच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आली आहे. डोंगर लक्ष्मी मंदिर येथे रात्रभर महाप्रसादची व्यवस्था करण्यात आली आहे.

भोगातून रोगाकडे जाण्यापेक्षा संत साहित्यातून महायोगाकडे जा

ज्येष्ठ निरुपणकार विवेक घळसासी यांचे प्रतिपादन; शिवशक्ती बँकेच्या व्याख्यानमालेची सांगता

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. १५ फेब्रुवारी-

आधुनिक काळात मानसिक ताणतणावांना तोंड देण्यासाठी संत विचारच तारक आहेत. त्यामुळे भोगातून रोगांकडे जाण्यापेक्षा संत साहित्याच्या वासनातून परमार्थिक महायोगाकडे जा, असे आवाहन ज्येष्ठ निरुपणकार विवेक घळसासी यांनी केली.

शिवशक्ती नागरी सहकारी बँकेने आयोजित केलेल्या चौदाव्या कर्मवीर व्याख्यानमालेत ते पसायदान श्री तुकोबांचे या विषयावर बोलत होते. यावेळी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, शिवशक्ती बँकेचे चेअरमन डॉ. प्रकाश बुरगुटे, सचिव पी. टी. पाटील, सहसचिव अरुण देबडवार, खजिनदार जयकुमार बापू शितोळे आदी मान्यवर व्यासपीठावर होते.

यावेळी घळसासी म्हणाले, पसायदान म्हणजे पायसदान आहे. महान आणि तपश्चर्या व साधनेनंतर ते दिले जाते. संतांनी परमात्म्याकडे पसायदान मागितले. संतत्व हे दिव्य कर्म आहे. त्यामुळे संत ज्ञानेश्वरांपासून चोखामेळ्यांपर्यंत सर्वांच्या जीवनात खडतर संकटे आहेत. ज्ञानेश्वरांपासून तुकारामांपर्यंत सर्वांनाच तत्कालीन धर्म मार्तंडांचा त्रास झाला आहे. ज्ञानदेवांच्या भिक्षेमध्ये माती मिसळली गेली. तुकारामांना त्रास दिला गेला. पण त्रास देणाऱ्यांनीच त्यांच्यावर

कर्मवीर व्याख्यानमाला पुष्प- तिसरे

आरती लिहिली. संत तुकाराम, समर्थ रामदास, आणि छत्रपती शिवराय हे समकालीन होते. शिवरायांमध्ये शौर्यातले संतत्व होते, तर रामदासांकडे संतत्वातले शौर्य होते, तर तुकारामांकडे प्रपंचातले वैराग्य होते. आसक्तीमुक्त होणे ही संतत्वाची खूणगाठ आहे. संन्यस्त होणे सोपे आहे. पण गृहस्थाश्रमाची कर्तव्य निभावणे हे अवघड आहे. त्यामुळे आधी प्रपंच करावा नेटका असे संतांनी सांगितले आहे. प्रपंचामध्ये भोगांच्या आहारी जाऊ नये तर परमार्थिक विचारांचे जतन केले पाहिजे. संत साहित्य हा आपल्याला मिळालेला चिरंतनवारसा असून तो जपला पाहिजे. त्यामुळे आपल्या घरात ज्ञानेश्वरी, गाथा, दासबोध हे संत साहित्य असले पाहिजे. घरामध्ये किती वस्तू आहेत, यापेक्षा त्या घरामध्ये धर्म, संस्कृती, अध्यात्म यांचे किती संवर्धन होते हे महत्त्वाचे आहे. संत तुकारामांनी दंभावर प्रहार केले. चांगल्या मार्गाने धन मिळविण्याचा उपदेश केला. अंधश्रद्धा आणि बुवाबाजीवर प्रहार केले. नवसापासून गंडे दोऱ्यापर्यंत खोट्या व भ्रामक गोष्टींवर भाष्य करून ते निरर्थक असल्याचे सांगितले. नीता देव यांनी केले. व्याख्यानमालेच्या यशस्वीतेसाठी बँकेचे व्हाईस चेअरमन अशोक वाघमारे, मुरलीधर चव्हाण, सरव्यवस्थापक भारत उमाटे, गणेश बारंगुळे, विजय शिखरे, स्वप्निल राऊत आदींनी परिश्रम घेतले.

तुकारामांकडून अनासक्त होण्याचा उपदेश

तुकारामांनी आपल्या विवेक बुद्धीची कास धरून खऱ्या परमेश्वर प्राप्तीचा मार्ग सांगितला. तुकारामांनी माणुसकी आणि करुणा व समता आणि त्याग हीच मूल्ये महत्त्वाची असल्याचे ठासून सांगितले. तुकोबांनी अनासक्त होण्याचा हितोपदेश केला व तो आजही मार्गदर्शक आहे असे घळसासी यांनी सांगितले.

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

कृषी प्रदर्शनातील विजेत्या शेतकऱ्यांना नांगर व रोटावेटरचे वाटप

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.१५ फेब्रुवारी - महाराष्ट्र नवनिर्माण सेना लातूर व कृषी नवनिर्माण ऍग्रो प्रोड्युसर कंपनी नरवटवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर येथील श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेच्या प्रांगणात कृषी नवनिर्माण २०२५ या राज्यस्तरीय तिसऱ्या कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाचा नुकताच समारोप झाला.

या प्रदर्शनात येणाऱ्या शेतकऱ्यासाठी

लागणारे साहित्याचा लकी ड्रॉ ठेवण्यात आला होता.हा लकी ड्रॉ काढण्यात आला असून या लकी ड्रॉतील विजेत्यांना ओम साई ऍग्रोच्या कार्यालयात मनसेचे शेतकरी सेना अध्यक्ष संतोष नागरगोजे यांच्या हस्ते वितरित करण्यात आले. या मनसे राज्यस्तरीय तिसऱ्या कृषी प्रदर्शनातील लकी ड्रॉ तील पहिले बक्षीस परभणी जिल्ह्यातील पाथरी येथील सुभान युसुफ सय्यद यांना ओम साई ऍग्रो शिर्डी यांच्या वतीने नांगर बक्षीस देण्यात आला तर दुसरे बक्षीस लातूर जिल्ह्यातील नळेगाव येथील सूर्यकांत विश्वनाथ तोंडारे यांना धरती इंजिनिअरिंग राजकोट यांच्यावतीने रोटावेटर देण्यात आले. यावेळी ओम साई ऍग्रो आणि धरती इंजिनिअरिंग यांचे मुख्य वितरक प्रदीप आलापुरे यांनी विविध शेती उपयोगी अश्या अनेक यंत्राची माहिती दिली.या लकी ड्रॉ प्रसंगी सचिन सिरसाट,भागवत कांदे,पांडुरंग कदम,रणवीर उमाटे,किरण चव्हाण,मुनव्वर सय्यद, जहांगीर शेख आदी उपस्थित होते.

संक्षिप्त वृत्त...

आठवडी बाजाराचे ठिकाणे निश्चित

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.१५ फेब्रुवारी - शहरातील नागरिकांना आठवडी बाजाराच्या दिवशी त्यांना लागणारे भाजीपाला, फळे इ. खरेदी करता यावी यासाठी शहरात ७ ठिकाणी ७ दिवशी आठवडी बाजार भरविण्याचे महानगरपालिका मार्फत नियोजन करण्यात आले आहे.

शहरातील नागरिकांची सोय व्हावी, रहदारीस अडथळा होणार नाही व नागरिकांना आपापल्या परिसरामध्ये भाजीपाला घेण्याची सोय व्हावी याचा विचार करून नागरिकांना आपल्या जवळच्या भागात खालीलप्रमाणे आठवडी बाजाराचे ठिकाण निश्चित करण्यात आले आहे. सोमवार अब्दुल कलाम चौक ते सिद्धेश्वर मंदिर जाणारा रोड मंगळवार व शनिवार - विवेकानंद चौक पाण्याची टाकी परिसर बुधवार खाजा नगर ग्रीन बेल्ट खाडगाव रोड गुरुवार व रविवार कोयना सब स्टेशनच्या बाजूला , सावित्रीबाई फुले उद्यानाच्या समोर शुक्रवार - पार्थ हॉटेल ते नांदगाव वेस तरी शहरातील पथविक्रेते, ग्रामीण भागातून आलेले छोटे व्यावसायिक व व्यापारी यांनी महानगरपालिका व वाहतूक पोलीस यंत्रणा यांचेकडून देण्यात आलेल्या नियमाचे व सूचनांचे पालन करावे, तसेच नागरिकांनी वरीलप्रमाणे आपल्या सोयीच्या ठिकाणी नेमून देण्यात आलेल्या दिवशी दि. १७ फेब्रुवारी पासून सदर आठवडी बाजारामधून खरेदी करून महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

बँक कर्मचारी युनायटेड फोरमची निदर्शने

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.१५ फेब्रुवारी - मागील काही वर्षापासून प्रलंबित असलेल्या बँक कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी युनायटेड फोरम ऑफ बैंक युनियन्सच्यावतीने संपूर्ण देशभरातील प्रमुख शहरांत शुक्रवारी निदर्शने करण्यात आली. शहरातील बैंक ऑफ महाराष्ट्रच्या मिनी मार्केट शाखेसमोर बैंक कर्मचाऱ्यांनी निदर्शने केली.

यावेळी धनंजय कुलकर्णी, उमेश आडगावकर, बालाजी बावलगे, विवेक पदरे, अभिषेक बाहेती, राहुल सावंत, कैलाश कच्छवे, सदाशिव मुगावे, सचिन नंदागवळे, स्वप्निल जाधव, नरसिंग कुलकर्णी, रोहन गरजे, रेश्मा भवरे, सरिता यांच्यासह सर्व बँकांचे कर्मचारी व निवृत्त कर्मचारी उपस्थित होते. यावेळी धनंजय कुलकर्णी म्हणाले, बँकेत वाढत असलेला कामाचा ताण पाहता व बँकेच्या नवीन उघडत असलेल्या अनेक शाखा याचा विचार करता बँकांमध्ये पुरेशी नोकरभरती करण्याची गरज आहे. अपुऱ्या कर्मचारी संख्येमुळे ग्राहक सेवेवरही परिणाम होत आहे. अनेकदा संप, निदर्शने व आंदोलने करूनही सरकार बँकांमध्ये पुरेशी नोकर भरती करत नाही. सर्व कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करण्यात यावी. सर्व शाखांमध्ये व एटीएममध्ये सुरक्षारक्षकांची नेमणूक करण्यात यावी, आदी मागण्यांसाठी निदर्शने करण्यात आली.

माजी नगर सेवक निलेश ठक्कर यांचा भाविकांनी केला सत्कार

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.१५ फेब्रुवारी - मोती नगर,येथील रहिवासी व प्रसिद्ध उद्योजक निलेश (भैय्या) ठक्कर यांनी

मंदिर देवस्थान मंडळाच्या आग्रहास्तव मोतीनगर श्री जय मल्हार खंडोबा देवस्थान बांधकाम करून देण्याचे आशवासन दिले व प्रत्यक्षदर्शी बांधकामास सुरूवात झाली आहे.

त्यामूळे मोतीनगर श्री जयमल्हार खंडोबा देवस्थान येथील भावीक भक्त व देवस्थान मंडळाच्या वतीने निलेश ठक्कर यांचा सत्कार करून आभार व्यक्त करण्यात आले.यावेळी खंडोबा देवस्थाचे वारू मंडळाचे अध्यक्ष जयराम बाबूराव सुर्यवंशी,अनिल धुमाळ,गोवींद धुमाळ, अशोक काळे, गणेश हाके, बालाजी काळे, सागर सुर्यवंशी, खंडू कुंजीर, नितीन सुर्यवंशी, पांडूरंग भिसे,ईश्वर घायळ यांनी त्यांचा सत्कार केला.

पाशा पटेल यांच्या प्रयत्नांना मंत्रिमंडळाचे पाठबळ देणार: ना.भरत गोगावले

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.१५ फेब्रुवारी - मानव जात जगवण्यासाठी बांबू लागवडीच्या माध्यमातून क्रांतिकारी प्रयत्न करणाऱ्या पाशा पटेल यांच्या प्रयत्नांना राज्य मंत्रिमंडळाच्या माध्यमातून खंबीर पाठबळ देऊ अशी ग्वाही राज्याचे रोजगार हमी मंत्री भरत शेठ गोगावले यांनी दिली.

फिनिक्स फाउंडेशन संस्था, लोदगा जि. लातूर आणि गोदरेज (STEC) यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरणीय योद्ध्यांचा सन्मान सोहळा लोदगा, लातूर येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी उद्घाटक म्हणून रोजगार हमी योजनाचे मंत्री भरत गोगावले हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील आणि आमदार गोपीचंद पडळकर उपस्थित होते.

यावेळी बोलताना रोहयो मंत्री भरत शेठ गोगावले म्हणाले, पाशा पटेल यांना फ्रीहँड दिला पाहिजे. शास्त्रज्ञाला कमी पडेल इतका अभ्यास पाशा पटेल यांनी केला आहे. रोजगार हमीच्या योजना बांबू लागवडीसाठी लाभदायक आहेत. वर्षानुवर्ष थोडीफार निगा राखून बांबू लागवड करणे सहज शक्य आहे. महाराष्ट्र हितासाठी पाशा पटेल यांनी उचललेल्या प्रत्येक गोष्टीसाठी मंत्रिमंडळाचे पाठबळ देण्याची जबाबदारी आम्ही घेतो.'

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले, जगाला आणि देशाला वाचवण्यासाठी बांबू लागवड आता महत्त्वाची आहे. बांबू शेती बांधावर आणि कुंपण म्हणून करणे अधिक फायदेशीर आहे. आमदार गोपीचंद पडळकर म्हणाले, मानव जातीला वाचवण्याचे केंद्र लोदग्याच्या माळरानावर सुरू झालं आहे.

दहा वर्षानंतर पाशा पटेल यांचे घराघरात फोटो लागतील. मी बांबू लागवडीमध्ये पाशाभाई यांचा कार्यकर्ता होण्याचे मी मान्य केले आहे. शेतीमध्ये असंख्य अडचणी असल्यामुळे बांबू लागवडीकडे वळणे आता काळाची गरज आहे. लावलेला बांबू आता छढ्झउ माध्यमातून बांबू खरेदीची आता हमी मिळणार आहे.

राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष आणि मुख्यमंत्री पर्यावरण संतुलित विकास ट्रान्सपोर्ट चे कार्यकारी अध्यक्ष पाशा पटेल म्हणाले, 'लोदग्याच्या माळावरून जग वाचवण्याची मोहीम सुरू केली आहे.हरित महाराष्ट्राच्या मोहिमेसाठी पैसा रोजगार हमीतून मिळणार आहे. अमेरिकेतील नुकतेच लागलेले वणवे आणि बर्फवृष्टी हे वातावरण बदलाचे परिणाम आहे.

रोजगार हमी मधून दोन हेक्टर पर्यंत प्रती हेक्टरी बांबू लागवडीसाठी अनुदान मिळत आहे. जागतिक बँकेच्या वतीने राज्य सरकारच्या 'मित्र' संस्थेच्या माध्यमातून दहा हजार कोटीचा प्रकल्प आकाराला येत आहे. त्यातून दोन हेक्टर वरील शेतकऱ्यांना निश्चितपणे बांबू लागवडीसाठी आर्थिक मदत मिळेल, असे पाशा पटेल यांनी सांगितले. उसाच्या शेतीपेक्षा बांबूची शेती फायदेशीर ठरणार असल्याचे त्यांनी यावेळी आकडेवारी निशी स्पष्ट केले. लातूर जिल्हा कृषी अधीक्षक जाधव आर. टी.,अहिल्या गाठाळ, उप जिल्हाधिकारी रोजगार हमी योजना लातूर,राजेंद्र शहाडे, राज्य गुण नियंत्रक रोजगार हमी योजना महाराष्ट्र राज्य अतिरिक्त मुख्याधिकारी अस्लम तडवी, वन अधिकारी अमित जाधव आणि कॉन बॅकचे संजीव करपे यावेळी उपस्थित होते. या सत्कार सोहळ्यामध्ये लातूर जिल्ह्यामध्ये बांबू लागवड करणारे शेतकरी आणि या प्रयत्नांना साथ देणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि अधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.

वाहनाच्या धडकेत सिग्नल कोसळला

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.१५ फेब्रुवारी - शहरातील गूळ मार्केट चौकातील वाहतूक सिग्नलला एटीएममध्ये पैसे भरणाऱ्या एका जीपने (एमएच १२ एसएक्स ०२०६) जोराची धडक दिली. यात सिग्नलचा खांब मोडून पडल्याची घटना गुरुवारी घडली. त्यामुळे सिग्नल व्यवस्था कोलमडून पडली. यात महापालिकेचे जवळपास १६ हजारांचे नुकसान झाले आहे. लवकरच मनपा या ठिकाणी नवीन पोल बसविणार आहे.

लातूरच्या विमान सेवेला मुख्यमंत्र्यांचा 'ग्रीन सिग्नल '

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.१५ फेब्रुवारी - लातूरच्या विमान सेवेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'ग्रीन सिग्नल ' दिला असून लातूरच्या विमानतळावरून लवकरच नियमितपणे हवाई वाहतूक सुरु होणार असल्याची माहिती भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश प्रवक्त्या प्रेरणा होनराव यांनी दिली.

लातूरला विमानतळ उपलब्ध आहे. पण त्याचा उपयोग केवळ राजकीय नेत्यांसाठीच केला जातो. लातूरच्या एकंदर विकासाचा आलेख पाहता येथील विमानतळाचा विस्तार, विकास होणे अतिशय गरजेचे आहे, या उद्देशाने आपण राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेऊन लातूरला नियमित विमान सेवा सुरु करण्याची विनंती केली असता क्षणाचाही विलंब न लावता मुख्यमंत्र्यांनी या मागणीला ग्रीन सिग्नल दिल्याचे प्रेरणाताई होनराव यांनी सांगितले. मागच्या दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात देश विकासाच्या दिशेने वेगाने मार्गक्रमण करत आहे. केंद्रीय रस्ते व दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांच्या दूरदृष्टीने देशाच्या कानाकोपऱ्यात महामार्गाचे जाळे विणले गेले आहे. लातूर जिल्ह्यातही महामार्गाचे जाळे मोठ्या प्रमाणात विणले जाऊन त्याचा लाभ नागरीकांकडून घेतला जात आहे.

रस्ते आणि रेल्वेच्या मुबलक उपलब्धीत लातूरकरांसाठी आता केवळ नियमित हवाई वाहतूकीची उणीव भासताना दिसतेय. याबाबत आपण राजकीय, सामाजिक, औद्योगिक, शैक्षणिक, आरोग्य अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांशी चर्चा केली असता, त्या सर्वांकडून लातूरला प्राधान्याने विमानसेवा सुरु होणे गरजेचे असल्याच्या प्रतिक्रिया आल्या. या प्रतिक्रिया ऐकून घेऊन आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीत लातूरच्या सर्वांगीण विकासासाठी नियमित हवाई सेवा सुरु करण्याची आग्रही मागणी केली. तेव्हा मुख्यमंत्र्यांनी या मागणीला तात्काळ होकार दिला. यावेळी लवकरच लातूरला विमान सेवा सुरू होण्याची शक्यता आहे.

शाहू महाविद्यालयात विज्ञान प्रदर्शन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.१५ फेब्रुवारी - येथील राजर्षी शाहू महाविद्यालयातील विज्ञान मंडळाच्या वतीने १७ फेब्रुवारीला राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

यात प्रथम प्रकल्पास रोख पाच हजार, द्वितीय तीन हजार व तृतीय दोन हजार, तसेच उत्तेजनार्थ एक हजार रुपयांची दोन पारितोषिके दिली जाणार आहेत.

राज्यातील कोणत्याही शाळेतील पाचवी ते नववीचे विद्यार्थी प्रदर्शनात सहभागी होऊ शकतात.

हज यात्रेकरुंसाठी लातुरात प्रशिक्षण शिबिर

रहेनुमा-ए-हज कमिटीचा पुढाकार

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.१५ फेब्रुवारी - हज कमिटी ऑफ इंडिया व राज्य हज कमिटीच्यावतीने २०२५ मध्ये हज यात्रेसाठी निवड झालेल्या भाविकांसाठी सुफा एज्युकेशन ॲण्ड सोशल वेलफेअर सोसायटी, आणि रहेनुमा-ए-हज कमिटीतर्फे बुधवार, १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मैसूर कॉलनी येथील एम. के. फंक्शन हॉल येथे प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

सुफा एज्युकेशन ॲण्ड सोशल वेल्फेअर सोसायटी आणि रहेनुमा-ए-हज कमिटी यांच्यावतीने दरवर्षी प्रशिक्षण शिबिर आयोजित केले जाते. याशिवाय आरोग्य तपासणी, लसीकरण शिबिरही घेण्यात येते. हज कमिटी तसेच खासगी टूर कंपनीकडून जाणाऱ्या भाविकांसाठी हे प्रशिक्षण शिबिर होणार असून शिबिरात तेथील सर्व प्रकारची माहिती तज्ज्ञांकडून दिली जाणार आहे. प्रशिक्षण शिबिरात महिला भाविकांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. भाविकांनी प्रशिक्षणासाठी उपस्थित राहावे. अधिक माहितीसाठी मौलाना सय्यद शौकत अली, मोहम्मद कामील मणियार, सलीम मणियार, सय्यद मुख्तेदरअली इनामदार यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन सुफा एज्युकेशन ॲन्ड सोशल वेल्फेअर सोसायटी, रहेनुमा-ए-हज कमिटीच्यावतीने मोहंमद कामील मणियार, मौलाना शौकतअली यांच्यासह संयोजकांनी केले आहे.

३ लाख ग्राहकांनी घरबसल्या भरले वीजबिल

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.१५ फेब्रुवारी - डिजीटल इंडियाच्या वाटचालीत आता महावितरणच्या वीजग्राहकांनी जोमाने सहभाग नोंदवला आहे. महावितरणच्या लातूर परिमंडलातील पावणेपाच लाखांहून अधिक ग्राहकांनी जानेवारी महिन्यात घरबसल्या ऑनलाईन पध्दतीचा वापर करीत वीजबील भरले आहे.

त्यामुळे ग्राहकांचे बिल भरणा केंद्रासमोर रांगेत उभे राहण्याचे कष्ट व वेळ वाचले आहेत, शिवाय बिलात ०.२५ टक्के सवलतही मिळाली. दरम्यान, १ जानेवारी ते ३१ मे या काळात सलग तीन वा अधिक वीजबिले ऑनलाईन भरणाऱ्या ग्राहकांना लकी ड्रॉद्वारे स्मार्टफोन, स्मार्टवॉच अशी आकर्षक बक्षिसे जिंकण्याची नामी संधी आहे. सर्व ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे यांनी केले आहे.

महावितरणच्या लातूर परिमंडलात टेक्नोसेव्ही ग्राहकांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, जानेवारी महिन्यात ३ लाख ८७ हजार ३१८ ग्राहकांनी २४ कोटी ५० लाख रुपयांची वीजबिले ऑनलाईन भरली आहेत. महावितरणच्या वतीने वीजग्राहकांना www.mahadiscom.in या वेबसाईटवर तसेच महावितरणच्या मोबाईल ॲपद्वारे केव्हाही व कुठूनही ऑनलाईन पद्धतीने कितीही रकमेचे वीजबिल ऑनलाईन भरण्याची सोय उपलब्ध आहे. त्याची कार्यपद्धती महावितरणच्या वेबसाईटवर दिलेली आहे. ग्राहकांना क्रेडिट/डेबिट कार्ड, नेट बँकिंग व यूपीआय इ. इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी त्यांचे वीजबिल भरता येते. ५ हजार रुपयांपेक्षा जास्त बिल असणाऱ्या सर्व लघुदाब ग्राहकांना आरटीजीएस / एनईएफटीद्वारे बिल भरता येते. क्रेडिट कार्ड वगळता इतर सर्व पद्धतीने वीजबिल भरण्यास कसलेही शुल्क लागत नाही. तसेच ऑनलाईन पेमेंटला बिलाच्या रकमेच्या ०.२५ टक्के इतकी सवलतही देण्यात आलेली आहे. वीजबिलांचे ऑनलाईन पेमेंट अत्यंत सुरक्षित असून, त्यास रिझर्व्ह बँकेच्या पेमेंट व सेटलमेंट कायदा-२००७ च्या तरतूदी लागू आहेत.

तात्काळ मिळते पोच वीजबिलाचे ऑनलाईन पेमेंट केल्यास ग्राहकांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर एसएमएसद्वारे त्वरित पोच मिळते. तसेच www.mahadiscom.in या वेबसाईटवर 'पेमेंट हिस्ट्री' तपासल्यास वीजबिल भरणा तपशील व पावतीही उपलब्ध होते. त्यामुळे ऑनलाईन बिल भरण्याच्या सुविधेचा ग्राहकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्य अभियंता सुंदर लटपटे यांनी केले आहे.

'गो-ग्रीन'द्वारे एकरकमी मिळणार १२० रुपयांची सूट महावितरणने लघुदाब ग्राहकांना वीजबिल ऑनलाईन भरण्यासह ई-मेलद्वारे वीजबिल मिळविण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. तसेच छापील कागदाऐवजी 'गो-ग्रीन' योजनेत वीजबिलाच्या फक्त ई-मेलचा पर्याय स्वीकारल्यास दरमहा १० रुपये सूट दिली जात आहे.

पालिकेच्या आदेशाला व्यवसायिकांचा ठेंगा

मस्जिद रोडवरील 'हॉकर्स झोन'मध्ये व्यवसाय करण्याचा निर्धार

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.१५ फेब्रुवारी - शहरातील गंजगोलाई परिसरातील फळ व भाजीपाला विक्रेत्यांना अतिक्रमणाच्या नावाखाली तेथून हटवल्यानंतर या विक्रेत्यांनी मस्जिद रोडवर व्यवसाय सुरू केला आहे. परंतु, तेथूनही हटविण्यात येत असल्याने महापालिका प्रशासन आणि शहर वाहतूक नियंत्रण शाखेचा आदेश धुडकावत मस्जिद रोड हा 'हॉकर्स झोन' असल्याचे सांगत तेथेच व्यवसाय करण्याचा निर्धार शुक्रवारी गंजगोलाईतील व दयानंद कॉलेजच्या समोरील पथविक्रेते, हॉकर्स आणि शेतकऱ्यांच्या झालेल्या बैठकीत करण्यात आला.

शहरातील गंजगोलाईत हातगाडीवर फळ विक्रेते, भाजीपाला विक्रेते व्यवसाय करीत होते. न्यायालयाच्या आदेशावरून गंजगोलाईच्या ७० फुटी सर्कलमधील व्यापाऱ्यांचे अतिक्रमण महापालिकेने पोलीस बंदोबस्तात हटविले. त्या व्यापाऱ्यांचे महापालिकेने फ्रूट मार्केट परिसरात पुनर्वसित केले. परंतु, तेथे ग्राहक येत नसल्याने कोणीही व्यापारी व्यवसाय करण्यास तयार नाहीत. गंजगोलाईतून उठविलेले व्यापारी मस्जिद रस्त्यावर गेले आहेत. यामुळे मस्जिद रस्ता जाम झाल्याने या व्यापाऱ्यांना तेथून हटविण्यात येत आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून शहरातील हातगाडे, पथविक्रेते आणि शेतकऱ्यांच्या व्यवसायावर महापालिकेने धडक कार्यवाही करून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आणली आहे. गंजगोलाई आणि दयानंद कॉलेजसमोर तसेच गंजगोलाईतील मस्जिद रोडवर व्यवसाय करण्याची संधी द्यावी, अशी मागणी करण्यात येत आहे. तरीही याकडे तेथून फळ व भाजीपाला विक्रेत्यांना हटविण्यात येत आहे. शुक्रवारी गंजगोलाई व दयानंद कॉलेजच्या समोरील पथविक्रेते, हॉकर्स आणि शेतकऱ्यांची बैठक झाली. गंजगोलाईतील मस्जिद रोड हा 'हॉकर्स झोन' आहे. त्यामुळे तेथे व्यवसाय करणार असल्याचा निर्धार या बैठकीत करण्यात आला. यावेळी स्वाभिमानी मुस्लीम विकास परिषदेचे अध्यक्ष मोहसीन खान, माजी नगरसेवक अहेमदखान पठाण, रवी शंके, फ्रूट असोसिएशनचे जाकीर बागवान, रईस टाके, बाबा शेख, इलाही शेख, शादुल शेख आदी उपस्थित होते.

आयुक्तांचा 'हिटलरी' निर्णय

न्यायालायाने गंजगोलाईतील ७० फूट रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याचे आदेश असताना, महापालिका संपूर्ण गोलाई 'व्यवसायमुक्त' करीत आहे. फेरीवाला समितीच्या धोरणांची अंमलबजावणी करण्यात येत नाही, फेरीवाला समिती सदस्यांशी चर्चा न करता महापालिका आयुक्त 'हिटलरी' निर्णय घेत आहेत, असा आरोप यावेळी करण्यात आला.

१३३८ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.१५ फेब्रुवारी - छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती व लातूर हॉस्टेल असोसिएशनतर्फे शिवजयंतीनिमित्त येथील ट्यूशन परिसरात विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिरास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळाला. यावेळी १ हजार ३३८ विद्यार्थ्यांची हिमोग्लोबीन, रक्तगट व रक्तदाब तपासणी करण्यात आली. हिमोग्लोबीन कमी असणाऱ्या विद्यार्थ्यांना औषधी देण्यात आली तसेच आहाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

उद्घाटन महापालिकेचे उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे व 'आरसीसी'चे प्रा. शिवराज मोटेगावकर यांच्या हस्ते झाले. यावेळी सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, ॲड. उदय गवारे, हंसराज जाधव, अभिजित देशमुख, संतोष पाटील, गणेश शिंदे, डॉ. अभय कदम, ॲड. विजय जाधव, धनंजय शेळके, लातूर हॉस्टेल असोसिएशनचे अध्यक्ष नितीन पवार, सचिव विजय जाधव, बालाजी पवार, प्रमोद साळुंके, श्वेता लोंढे, वैशाली यादव, सुबोध मगरे, इम्रान शेख आदींची उपस्थिती होती. प्रारंभी विद्यार्थ्यांसह उपस्थितांना टी. बी. मुक्तीची शपथ देण्यात आली.

प्रास्ताविक ॲड. गवारे यांनी, सूत्रसंचालन धनंजय जाधव यांनी केले. आभार विजय जाधव यांनी मानले.

हिंगोलीत जनप्रहार कामगार संघटनेचा वर्धापन दिन साजरा

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १५ फेब्रुवारी

शहरातील स्व. शिवाजीराव देशमुख सभागृहामध्ये काम गारांच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या जनप्रहार कामगार संघटनेचा तिसरा वर्धापन दिन विविध सामाजिक उपक्रम ांनी साजरा करण्यात आला. अन्यायग्रस्त, पीडित काम गार वर्गाला न्याय मिळवून देण्यासाठी कामगार नेते नितीन दलित दवंडे यांनी आपल्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन तीन वर्षांपूर्वी जनप्रहार कामगार संघटना महाराष्ट्र राज्य या कामगार संघटनेची स्थापना करून त्या माध्यमातून लोकशाहीच्या मार्गाने आंदोलन, मोर्चे काढून कामगारांना न्याय देण्याचा सातत्याने प्रयत्न सुरू ठेवला आहे. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. किशोर इंगोले म्हणाले की, कामगाराच्या हिताकरिता ही संघटना काल देखील अखंड होती आज देखील अखंड आहे आणि येणाऱ्या काळात देखील अखंड रा-हील. जनप्रहार संघटनेने या तीन वर्षातच अनेक कामगारांना शासनाशी लढा देण्यास सक्षम केले आहे. ह्या संघटनेचे पदाधिकारी कामगाराच्या हिताकरिता त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी निर्भीडपणे उभे आहेत. डॉ. इंगोले यांनी फुले-शाहू-आंबेडकर व अण्णाभाऊ साठे यांचे कामगारांच्या कल्याणासाठी असलेले योगदान सांगितले. तद्वतच संघटनेचा कार्यकर्ता कसा असावा यावर विस्तृत मार्गदर्शन केले. हवे बरोबर तोंड फिरवणारे शंभर लोक असण्यापेक्षा वादळात उभी राहणारी मोजकीच लोकं पाहिजे. संघटनेचा प्रत्येक कार्यकर्ता हा निष्ठावान असला पाहिजे. संघटना म्हणजे पोट भरण्याचे साधन नसून समाज परिवर्तनाचे माध्यम आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. यावेळी अनेक पदाधिकाऱ्यांचा नवीन निवडीबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना स्वतंत्र कृती समिती चे प्रदेश उपाध्यक्ष प्रशांत रामटेके हे हो-ते. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष स्वामी विवेकानंद सेवा ट्रस्ट, मुख्य कार्यकारी अधिकारी पुरुषोत्तम कुटे हे होते. कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना स्वतंत्र कृती समितीचे प्रदेश सह कोषाध्यक्ष रत्नपाल डोफ ेे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून शिवाजी महाविद्यालय हिंगोली येथील सहयोगी प्राध्यापक तथा आंबेडकरी विचारवंत डॉ. किशोर इंगोले हे उपस्थित होते. तर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सरकारी कामगार अधिकारी टी ई कराड, रिपब्लिकन सेना युवा प्रदेशाध्यक्ष किरण घोंगडे, सरकारी कामगार अधिकारी हिंगोली चे सेवानिवृत्त कर्मचारी भीमराव दवंडे, सुप्रसिद्ध गीतकार गोविंद भारशंकर आदी उप-स्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संघटनेच्या तीन वर्षाच्या कामाचा लेखाजोगा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नितीन दवंडे यांनी मांडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. दीपिका सरकटे, यांनी केले तर आभार प्रदर्शन दे-वराव वाघमारे यांनी केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने पदाधिकारी, महिला वर्ग व पुरुष मंडळी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संस्थापक सचिव सिद्धार्थ दवंडे, पवन ढवळे, राजेश पारधे, रोहित नगरकर, रवी आ-हेर, विशाल गायकवाड व संस्थेचे सर्व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

आदर्शमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर कार्यशाळा संपन्न

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १५ फेब्रुवारी

येथील आदर्श शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात प्रधानमंत्री उच्चस्तर शिक्षा अभियान (पीएम उशा) अंतर्गत क्रीडा विभागाच्या वतीने नवीन शैक्षणिक धोरण : २०२० शी संबंधित क्रीडा क्षेत्रातील क्रेडिट स्कोअरची अंमलबजावणी या विषयावर एक दिवसीय विद्यापीठस्तरीय कार्यशाळचे आयोजित करण्यात आले.

या कार्यशाळेला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव यांची उपस्थिती होती तर उद्घाटक म्हणून स्वामी रामानंद तीर्थ म राठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील क्रीडा अभ्यास मंडळाचे अध्यक्ष मा. डॉ. कैलास पाळणे हे उपस्थित होते. सदरील कार्यशाळेला साधन व्यक्ती म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील आंतरविद्या शाखेचे अधिष्ठाता मा. प्रा.(डॉ.) चंद्रकांत बाविस्कर हे होते.

तसेच प्रा. (डॉ.) दिपक बच्चेवार प्राचार्य, कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय, हडोळती, ता. अहम दपूर, जि. लातूर, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील सिनेट सदस्य डॉ. महेश बेंबडे, डॉ. मीनानाथ गोमचाळे सदस्य, क्रीडा अभ्यास मंडळ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, एमसीव्हीसी समन्वयक डॉ. संजय कयाल, आयक्यूएसी समन्वयक डॉ. सचिन पत्की, पीएम उशा समन्वयक प्रा. अमजदखान पठाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

उद्घाटणीय भाषणात डॉ. कैलास पाळणे यांनी नविन शैक्षणिक धोरण:२०२० यावर सखोल मार्गदर्शन केले. या धोरणात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल तसेच शारीरिक व मानसिक दृष्ट्या सुदृढ कसा होईल याचा विचार करण्यात आला आहे, त्यादृष्टीने खेळाला महत्त्व दिले पाहिजे. ज्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळाडू तयार होतील असे मत मांडले.

अध्यक्षीय भाषणात प्रो. डॉ. विलास आघाव यांनी खेळ, योग, जीवनातील ध्यान आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे सतत वाढत जाणारे महत्त्व समजून घेऊन, नवीन शैक्षणिक धोरण : २०२० द्वारे कल्पना केलेली खेळाशी संबंधित उद्दिष्टे पूर्ण करण्याचा मानस आमच्या या कार्यशाळेचा आहे. हि कार्यशाळा उच्च शिक्षणात खेळाचे महत्त्व प्रभावीपणे समजण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल असे मनोगत व्यक्त केले.

पहिल्या तांत्रिक सत्राचे अध्यक्ष डॉ. महेश बेंबडे होते या सत्राचे बीज भाषक म्हणून प्रा.(डॉ.) चंद्रकांत बाविस्कर यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी नवीन शैक्षणिक धोरण प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी नाविन्यपूर्ण क्रीडा तंत्र, ट्रेंड आणि वैयक्तिक प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देणे गरजेचे आहे मत मांडले तसेच क्रीडा आणि एकूण शैक्षणिक कार्यक्रमातील क्रेडिट स्कोअर प्रणालीबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले.

दुसऱ्या तांत्रिक सत्राचे अध्यक्ष डॉ. मीनानाथ गोमचाळे होते. या सत्राचे बीज भाषक म्हणून प्राचार्य डॉ. दिपक बच्चेवार यांनी मार्गदर्शन केले. नवीन शैक्षणिक धोरणाकडे आंधळेपणाने न बघता डोळसपणे बघायला पाहिजे. भारतातील क्रीडा क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी, राष्ट्राच्या समग्र विकासासाठी, क्रीडा शक्तीचा वापर करण्यासाठी, राष्ट्र उभारणीसाठी खेळाशी संबंधित अभ्यासक्रम तयार करून क्रेडिट स्कोअर निर्माण केले पाहिजे असे मत व्यक्त केले. कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी प्रास्ताविकपर मनोगत क्रीडा विभाग प्रमुख व संयोजक डॉ. आनंद भट्ट यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सचिन हाटकर यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. नरेंद्र रायलवार यांनी केले.

सदरील कार्यशाळेच्या यशस्वी नियोजनासाठी क्रीडा विभागाचे विभाग प्रमुख व संयोजक डॉ. आनंद भट्ट, आयक्यूएसी समन्वयक डॉ. सचिन पत्की, पीएम उशा समन्वयक प्रा. अमजदखान पठाण, प्रा. नरेंद्र रायलवार, कार्यालयीन अधीक्षक दिलीप दुबे, कैलास डिडाळे, प्रा. गजानन चव्हाण, डॉ. सुयोग दोडल, डॉ. विलास पवार, डॉ. अविनाश पावडे, डॉ. अण्णाजी मडावी, डॉ. बस्वराज लक्षटे, डॉ. प्रशांतकुमार जोशी तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

संत सेवालाल महाराज जयंतीनिमित्त रक्तदान शिबीर

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १५ फेब्रुवारी

शहरातील खटकाळी बायपास येथे आज दिनांक १५ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता सद्गुरु सेव-ालाल महाराज यांच्या २८६ व्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिर मोफत बॉडी चेकअप मिशन २०२५-२६ फिट इंडिया अंतर्गत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर अनेक नव तरुणांनी तसेच समाजातील नागरिकांनी मोठ्या संख्येने रक्तदान शिबिरात रक्तदान केले. तसेच मिशन २०२५-२६ फिट इंडिया अंतर्गत या शिबिरात मोफत बॉडी चेकअप करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन विलास चव्हाण यांच्यावतीने करण्यात आले होते. रक्तदान शिबिरात जवळपास ४५ लोकांनी रक्तदान केले. तर मोफत बॉडी चेक अप मध्ये जवळपास ८० लोकांनी मोफत बॉडी चेक अप केली. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी विलास चव्हाण, आरोग्य सल्लागार सुनील राठोड, शेषराव चव्हाण, शेषराव राठोड, गजानन राठोड, अश-ोक चव्हाण, एकनाथ राठोड, प्रवीण चव्हाण, सुनील रिठे, अमित मोडक, ज्ञानेश्वर फरकंडे, किशनराव फलटणकर, सविता राठोड,स्नेहा मोडक,राहुल नरवाडे यांच्या सह इतरांनी परिश्रम घेतले.

संक्षिप्त वृत्त

उद्योगांशी संबंधीत बैठकीला उपस्थित रहावे

हिंगोली- जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार, (दि.१७) रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हा उद्योग मित्र समिती सभा, जिल्हा सल्लागार समिती सभा, स्थानिक लोकांना रोजगारात प्राधान्य जिल्हास्तरीय समिती सभा व आजारी उद्योग पुनरुज्जीवन जिल्हास्तरीय समिती सभा, जिल्हा निर्यात प्रचालन समिती सभा, डीएलटीएफसी संबंधित बैठकीचे जिल्हा उद्योग केंद्राच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीस जिल्ह्यातील औद्योगिक संघटनेचे पदाधिकारी, उद्य-ोजक संबंधित अधिकारी व पदाधिकारी उपस्थित राहाणार आ-हेत. तरी जिल्ह्यातील उद्योजकांनी आपल्या उद्योगाशी संबंधित अडी-अडचणी सोडविण्यासाठी व आपल्या समस्याचे निराकरण करण्यासाठी या बैठकांमध्ये सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अनिल कदम यांनी केले आहे.

सक्षम संरक्षण क्षमता महोत्सवाचे आयोजन

औंढा नागनाथ- जीवाश्म इंधनावरील वाया जाणारा खर्च रा-ेखणे, परकी तिजोरीवरील वाढता भार कमी करणे, आणि जीवाश्म इंधन जाळल्यामुळे निर्माण होणाऱ्या हरितगृह वायूंच्या प्रतिकूल परिणामापासून पर्यावरणाचे संरक्षण करणे यासाठी जनतेमध्ये जनजागृती करण्यासाठी पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने सक्षम संरक्षण क्षमता महोत्सवाचे आयोजन केले आहे.हा महोत्सव १४ फेब्रुवारीते २८ फेब्रुवारी दरम्यान आयोजित होणार असून संपूर्ण देशभर या महोत्सवाचे टॅगलाईन 'ग्रीनअँडक्लीन एनर्जीद्वारे क्लीन एन्व्हायरमेंट अर्थात हरित व स्वच्छ ऊर्जेचे अंगीकार करा व पर्यावरणात स्वच्छ बनवा अशी आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय व तेलउद्योगाचे राज्यस्तरीय समन्वयक संबंधित राज्य सरकारच्या सक्रिय सहभागाने जनजागृती पसरविण्यासाठी दरवर्षीच विविध उपक्रम हाती घेतात. पेट्रोलियम उत्पादनाच्या संवर्धनासाठी धोरणे प्रस्तावित करण्यात सरकारला मदत करण्यासाठी तेल विपणन कंपन्या आघाडीवर असतात. सक्षम संरक्षण क्षमता महोत्सवांमध्ये शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी गट चर्चा, वादविवाद, महाविद्यालयामध्ये भीतीचित्र स्पर्धा, इंधन कार्यक्षम ड्रायव्हिंग स्पर्धा, लेख लेखन, पत्रकार परिषद आणि टीव्ही व रेडिओवरील टॉक शो असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. यावेळी जिल्हा नोडल अधिकारी दिलीप बिसीकर, महेश शेळके, महेश भांगडिया आदींची उपस्थिती होती.

शासकीय विश्रामगृहात संत सेवालाल जयंती

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १५ फेब्रुवारी

येथील शासकीय विश्रामगृहात जिल्ह्यातील गोरबंजारा समाज बांधवांच्यावतीने संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी भाजपचे उपाध्यक्ष भागोराव राठोड, शंकर राठोड, उत्तमराव पवार, उल्हास राठोड, प्रा डी आर पवार, संतोष जाधव, विक्रम राठोड, वसंत जाधव, एल डी चव्हाण आदींची उपस्थिती होती. यावेळी भाग-ारोव राठोड यांनी संत सेवाल-ाल महाराज यांच्या कार्याबद्दल माहीती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन एल डी चव्हाण यांनी केले तर आभार पत्रकार संतोष जाधव यांनी मानले. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने गोर बंजारा समाज बांधव उपस्थित होते.

पोलिस संघ आणि व्यापारी संघ विजयी

शिवजन्मोत्सव क्रिकेट लिग सामन्यांना प्रचंड प्रतिसाद

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १५ फेब्रुवारी

सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती व पत्रकार संघाच्या वतीने शिवजन्मोत्सवानिमि त्त शहरातील संत नामदेव पोलिस कवायत मैदानावर ११ फेब्रुवारीपासून क्रिकेट लिग मॅचेसचे आयोजन करण्यात आले आहे. १५ फेब्रुवारी रोजी खेळविण्यात आलेल्या दोन सामन्यांत प्रथम सामना पोलीस संघ हिंगोली विरुद्ध महावितरण यांच्या सामना झाला यामध्ये पोलीस संघाने विजय प्राप्त केला तर दुसऱ्या सामन्यांमध्ये कोरोना योद्धा आरोग्य विभाग (जिल्हा सामान्य रूग्णालय) व व्यापारी क्रिकेट संघात अतिशय रोमहर्षक असा सामना झाला यामध्ये चित्तथरारक लढतीमध्ये व्यापारी महासंघाने विजय मि ळवला.

यावेळी व्यापारी महासंघाचे अध्यक्ष तथा माजी आमदार गजाननराव घुगे, माजी नगराध्यक्ष जगजितराज खुराणा, माजी उपनगराध्यक्ष बिरजू यादव, व्यापारी महासंघाचे ज्ञानेश्वर माम डे अबिद अली जहागिदार, काँग्रेसचे जिल्हा प्रवक्ते विलास गोरे, जहीर भाई विटवाले,पवन मुंदडा, सोमाणी समिती मार्गदर्शक कल्याण देशमुख, नगरपरिषद स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, शिवा घुगे आदींची उपस्थिती होती. या सामन्याचे धावते समालोचन मराठी मधुन गोपालराव सरनायक,प्रदून गिरीकर तर हिंदी मधून राकेश भट्ट यांनी केले. पंच म्हणून इम्रान कालीवाले, दिनकर कागणे तर स्कोरर म्हणून रोमन सय्यद यांनी काम पाहिले. क्रिकेट लिग मॅचेसमध्ये १६ फेब्रुवारी रोजी सकाळी ६:३० वाजता होणार असून पहिला सामना तृतीय बक्षीस करिता कोरोना योद्धा सिव्हिल संघ* विरूद्ध महावितरण संघ तर दुसरा सामना प्रथम व द्वितीय बक्षीस करिता व्यापारी महासंघ विरुद्ध हिंगोली पोलीस संघ यांच्यात होणार आहेत. संघांनी वेळेवर उप-स्थित रहावे असे आवाहन पत्रकार संघाकडून आयोजक शिवाजी मेटकर, सुनील पाठक यांच्याकडून करण्यात आले आहे.

पुलवामा दहशतवादी हल्ल्यातील शहीद जवानांना हिंगोलीत श्रध्दांजली

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १५ फेब्रुवारी

देशातील जम्मू काश्मीरच्या पुलवामा येथे १४ फ ेब्रुवारी २०१९ रोजी झालेल्या दहशतवाद्यांच्या भ्याड हल्ल्यात शहीद झालेल्या भारत मातेच्या वीरजवान सुपुत्रांना हिंगोली येथे भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

जम्मू काश्मीर श्रीनगर हायवेवर दहशतवाद्यांनी विस्फोटक कारद्वारे सी आर पी एफ च्या जवानांच्या बसला धडक देवून दहशतवाद्यांनी अंदाधुंद गोळीबार केला होता. त्यामुळे जवळपास ४० जवानांना वीरम रण आले. या भ्याड हल्ल्यात देशातील जवानांना सह महाराष्ट्रातील लोणार येथील नितीन राठोड, व मलकापूर येथील संजय राजपूत ही शहीद झाले होते. यावेळी ज्येष्ठ पत्रकार डॉ विजय निलावार, सामाजिक कार्यकर्ते गणेश साहू, भाजपचे बाबा घुगे, शाम खंडेलवाल, सुभाष नायक, मोतीराम घोडेकर नंदकुमार लव्हाळे, अजय भट्ट, सुभाष दराडे, राजू बांगर, चंदू शिखरे, शेख शाहबाज, सुनील काळे, प्रकाश नीनाळ आदींची उपस्थिती होती.

शिवाजी महाविद्यालयात संत सेवालाल महाराज जयंती उत्साहात साजरी

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १५ फेब्रुवारी

श्री शिवाजी शिक्षण प्रस-ारक मंडळ हिंगोली संचलित शिवाजी महाविद्यालय कोथळज रोड हिंगोली येथे संत सेवालाल महाराजांची जयंती उत्साहात संपन्न झाली.

या समारंभास अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब क्षीरसागर, तसेच प्रमुख पाहुणे म्हणून कार्यालयीन अधीक्षक श्री उत्तमराव जाधव यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी जाधव यांनी संत सेव-ालाल यांचय जीवनचरित्रावर प्रकाश टाकला. डॉ.संदीप लोंढे, डॉ.गुणाजी नलगे, डॉ. एन. आर. हुरगुळे, कनिष्ठ म हाविद्यालय शिक्षक पर्यवेक्षक प्रा. देवानंद येवले, परीक्षा विभाग प्रमुख प्रा. प्रकाश पिंजन, प्रा. धाराशिवशिराळे,प्रा.प्रकाश पतंगे,डॉ.सौ. संगीता मुंडे, डॉ. सौ. सुनंदा भुसारे, डॉ.सौ. मनीषा गवळी, प्रा. सौ. प्रियंका पवार, प्रा. सौ. नीलम काळे, प्रा. संजय चव्हाण, प्रा. तुकाराम चौतमल, प्रा. बळीराम शिंदे, प्रा. माणकेश्वर गलांडे, डॉ. सुनील कांबळे, डॉ. किशोर इंगोले, ग्रंथपाल डॉ. गणपत पवार, प्रा. दीक्षित इंगोले, श्री विजय पवार, प्रा. कैलास खंदारे, डॉ. बाप्पा जाधव, डॉ. शेरकर, डॉ. रामदास मुक्ते, डॉ. श्रीराम कराळे यांच्यासह समस्त प्राध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

पोलिसांच्या अवैध रेती उपसावरील कारवायांच्या धास्तीने

बिहारी टोळ्यांनी धरला घरचा रस्ता

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. ११ फेब्रुवारी

मागील पंधरवाड्या पासून जिल्हा पोलिस दलाच्या वतीने अवैध वाळु उपसा, वाहतुकीविरोधात कारवाई सुरू आहे. नदी पात्र परिसरात फिरणाऱ्यांना बिहारी मजुरांना लाठीचा प्रसाद देखील देण्यात येत असल्याने रेती उपसासाठी आलेले परप्रांतातील मजूर परतीच्या वाटेला लागले आहेत. मागील दोन दिवसात बहुतांश बिहारी टोळ्या नांदेड सोडून गेल्या आहेत तर काही परतीच्या वाटेवर आहेत.

राज्यात मोठ्या प्रमाणात अवैधरित्या वाळु उपसा वाहतुक सुरू असल्यामुळे या अवैध उपसाची दखल वरिष्ठ पातळीवर

घेण्यात आली असून ठिकठिकाणी कारवाई सुरू आहे. त्याच पद्धतीने नांदेड जिल्हा पोलिस दलाच्या वतीने देखील मागील पंधरवाड्यापासून जिल्ह्यातील प्रत्येक पोलिस ठाणे तहसीलच्या मदतीने कारवाई करत आहे. या कारवाईत पोलिसांनी कोट्यावधी रुपयांचे साहित्य जप्त केले असून अनेकांवर गुन्हे दाखल केले आहेत. केवळ वाहन चालकांवरच गुन्हे दाखल करण्यात आले असले तरी या कारवाईसत्राचा धसका रेती माफियांसह बिहार मजुरांनी घेतला असून अवैधरित्या होणारी वाळु उपसा व वाहतुक बऱ्याच प्रमाणात बंद झाली आहे. त्यामुळे वाळु उपसासाठी परप्रांतातून आलेल्या मजुरांना काम नसल्याने त्यांनी आता परतीची वाट धरली आहे. काम नाही त्यातच एखादा परप्रांतीय मजुर नदी पात्र परिसरात भेटल्यास त्याला पोलिसांकडुन 'प्रसाद' मिळत असल्याने अनेकांनी नांदेड सोडणेच पसंत केले आहे. मागील दोन दिवसापासून बिहारी मजुरांनी घरची वाट धरली आहे. अनेक बिहारी टोळ्या नांदेड सोडून गेल्या आहेत तर काही टोळ्या पुन्हा रेती उपसा सुरू होईल या आशेने नांदेडातच तळ ठोकुन आहेत. या बिहारी टोळ्यांना प्रत्येकी १ गाडी १ हजार रुपये देण्यात येतात. एका टोळीत ५ ते ७ मजुरांचा समावेश असतो तर ही टोळी एका रात्रीतून १५ ते २० गाड्या भरते. मोठ्या प्रमाणात उपसा होत असल्याने अनेक परप्रांतिय मजुरांनी नांदेडची वाट धरली होती. परंतू पोलिसांनी कारवाईसत्र सुरू करताच या बिहारी टोळ्यांनी पुन्हा घरची वाट धरली आहे.

रेती माफियांचा 'मॅजिक'

पोलिस दलाच्या वतीने मागील पंधरा दिवसापासून कारवाई सुरू असल्याने वाळु उपसा, वाहतुक बंद आहे. ४०७ टिप्पर व हायवाच्या माध्यमातून होणारी रेती वाहतुक बंद झाली असली तरी पोलिसांच्या डोळ्यात धुळफेक करत काही रेती माफिया रेती वाहतुकीसाठी छोटा हत्ती मॅजिक वाहनांचा वापर करत असून पोलिसांनी रेती माफियांच्या 'मॅजिक'कडे लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

आदिवासी युवकांना रोजगारासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यास शासन कटीबद्ध : उईके

तभा वृत्तसेवा
किनवट,दि. १५ फेब्रुवारी

राज्यातील १३ जिल्हे पेसा कायद्याअंतर्गत समाविष्ट आहेत त्या अंतर्गत आदिवासी प्रकल्प कार्यालयामार्फत आदिवासी विकास कार्यक्रम राबविण्यात येतो. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवस कृतीकार्यक्रमांतर्गत दिनांक ७ फेब्रुवारी रोजी त्या त्या विभागातील मंत्री, जिल्हाधिकारी, प्रकल्प अधिकारी तसेच संबंधित सर्वोच्च अधिकारी यांनी एक दिवसाचा मुक्काम केला त्यांच्या अहवालानुसार आश्रमशाळेत अत्यावशक भौतिक व शैक्षणिक सुविधा तात्काळ उपलब्ध करून दिल्या जातील तसेच राज्यातील बेरोजगार आदिवासी युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासनाने विविध योजना आखल्या असून त्याची लवकरच अंमलबजावणी करण्यात येईल अशी माहिती राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांच्या संकल्पनेतुन १०० दिवस कृती आराखडा संकल्पने अंतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय किनवट येथिल लाभार्थी, अधिकारी व कर्मचारी यांच्या सोबत बैठक व आढावा घेण्याच्या दृष्टीने ते दि १५ फेब्रुवारी रोजी किनवट दौ-यावर आले असताना गोकुंदा येथील शासकीय विश्राम गृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

त्यांनी सांगितले कि, राज्यातील १३ जिल्हे पेसा कायद्या अंतर्गत समाविष्ट आहेत. त्या अंतर्गत आदिवासी प्रकल्प कार्यालया मार्फत आदिवासी विकास कार्यक्रम राबविण्यात येतो. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांच्या १०० दिवस कृती कार्यक्रमा अंतर्गत दिनांक ७ फेब्रुवारी रोजी राज्यातील ४९७ आश्रमशाळांमध्ये त्या त्या विभागातील मंत्री, जिल्हाधिकारी, प्रकल्प अधिकारी, संबधित सर्वोच्च अधिकारी यांनी एक दिवसाचा मुक्काम केलेला होता. राज्यातील बेरोजगार आदिवासी युवकांना रोजगार उपलब्ध व्हावे या करिता विविध योजना आखल्या असुन त्या लवकरच अमलात येतील तर बेरोजगार आदिवासी युवकांना व्यवसाया करिता अर्थसहाय्या करण्याच्या योजना ही अमलात आणल्या जाणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

किनवट तालुक्यासह राज्यातील आदिवासी महिलांवरील अत्याचाराच्या घटनांसंदर्भात त्यांना प्रश्न विचारला असता त्यांनी स्पष्ट केले कि, राज्याचे सरकार हे आदिवासी महिला असो किंवा कोणत्याही संवर्गातील महिला असो त्यांच्या सुरक्षे संदर्भात अत्यंत संवेदशिन असुन महिलांवरील अत्याचाराचे प्रकरण जलदगती न्यायालयात चालऊन आरोपीना कठोर शासन केले जाईल. या करिता सर्व संबधित विभागांना तत्काळ कृती करण्याच्या सुचना देण्यात आल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

आश्रमशाळेतील कर्मचा-यांना निवासाची व्यवस्था केलेली असते परंतु ज्या कर्मचा-यांना निवासाची व्यवस्था नसते व ते कर्मचारी त्यांच्या अपेक्षित कार्यालयीन वेळेत उपस्थित राहत नसेल अशांवर कारवाई करण्यात येईल. आपली वेळेत सेवा बजावुन मग तो कर्मचारी काय करतो हा त्याचा वैयक्तीक प्रश्न असल्याचे उईके म्हणाले.

यावेळी त्यांनी एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयाला भेट दिली व त्यानंतर भारतीय जनता पक्षाचा संघटनात्कम आढावा घेऊन पदाधिका-यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी किनवट शहरातील राष्ट्रीय स्वंयसेवक कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांच्या सोबत किनवट विधानसभेचे आमदार भिमराव केराम, हदगावचे आमदार बाबुराव कोहळीकर यांच्यासह भाजपा, शिवसेना, महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.

'चार साहिबजादे सिख युथ फेस्टीव्हल'च्या अकाराव्या स्पर्धेची जय्यत तयारी सुरू

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. १५ फेब्रुवारी

सिख एज्युकेशन वेलफेअर असोसिएशन चे अध्यक्ष जरनैलसिंघ भुजगसिंघ गाडीवाले यांच्या वतीने आजोयित सिख युथ फेस्टीव्हल ची जय्यत तयारी सुरू करण्यात आली आहे.

सिख एज्युकेशन वेलफेअर असोसिएशन सेवा संस्थेच्या वतीने गेल्या दहा वर्षापासुन निरतंर पणे सिख युथ युथ फेस्टीव्हल चे आयोजन केले जाते हा आयोजन श्री गुरु गोंविदसिंगजी यांचे चार पुत्र (अर्थात) चार साहिबजादे यांनी मानवतेसाठी आणी अधर्माच्या विरोधात लढत असताना दिलेल्या बलिदानाच्या पावन स्मृतीमध्ये सिख खुथ फेस्टीव्हलच्या नावाने कार्यक्रम पार पडतो. यंदाचा आयोजनाचा हा आकरावा वर्ष असुन १९ ते २० फेब्रुवारी २०२५ दरमान्य अशा दोन दिवशीय स्पर्धाचे आयोजनाचे खालसा हायस्कुल मैदानावर जय्यत तयारी सुरू असल्याचे माहिती कार्याक्रमाचे आयोजन जर्नलसिंघ भुजगसिंघ गाडीवाले यांनी दिली आहे. या कार्याक्रमचा उद्घाटन संमारभ १९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११.३० वा होणार तर बक्षीस वितरण कार्याक्रम तारीख २० फेब्रुवारी २०२५ रोजी सांय ४.३० वा. होणार आहे. या क्रर्याक्रमाचे उद्घाटन व बक्षीस संमारभ संत महापुरुष व विविध पक्षातील जेष्ठ नेते, अधिकारी मान्यवर, व जेष्ठ नागरीक यांच्या शुभ हस्ते होणार आहे. या आयोजनामध्ये पगडी बांधणे, गुरुवाणी कंठ, हॉकी, व्हीलीबॉल, बॅटमिटन अश्याप्रकारे धार्मिक व खेळ स्पर्धा युवक व युवती साठी पार पडणार आहे. या कार्यक्रमाच्या स्थानाला दिवाण तोडरमल जैन असे नाव देण्यात येत आहे अशी माहिती सुध्दा गाडीवाले यांनी दिली आहे. तसेच या कार्यक्रमाला युवक व युवतीनी जास्ती जास्त संख्येने सहभाग घ्यावे. असे आव्हान कार्यक्रमाचे आयोजक व संस्थेचे अध्यक्ष जरनैलसिंघ भुंजगसिंघ गाडीवाले यांनी केले आहे.

संक्षिप्त वृत्त

रातोळी येथील श्री रोकडेश्वराची यात्रा विविध उपक्रमांनी उत्साहात

नायगांव-तालुक्यातील रातोळी येथील सकल ग्रामस्थांचे ग्रामदैवत श्री.रोकडेश्वर मंदिराच्या यात्रेची १६६ वर्षापूर्वीपासून परंपरा ही कायम ठेवत. यंदाची यात्रा विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. श्री रोकडेश्वर यात्रेच्या निमित्ताने पालखी मिरवणूक, नयनरम्य आतिषबाजी,व जंगी कुस्त्यांचे सामने, कला महोत्सव विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या मेजवानीसह पार पडली . दि. १४ रोजी श्री रोकडेश्वर कला मंचावर सांस्कृतिक कला महोत्सव सोहळा पार पडला. या वेळी नायगांव, मुखेड तालुक्यातील विवीध शाळेतील मुला - मुलींनी मराठी, हिंदी गाण्यांच्या ठेक्यावर नृत्याचे सादरीकरण करुन रसिक श्रोत्यांची मने जिंकली असून. यावेळी मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थीत होता श्री रोकडेश्वर कला मंचावर सांस्कृतिक कलेचे सादरी करण करणाऱ्या सर्व कलावंताचे श्री रोकडेश्वर यात्रा महोत्सव कमिटीच्या वतीने सन्मान प्रमाणपत्र ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.यंदाच्या वर्षातील श्री.रोकडेश्वराची यात्रा यशस्वी करण्यासाठी यात्रा समितीचे अध्यक्ष शिवराज रातोळीकर,माजी सरपंच विश्वांभर रातोळीकर,नंदू रातोळी कर, तूकाराम गोविंद रातोळीकर,संदीप रातोळीकर, साहेब राव रातोळीकर, अंकूश रातोळीकर, सरपंच प्रतीनिधी राहुल रातोळीकर, बी.जी.रातोळीकर, व्यंकटराव टाकळे रातोळीकर, डॉ.शिवसांब चिद्रे , हाणमंत रातोळीकर, जे.डी. रातोळीकर, अरुण रातोळीकर,विजय रातोळीकर, हाणमंत रातोळीकर, विजय रातोळीकर,शिवाजी लूगारे सह अनेक गांवकरी मंडळीने मोलाचे परीश्रम घेऊन ही यात्रा यशस्वी केले आहे. रातोळी येथील श्री रोकडेश्वर यात्रेच्या निमित्ताने श्री रोकडेश्वर कला मंचावर सांस्कृतिक कलेचे सादरी करण करुन सर्व प्रथम क्रमांक मिळविलेल्या कलाकाराचे यात्रा समितीच्या वतीने सन्मान प्रमाण पत्र व ट्राफी देऊन सन्मानित करण्यात आले.

संत रविदास महाराज जयंती उत्साहात

माहूर-भारतीय संत आणि कवी संत शिरोमणि संत गुरु या उपाधीने ओळखले जाणारे संत रविदास महाराज यांची ६४८ वी जयंती अ.भा.

गुरु रविदास समता परिषद शाखा,माहूरच्यावतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. संघटनेच्या संपर्क कार्यालयात अनेक अनुयायी तसेच सर्वधर्मीय प्रतिष्ठित मान्यवर नागरीकांच्या उपस्थितीत अभिवादन सोहळ्याचे आयोजन करण्यात येऊन विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर तथा संत रविदास महाराज यांच्या प्रतीमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी भाजप ओबीसी प्रदेश सचिव अनिल वाघमारे, उपनगराध्यक्ष ज्ञानेश्वर लाड, भाजपाचे ज्येष्ठ नेते नंदकुमार जोशी,पं.स.माजी सभापती वसंतराव कपाटे, शिवसेना (उबाठा) श.प्र.निरधारी जाधव,अ.भा.गुरु रविदास समता परिषद (ग्रामीण) जिल्हा उपाध्यक्ष संजय बनसोडे, अ.भा. गुरु रविदास समता परिषदेचे तालुकाध्यक्ष ड.नितेश बनसोडे, माजी नगरसेवक इलियास बावानी, राज ठाकूर, अमृत जगताप, मारोती कांबळे, चंद्रकांत देवरसे, प्रवीण कांबळे, नां. जि.म. सहकारी बँकेचे सेक्रेटरी संजय वांगे आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

मरवाळी तांडा ग्रामपंचायतीसह आश्रम शाळेत संत सेवालाल महाराजांची जयंती साजरी

नायगाव-तालुक्यातील मरवाळी तांड्यासह माध्यमिक आश्रम शाळेत संत सेवालाल महाराजांची २८६ वी जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. नायगांव तालुक्यातील मरवाळी तांड्या सह येथील माध्यमिक आश्रम शाळेत दि.१५ रोज शनिवारी सकाळी शाळेच्या भव्य प्रांगणात सर्व प्रथम प्राचार्य विजय कुमार देशमुख,सुर्यकांत जाधव,नामदेव राठोड शिवराम राठोड यांनी बंजारा समाजाचे आराध्य दैवत तथा थोर विचारवंत संत सेवा लाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन पुष्प अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. तद्नंतर प्राथमिक चे नागोराव चव्हाण,एकनाथ मुनगीलवार, साहेबराव येवरे, सुभाष राठोड , सुभाष कदम , माधवराव वाघमारे, गणेश मारताळेकर आनंदराव सूर्यवंशी, दिपक बि-हाडे, उत्तम राठोड, सचिन राठोड सह, आदि शिक्षक वृंदानी सामुहिक पणे बंजारा समाजाचे समाज सुधारक, संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्प अर्पण करुन अभिवादन करीत २८६ वी जयंती साजरी करण्यात आली. तर यावेळी पोष्ट बेसिक ज्यू.कॉलेज चे प्राध्यापक अवचित शेजूळ यांनी उपस्थित विद्यार्थ्या समोर बंजारा समाजाचे आराध्य दैवत अंधश्रद्धा अनिष्ट रूढी परंपरा विरुद्ध समाज प्रबोधन करणारे थोर विचार वंत समता, न्याय, बंधुतावादी विचारांचे उदगाते, संत सेवालाल महाराजांच्या जिवन पैलूवर आपले मनोगत व्यक्त केले आहे. यावेळी नागनाथ येल्लूरे, संभाजी मेहेत्रे, धोंडिबा तेलंग, बालाजी राठोड, लक्ष्मण चव्हाण चिलमवाडसह आदि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हाणेगाव येथे संत सेवालाल महाराज जंयती साजरी

तभा वृत्तसेवा
हाणेगाव,दि. १५ फेब्रुवारी

दि.१५ रोजी बंजारा समाजाचे आराध्य दैवत संत सेवालाल महाराज यांच्या २८६ व्या जयंतीनिमित्त समाजसेवक संजय आनंदराव चव्हाण यांच्याकडून असलम शेख यांच्यातर्फे जि.प.हायस्कुल,कन्या शाळा,स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल येथे जिलेबी वाटप करण्यात आले यावेळी असंख्य विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतले आहे तर आनेकांनी या कार्याच कौतुक ही केले आहे.

संत गजानन महाराज प्रगट दिनानिमित्त शिवपुराण कथेचे आयोजन

तभा वृत्तसेवा
निवघा बाजार,दि. १५ फेब्रुवारी

श्री गजानन महाराज मंदिर संस्थान चक्री व समस्त गावकरी मंडळी चक्री ता. हदगाव यांच्या वतीने श्री संत गजानन महाराज शेगाव यांच्या १४७ व्या प्रकट दिनानिमित्त व चक्री येथील श्रींच्या मूर्ती प्रतिष्ठापना वर्धापन दिनानिमित्त हदगाव तालुक्यातील मौजे चक्री येथे समस्त गावकरी मंडळीच्या वतीने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री गजानन विजय ग्रंथ व्यासपीठ नेतृत्व ह. भ. प. अनिताताई सुर्यवंशी पाटील चक्रीकर तर शिवपुराण कथेचे वाचन पांडुरंग महाराज दिवटपिंप्रीकर यांच्या सुमधुर वाणीतून होणार आहे. परिसरातील सर्व भाविकभक्तांनी साप्तहात आयोजित सर्व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी मंडळी चक्री यांच्या वतीने करण्यात आले आहे.

विविध मागण्यांसाठी लाइनस्टाफ कर्मचाऱ्यांचे आंदोलन

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. १५ फेब्रुवारी

इलेक्ट्रिसिटी लाईनस्टाफ असोसिएशनतर्फे महावितरण कंपनीतील लाईनस्टाफ कामगारांचे सुरक्षित साधने मिळण्याकरिता व प्रलंबित ज्वलंत प्रश्न निकाली काढण्याकरिता सोमवार, १० फेब्रुवारी विभागीय कार्यालयासमोर द्वारसभा, निदर्शने करण्यात आली.

महाराष्ट्र राज्यात प्रत्येक घरात वीज पोहोचविण्याचे कार्य महावितरण कंपनीतील आपल्या सर्वांच्या संपर्कातील तळागाळात कार्यरत असणारे लाईनस्टाफ (लाईनमन) कामगार आहेत. आता याच तळागाळात कार्यरत असणाऱ्या कामगारांवर अन्याय होत आहे. मागील अनेक वर्षापासून त्यांना दैनंदिन लागणारी सुरक्ष साधाने त्यांना व्यवस्थित मिळत नाहीत. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात महावितरण अंतर्गत दरवर्षी हजारो अपघात होतात त्यात मोठ्या प्रमाणात लाईनस्टाफ कामगारांचे अपघात होऊन मृत्यू होत आहे. यासह अनेक ज्वलंत प्रश्नाबाबत ठोस निर्णय अद्याप महावितरण प्रशासन तसेच ऊर्जा मंत्री यांच्याकडे प्रलंबित आहे त्यामुळे या श्रेणीवर अन्याय होत असल्याने लाइनस्टाफ राज्यभरात सोमवारपासून आंदोलना सुरू गेले आहेत. त्याच अनुषंगाने नांदेड विद्युत भवन समोर आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात झोन अध्यक्ष ईश्वर सिंघ टेलर, झोन सचिव मोहन सिंग जांगडे, साईनाथ जाधव, दत्ता गाडेकर, प्रियंका सूर्यतळे, विद्या डेरणासे, विश्वदीप वाघमारे,गजानन कुरुडे, कैलाश राऊत,जाकीर अली शेख, वैभव मोरे, यांच्यासह अनेक कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला.

आरिफ तांबोळीची महसूल सहाय्यक पदी निवड

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. १५ फेब्रुवारी

मुखेड तालुक्यातील ग्राम चांडोळा येथील रहिवासी तथा सर्वसामान्य कुटुंबातील आरिफ मोहियोद्दीन तांबोळी याची महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आलेल्या महाराष्ट्र सेवा गट-क सन २०२३ सालातील परीक्षेतून महसूल सहाय्यक पदी निवड झाली आहे. नुकताच एमपीएससी गट-क मुख्य परीक्षेची सर्वसाधारण गुणवत्तेची निवड यादी संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली.त्यात चांडोळा येथील होतकरू तरूणाने भरारी घेतल्याचा निकाल हाती आला.येथील किरकोळ व्यापारी मोहियोद्दीन तांबोळी यांचे हे कनिष्ठ सुपूत्र आहेत.यांनी मिळेल तो व्यवसाय करीत आपल्या मुलास पुणे येथे पाठवले होते. काही वर्षांपासून पूर्व परीक्षा,मुख्य परीक्षा अशी धडपड आरिफची कष्टदायी राहिली आहे.

सरसम येथे भिमाई जयंती उत्साहात साजरी

तभा वृत्तसेवा
हिमायतनगर,दि. १५ फेब्रुवारी

हिमायतनगर तालुक्यातील मौजे सरसम (बु) येथे दिनांक १४ फेब्रुवारी रोजी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार,महामानव,विश्वरत्न,बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आई माता भिमाई रामजी आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

सर्वप्रथम माता भिमाई रामजी आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. माता भिमाई यांच्या जीवनकार्याला उजाळा दिला. जे स्वातंत्र्य,समता, बंधुता आणि एवढे सुख सुविधा प्राप्त झाल्या आहेत. ते म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच झाल्या आहेत. आणि या थोर समाजसुधारकाला जन्म देणाऱ्या माता भिमाई यांच्यामुळेच आपल्याला हे सर्व मिळाले आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे पिता रामजी आंबेडकर व त्यांच्या परिवाराला सांभाळणाऱ्या तसेच लेकरा बाळांवर योग्य ते संस्कार करणाऱ्या माता भीमाईच होत्या. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मानंतर अवघ्या पाच वर्षातच त्यांचा मृत्यू झाला.त्यांनी त्यांचे जीवन आंबेडकर घराण्यासाठी अहोरात्र झिजविले.यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना जन्म देणाऱ्या भीमाईचे कार्य समाजाने विसरता कामा नये.आजच्या माता माऊल्यांनी माता भीमाईचा आदर्श घ्यावा. यावेळी रुपाली कांबळे, संघप्रिया कवडे, आम्रपाली नगराळे, माजी सरपंच शेषेकला नगराळे, बालाजी कांबळे, मायावती कांबळे, कमलबाई कांबळे, वंदना नगराळे, संजय वाठोरे, विजय वाठोरे, सरस्वताबाई कांबळे, प्रभावती कांबळे, राजू नगराळे, अमन नगराळे, दिशांत कांबळे, दक्ष कवडे यासह अनेक जन मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विविध नागरी सुविधांसाठी काँग्रेसचे नगर परिषदेला निवेदन

तभा वृत्तसेवा
मुदखेड,दि. १५ फेब्रुवारी

मुदखेड नगर परिषदेची मागील काही वर्षांपासून निवडणूक न झाल्याने सध्या नगर परिषदेवर प्रशासक राज असून गत काळात नगर परिषदेने काही जाचक अटी व नियम भारतीय राज्य घटनेने दिलेल्या विशेष अधिकारा अन्वये लागू करण्यात आले आणि शहरात सार्वजनिक ठिकाणी नागरी सुविधा उपलब्ध नसून सामान्य नागरिकांना सुविधेचा अभाव होत असून नागरिकांना अडचणीचा सामना करावा लागतो करिता काँग्रेस पक्षाने दिनाक १२ फेब्रुवारी रोजी निवेदन सादर करत मालमत्तेवरील थकीत बाकीवर २४% टक्के व्याजदर कपाती जाचक अटी व नियम रद्दबातल करण्यात यावे आणि सार्वजनिक ठिकाणी नागरी सुविधा प्रदान करण्यात यावी अशी मागणी देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

याप्रसंगी नगरपरिषदेचे कार्यालयीन अध्यक्ष मोहम्मद अजीमुद्दीन यांनी निवेदन स्वीकारले.

मुदखेड नगर परिषदेच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या जनतेच्या मालमत्तेच्या थकीत बाकींवर २४ टक्के व्याजदर आकारण्यात येत असून थकित बाकीदारांवर २४ टक्के व्याजदर अधिकचा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असुन २४ टक्के व्याजदर ताबडतोब कपात करण्यात यावी, शहरातील पथदिवे दिवसभर चालू असतात वेळेनुसार बंद चालू करण्यात यावे,कालेजी देवी ते बारड बायपास पर्यंत पथदिवे लावण्यात यावे, उमरी रोड ते नांदेड रोड वरील बंद असलेले पथदिवे चालू करण्यात यावे, ग्रामीण भागातून येणाऱ्या महिलांसाठी, शाळकरी मुलींसाठी आणि महिला भगिनींसाठी शौचालयाची व्यवस्था नगरपरिषदेच्या सुलभ शौचालयाच्या माध्यमातून करून महिलांसाठी शौचालय गृह निर्माण सुविधा पुरवण्यात यावी. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि वाल्मिकी ऋषी यांच्या पुतळ्याच्या नियोजीत जागेतील व्यापारी संकुल समोरील गाळ्यातील दोन्ही बाजूने नव्याने शौचालय चालू करण्यात येत असून ते व्यापारी संकुल च्या पाठीमागच्या भागात बांधकाम करण्यात यावे सह इतर मागण्यांसाठी निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनावर शहर काँग्रेस कमिटी अध्यक्ष कैलास गोडसे, माजी नगराध्यक्ष राजबहादुर कोत्तावार, माजी उपाध्यक्ष लक्ष्मणराव देवदे, माजी उपाध्यक्ष करीम खान साहब, जिल्हा सहसचिव गिरीश कोत्तावार, तालुका कार्याध्यक्ष मोहम्मद गौस अब्दुल नबी, शहर उपाध्यक्ष सूर्यकांत चौदंते, शहर सचिव अतिक अहमद, शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष मुजीब पठाण, संजय बोकेफोड, युवक काँग्रेसचे शहर उपाध्यक्ष अविनाश चौदंते, युवक काँग्रेसचे शहर सचिव आकाश सोनटक्के, राधेश्याम पाटील ढगे, कुलदीप मल्लेवार, मोहम्मद युसुफ अब्दुल रहमान, अब्दुल लतिफ टेलर, संजय बोकेफोड, शेख मोइन भाई फुलवाले, सुरेश पाटील ढगे, यशवंत रणखांबे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

मार्क मेमो हरवला आहे

नंदगाव तांडा पाटी ते इस्लापूर प्रवासादरम्यान **जोशी मंगल नारायणराव** या नावाचा पूर्वतयारी परीक्षा (यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक) चा मार्क मेमो व इतर कागदपत्र हरवले आहेत. तरी कोणाला मिळाल्यास संपर्क करावा.

पत्ता :
जोशी मंगल नारायणराव
रा. इस्लापूर ता.किनवट
मो.९६५७७२५३८३

एमआयडीसी, महामार्ग प्राधिकरणाच्या विभागीय कार्यालयात

आ.संदीप क्षीरसागरांकडून बीडच्या महत्त्वाच्या प्रश्नांवर संभाजीनगरमध्ये बैठका

तभा वृत्तसेवा
छत्रपती दि.१५ फेब्रुवारी

बीडच्या अतिशय महत्त्वाच्या प्रश्नांवर आ.संदीप क्षीरसागर यांनी शुक्रवारी (दि.१४) एमआयडीसी आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या विभागीय कार्यालयात बैठका घेतल्या. यावेळी बीड येथील एमआयडीसीचा विकास आणि बीडच्या बायपासवरील स्लीप सर्व्हिस रोड व उड्डाणपूलांच्या विषयावर सविस्तर चर्चा झाली.

बीड जिल्ह्याचा औद्योगिक विकास होण्यासाठी नवनवीन उद्योग बीडमध्ये यावे लागतील. त्यामुळे सर्वप्रथम बीड शहरात असलेल्या एमआयडीसीचा विकास होणे अत्यंत गरजेचे आहे. ही बाब लक्षात घेऊन आ.संदीप क्षीरसागर यांचा, बीडच्या एमआयडीसीच्या विकासाबाबत सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. गेल्या आठवड्यातच आ.क्षीरसागर यांनी बीड येथील शासकीय विश्रामगृहात औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकार्यांसमवेत बैठक घेतली होती. यानंतर आता पुन्हा छत्रपती संभाजी नगर येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या विभागीय कार्यालयात आ.क्षीयसागर यांनी याच विषयावर बैठकप घेऊन एमआयडीच्या वरिष्ठ अधिकार्यांसमवेत सविस्तर चर्चा केली. यासोबतच बीडच्या बाह्यवळण रस्ता म्हणजेच बायपासवर उड्डाणपूल नसल्यामुळे नियमितपणे अपघात होत होते. तसेच स्लीप सर्व्हिस रोड नसल्यामुळे नागरिकांना वाहतुकीसाठी मोठी अडचण निर्माण झाली होती. याबाबतही आ.संदीप क्षीरसागरांनी शासन, प्रशासन आणि न्यायालयात पाठपुरावा करून हा प्रश्न मार्गी लावला. आता बीडच्या बायपासवर महालक्ष्मी चौक, जिरेवाडी व छत्रपती संभाजी महाराज चौक, समनापूर या दोन्ही ठिकाणी उड्डाणपूल आणि परळी रोड, नाथापूर रोड, इमामपूर रोड या ठिकाणांवर स्लीप सर्व्हिस रोडच्या कामाची निविदा प्रक्रिया सुरू आहे. याबाबतचा आढावाही आ.संदीप क्षीरसागर बैठकीत घेतला. संभाजीनगर येथे झालेल्या एमआयडीसीच्या बैठकीस माजी आ.सय्यद सलीम, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती सोनाली मुळे तसेच इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. तर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या बैठकीस माजी आ.सय्यद सलीम, प्रकल्प संचालक श्री.रवींद्र इंगोले यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने भिमाई जयंती साजरी

तभा वृत्तसेवा
माजलगाव दि.१५ फेब्रुवारी

भारतीय बौद्ध महासभा तालुका माजलगाव च्या वतीने शुक्रवार रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या माता भिमाई यांची जयंती सांची बुद्ध विहार केसापुरी कॅम्प या ठिकाणी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाची शुरूवात तथागत गौतम बुद्ध, डॉ बाबासाहेब आंबेडकर व माता भिमाई यांच्या प्रतिमांचे पुजन करुण धम्म वंदनेने करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभेचे बौद्धाचार्य डी पी वाघमारे होते. तर भारतीय बौद्ध महासभेच्या केंद्रीय शिक्षिका लिलाताई उजगरे,जिल्हा संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे, बी राजभोज, माजी संरक्षण उपाध्यक्ष गुलाब प्रधान,तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे उपस्थित होते.

शामभाऊ वाघमारे,लिलाताई उजगरे,एन बी राजभोज यांनी भिमाईच्या जिवनावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक बौद्धाचार्य डी पी पोटभरे केले तर सुत्रसंचलन साळवे यांनी केले. कार्यक्रमासाठी नितीन डोंगरे, भगवान डोंगरे, राजेभाऊ साळवे,,मोहन काकडे ,गणपत भालेराव , सिद्धांत साळवे, शरद उजगरे, पोहरेताई, वैशालीताई गायकवाड, रमाताई राजभोज,प्रभावती वाघमारे ,गायसमुद्रेताई,कौसाबाई आवचारे,यांच्या सह भारतीय बौद्ध महासभेच्या पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

माजलगावातील भागवत कथेची उत्साहात सांगता

तभा वृत्तसेवा
माजलगाव दि.१५ फेब्रुवारी

माजलगाव शहरामध्ये शिवसेवाभावी संस्थेच्या वतीने शिवजयंतीनिमीत्त आयोजित विवाह सोहळ्यातील श्रीमद् भागवत कथेची सांगता आज दि. १४ शुक्रवारी झाली.

शहरामध्ये बाळु ताकट यांचे वतीने शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने आगळया - वेगळ्या पध्दतीने शिवजन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले असुन सामुदायिक विवाह सोहळ्याच्या ठिकाणी श्रीमद् भागवत कथा झाली. दि. ८ फेब्रुवारीला कथेला सुरूवात झाली होती. उज्जैन मध्यप्रदेश येथील कथाकार साध्वी अनन्या दिदी शर्मा यांच्या सुश्राव्य वाणीतुन मागील सात दिवस कथा चालली. सात दिवसीय श्रीमद् भागवत कथेतुन अनन्या दिदींनी विविध पैलु सांगीतले तर कथेत शिव - पार्वती विवाह, कृष्ण जन्मोत्सव, गोवर्धन पर्वत, श्रीकृष्ण लिला, कंस वध, रूक्मीणी विवाह, व्दारकादीश - सुदामा भेट अशा विविध झ्याक्यांनी कथेने लक्ष वेधले होते. दि. १४ शुक्रवारी या भागवत कथेची सांगता झाली तर याच ठिकाणी दि. १४ ते १६ किर्तन महोत्सव, दि. १७, १८, १९ फेब्रुवारी दरम्यान तिरूपती बालाजी देवस्थान येथील श्रीनिवास कल्याणम् महोत्सवात श्री देवी व भुदेवी भगवान स्वामी व्यंकटेश्वर सोबत दिव्य लग्नाची अनुभुती घेण्यासाठी उपस्थित रहावे असे आवाहन संयोजक बाळु ताकट, विनोद लड्डा, राहुल मुगदिया, प्रविण चांडक, एकनाथ मस्के, जगदीश साखरे, महेश होके यांचेसह आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

वडिलांच्या पुण्यतिथी निमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

ढोरगावच्या सरवदे कुटुंबाचा उपक्रम

तभा वृत्तसेवा
माजलगाव दि.१५ फेब्रुवारी

वडिलांच्या पुण्यतिथी निमित्त जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून ढोरगाव येथील माजी जिल्हा परिषद सदस्य बबनराव विठ्ठलराव सरवदे यांच्या कुटुंबीयांनी समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे.

शहरा पासून जवळच असलेल्या ढोरगाव येथील पोलीस पाटील कै. विठ्ठलराव सरवदे यांच्या पंधराव्या पुण्यतिथीनिमित्त त्यांचे मुलं माजी जिल्हा परिषद सदस्य बबनराव सरवदे आडत व्यापारी साहेबराव सरवदे प्रतिष्ठित शेतकरी छगनराव सरवदे डॉक्टर सदाशिव सरवदे या चार मुलांनी व त्यांच्या कुटुंबियांनी इतर खर्चाला फाटा देऊन जिल्हा परिषद शाळा लाहामेवाडी येथील विद्यार्थ्यांना दि.१३ फेब्रुवारी सकाळी दहा वाजता शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले या कार्यक्रमास च्या अध्यक्षस्थानी सरपंच अशोकराव वाघमारे होते तर उद्घाटक म्हणून सेवानिवृत्त बि.डि.ओ. सुभाषराव गडदे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक ओंकार खुरपे शिवसेनेचे तालुकाप्रमुख तुकाराम येवले माजी उपनगराध्यक्ष सतीश शेठ दुगड उद्योजक संपतराव हराळ मल्हार पतसंस्थेचे चेअरमन विशाल देवकते सेवानिवृत्त मुख्याध्यापक भगवानराव धरपडे, सेवानिवृत्त कर्मचारी अशोकराव देवकते, मल्हार सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष अशोकराव डोने, मुंजा हरी चिंचोलकर तुकाराम यमगर चंद्रकांत कापसे माणिकराव मदने गोपीनाथ मदने प्रकाश हांडे, शाळेचे मुख्याध्यापक शेख वहाब सहशिक्षक थेटे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

सहकार भारतीचे मार्गदर्शक सतीश मराठे यांच्या अमृत महोत्सव समारोहाचे १९ फेब्रुवारी रोजी आयोजन

सहकारातील कार्यकर्त्यांनी उपस्थित रहाण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा
अंबाजोगाई दि.१५ फेब्रुवारी

सहकार भारतीचे मार्गदर्शक सतीशजी मराठे यांच्या अमृत महोत्सव समारोहाचे बुधवार, दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी आयोजन करण्यात आले आहे. या अभिष्टचिंतन सोहळ्यास सहकार क्षेत्रात कार्यरत कार्यकर्त्यांनी बहुसंख्येने उपस्थित रहाण्याचे आवाहन दीनदयाळ नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष ऍड.मकरंद पत्की, उपाध्यक्ष ऍड.राजेश्वरराव देशमुख आणि बँकेच्या संचालिका सौ.शरयूताई हेबाळकर, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर व स्थानिक कार्यकर्त्यांनी केले आहे.

'बिना संस्कार नहीं सहकार' हे ब्रीदवाक्य असलेली 'सहकार भारती' ही सहकारी क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावर काम करणारी एकमेव स्वयंसेवी संस्था आहे. १९७९ मध्ये स्थापन झाल्यापासून आजपर्यंत, सहकार भारतीचे कार्य २८ राज्ये आणि ६५० हून अधिक जिल्हा केंद्रांमध्ये विस्तारले आहे. आज सहकार भारतीचे अनेक कार्यकर्ते हे सहकारी क्षेत्रातील सर्वोच्च संस्थांमध्येही सातत्यपूर्ण कार्य करीत आहेत. सहकार भारतीच्या संस्थापक सदस्यांपैकी एक प्रमुख कार्यकर्ते श्री.सतीश मराठे यांनी नुकतेच १ फेब्रुवारी २०२५ रोजी त्यांच्या वयाची ७५ वर्षे पूर्ण केली. श्री.मराठे यांनी अनेक वर्षे सहकार भारती महाराष्ट्राचे सरचिटणीस म्हणून ही उल्लेखनीय काम केले आहे आणि आज ही ते एक सामान्य कार्यकर्ता म्हणून काम करीत आहेत. काळानुसार, त्यांनी सहकार भारतीच्या राष्ट्रीय सरचिटणीस, राष्ट्रीय अध्यक्ष, राष्ट्रीय संरक्षक इत्यादी महत्त्वाच्या पदांवर जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या आहेत. या मालिकेत, श्री.मराठे यांना दुसऱ्यांदा आरबीआयचे संचालक होण्याची सुवर्णसंधी ही मिळाली आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेत काम करीत असताना, श्री.सतीश मराठे यांनी बँक ऑफ इंडियामधून त्यांच्या व्यावसायिक कारकिर्दीची सुरूवात केली. सहकार भारतीचे काम करण्यासाठी, श्री.मराठे यांनी सहकारीता क्षेत्रातील डोंबिवली नागरी सहकारी बँक आणि जनकल्याण सहकारी बँकेत मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून जबाबदारी अतिशय कार्यक्षमतेने पार पाडली. श्री.सतीशजी यांनी इंडियन बँक्स असोसिएशन आणि महाराष्ट्र आणि गोवा स्टेट ॲपेक्स बँकेचे संचालक म्हणूनही काम केले आहे. श्री.सतीशजी यांच्या अद्वितीय कार्याचा सन्मान करण्यासाठी, सहकार भारतीने बुधवार, दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी मुंबईत श्री.सतीश मराठे अमृत महोत्सव सोहळा आयोजित केला आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरचिटणीस श्री.भैय्याजी जोशी हे उपस्थित असतील आणि विशेष अतिथी म्हणून इफकोचे व्यवस्थापकीय संचालक श्री.डॉ.उदय शंकर अवस्थी आणि केंद्रीय सहकार राज्यमंत्री श्री.मुरलीधर मोहोळ हे मान्यवर उपस्थित राहतील. या कार्यक्रमात माजी केंद्रीय मंत्री श्रीमान सुरेश प्रभू स्वागत समारंभाचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून उपस्थित राहतील. या समारोहात संपूर्ण भारतातील नागरी सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, साखर कारखाने, दूध संघ, मत्स्यव्यवसाय इत्यादी क्षेत्रातील १२०० हून अधिक सक्रिय कार्यकर्ते उपस्थित राहतील असा अंदाज आहे. हा कार्यक्रम बीएपीएस श्री स्वामी नारायण मंदिर, स्वामी नारायण चौक, दादर सेंट्रल रेल्वे स्टेशनसमोर, दादर (पूर्व) मुंबई - ४०००१४ या ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी आम्ही तुम्हाला मनापासून आमंत्रित करीत आहोत. असे डॉ.उदय जोशी (राष्ट्रीय अध्यक्ष), दीपक चौरसिया (राष्ट्रीय सरचिटणीस) यांनी कळविले आहे. तरी या गौरवपर कार्यक्रमास बहुसंख्य कार्यकर्त्यांनी आवर्जून उपस्थिती द्यावी असे दीनदयाळ नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष ऍड.मकरंद पत्की, उपाध्यक्ष ऍड.राजेश्वरराव देशमुख, तथा बँकेच्या संचालिका शरयूताई हेबाळकर, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर आणि स्थानिक कार्यकर्त्यांनी केले आहे.

आकांक्षा कऱ्हाड यांची जलसंधारण अधिकारी म्हणून निवड

तभा वृत्तसेवा
अंबाजोगाई दि.१५ फेब्रुवारी

येथील आकांक्षा अंगदराव कऱ्हाड यांची महाराष्ट्र शासनाच्या मृद व जलसंधारण विभागात जलसंधारण अधिकारी (गट - ब) म्हणून निवड झाली आहे.

आकांक्षा ही अंबाजोगाई येथील योगेश्वरी शिक्षण संस्थेचे संचालक अंगदराव कऱ्हाड यांची कन्या असून तिने आपले शालेय शिक्षण श्रीमती गोदावरीबाई कुंकुलोळ योगेश्वरी कन्या शाळा व महाविद्यालयीन शिक्षण योगेश्वरी महाविद्यालय,अंबाजोगाई येथे पूर्ण केले. तसेच तिने चइएड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अंबाजोगाई येथून बी.ई (सिव्हिल) तर त्र्श्रींशिलहपळलरश्र एपसळ-पशशीळपस इघखढ भालकी येथून च.ढशलह. पूर्ण केले.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने २०२३ साली आयोजित करण्यात आलेल्या एकत्रित स्पर्धा परीक्षेच्या निकालावर आधारित जलसंधारण अधिकारी म्हणून त्यांना महाराष्ट्र शासनाने नियुक्ती पत्र दिले आहे.

तिने मिळवलेल्या या यशाबद्दल योगेश्वरी शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक डॉ.सुरेश खुरसाले, संस्थेचे अध्यक्ष श्री चंद्रशेखर बर्दापूरकर, सचिव कमलाकरराव चौसाळकर, कोषाध्यक्ष डॉ.शैलेश वैद्य तसेच संचालक मंडळातील सर्व सदस्य व इतर प्रतिष्ठित मान्यवरांनी तिचे अभिनंदन केले आहे.

रोटरीच्या शैक्षणिक साहित्य उपक्रमाअंतर्गत शाहू विद्यामंदिरला टीव्ही संच भेट

तभा वृत्तसेवा
केज दि.१५ फेब्रुवारी

रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ अंतर्गत रोटरी क्लब ऑफ सोलापूर यांच्या पुढाकाराने, डिस्ट्रिक्ट गव्हर्नर नॉमिनी जयेश पटेल यांच्या मेसर्स पी पी पटेल अँड कंपनी आणि रोटरी फौंडेशन च्या अर्थसह्याने व रोटरी क्लब ऑफ केजच्या उपक्रमांअंतर्गत केज शहरातील राजर्षी शाहू विद्यामंदिर शाळेला टीव्ही संच भेट देण्यात आला.

शैक्षणिक साहित्यांतर्गत विद्यार्थ्यांना आकलन क्षमता वाढावी व शिक्षण अधिक सुलभ होऊन अभ्यासाची गोडी निर्माण करण्याच्या उद्देशाने या टीव्ही संचाची अभ्यासक्रमाची डिझायनिंग करण्यात आली आहे. डिजिटल क्लासरूम च्या माध्यमातून गरजू शाळांना आपल्या अध्यापनाचा दर्जा उंचावण्यासाठी रोटरी ने हा उपक्रम हाती घेतला आहे. येत्या पाच वर्षात प्रतिवर्षी जिल्ह्यातील शंभर शाळांना अशा डिजिटल रुम तयार करण्यासाठी रोटरी मदत करणार आहे.

केज शहरातील राजर्षी शाहू विद्यामंदिर या शाळेत पहिल्या उपक्रमात अंतर्गत हा टीव्हीसंच भेट देऊन त्यामध्ये इयत्ता पहिली ते दहावीचा अभ्यासक्रम इन्स्टॉल करण्यात आला आहे. यावेळी सोलापूर रोटरीचे रो अतुल चव्हाण, रो महेश साळुंके, रो उदय शिंदे , केज रोटरीचे अध्यक्ष प्रकाश कामाजी, सचिव अनंत तरकसबंद, केज रोटरीचे हनुमंत भोसले, प्रवीण देशपांडे, सत्यवान राऊत, संस्थेचे अध्यक्ष ऍड राजेसाहेब देशमुख, सचिव जी बी गदळे, मुख्याध्यापिका सौ चाटे-गदळे, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी या महत्त्वाच्या उपक्रमाला आर्थिक सहाय्य करणाऱ्या मे. पी पी फौंडेशन चे केज रोटरीने विशेष आभार मानले.

स्वा सावरकर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचे जेईई मेन २०२५ परीक्षेत यश

तभा वृत्तसेवा
बीड दि.१५ फेब्रुवारी

स्वा.सावरकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बीड मधील १२ वी विज्ञान शाखेतील श्रावणी अशिष मालू ९९ % अदित्यअमोल कुलकर्णी ९७ % अभिजित भागवत सवासे ९५ % या विद्यार्थ्यांनी जेईई मेन परिक्षेत यश मिळवले आहे. सर्वांचे अभिनंदन भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई अध्यक्ष डॉ सुरेंद्र आलूरकर, कार्यवाह डॉ हेमंत वैद्य ,प्रा चंद्रकांत मुळे प्रशासकीय अधिकारी, विद्यासभा उपाध्यक्ष उमेश जगताप , स्थानिक व्यवस्था मडंळ अध्यक्ष डॉ पुरुषोत्तम कुलकर्णी , स्थानिक व्यवस्था मंडळ कार्यवाह डॉ अविनाश देशपांडे , शालेय समिती अध्यक्ष प्रमोद कुलकर्णी , प्राचार्य विठ्ठल काळे , उपमुख्याध्यापक माधव जोशी, विभागप्रमुख प्रा बाळासाहेब साळवे , सर्व प्राध्यापक वृंद यांनी केले आहे .

महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शाळा कृती समितीचा १२ वी पेपर तपासणीवर बहिष्कार

१४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी जोपर्यंत शासन करणार नाही तोपर्यंत संपूर्ण राज्यभरात १२ वी च्या पेपर तपासणीवर बहिष्कार-रत्नाकर माळी

तभा वृत्तसेवा
गेवराई दि.१५ फेब्रुवारी

शिक्षकांच्या आंदोलनामुळे महाराष्ट्र शासनाने प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व वर्ग तुकड्यांना वाढीव टप्पा १० ऑक्टोबर च्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजूर करण्यात आला व त्याचा शासन निर्णय १४ ऑक्टोबर २०२४ रोजी काढण्यात आला,परंतु ४ महिने झाले तरी अध्याप ही शासन हालचाल करताना करीत नाही खरे तर हिवाळी अधिवेशनात याचा निधी मंजूर होणे आवश्यक होते, परंतु राज्य सरकारने वेळकाढूपणा केला, पण येणाऱ्या मार्च च्या अधिवेशनात १४ ऑक्टोबर च्या निर्णयाची अंमलबजावणी होऊन निधी मंजूर होणे आवश्यक आहे यासाठी राज्यभरात सर्वच विधानसभा व विधानपरिषद यांच्या मधील आमदारांनी तशी पत्रे सरकारला दिली आहेत.

गेल्या २५ वर्षांपासून शिक्षक उपाशीपोटी राबतोय पण शासनाला दिसत नाही . आम्ही फक्त समाज घडवायचा का ? आम्ही खायचे काय ?आमची कुटूंबे जगवणार कशी ? एवढे होऊन ही हक्काच्या वेतनासाठी आम्हीच रस्त्यावर उतरून झगडावे लागत आहे हे पुरोगामी महाराष्ट्राला शोभणारे नाही,

त्यामुळे जोपर्यंत १४ ऑक्टोबर ची अंमलबजावणी शासन करीत नाही तोपर्यंत इ १२ वीच्या पेपर तपासणी वर आमचा बहिष्कार कायम राहील

याबाबत आम्ही प्रशासनाला २० जानेवारी २०२४ लेखी कळविले होते जर आमच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत व १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी केली नाही तर इ १२ वी च्या पेपर तपासणीवर बहिष्कार टाकला जाईल संबंधित प्रशासनाने ही याकडे दुर्लक्ष केले

हा बहिष्कार संपूर्ण राज्यात जाईल कोणतेही पेपर सोडवून घेतले जाणार नाहीत व तपासले ही जाणार नाहीत शासनास१आमची नम्रपणे विनंती आहे की १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करावी अन्यथा आम्ही आमच्या आंदोलनावर ठाम आहोत, याबाबत कोल्हापूर, सांगली सातारा रत्नागिरी सिधुदुर्ग हे सर्व जिल्हे सहभागी झाले आहेत उर्वरित सर्व महाराष्ट्रात बहिष्कार टाकला जाईल असे कृती समितीचे उच्च माध्यमिक चे विभागीय अध्यक्ष श्री रत्नाकर माळी यांनी सांगितले यावेळी राज्य निमंत्रक संजय लश्करे सचिव डॉ.चंद्रकांत बागणे, जिल्हाध्यक्ष भारत शिरगावकर,

जयसिंग जाधव यासह अनेक शिक्षक उपस्थित होते,

खंडेराव जगदाळे

राज्य सरकारने आमची फसवणूक न करता १४ ऑक्टोबर २०२४ चा शासन निर्णयाची अंमलबजावणी करावी व येणाऱ्या अधिवेशनात त्याची तरतूद करण्याबाबत निर्णय लवकरात लवकर न घेतल्यास इ १० वी च्या परीक्षेच्या पेपर तपासणीवर आम्ही ही बहिष्कार टाकणार

खंडेराव जगदाळे